SSK/ MAP/ SBT/ 10:00

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी./मु.शी.**: झुणका-भाकर केंद्राबाबात शासनाने निवेदन करण्यासंबंधी.

**उपसभापती** : झुणका-भाकर केंद्रे सुरु करण्याविषयी मी मागील आठवडयात सभागृहात निदेश दिले होते. त्याबाबतचे अजून झालेले नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, याबाबत मला विधिमंडळ कार्यालयाकडून काही कळविलेले नाही. मागील आठवडयात मी निवेदन घेऊन आलो होतो. परंतु माननीय सभापतींना मी विनंती केली की, सोमवार ऐवजी मी मंगळवारी म्हणजे आज निवेदन करणार आहे. मला माननीय सभापतींनी तशी परवानगी दिलेली आहे. परंतु काल म्हणजे 23 तारखेला 6 वाजेपर्यंत निवेदन करावयाचे आहे अशी कोणतीही सूचना मला मिळालेली नाही.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा विषय हा प्रोसिजरच्या संदर्भातील आहे. आपण दिलेले निदेश सरकारपर्यंत पोहोचत नाहीत असा याचा अर्थ आहे.

-------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2007-08 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

**उपसभापती** : पुरवणी मागण्यांवरील चर्चेचा आजचा शेवटचा दिवस आहे. आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग-दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रिनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे.

खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

(1) मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - ए - 2,ए-4,ए-5,ए-6,बी-3,बी-7, जे-1,एन - 2,क्यू -3,

(2) सहकार,पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - सी -5,व्ही -2, व्ही -3,व्ही - 5.

(3) जलसंपदा ( कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ वगळून ) आणि लाभक्षेत्र विकास व पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक -आय-3,आय-5.

(4) वस्त्रोद्योग,माजी सैनिकांचे कल्याण व रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - व्ही -3,जी-1,जी-5,ओ-5,ओ -7,ओ-8,ओ-9.

(5) वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - जी-1,जी-5,ओ-5,ओ-7,ओ-8,ओ-9.

(6) उद्योग व खनिकर्म,सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागाच्य पूरक मागण्या - अे-4,के-7,के-10,झेडडी-1,झेडडी-2,झेडडी-5.

(7) पणन,रोजगार हमी योजना,संसदीय कार्य व महिला व बाल विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या - ओ-3,व्ही-2,एक्स-1.

(8) राज्य उत्पादन शुल्क,पर्यावरण व कामगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - बी-2,के-4,यू-4.

(9) वने मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - सी-7,सी-10.

.....3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(10)उपमुख्यमंत्री पूरक मागणी क्र. बी-1(बाब क्र.13 ते 22), बी-4,बी-5,

(11) महसूल मंत्री सी-1,सी-5,सी-10

(12)शालेय शिक्षण,क्रिडा व युवक कल्याण मंत्री ई-2,ई-3,ई-4.

(13) ऊर्जा(अपारंपारिक ऊर्जा वगळून)वैद्यकीय शिक्षण,उच्च व तंत्रशिक्षण मंत्री के-11, एस-1,डब्ल्यू-2,डब्ल्यू-3,डब्ल्यू-4,डब्ल्यू-6,डब्ल्यू-7.

(14) पशुसंवर्धन,दुग्धविकास,मत्स्यव्यवसाय व औकाफ मंत्री डी-5,डी-6,डी-7.

(15)सार्वजनिक बांधकाम मंत्री एच-1,एच-3,एच-5,एच-6,एच-7,एच-9.

(16)कृषि,जलसंधारण व खार जमीन मंत्री डी-3,डी-4,एल-3.

(17) सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री आर-1,आर-2.

(18)आदिवासी विकास मंत्री टी-5,टी-6,टी-7,टी-7.

(19) अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री एम-2,एम-3.

आता माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे मागण्यांवरील चर्चा सुरु करतील.

------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आपल्या अनुमतीने मी याठिकाणी पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करणार आहे. पण गृहनिर्माण खात्यावरील पूरक मागण्यांसंबंधी मी बोलणार आहे. या खात्याचे मंत्री अथवा राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : अन्य मंत्रीमहोदय आपण उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेत आहेत. आपण उपस्थित केलेल्या मुद्यांना उत्तर मिळेल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 143 बाब क्र. 151 आणि 152 बाबत मी बोलणार आहे. केंद्र पुरस्कृत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुथ्थान अभियान कार्यक्रमासाठी निधीची तरतूद करणे आणि बाब क्र.152 एकात्मिकृत गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रमासाठी निधीची तरतूद करणे हे दोन विषय आहेत. सभापती महोदय, या कार्यक्रमांसाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. पण या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणारी प्रशासकीय यंत्रणा कशी असे यासंबंधी याठिकाणी मी नांव घेऊन स्पष्टपणे आरोप करणार आहे आणि माझा मुद्दा सांगणार आहे. म्हाडाचे सचिव आणि म्हाडाचे मुख्याधिकारी आणि उपाध्यक्ष हे माननीय मुख्यमंत्र्यांच्या नांवाने याठिकाणी भ्रष्टाचार करीत आहेत......

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.......

आणि याची आपल्याला मी काही उदाहरणे देतो. सभापती महोदय, धारावीमध्ये सुमारे 9000 कोटी रुपयांचा विकास प्रकल्प राबविण्यात येणार आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना कळविले आहे की, मी त्यांच्या खात्याविषयी आरोप करणार आहे. 9000 कोटी रुपयांचे ग्लोबल टेंडर आहे आणि तो प्रकल्प त्याठिकाणी राबविण्यात येणार आहे. खरे म्हणजे यासाठी वेगळा अधिकारी नेमण्याची गरज आहे. परंतु शिवसेनेचे ज्येष्ठ नेते श्री.दत्ताजी नलावडे आणि श्री.सुभाष देसाई यांनी दिनांक 26 मार्च, 2007 रोजी खालच्या सभागृहात चर्चेच्या निमित्ताने श्री.चहल यांच्या कारभारावर विदारक प्रकाश टाकला आहे. सीईओ यांनी एकाच दिवशी 16 हजार कोटी रुपयांचे ग्लोबल टेंडर काढले. खरे म्हणजे आघाडी सरकारचे राज्य सत्तेवर येऊन 3 वर्षे झाली. म्हाडाला अद्याप अध्यक्ष दिलेला नाही. म्हाडाला सदस्य दिलेले नाहीत. रिपेअर बोर्डाला सदस्य दिलेले नाहीत. म्हाडा अंतर्गत एकूण 9 बोर्ड आहेत. ज्यांचा डायरेक्ट जनतेशी संबंध येतो. याचा परिणाम असा झाला की, श्री.चहल, सीईओ व व्हीपी, म्हाडा यांनी अतिशय गोंधळ घातलेला आहे. भ्रष्टाचाराची परिसीमा गाठली आहे. जितक्या लवकर या अधिकाऱ्याला बदलले जाईल तेवढे म्हाडाचे कल्याण होईल. दररोज धारावीमध्ये लोकांचे मोर्चे निघत आहेत. धारावीचा कायापालट करण्याच्या अनेक योजना राज्यामध्ये आणल्या गेल्या. परंतु तेथील जनता तिथेच आहे. छोटे छोटे शेकडो उद्योग त्याठिकाणी चालतात. परंतु त्यांची काळजी न घेता सुमारे 300 हेक्टर जमिनीचा विकास केला जाणार आहे. 300 हेक्टर जमिनीपैकी फक्त 10 ते 12 हेक्टर जमिनीवर या लोकांचे पुनर्वसन होणार आहे आणि उर्वरित सगळी जमीन बिल्डर्सच्या घशात घालून श्रीमंतांच्या वस्त्या निर्माण केल्या जाणार आहेत. हा वेगळा चर्चेचा विषय आहे. ज्याठिकाणी 16 हजार कोटी रुपयांचे टेंडर एकाच दिवशी काढले जाते, 9000 कोटी रुपयांचा विकास प्रकल्प राबविला जाणार आहे याचे काम म्हाडाचे व्हीपी श्री.चहल यांना दिले आहे. तेथे वेगळा अधिकारी असण्याची आवश्यकता आहे. श्री.दत्ताजी नलावडे व श्री.सुभाष देसाई यांनी खालच्या सभागृहात चर्चा मागितली होती. मुंबई शहरातील टीडीआर हा एलआयजीसाठी ट्रान्सफर करावयाचा असतो. श्री.चहल यांनी एलआयजीचा टीडीआर एचआयजीला ट्रान्सफर करुन बिल्डरला दिलेला आहे. डी.सी.रुल्सच्या कलम 33(5) प्रमाणे याचा भंग झालेला आहे. कुठलाही टीडीआर आर्थिकदृष्टया जे दुर्बल घटक असतील त्यांच्याकरिता घरे बांधावयाची असतील तर तेथे ट्रान्सफर करावयाचा

..2..

24-07-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )B.1

श्री.मधुकर चव्हाण.......

असतो किंवा एलआयजीच्या ठिकाणी ट्रान्सफर करावयाचा असतो. परंतु श्री.चहल यांनी सगळा टीडीआर एचआयजीसाठी ट्रान्सफर केलेला आहे. श्री.दत्ताजी नलावडे व श्री.सुभाष देसाई यांनी उपस्थित केलेल्या चर्चेला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर देताना खालच्या सभागृहात स्पष्टपणे म्हटले होते की, "होय, त्याबाबत मी सांगू इच्छितो की, मी हे मान्य करतो, एलआयजीचा एफएसआय एमआयजीला दिलेला आहे आणि एमआयजीचा एफएसआय एचआयजीला दिलेला आहे. त्यामुळे ज्याचा एफएसआय निर्माण झाला आहे त्याला त्याचा लाभ मिळत नाही. तो त्या लाभापासून वंचित राहिला आहे. ही गोष्ट सन्माननीय सदस्यांनी शासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे."

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

ही गोष्ट महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून मला मान्य आहे असे त्यांनी सभागृहात अतिशय स्पष्टपणे सांगितले होते. यांसदर्भात विधानसभेत काही सन्माननीय सदस्श्यांनी चौकशीची मागणी केली होती. या प्रकरणामध्ये टीडीआर ट्रान्सफर केला गेला आहे. हा टीडीआर कशासाठी ट्रान्सफर करण्यात आलेला आहे, याची माहिती सभागृहात देण्याची आवश्यकता आहे. तसेच यासंदर्भात सीआयडी मार्फत चौकशी करावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे. दुसरी गोष्ट अशी की, टीडीआर ट्रान्सफर करण्याचे अधिकार आतापर्यंत गृहनिर्माण मंडळाला होते. मुंबई गृहनिर्माण मंडळ, नागपूर गृहनिर्माण मंडळ, पुणे गृहनिर्माण मंडळ इत्यादि गृहनिर्माण मंडळ आहेत. 6 सप्टेंबर, 2006 रोजी गृहनिर्माण मंडळाचे चहल महोदयांनी लेखणीच्या एका फटक्यासरशी याबाबत निर्णय घेतला. वास्तविक लोकशाहीमध्ये हे अधिकार डिस्ट्रीब्यूट केलेले असतात. लोकहितासाठी निर्णय घेण्याच्या संदर्भात महामंडळे आणि मंडळे नियुक्त केलेले असतात. लोकप्रतिनिधींना निर्णय घेण्याचा संदर्भात कायद्याने अधिकार दिलेले आहेत. कोटयावधी रुपयांचे प्रकल्प राबवितांना जनहित पाहिले जाते. या संदर्भात मंडळ स्थापित करण्यात आले आहेत परंतु काही मंडळामध्ये अध्यक्ष नियुक्त करण्यात आलेले नाही तर काही मंडळात सदस्य नियुक्त करण्यात आलेले नाही. या मंडळात जनतेच्या प्रतिनिधींचा समावेश झाला तर त्या ठिकाणी जर अयोग्य होत असेल तर लोकप्रतिनिधी मार्गदर्शन करीत असतात. आपले सरकार येऊन तीन वर्षे होत आलेली आहेत परंतु या तीन वर्षात एका सुध्दा मंडळात आपण अध्यक्ष व सदस्य नियुक्त केलेले नाही. रिपेअर बोर्डाचे अध्यक्ष म्हणून माननीय सचिन अहिर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे परंतु रिपेअर बोर्डावर अजून सदस्य नियुक्त करण्यात आलेले नाहीत. म्हाडाचे सदस्य तीन वर्षे झाली तरी सुध्दा नियुक्त केलेले नाहीत. मुंबई गृहनिर्माण मंडळावर सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. कारण तुमचा प्रत्येक आदेश दिल्लीतून मॅडमकडून येत असतो. तुम्हाला तालुक्याचा अध्यक्ष जरी नियुक्त करावयाचा असेल तर त्यासंदर्भातील आदेश दिल्लीवरुन यावे लागत असतात. आपण कॉंग्रेस पक्ष चालवित आहात की, शासनाचे गृहनिर्माण खाते चालवित आहात ? त्यामुळे यासंदर्भात वेळेवर निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, कॉंग्रेस पक्षाच्या श्रेष्ठींवर असा आरोप करणे योग्य नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांचे वक्तव्य कामकाजातून काढून टाकावे अशी माझी विनंती आहे.

...2

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या राज्यात सत्ता कॉंग्रेसची आहे. 3 वर्षे झाली तरी मंडळावर अध्यक्ष/सदस्य नियुक्त करण्यात आलेले नाहीत.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी आपल्या भाषणात बोलण्याच्या ओघात कॉंग्रेस पक्षाचा उल्लेख केला. कॉंग्रेस पक्ष सत्तेवर जरी असला तरी अशा प्रकारे पक्षावर खापर फोडणे बरोबर नाही. त्यामुळे आपण केलेले विधान आपण परत घ्यावे. शासनावर टीका करणे हे मला मान्य आहे परंतु पक्षावर टीका करणे मला मान्य नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी केलेले वक्तव्ये कामकाजातून काढून टाकण्यात यावे.

श्री. मधुकर चव्हाण : ठीक आहे. मी असे सांगत होतो की 6 सप्टेंबर, 2006 रोजी सर्व अधिकार एका अधिका-याने आपल्या हातामध्ये घेतले. म्हाडाचा ट्रान्झीट कॅम्प वांद्रे पूर्व येथे आहे. हा ट्रान्झीट कॅम्प दिवाण नावाच्या बिल्डरला देण्यात आला. या ठिकाणी जे ट्रान्झीट कॅम्प्स होते ते सर्व नष्ट करण्यात आले असून आता त्या ठिकाणी एक सुध्दा ट्रान्झीट कॅम्प शिल्लक नाही. वास्तविक संक्रमण शिबिराची जागा विकसीत करण्याच्या संदर्भात त्यावेळेस असे धोरण स्वीकारण्यात आले होते की, त्या ठिकाणी ज्या बैठया चाळी आहेत, त्यांचे जे चटई निर्देशांक आहे तो त्या ठिकाणी पूर्ण उपयोगात आलेला नव्हता. समजा तेथे 500 रुम्स असतील तर त्या ठिकाणी 500 रुम्सची एक ऊंच इमारत बांधावयाची आणि उरलेल्या जागेमध्ये कमर्शिअल डेव्हलपमेंट करण्यास देऊन पैसे मिळवायचे असे ठरले होते. परंतु या ठिकाणी एक सुध्दा ट्रान्झीट कॅम्प ठेवला नाही. वास्तविक शहरातील सर्व पक्षीय आमदारांची, लोकप्रतिनिधींची अशी मागणी आहे की, मुंबईशहर व उपनगरात इमारती पडत असतात व इमारत पडल्यानंतर त्या रहिवाश्यांची संक्रमण शिबिरात सोय व्हावी यासाठी जास्तीतजास्त संक्रमण शिबिरे उपनगरात न बांधता शहरात बांधली जावीत. असा उद्देश असतांना वांद्रे येथील ट्रान्झीट कॅम्प रद्द करण्यात आले. सभापती महोदय, वांद्रे पूर्व येथे दिवाण बिल्डरने 7 हजार चौ. फुटाची इमारत बांधली. यासंदर्भात श्री. चहल यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना बदनाम करण्यासाठी फाईलवर लिहिले की, " ही इमारत विकू नये, असे मुख्यमंत्र्यांचे आदेश आहेत ". राज्याच्या प्रमुखावर आपण अशा प्रकारे मोठा आरोप करीत आहोत हे चहल साहेब विसरले. मंत्रीमहोदयांनी तोंडी आदेश दिले असतील तर आयएएस अधिकारी निर्भीड असेल तर तो सांगेल की, मंत्रीमहोदय, आपण यासंदर्भात मला लिखित आदेश दिले तर बरे होईल.

यानंतर श्री. अजित.......

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.............

एखाद्या वेळेला मंत्रिमहोदय तोंडी आदेश देत असतात. विभागाचा प्रमुख म्हणून तो आदेश शिरसावंद्य मानून त्याची अंमलबजावणी करायची असते. परंतु असे तोंडी दिलेले आदेश अधिकारी लिहित नाही की, मला हे आदेश माननीय मुख्यमंत्र्यांनी द्यायला सांगितलेले आहेत. त्यांनी फाईलवर असे लिहिले की,"माननीय मुख्यमंत्र्यांनी असे आदेश दिलेले आहेत की, 60 हजार चौ.फूटाची इमारत विकू नये." यामध्ये शासनाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झालेले आहे. म्हाडाच्या ट्रान्झिट कॅम्प संदर्भात लोकलेखा समितीमध्ये एक पॅरा चर्चेसाठी आला होता. श्री.चहल यांच्या निर्णयामुळे शासनाचे 78 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे असा तो पॅरा होता. श्री.चहल यांनी एलआयजीकरिता असलेला एफएसआय एचआयजीला दिलेला आहे. त्यांनी स्वत: सर्व अधिकार काढून घेतलेले आहेत. डी.सी.रुल 33 (5) याचे व्हायोलेशन केलेले आहे. श्री.चहल यांनी मुख्यमंत्र्यांचे आदेश नसताना 60 हजार चौ.फूट कमर्शिअल इमारत पाडू नये कळविले आहे. ही इमारत विकून शासनास कोट्यावधी रुपये मिळाले असते. ही इमारत वर्षभर रिकामी ठेवली आहे. आम्ही या संदर्भात नियम 93 अन्वये वा अन्य माध्यमातून प्रश्न विचारला तर सांगण्यात येईल की, माननीय मुख्यमंत्र्यांचे आदेश होते म्हणून ती इमारत विकण्यात आलेली आहे. तेव्हा माझी मागणी आहे की, या सर्व प्रकरणाची चौकशी सीआयडीमार्फत करण्यात यावी.

दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे म्हाडाकडून इमारती लवकर बांधल्या जात नाहीत,त्यामुळे लोक अनेकवर्षे ट्रान्झिट कॅम्पमध्ये खितपत पडून राहतात. गेली दोन वर्षे नवीन पुनर्रचित इमारतीमध्ये 948 गाळे पडून आहेत. त्यातील पुनर्रचित विभाग (2) म्हणजे, शिवडी, लालबाग, परळ, नायगाव, भायखळा हा जो कामगार एरिया आहे. या ठिकाणी सुमारे 368 गाळे पडून आहेत. एकीकडे लोक ट्रान्झिट कॅम्पसमध्ये खितपत पडून आहेत तर दुसरीकडे गाळे उपलब्ध असताना ते लोकांना देण्यात येत नाहीत. लोक ट्रान्झिट कॅम्पसमध्ये खितपत पडून आहेत. पुनर्रचित इमारती झालेल्या आहेत. त्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च झालेले आहेत. लोक सांगत आहेत आम्हाला शिफ्ट करा. परंतु त्यांना त्याठिकाणी का शिफ्ट केले जात नाही याची चौकशी केली पाहिजे. शिवसेनेच नगरसेवक श्री. साटमकर यांचे माझेकडे एक पत्र आहे. म्हाडाच्या 120



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..............

गाळ्याची रॅन्डम पध्दतीने चेकींग केली असता 120 गाळ्यांपैकी फक्त दोनच गाळयांमध्ये अधिकृत रहिवाशी आढळले. बाकीच्या 118 गाळ्यामध्ये बेकायदेशीरपणे राहत असल्याचे आढळून आले. त्यामध्ये बारबाला राहत आहेत. त्याठिकाणी सट्टा, मटका आणि दारुचे अड्डे चालू आहेत. दक्षता अधिकारी श्री.सिंग यांनी तेथील बेकायदेशीर राहणाऱ्या लोकांना सांगितले की, आम्ही तुम्हाला दहा दिवसांची मुदत देतो त्या अवधीमध्ये तुम्ही पुरावा आणल्यास तुम्हाला अधिकृत समजण्यात येईल्. श्री.साटकर यांचे म्हणणे योग्य आहे. हे घुसघोर आहेत हे तुम्हाला मान्य आहे. हे घुसखोर दलालांना लाखो रुपये देऊन त्यांची चुकीच्या मार्गाने अधिकृत भाडेकरु म्हणून इन्ट्री करुन घेतात. आता त्यांना अनधिकृत ठरविले जात आहे. त्यांचे संसार त्याठिकाणी थाटलेले आहेत. न्यायाधीश सुजाता मनोहर यांनी निर्णय दिलेला आहे की, जर एखादी व्यक्ती 10-20 वर्षे अनधिकृतपणे राहत असले आणि 10-20 वर्षानंतर ही बाब दृष्टोत्पतीस आली तरी सुध्दा त्या जागेवर कायदेशीरपणे हक्क प्रस्थापित होत नाही. ती व्यक्ती घुसघोर म्हणून समजली जावी.

सभापती महोदय, याठिकाणी म्हाडासाठी पूरक मागणी सादर करण्यात आलेली आहे. परंतु ज्या कामासाठी ही मागणी करण्यात आलेली आहे त्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा पूर्णपणे किडलेली आहे. सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.चंद्रकांत हंडोरे आणि सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. नवाब मलिक यांनी एक बैठक बोलाविली होती. त्या बैठकीला श्री.चहल उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी शिपायाकरवी मंत्रिमहोदयांकडे निरोप पाठविला की, "साहेब दुसरीकडे व्हिझीटला गेलेले आहेत." पालकमंत्र्यांनी ती मिटींग रद्द केली. पालकमंत्री मोठे की आयएएस अधिकारी मोठा असा मला प्रश्न पडतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते याठिकाणी नेहमी एक मुद्दा मांडतात की, अधिका-यांची मिजास उतरवली पाहिजे. अधिकाऱ्यांना वरचढ होऊ देऊ नका. दुसरी एक घटना सांगतो. सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.युसुफ अब्राहनी हे चहल यांना भेटायला गेले होते. त्यावेळी ते ॲन्टी चेम्बरमध्ये बसले होते. त्यांनी शिपायाला सांगायला सांगितले की, साहेब नाहीत म्हणून सांगा. नंतर त्यांनी श्री.युसुफ अब्राहनी यांना सॉरी म्हटले आणि सांगितले की, शिपायाने मला निरोप दिला नाही. खरे म्हणजे एखादा लोकप्रतिनिधी त्यांच्या चेम्बरमध्ये गेल्यास त्यांनी त्यांना सन्मानपूर्वक केबिनमध्ये बसवायास पाहिजे होते.

यानंतर श्री.पुरी....

SSP/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 10:20

श्री.मधुकर चव्हाण....

बाहेरच्या बाहेर जाण्यास त्यांना सांगतात, हे काय चालले आहे ? माझा म्हणण्याचा उद्देश एवढाच आहे की, म्हाडाकडे कोटयावधी रुपयांचे काम आहे. आज म्हाडाचा 6-7 हजार कोटी रुपयांचा टर्नओव्हर आहे. त्याला अधिकारी म्हणून श्री.चहल आहेत आणि सुमारे 9 हजार कोटी रुपयांचा प्रकल्प असून त्यासाठी टेंडर मागविण्यात आले आहेत, त्याचेही श्री.चहल हेच प्रमुख आहेत. परंतु आज म्हाडाच्या घरांमध्ये घुसखोर घुसत आहेत, त्याची आपल्याला माहिती नाही, ट्रांझिट कॅम्पमध्ये लोक अनेक वर्षे खितपत पडले आहेत, त्याचीही दखल घेतली जात नाही, हे योग्य आहे काय ? त्यामुळे यासंबंधीची संपूर्ण चौकशी करणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील याठिकाणी उपस्थित आहेत. गृह विभागाच्या बाब क्रमांक 17 व 18 वर मी बोलणार आहे. या बाबी पोलिसांच्या जागा वाढविण्यासंबंधी, दहशतवादी पथकाला काही साधने उपलब्ध करुन देण्यासंबंधीच्या आहेत. आपण पोलिसांच्या जागा वाढवा, सगळया गोष्टी करा. परंतु आपली कायदा आणि सुव्यवस्था नीट नसेल तर याचा काहीही उपयोग होणार नाही. याबाबतीत मी एक उदाहरण देऊ इच्छितो. माननीय उपमुख्यमंत्री महोदय, आज सगळया वर्तमानपत्रात आयशा नावाच्या मुलीच्या विनयभंगाची घटना आलेली आहे. या घटनेची मी चर्चा करत नाही. मी फक्त पोलीस खाते कसे वागते, याची माहिती देऊ इच्छितो. या 10 वर्षाच्या मुलीची टींगल करण्यासाठी एका मुलाने तिचा जीपमधून पाठलाग केला, अश्लील हावभाव केले त्यामुळे ती भीतीने रस्ता ओलांडायला लागली, त्यावेळी तिच्या अंगावर जीप घालण्याचा प्रयत्न करण्यात आला, तिचा स्कर्ट जीपच्या मागच्या चाकामध्ये आला आणि ती फरफटत गेली व आज ती रुग्णालयात ॲडमिट आहे. परंतु आपले पोलीस कसे वागले ? मी या घटनेच्या मेरिटमध्ये जात नाही, तो एक वेगळा विषय आहे. परंतु आपल्या पोलिसांनी काय केले की, ड्रायव्हरकडे फक्त लायसन्स नसल्याचा आरोप ठेऊन त्याला सोडून दिले. ती मुलगी जखमी होऊन आज हॉस्पीटलमध्ये आहे आणि ज्यांनी अतिशय क्रूरतेने तिची टींगल करुन तिच्या अंगावर जीप घालण्याचा प्रयत्न केला, त्याला आपल्या पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे जामीन मिळाला व तो घरी आराम करतो आहे. खरे म्हणजे, त्याला आपण अटेम्ट टू मर्डरखाली अटक करावयास पाहिजे होती. कारण ही रॅश ड्रायव्हींग नाही, यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2....

श्री.मधुकर चव्हाण....

उद्देश हा डेफिनेट तिच्या शाळेवर जाऊन तिची हेतूपुरस्सर टींगल करण्यासाठी जीपमध्ये आपले मित्र आणून तिचा पाठलाग करण्याचा होता. ती पळत फुटपाथच्या कडेला गेल्यानंतर, जीप फुटपाथवर घेण्यात आली. म्हणजे यामध्ये उद्देश तिला जखमी करण्याचा होता, तिला ठार मारण्याचा होता. असे असताना आपण त्याच्याविरुध्द कलम 307 का लावले नाही ? याबाबतीत पोलिसांना अशी भूमिका घेता येणार नाही. कोर्ट पाहून घेईल काय निर्णय घ्यायचा तो, आपल्याला का चिंता आहे ? आता पोलीस सांगत आहेत की, आम्ही पूर्ण चौकशी करु, तिची जबानी पूर्ण झाल्यानंतर कारवाई करु, परंतु तेव्हा ती बेशुध्दाअवस्थेत नव्हती, ती कोमामध्ये नव्हती, मग तेव्हाच आपण तिची जबानी का घेतली नाही ? तिने याबाबतीत पोलिसांना माहिती सांगितलेली आहे. सर्व पक्षाचे लोक आणि मुस्लीम बांधव त्याठिकाणी गेल्यानंतर आपण सांगितले की, आम्ही त्याला वेगळया पध्दतीने ॲरेस्ट करु. हा काय प्रकार चालू आहे ? आपण पोलिसांची संख्या वाढवा, परंतु ते वाढवलेले पोलीस कर्मचारी पोलीस स्टेशनमध्ये कसे वागत आहेत, हे आपण पाहणार की नाही ? आज अशाप्रकारे जगामध्ये अमानुषता वाढलेली आहे. ती 10 वर्षांची निष्पाप आणि लहान मुलगी आहे, यासंदर्भात शिक्षा देण्याचा भाग वेगळा आहे. याबाबतीतील केस ज्यावेळी न्यायालयात सबमिट होईल त्यावेळी माननीय न्यायालय जो निर्णय घेईल तो घेईल. परंतु यामध्ये आपण फक्त लायसन्स नसल्याचा आरोप ठेवला व त्याला सोडून दिले. आज ती मुलगी महिनाभर हॉस्पीटलमध्ये राहणार आहे आणि आपण आरोपीला आरामशीर घरी झोपायला जामिनावर सोडून दिलेले आहे. असे असतानाही आपण सांगता की, कायदा आणि सुव्यवस्था नीट आहे, पोलिसांची संख्या वाढलेली आहेत. पोलिसांची संख्या वाढवा, ते चांगलेच आहे, आपण च्ांगला निर्णय घेतला. परंतु त्यांची गुणवत्ता आणि त्यांची कर्तव्यबुध्दी तपासून त्यांची भरती केली नाहीतर नुसती खोगीर भरती केल्यासारखे होईल. म्हणून अशाप्रकारचे पोलीस घेऊन कायदा आणि सुव्यवस्थेच्या माध्यमातून जनतेला न्याय मिळणार नाही. माझी अशी मागणी आहे की, या प्रकरणामध्ये आरोपीचा उद्देश, त्या मुलीला जखमी करण्याचा होता, हे स्पष्ट आहे.

नंतर श्री.रोझेकर...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...........

कारण जीप घेऊन तो क्लासमध्ये गेला होता. जाता जाता मुलगी समोर आली, घाणेरडी वासना जागृत झाली आणि हा प्रकार त्याच्याकडून घडला, असे झालेले नाही. With clear intention, with clear preparation ने त्याने हे कृत्य केलेले आहे. त्यामुळे त्याला तुम्ही 307 हे कलम का लावले नाही ? उद्या ती मुलगी मेली असती, सुर्दैवाने ती मुलगी अजून जीवंत आहे, हा भाग वेगळा.

सभापती महोदय, म्हाडासंदर्भात आणि गृह विभागाच्या संदर्भात मी जे मुद्दे उपस्थित केले आहेत ते दोन्ही मुद्दे शासनाने गांभीर्याने ध्यावेत. म्हाडामध्ये अधिका-यांनी एकाधिकारशाही चालविली आहे. विधानसभेत सन्माननीय सदस्य, श्री.दत्ताजी नलावडे व सन्माननीय सदस्य, श्री.सुभाष देसाई असे म्हणाले की, Mhada is one man Army. There is only Mr.Chahal and nobody else. ते बरोबर आहे म्हाडातील अधिकारी कोणालाही विचारेनासे झाले आहेत. मराठी माणसाला काय अक्कल असते, असेही ते म्हणाले आहेत. संबंधित मंत्रीमहोदय ज्यावेळी या चर्चेला उत्तर देतील त्यावेळी त्यांनी या दोन्ही मुद्दांची उत्तरे आम्हाला द्यावीत, अशी विनंती करतो. मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो आणि थांबतो.

-----------------

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप**सभापती** : सभागृहात पुरवणी मागण्यावर चर्चा सुरु आहे. गृह खात्याशी संबंधित मुद्दा सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर चव्हाण यांनी आताच मांडला आहे. मलाही या निमित्ताने एक छोटी बाब सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणावयाची आहे.

चार महिन्यांपूर्वी श्री.थिटे नावाचे एक सर्वसामान्य गृहस्थ माझ्याकडे आले होते. श्री.थिटे हे माटुंगा येथे सन 1956 पासून गिरिजा नावाच्या इमारतीत, तळमजल्यावर राहतात व त्याच ठिकाणी फळविक्रीचा व्यवसाय करतात. मधल्या काळात पत्नी आजारी असल्यामुळे ते त्यांच्या गावी गेले होते. या पंधरा दिवसांच्या काळामध्ये त्यांच्या घरमालकाने घरात घुसून श्री.थिटे यांची महत्वाची कागदपत्रे, रेशनकार्ड वगैरे गायब केली. श्री.थिटे यांनी माटुंगा पोलीस स्टेशनमध्ये यासंबंधी तक्रार नोंदविली परंतु त्याची कोणतीही दखल घेण्यात आली नाही. मला ज्यावेळी हा प्रकार समजला त्यावेळी मी स्वत: माटुंगा पोलीस स्टेशनमध्ये गेलो. त्या ठिकाणी असलेले सिनियर पोलीस इन्स्पेक्टर श्री.देशपांडे यांनी या प्रकरणाचा चांगला कॉग्निजन्स घेतला. त्यांनी सदर प्रकरण तपासासाठी सब इन्स्पेक्टर, श्री.दिवेकर यांच्याकडे दिले. श्री.दिवेकर यांनी श्री.थिटे यांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावून घेतले, त्यांना दम दिला त्यावेळी श्री.थिटे यांनी श्री.दिवेकरांच्या ही बाब लक्षात आणून दिली की, या प्रकरणी सन्माननीय उपसभापती, श्री.डावखरे हे पोलीस स्टेशनमध्ये आले होते. त्यावर श्री.दिवेकर असे म्हणाले की, मी डावखरेंना ओळखत नाही, मुख्यमंत्र्यांना ओळखत नाही, तुम्ही पंतप्रधानांकडे गेलात तरी काहीही होणार नाही, मालकाबरोबर तुम्ही कॉम्प्रमाईज करा, ते देतील तेवढे पैसे घ्या आणि गप्प बसा. मी स्वत: काल पोलीस आयुक्त आणि सह पोलीस आयुक्त यांच्या कानावर हे प्रकरण घातले आहे, त्यांना आज माझे पत्रदेखील पाठविणार आहे. पोलीस लोकप्रतिनिधींविषयी अशा पद्धतीने उद्धटपणे बोलत असतील तर हा आमचा निश्चितपणे अनादर आहे. विधानसभेमध्ये देखील हा प्रश्न उपस्थित झाला आहे व त्यावर चर्चा झाली आहे. एखाद्या गरीब कुटुंबातील माणूस पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर त्याला दडपायचे आणि वर पुन्हा लोकप्रतिनिधींबाबत व मुख्यमंत्र्यांबाबत अशी भाषा वापरुन त्यांची अवहेलना करणे, हे अत्यंत गैर आहे. मी स्वत: पोलीस सब इन्स्पेक्टर, श्री.दिवेकर यांना बोलावून घेतले होते. मी असे बोललो आहे, हे त्यांनी मान्य केले आहे. या निमित्ताने ही बाब मी

..3......



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती............

माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणतो आहे व त्यांना विनंती आहे की, आपण या प्रकरणाची दखल घेऊन आपल्याला योग्य वाटेल तशी कारवाई करावी.

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्यात येईल आणि आजच्या आज कारवाई करण्यात येईल.

--------------------

..4...........

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा) : सभापती महोदय, वारंवार या सार्वभौम सभागृहाच्या अत्युच्च पदाला असा अनुभव येतो तर आमच्यासारख्यांना काय अनुभव येत असेल, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. शासकीय अधिका-यांवर शासनाचा वचक राहिलेला नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, सन 2007-2008 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रातील सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 11, पान क्रमांक 7 बाबत मी माझे विचार या ठिकाणी व्यक्त करीत आहे. सन्माननीय मंत्री, प्रा.वसंत पुरके हे या ठिकाणी उपस्थित आहेत. ज्यावेळी मराठी भाषेसंबंधी या सभागृहात चर्चा झाली त्यावेळी मला असा शब्द दिला होता की, मराठी ही राजभाषा असल्यामुळे मराठी भाषेचा पूर्णपणे वापर केला जाईल आणि जो करणार नाही त्याच्यावर कारवाई केली जाईल. किंबहुना राजभाषेचा ठराव शासनाने केलेला असल्यामुळे संबंधितांवर हक्कभंग येऊ शकतो, असे मत मला प्राप्त झाले आहे. मला कळत नाही की, कालच्या लक्षवेधीमध्ये अशाच प्रकारचे अवमूल्यन झाले आहे, अवमान झाला आहे. लिहितांना तसेच लिहिले जात आहे. म्हणजे तुम्ही खालपर्यन्त काय पोहोचविले आहे ? सामान्य प्रशासन विभागात जे आय.ए.एस.अधिकारी बसले आहेत, ते काही करतात की नाही, हा प्रश्न आहे. यामध्ये अनेक गोष्टी आहेत. बाब क्रमांक 11, पूरक मागणी क्रमांक ए-5 मध्ये '2251, सेक्रेटरिएट - सामाजिक सेवा' असा शब्दप्रयोग कशासाठी वापरला आहे ? सदनामध्ये जी चर्चा होते, जे निर्णय घेतले जातात ते खालपर्यन्त पोहोचत नाही, असाच याचा अर्थ आहे. सदनामध्ये जी चर्चा होते त्याची दखलच घेतली जात नाही, असेच यावरुन दिसते. मी नम्रपणे सांगतो की, मी जर एखाद्या अधिका-याच्या दालनात गेलो आणि त्याने चुकुन जरी 'बॉम्बे' असा शब्दप्रयोग केला......कारण हे सर्व अधिकारी 'मुंबई'चा उल्लेख नेहमी 'बॉम्बे', 'बॉम्बे' असाच करीत असतात.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर .......... 10:30

श्री.दिवाकर रावते ...........

माझ्यासमोर कोणता अधिकारी मुंबईचा उल्लेख बॉम्बे करीत असेल तर मी तेथल्या तेथे त्याच्या कानफटीत मारीन, हे मी आज जाहीररित्या सांगतो. शासनाचे अधिकारी सुधारणार नाहीत काय ? प्रत्येक ठिकाणी अधिकारी बॉम्बे म्हणतात, मुंबई म्हणत नाहीत. हे अधिकारी महाराष्ट्र शासनाकडून पगार घेतात, नागरिकांनी भरलेल्या करातून पगार घेतात. मग अधिकारी बॉम्बे का म्हणतात ? कितीही मोठा अधिकारी असला आणि त्याने जर माझ्या समोर मुंबईचा उल्लेख बॉम्बे असा केला तर मी तेथल्या तेथे त्याच्या कानफटीत मारीन, त्यानंतर शासनाने माझ्यावर कोणते खटले भरावयाचे ते भरावेत. (अडथळा) म्हणजे तुम्ही अधिका-यांना सुधारणार नाहीत, हे त्यातून गृहीत होते. हे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्र.22 मध्ये "होमगार्ड" असे नमूद केलेले आहे. येथे गृह रक्षक दल असे नमूद करावयास पाहिजे होते. शिवतिर्थावर 1 मे रोजी परेड होते त्यावेळी गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील त्या कार्यक्रमाला उपस्थित असतात. त्यावेळी असे म्हटले जाते की, गृह रक्षक दलाची तुकडी आता येत आहे. अशा छोटया गोष्टी आपण का दुरुस्त करत नाहीत, असा प्रश्न आहे. गृह विभागाच्या बाब क्र.22 मध्ये होमगार्ड असा उल्लेख आलेला आहे तो मुद्दा मी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलला आहे. किमान राज्य भाषेचा अवमान होणार नाही याची काळजी घ्यावी, अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्र 24 मध्ये "सहायक मोटार वाहन निरीक्षकांच्या वेतन व भत्त्यांकरिता तरतूद" असे नमूद केलेले आहे. त्यासंदर्भात मला माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना अशी विनंती करावयाची आहे की, परिवहन विभागाचा शासन निर्णय निघालेला आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, गाडीवर मराठी नंबर लिहीता येतील, सोबत इंग्रजी नंबरही असावेत. त्यावर अशी सूचना आली की, गाडीच्या बॉडीवर इंग्रजी नंबर लिहावेत आणि नंबर प्लेटवर मराठी नंबर लिहावेत. गाडीवर मराठीतून नंबर लिहावेत, असा परिवहन विभागाने अधिकृत शासन निर्णय काढलेला आहे. त्या शासन निर्णयाची प्रत माझ्याकडे आहे. आपल्याला सुध्दा याबाबत माहिती असेल. ट्रॅफिक पोलीस लोकांना अडवून त्यांच्याकडून जाणिवपूर्वक दंड वसूल करतात आणि मराठीतून नंबर लिहिला तर याद राख असे सांगतात. हे सर्व कशासाठी ? एस.टी. महामंडळाच्या बसेस सर्व महाराष्ट्रामध्ये फिरतात. एस.टी. महामंडळाच्या

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...........

बसेसवर मराठी नंबर असतील तर ग्रामीण भागातील जनता तो नंबर वाचू शकते. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर जाणा-या ज्या बसेस आहेत त्या बसेसवर मराठीतून आणि इंग्रजीतून नंबर असले तरी काही हरकत नाही, हा विषय नंतरचा आहे. ट्रॅफिक पोलीस लोकांना अडवितात आणि त्यांच्याशी अरेरावीने बोलतात. फक्त एम.एच. हे इंग्रजीतूनच लिहिले पाहिजे असे मला वाटते. कारण तो कोड आहे.

सभापती महोदय, गृह विगाच्या बाब क्र. 27 मध्ये देखील "सेक्रेटरिएट-सर्वसाधारण" असा उल्लेख केलेला आहे. याची शासनाने दखल घ्यावी, अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभागाच्या मंत्री महोदयांकडून मला अशी माहिती पाहिजे की, त्यांनी मागच्या अधिवेशनामध्ये असे सांगितले होती की, माननीय पंतप्रधानांनी विदर्भातीत शेतक-यांसाठी जे पॅकेज दिलेले आहे त्या पॅकेज अंतर्गत आम्ही मोठया प्रमाणावर गाई, म्हशी, शेळया-मेंढयांचे वाटप करीत आहोत. आता पर्यंत पंतप्रधान पॅकेज अंतर्गत किती जिल्हयांमध्ये किती गाईंचे किती म्हशींचे आणि किती शेळयांचे वाटप झालेले आहे आणि आता पर्यंत किती लाभार्थ्यांना लाभ मिळाला आणि किती लाभार्थी बाकी आहेत ? याबाबतची सविस्तर माहिती माननीय पशुसंवर्धन मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये द्यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पशुसंवर्धन विभागाच्या बाब क्र.50 मध्ये "पशुधनामधील पोषक द्रव्यांची कमतरता मापणे, राज्यामध्ये पशुधनामधील पोषक द्रव्यांची कमतरता मापण्याची एक नवीन योजना राबविण्याचे ठरविण्यात आले आहे." असे नमूद केलेले आहे. सभापती महोदय, या प्रस्तावा अंतर्गत अंदाजे रुपये 45 लाख इतका खर्च होणार आहे. ही नवीन योजना काय आहे ? हे जर माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये सभागृहाला समजून सांगितले तर फार बरे होईल. पशुसंवर्धन मंत्री श्री.अनिस अहमद आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. त्यांना मी सभागृहामध्ये या असे सुध्दा सांगू शकत नाही. कारण ते कोणाच्याही मेहरबानीमुळे मंत्री झालेले नाहीत, असे त्यांनी सभागृहात जाहीर केलेले आहे. मंत्रिमंडळातील कोणत्याही मंत्र्याची नियुक्ती माननीय मुख्यमंत्र्यांनीच करावयाची असते. त्यांनी सरळ सांगितले की, मी कोणालाही जुमानत नाही, कोणालाही मानत नाही. मला मंत्री केले ते दिल्लीहून केले आहे आणि अल्लाच्या मेहरबानीमुळे मी मंत्री झालेलो आहे.

यानंतर श्री.गागरे ........

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

श्री.दिवाकर रावते.....

घडलेली गोष्ट घटनाबाहय आहे. ती आपण सहन केलेली आहे. त्यावेळी सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी या बोलण्यासाठी उठल्या नाहीत. त्या एकटया पक्षाची बाजू सांभाळत असतात. बोलण्याच्या वेळी त्यांच्या पक्षातील बाकीचे कोणी उठत नाही, म्हणून मी श्रीमती सुधाताई जोशी यांच्याबद्दल नेहमी बोलतो.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 70 वर मी बोलणार आहे. गृहनिर्माण व नगरविकास महामंडळाकडून मिळालेल्या कर्जावरील व्याजासाठी अतिरिक्त तरतूद रुपये 8 कोटी 31 लक्ष, 87 हजार करण्यात आलेली आहे. व्याजाच्या बदलत्या दरामुळे राज्यातील मार्ग व पुलांचे बांधकाम करण्याकरिता गृहनिर्माण व नगरविकास महामंडळाकडून मिळालेल्या कर्जाच्या व्याजात झालेल्या वाढीसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याचे ठरविण्यात आले आहे. याबाबत मी विचारु इच्छितो की, यातील मुळ रक्कम किती आहे ? हे कर्ज कशासाठी घेतले होते ? गृहनिर्माणासाठी यापैकी किती रकमेचा वापर केला आहे ? किती रक्कम परतफेड केली आहे ? सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी त्यांच्या भाषणात गृहनिर्माण धोरणाबाबत उल्लेख केलेला आहे की, एवढया मोठया प्रमाणावर रक्कम उपलब्ध असताना गरीबांची घरे तयार करण्यासाठी असलेली तरतूद दुसऱ्या कामासाठी का वापरली जात आहे ? याबाबत माहिती द्यावी.

सभापती महोदय, इंग्रजीमध्ये उल्लेख असलेल्या "बाम्बे हायकोर्ट" चे "मुंबई हायकोर्ट" असा मराठीत बदल करण्याचा मी आग्रह मागील अधिवेशनात धरला होता. याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी पत्र दिलेले आहे. विधी व न्याय खात्यानेही पत्र दिलेले आहे, या पत्राच्या प्रती माझ्याकडे आहेत. परंतु हा विषय केंद्र सरकारच्या विधी व न्याय खात्याच्या अखत्यारितील असल्यामुळे आपल्याकडून यावर अंमलबजावणी होत नाही. मुंबई होऊन इतकी वर्षे झालेली आहेत, परंतु बॉम्बे हायकोर्टचे "मुंबई उच्च न्यायालय" असा बदल करण्यासाठी इतका अवधी का लागतो ?. दिल्लीच्या आशेवर व मेहेरबानीवर आपल्या अस्मितेला किती काळ टिकवून ठेवायचे ? मुंबई हायकोर्ट असा बदल कधी करणार आहात ? हा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, न्यायदानामध्ये मराठीचा वापर करण्यामध्ये अनेक अडचणी आहेत, असे बोलले जाते, त्यासंबंधीही मंत्री महोदयांनी खुलासा करावा, ही विनंती.

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MAP/

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाच्या बाब क्र.151 व 152 वर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण बोलले आहेत. यामध्ये केंद्र पुरस्कृत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान कार्यक्रमाकरिता निधीची तरतूद केलेली आहे. भारत सरकारने मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर व नांदेड शहरामध्ये 12 प्रकल्प मंजूर केले असून त्यानुसार भारत सरकारने रु. 287 कोटी 11 लाख रकमेचा हिस्सा दिला आहे. ही रक्कम नेमकी कशासाठी वापरली जाणार आहे ? मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर व नांदेड शहरामध्ये नेमके काय करणार आहात ?. बाब क्र.151 मधील 2 वर एकात्मिकृत गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांकरिता 3 कोटी 76 लाख 52 हजार केंद्र सरकारने दिलेली आहे. पुरवणी मागण्यामध्ये ही तरतूद दाखविल्यानंतर ही रक्कम खर्च केली आहे का ? याचाही संबंधित मंत्री महोदयांनी खुलासा करावा. शासनाने गृहनिर्माण धोरण जाहीर केले आहे, या रकमेचा या धोरणावर कोणता परिणाम होणार आहे ? याची माहिती द्यावी. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण हे गृहनिर्माण धोरणावर बोलले आहेत, धारावीकरिता ग्लोबल टेंडर काढलेले आहे. या योजनेत यापैकी किती रकमेचा वापर केला जाणार आहे ? याचा खुलासा करावा.

सभापती महोदय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाची बाब क्र.228 "दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक व पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र यांना सहाय्यक अनुदान" बाबत आहे. याबाबत मी नम्रपणे सांगू इच्छितो की, कणकवली येथे नाटयसंमेलन झाले. नाटय संमेलनाला शासन 25 लाख रुपये अनुदान दिले होते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन व नाटय संमेलनाचा अनुदान देण्याची ही दरवर्षीची प्रथा व पध्दती आहे. परंतु कणकवली येथील नाटय संमेलन पालकमंत्री यांच्या नियंत्रणात होते. त्यांनी असे जाहिर केले होते की, तेथे विरोधी पक्ष शिल्लक ठेवला नसल्यामुळे विरोधी पक्षातील कोणालाही निमंत्रण दिलेले नाही, असे वर्तमानपत्रात छापून आलेले आहे.

यानंतर श्री.सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

तेथे जे कार्यकर्ते नेमले होते तेही त्यांनीच नेमले होते. त्यामुळे मंडपाबाहेर मारामाऱ्या झाल्या. त्याचा परिणाम नाट्य संमेलनास येणाऱ्या रसिक प्रेक्षकांवर झाला. हे मी माझ्या मनचे सांगत नाही तर तेथील वर्तमानपत्रामध्ये ज्या बातम्या आलेल्या आहेत त्या आधारेच सांगतो आहे. तेथे गेलेल्या एका नाट्य रसिकाने वर्तमानपत्रामध्ये त्या संमेलनासंबंधात जे पत्र लिहिले होते त्यात त्याने म्हटले आहे की, मी मंडपामध्ये गेलो तर तेथे मी एकटाच श्रोता होतो आणि त्या ठिकाणी चर्चेसाठी केवळ 10 जण बसले होते आणि तेथील कोठल्याही मंडपामध्ये 20-25 पेक्षा अधिक उपस्थिती नव्हती. अशा भयभीत वातावरणामध्ये नाट्यसंमेलन प्रथमच महाराष्ट्रात घडले आणि तेही तेथील पालक मंत्र्यांच्या नेतृत्त्वाखाली घडले. त्यांनी स्वत: त्याबाबत जाहीर केले की, या नाट्य संमेलनावर काँग्रेसचा पूर्ण पगडा होता. ... सभापती महोदय, मी हे माझे स्वत:चे असे काहीच सांगत नाही. किबहुना मी नाट्य परिषदेचा आजीव सभासद आहे....

श्री. राजन तेली : सभापती महोदय, ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी जे काही सांगतो आहे ते त्यावेळेस आणि त्यानंतर वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांच्या आणि पत्रांच्या आधारे सांगतो आहे. तसेच मी मंत्र्यांबद्दल बोलतो आहे आणि मंत्र्यांबद्दल येथे बोलता येते. मी मंत्र्यांबद्दल येथे एकही निषेधाचा शब्द बोललो नाही वा त्यांच्यावर आरोपदेखील केलेला नाही. जे काही वृत्तपत्रांतून छापून आले त्या संबंधानेच बोलतो आहे. त्यावर आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.तेली यांना काही उत्तर द्यायचे आहे काय ? मंत्र्यांबद्दल जर मी असे काही बोललो असेन तर सदस्य म्हणून ते उत्तर देणार आहेत का ? का त्यांचा काही हरकतीचा मुद्दा आहे. तसे असेल तर त्यांनी ते स्पष्ट सांगावे. असो.

सभापती महोदय, अशा प्रकारे त्या नाट्य संमेलनाला अशा प्रकारे सर्व संबंधितांनो बोलाविले की नाही, तेथे मंत्र्यांना, तेथील स्थानिक आमदारांना, लोकप्रतिनिधींना मान दिला पाहिजे असतो तसा तो दिला गेला की नाही याची मला माहिती नाही. परंतु वर्तमानपत्रातून मात्र आलेले आहे की, कणकवलीच्या संमेलनाकडे नाट्य रसिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी देखील पाठ फिरविली. खरे तर नाट्य संमेलन म्हणजे पूर्ण महाराष्ट्राचा विषय आहे पण तो बाजूलाच पडला आणि तेथे ज्या प्रकारे नाट्य संमेलन पार पडले त्यामुळे नाट्य निर्मातेदेखील संतप्त झाले होते. तेथील नाट्य संमेलन यशस्वी झाले होते की नाही याबाबत श्री.गजानन गानू यांचे आलेले एक पत्र

........ आय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

अतिशय बोलके आहे. तेव्हा माझा सांगण्याचा मुद्दा हा आहे की, अशा प्रकारे शासनाचे अनुदान असणारे नाट्य संमलेनासारखे कार्यक्रम घिसाडघाईने होता कामा नयेत आणि त्या विषयी ज्या काही प्रतिक्रिया वर्तमानपत्रांतून देखील आल्या तशा प्रतिक्रिया यापूर्वीच्या संमेलनांबाबत यापूर्वी केव्हाही आलेल्या नव्हत्या हे आपण लक्षात घ्यावे आणि अशा प्रकारे पक्षीय नाट्य संमेलन जाहीर करणे अयोग्य आहे. शासनाचे अनुदान घेतल्यानंतर त्या ठिकाणी भले मंत्री वा राज्यमंत्री तेथे मुख्य असले तरी तेथील आमदारांचा, स्थानिक लोकप्रतिनिधींचाही सन्मान झाला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.तावडे हे रत्नागिरीचे आहेत. ते त्या नाट्य संमेलनामध्ये आवर्जून दिसले. परंतु सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी मात्र कोठेही दिसले नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.उपरकर यांचा तर तेथे दिसण्याचा प्रश्नच येत नाही. आता त्या संमेलनावर पूर्णपणे कॉंग्रेसचा पगडा होता तरी श्री.गुरूनाथ कुलकर्णी तेथे दिसत नव्हते. तेव्हा नाट्य संमेलनामध्ये आपण आपल्या पक्षाची पताका पडकावलीत पण ज्या प्रकारे ते नाट्य संमेलन पार पडले ते लक्षात घेता महाराष्ट्रातील जनता त्या नाट्य संमेलनाचा जरूर विचार करील आणि सरकारला देखील करण्यास भाग पाडील असे मी या ठिकाणी नमूद करतो. त्याबरोबरच आमचे परम मित्र सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी उगाचच हा विषय मनाला लावून घेऊ नये. कारण या राज्यामध्ये मंत्रिमंडळामध्ये मंत्र्यांच्या बाबतीत जे काही घडते ते करावेच लागते. आता या ठिकाणी श्री.चहल यांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषेत धू धू धुतले आहे. तेव्हा असे येथे चालूच असते. मंत्री झाल्यानंतर असे सारे होणारच. आता या ठिकाणी सन्माननीय मंत्री श्री.भुजबळ बसले आहेत. तेही यातून तावून सुलाखून गेलेले आहेत. त्यांच्यावर देखील अनेक आरोप झाले. अगदी ते तेलगीच्या मांडीला मांडी लावून बसले म्हणूनही सांगण्यात आले पण आम्ही तसे म्हणणार नाही. आम्ही त्याबद्दल तक्रार देखील करीत नाही. एवढे बोलून मी भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

***

( यानंतर श्री. सरफरे ..... जे 1 ...

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2007-2008 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्याकरिता मी याठिकाणी उभी आहे. प्रथम जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 102 वरील बाब क्रमांक 106 कडे आपल्या मार्फत शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. अलमट्टी धरणामुळे महाराष्ट्रातील सांगली व कोल्हापूर जिल्हयातील अनेक गावे बऱ्याच वेळा पाण्याखाली जातात. अशावेळी म्हैसाळ पाटबंधारे प्रकल्प पूर्ण केला आणि कृष्णा नदीमधील पाणी योग्य प्रमाणात उचलून दुष्काळी भागाला पोहोचविले तर त्या पाण्याचा दुहेरी उपयोग होईल. याकरिता कृष्णा नदीवरील ताकारी म्हैसाळ या पाटबंधारे प्रकल्पाकरिता जादा निधीची तरतूद करुन तो पूर्ण करण्यात यावा.

सभापती महोदय, त्यानंतर वस्त्रोद्योग विभागाच्या पृष्ठ क्रमांक 188 व बाब क्रमांक 199 मध्ये सहकारी सूतगिरण्यांना भाग भांडवल देण्याकरिता अधिक तरतूद करण्यात आली आहे. हे अत्यंत स्तुत्य आहे, परंतु या बाबतीत एक सांगावेसे वाटते की, राज्यातील अनेक सूतगिरण्या आजारी दिसतात. त्यामुळे अनेक कामगारांची उपासमार होते. यावर एक उपाय दिसत असून तो आपणासमोर मांडणार आहे. राज्यातील 10 कोटी जनतेला आवडेल अशा कापडाची आपण निर्मिती केली आणि त्याचबरोबर सर्व सूतगिरण्यांचा विकास करण्यासाठी एक अभ्यासगटाची नियुक्ती केली तर अधिक चांगले होईल. त्याचप्रमाणे टेक्सटाईल कॉटन फेडरेशनमार्फत फॅशन डिझायनिंग अद्ययावत पध्दतीने विकसित केले तर ते अतिशय उत्तम ठरेल. त्याकरिता नवीन तंत्रज्ञान वापरण्याची आवश्यकता आहे. आज इचलकरंजी येथील हातमागाचा धंदा अडचणीत आला आहे. त्यामधील पॉवरलूमच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सभापती महोदय, आज मुंबईमधील अनेक सूतगिरण्या बंद पडल्या आहेत. त्यांच्या जागांची विल्हेवाट लावण्यात आली आहे. परंतु त्यामध्ये ज्या काही बच्याकुच्या गिरण्या आहेत त्या कशा उभ्या रहातील आणि कशा सुरु होतील याबाबत शासनाने विचार करावा अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 120 वरील बाब क्रमांक 130 ही उद्योगांना कर्ज देण्यासंबंधीची आहे. या बाबीच्या माध्यमातून मुंबईच्या संदर्भात सूचना करु इच्छिते. मुंबई आणि उपनगरातील उद्योगासाठी व कारखाने उभारण्यासाठी मोठ मोठया उद्योजकांना फार मोठया जमिनी दिल्या आहेत. परंतु आज आपण बघितले तर या जमिनी रहिवाश्यांच्या इमारतीसाठी आणि मॉल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्रीमती सुधा जोशी....

बांधण्यासाठी वापरण्यात आल्या आहेत. या संदर्भात चेंज ऑफ युजर्स परपज झालेले आहे. या संदर्भात शासनाने ज्या उद्योजकांना आपला उद्योग उभारण्यासाठी जागा दिली आहे त्या जागेचा वापर त्याच कारणासाठी होत नसेल, रहिवाश्यांची इमारत उभी करण्यासाठी होत असेल, मॉलची उभारणी करण्याकरिता होत असेल तर ती जागा परत घेण्यात यावी. आणि त्या जागेचा लिलाव करुन जे नवीन उद्योगपती पुढे येतील त्यांना ती जागा देण्याची व्यवस्था करण्यात यावी असे मला शासनाला सुचवावेसे वाटते.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 203 वरील बाब क्रमांक 222 मध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्यात आलेली आहे. ही वाढ त्यांना मिळाली असेल. आज महागाई खूप वाढलेली आहे. अशा महागाईच्या काळात त्यांना मिळणारे तुटपुंजे उत्पन्न पुरेसे नाही. त्यामुळे या मानधनामध्ये आणखी वाढ होऊ शकते काय? याबाबत शासनाने अवश्य विचार करावा.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (पुढे सुरू....

सभापती महोदय,रोजगार स्वयंरोजगार या संदर्भातील बाब मी शोधण्याचा प्रयत्न केला, पुरवणी मागण्यांचे सगळे पुस्तक चाळले परंतु मला जे बोलायचे आहे,ते कोणत्या बाबीअंतर्गत बोलावे हे मला समजत नाही. उद्योग आणि कामगार विभागाच्या बाबीशी संबंधित विषय असावा असे मी समजून मला या संबंधाने मुद्दा मांडावयाचा आहे.

सभापती महोदय, आज राज्यामध्ये सुशिक्षित बेकारांची संख्या 51 लाखाच्या वर गेलेली आहे. या संदर्भाने मला असे सुचवायचे आहे की, व्यवसाय प्रशिक्षण परीक्षा मंडळामार्फत जे कोर्सेस पूर्ण करणारे प्रशिक्षणार्थी आहेत, त्यांना व्यवसाय सुरू करण्यासाठी त्वरित कर्ज मंजूर केले तर त्यांनी ज्या प्रकारचे शिक्षण घेतलेले आहे, ते कारणी लागेल, ते व्यवसाय करू लागतील आणि बेकारीला थोडा तरी आळा बसेल. म्हणून प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थी तरुणांना विनाविलंब कर्ज द्यावे, अशी मी शासनाला विनंती करते. धन्यवाद. जयहिंद जय महाराष्ट्र.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बाब क्रमांक 149, पान क्रमांक 139 च्या संबंधाने मला सांगावयाचे आहे. जिल्हा नियोजन मंडळाच्या निवडणूक लावली होती, त्या संदर्भाने मी पूरक मागणीच्या माध्यमातून मागणी केली होती की. जिल्हा नियोजन मंडळाची तीन वर्षांनी निवडणूक होऊन लोकप्रतिनिधी नियुक्त केले जावेत. तसे 73 व्या घटना दुरुस्तीमध्येच म्हटलेले आहे. त्याशिवाय जिल्हा नियोजन मंडळाची पूर्तता पूर्ण होत नाही. या पूर्वी राजकीय अडचणी आल्यामुळे निवडणूक स्थगित करण्यात आली. आता निवडणूक ताबडतोब शासनाने घ्यावी, अशी या निमित्ताने मी मागणी करतो. बाब क्रमांक 139 मध्ये भोकरदन मतदार संघातील आमदार निधी लॅप्स झालेला होता, तो उपलब्ध करून दिलेला आहे. सभापती महोदय, आमदारांना जो निधी दिला जातो तो स्थानिक पातळीवरील कामासाठी दिला जातो. त्या ठिकाणी नगरपालिका, जिल्हापरिषदांचा निवडणुका असतात, त्यावेळेस त्या ठिकाणी आमदार निधी खर्च करण्यास अडचणी निर्माण होतात. तो निधी ठराविक मुदतीनंतर वापरता येत नाही, तो लॅप्स होतो. तो लॅप्स न होण्याची तरतूद शासनाने केली पाहिजे. नांदेड जिल्ह्यातील आमदारांना तांत्रिक बाबीवर तो निधी नंतर खर्च करण्यास परवानगी दिलेली आहे. आमदार निधी 1 कोटी रुपये दिल्यानंतर तो निधी मार्चपर्यन्त खर्च झाला नाही तरी पुढच्या वर्षापर्यन्त तो खर्च करता आला पाहिजे अशी तरतूद शासनाने अर्थसंकल्पामध्ये करावी, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

त्यानंतर बाब क्रमांक 145, पान क्रमांक 186 च्या संदर्भात मला सांगावयाचे आहे. पत संस्थांनी डिपॉझिट किती गोळा करायचे, यावर बंधन घातले पाहिजे. माजी आमदार श्री.मेटे यांच्या वाढ दिवसाच्या निमित्ताने मी औरंगाबाद येथे गेलो होतो. त्या ठिकाणच्या बुलढाणा सहकारी पत संस्थेमध्ये 600 कोटी रुपयाच्या ठेवी आहेत. त्यांनी अनेक शाखा उघडलेल्या आहेत, अशी मला माहिती मिळाली. या पतसंस्थांवर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण नाही, नाबार्डचे नियंत्रण नाही. कोणती तरी एखादी पंच कमिटी काही कालावधीकरिता निवडून येते, त्या पतसंस्थांवर नियंत्रण नसल्यामुळे त्यांच्याकडून ठेवीदारांचे पैसे सुरक्षित रहात नाहीत. या संदर्भात भूदरगड पतसंस्थेचे उदाहरण देता येईल. कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड पतसंस्था ही नावलौकिक असलेली पतसंस्था होती. परंतु त्यावर कोणाचे नियंत्रण नसल्यामुळे कालांतराने ती डबघाईला आली. या पतसंस्थांवर कोणाचे नियंत्रण नाही, अर्बन बँकांवर रिझर्व्ह बँक नियंत्रण ठेवू शकलेली नाही. रिझर्व्ह बँक आणि

3....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.जयंत प्र.पाटील (पुढे सुरू...

नाबार्ड हे या पतसंस्था आणि अर्बन बँकांवर नियंत्रण ठेवण्यास कमी पडलेले आहे. या पत संस्थांनी डिपॉझिट 5 कोटी, 10 कोटी किंवा 15 कोटी पर्यन्त गोळा करावे त्याच्या वर डिपॉझिट गोळा करता कामा नये, असे बंधन घातले पाहिजे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

ही बाब शासनाने गांभीर्याने घेतली पाहिजे आणि या पतसंस्थांना यापुढे डिपॉझिट गोळा करण्याच्या बाबतीत बंधन घातले पाहिजे अशी मी या पुरवणी मागणीच्या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 38 वरील कृषी विभागाच्या बाब क्रमांक 46 बाबत बोलावयाचे आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची तरतूद या पुरवणी मागणीमध्ये करण्यात आली आहे. गेल्या अधिवेशनामध्ये आंबा उत्पादकांना नुकसान भरपाई देण्याचे जाहीर झाले होते तसेच या अधिवेशनामध्ये सुरुवातीच्या आठवड्यामध्ये जाहीर झाले होते परंतु या पुरवणी मागण्यांमध्ये त्याची तरतूद कोठेही दिसत नाही. यादृष्टीकोनातून तरतूद करावी आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना ती नुकसान भरपाई मिळाली पाहिजे अशी मी या बाबीच्या निमित्ताने मागणी करतो. शेतकऱ्यांना 6 टक्के दराने कर्ज देण्याची योजना आहे. शेतकरी जेव्हा आपल्या शेतीचे उत्पादन घेण्यास सुरुवात करतो त्याच्या दोन महिने आधी ही योजना शासनाने जाहीर केली पाहिजे. अजूनपर्यंत त्याबाबतचे धोरण जाहीर केलेले नाही. माननीय सहकार मंत्री सांगतात की, 6 टक्के दराने कर्ज देणार. दरवर्षी दिवाळी झाल्यानंतर प्रत्यक्षात शेतकऱ्यांना धोरण समजले पाहिजे की, आपल्याला 6 टक्के दराने, 4 टक्के दराने, 8 टक्के दराने कर्ज मिळणार आहे. त्याप्रमाणे किती कर्ज घ्यावयाचे हे शेतकरी ठरवू शकतो. एप्रिल महिन्याच्या आत धोरण ठरले पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 39 वरील कृषी विभागाच्या बाब क्रमांक 49 बाबत बोलावयाचे आहे. कर्जत, जिल्हा रायगड येथे कृषी संशोधन केंद्र आहे. त्या ठिकाणी भरपूर मोकळी जागा आहे. त्या ठिकाणी कृषी चिकित्सालय सुरु करण्याची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 15 वरील गृह विभागाच्या बाब क्रमांक 18 बाबत बोलावयाचे आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. छगन भुजबळ साहेबांबद्दल बोलले. या राज्यात जो मोठा तेलगी घोटाळा झाला त्यामध्ये उच्च पदावर असलेल्या अनेक अधिकाऱ्यांना तुरुंगात टाकण्यात आले. आता कोर्टाने त्यांना

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .......

निर्दोष सोडलेले आहे. ज्यांनी काहीही केलेले नाही त्यांना निर्दोष सोडलेले आहे. मी माननीय गृहमंत्र्यांना विनंती करतो. पोलीस खात्यामध्ये दोन गट आहेत त्यामुळे एकमेकांचा बदला घेण्यासाठी पोलीस आपल्या पदाचा वापर करीत असतील तर आपण ज्या खाक्याने सभागृहात बोलता आणि सांगता त्याप्रमाणे ज्या अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून आपला बदला घेण्यासाठी त्यांच्यावर खोट्या केसेस केल्या त्यांच्यावर शासनाने कारवाई केली पाहिजे. यामध्ये काही लोकप्रतिनिधींनाही गुंतविण्याचा प्रयत्न केला. ही बाब आपल्या दृष्टीने बरोबर नाही. आपण सार्वजनिक जीवनामध्ये काम करीत असताना अशा प्रकारे कोणालाही गुंतविण्याचे काम करणारे जे शासकीय अधिकारी आणि पोलीस अधिकारी असतील त्यांच्यावर सुध्दा कारवाई झाली पाहिजे जेणेकरुन त्याची पुनरावृत्ती होणार नाही तसेच खोट्या केसेस टाकण्याबाबत कोणी धजावणार नाहीत. याबाबत शासनाने आणि माननीय गृहमंत्र्यांनी खुलासा करावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर पृष्ठ क्रमांक 21 वरील गृह आणि बंदरे विभागाशी संबंधित बाब क्रमांक 26 बाबत मला सांगावयाचे आहे. मच्छिमारांना समुद्रामध्ये राखीव क्षेत्र ठेवलेले आहे. त्या ठिकाणी 720 किलोमीटरमध्ये नियोजनबध्द आराखडा तयार केलेला आहे. पाच वर्षापूर्वी त्या ठिकाणी मच्छिमारांसाठी राखीव क्षेत्र ठेवलेले आहे. त्या क्षेत्रामध्ये आपण बंदर विकास करणार असलो तर ज्या बंदरांचा विकास झालेला आहे त्यालाही अडथळा येण्याची शक्यता आहे. ज्या ठिकाणी आपण मच्छिमारांसाठी राखीव क्षेत्र ठेवलेले आहे, या 720 किलोमीटरमध्ये जे अधिकार मच्छिमारांना दिलेले आहेत ते अधिकार कायम ठेवले पाहिजेत. त्या ठिकाणी जे ब्रिजेस आहेत मग त्यामध्ये उलव्याचा ब्रिज असेल, धरमतरचा ब्रिज असेल, रेवदंडा-साळव ब्रिज असेल त्याच्या खालून जल वाहतूक होता कामा नये.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ SBT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 11:00

(श्री. जयंत प्र. पाटील...)

जल वाहतूक सुरु झाली त्यावेळी काही ठिकाणी पूल पडले. वसईचा पूल पडला, मुंब्र्याचा पूल पडला. ब-याच कालावधीनंतर कोकणामध्ये दळणवळणाची सोय झाली. याबाबतीत सार्वजनिक बांधकाम खाते, बंदर खाते आणि महसूल खाते या तिन्ही खात्यांनी एकत्र येऊन एक आराखडा तयार केला पाहिजे. हा आराखडा तयार करताना लोकप्रतिनिधी, मच्छिमार सोसायट्या, मच्छिमारीच्या क्षेत्रामध्ये काम करणारे कार्यकर्ते या सर्वांना विश्वासात घेतले पाहिजे. मेरिटाईम बोर्डाच्या प्रशासकीय रचनेमध्ये माननीय मंत्री महोदय बदल करु इच्छित आहेत. त्याबाबत मी त्यांना पत्रही दिले होते. माझे म्हणणे असे आहे की, बंदर अधिका-यांच्या जागांवर जर तुम्ही कार्यालयातील क्लार्क आणून बसविले तर ते कसे चालेल. बंदर अधिकारी हा एक विशिष्ट संवर्ग आहे. ते विशेष दर्जा आणि अनुभव असणारे अधिकारी आहेत. त्यांच्या जागी क्लार्कची नेमणूक करणे उचित होणर नाही. मी याबाबतीत माननीय मंत्री महोदयांना पत्र देऊन एक बैठक घेण्यासाठी सांगितले होते. बैठकीबाबत मंत्री महोदयांचे मला पत्र आले नाही, परंतु त्यांचा जेव्हा मला फोन आला त्यावेळी मी अन्य महत्वाच्या कामामध्ये व्यस्त होतो. माझी या निमित्ताने मंत्री महोदयांना विनंती आहे की, बंदरे सुरक्षित राहाण्यासाठी योग्य ती दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. यासाठी केन्द्र शासनाच्या धर्तीवर आयएसपीएस संस्था निर्माण करुन अतिरेक्यांपासून बंदरे सुरक्षित राहतील यादृष्टीने शासनाने धोरण ठरविले पाहिजे.

सभापती महोदय, मच्छिमारांसाठी ज्या जेट्या बांधल्या जातात त्यांची दुरुस्ती वर्षानुवर्षे होत नाही. जेट्यांपर्यन्त जाणा-या रस्त्यांची दुरुस्ती देखील केली जात नाही. ही रस्त्यांची दुरुस्ती बंदर खात्याने केली पाहिजे. 1996 सालामध्ये मेरिटाईम बोर्डाची स्थपना झाली त्यावेळी त्याचे बजेट दोन-तीन कोटीचे होते हे बजेट आता 80 ते 90 कोटी झालेले आहे. आज मेरिटाईम बोर्डाला चांगले उत्पन्न मिळत आहे. केवळ बँकेमध्ये पैसे ठेवून त्याचा काही उपयोग होणार नाही. ते पैसे विकासाच्या कामासाठी लावावेत अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

बाब क्रमांक 74 आणि 78, पान क्रमांक 69 आणि 70. सभापती महोदय, थेरोंडो, तालुका अलिबाग या ठिकाणी पूल बांधण्याबाबत मी सार्वजनिक बांधकाम विभागाला दोन-तीन पत्रे दिलेली असून त्या पत्राची साधी दखल घेण्यात आलेली नाही. समुद्रामध्ये जाणा-या मच्छिमारांसाठी थेरोंडा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील...)

येथे पूल बांधावा अशी अनेक वर्षापासूनची मागणी आहे. या मागणीची पूर्तता होईल अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. पोयनाड पोलीस स्टेशन हे इंग्रजांच्या काळात बांधलेले आहे. या पोलीस स्टेशनच्या नवीन बांधकामाबाबत मी प्रश्न विचारला असता तरतूद करण्यात येईल असे उत्तर मला दिले होते. तसेच कर्जत पोलिस स्टेशन, तहसिल कार्यालय आणि उपकोषागार हे डोंगरावर असून लोकांना उंच ठिकाणी चालत जावे लागते. ही कार्यालये खाली रेल्वे स्टेशन नजिक आणण्याबाबतीत मी अनेक वेळा या सभागृहामध्ये चर्चा केलेली असून शासनाने मला तसे आश्वासनही दिलेली आहे. परंतु त्या आश्वासनाची पूर्ती करण्यामध्ये शासन अयशस्वी ठरलेले आहे. तेव्हा याबाबतीत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 170, पान क्रमांक 165. आदिवासी विभागामध्ये काम करणा-या विविध संस्थामध्ये सचिव म्हणून काम करणा-यांना आदिवासी विकास महामंडळामार्फत जे वेतन मिळत होते ते बंद झालेले आहे. तेव्हा त्यांच्या वेतनाची तरतूद तातडीने करावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

...नंतर कु. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम एम. ....... 11:05

श्री.जयंत प्र.पाटील......

बाब क्रमांक 53 आणि पान क्रमांक 49 मधील शिक्षण खात्यासबंधात शालेय शिक्षण मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी सभागृहामध्ये चर्चा झाल्यानंतर त्या चर्चेला उत्तर देतांना ब-याच वेळा सांगितले की, शासनातर्फे कायम विनाअनुदानित तत्व पूर्णपणे बदलण्यात येईल आणि तसा निर्णय पुढील कॅबिनेट बैठकीमध्ये घेण्यात येईल आणि ते असेही सांगतात की, टप्प्याटप्प्याने शाळा अनुदानावर आणू,अशा प्रकारे प्रत्येक अधिवेशनामध्ये मंत्रिमहोदय गोड आश्वासने देतात. मंत्रिमहोदय अजूनपर्यंत आपली पुढील कॅबिनेट मिटींग झालेली नाही आणि अजूनपर्यंत काही तुमचा यासंदर्भातील दिलेल्या आश्वासनांनुसार घेतलेला निर्णय बाहेर पडलेला नाही. शासनाने लवकरात लवकर शाळांच्या संदर्भातील कायम विनाअनुदानित हे तत्व बदलून टाकावे, अशी मागणी मी यानिमित्ताने या ठिकाणी करतो व मला येथे बोलण्यासाठी जास्त वेळ दिल्याबद्दल आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

N - 2

श्री.श्रीकांत जोशी ( औरंगाबाद पदवीधर मतदारसंघ ) :सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी आपल्या भाषणाचा समारोप जेथून केला तेथून मी सुरुवात करतो.

बाब क्रमांक 53 आणि पान क्रमांक 49 यामधील शिक्षण विभाग महागाई भत्त्यासाठी 300 ते 350 कोटी रुपये खर्च करते पण विशेषत: मराठवाडयातील जास्त असलेल्या पाचवी ते सातवीच्या तुकडयांसाठी सर्व प्रकारचे वैधानिक आंदोलन करुन देखील जर वित्तमंत्री दाद देत नसतील तर आम्ही नेमकं काय समजावे की, मराठवाडयामध्ये जास्त तुकडया आहेत, म्हणून वित्तमंत्री अनुदान देत नाही का ? का आपण कमी पडत आहेत ? का आपला काही याच्यामध्ये इंटरेस्ट नाही? या अधिवेशनामध्ये यासंदर्भामध्ये ही चर्चा होऊन यांच्यासाठी काहीतरी होणे अत्यंत आवश्यक आहे किंवा सी.एफ.ॲडव्हान्स काढून त्यांना अनुदान देणे अत्यंत आवश्यक आहे. तुकडयांचा काहीही दोष नसतांना फक्त संचालक म्हणजे डायरेक्टर ऑफ एज्यूकेशनच्या काही दळभद्री अधिका-यांनी त्यांचे इंटरेस्ट साधले गेले नाहीत म्हणून "ते गठोडं उचलले आणि बाजूला फेकून दिले." मराठवाडयातील जवळपास 600 तुकडया अद्याप अनुदानावर यावयाच्या राहिलेल्या आहेत. वेळोवेळी मराठवाडयाच्या संदर्भात आमदार म्हणून मी, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे असतील, आता तालिका सभापतीच्या आसनावर बसलेले सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते असतील किंवा माजी विधानपरिषद सदस्या श्रीमती संजीवनी रायकर असतील या सर्वांनी कंठ फुटेपर्यंत विनंती केली परंतु आजपर्यंत त्या तुकडयांना अनुदान द्यावयाला शासनाला वेळ मिळाला नाही. वित्तमंत्र्यांनी यासंदर्भात तीनदा बैठक बोलाविली तरीपण मला समजत नाही की,इतरांना जे काही मिळते म्हणजे इतर ठिकाणी 4,000 तुकडयांना अनुदान मिळते पण मराठवाडयातील 600 तुकडयांना ते का मिळत नाही ? हा अन्याय सहन करण्यापलिकडचा आहे. कृपा करुन हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर माननीय वित्तमंत्री यांनी व शिक्षणमंत्र्यांनी यासंदर्भात मार्ग काढावा अशी मी विनंती करतो.

बाब क्रमांक 83 आणि पान क्रमांक 77 मध्ये मराठवाडा एकात्मिक विकासासाठी पी.डब्ल्यू.डी.ला माननीय भूजबळ साहेब आपले 100 कोटी अनुदान मिळालेले आहे. आमची एवढीच विनंती आहे की, एकात्मिक विकास प्रकल्प 2005 आणि 2006च्या निमित्ताने यासंदर्भामध्ये मराठवाडयामध्ये ज्यावेळी बैठका झाल्या त्यावेळी 1100 कोटी रुपयांच्या घोषणा झाल्या होत्या परंतु आतापर्यंत यासंदर्भामध्ये फक्त 177 कोटी रुपये खर्च झालेले आहेत आणि बाकी प्रायव्हेट

N - 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



JPK/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम एम. ....... 11:05

श्री.श्रीकांत जोशी.......

पार्टिसिपेशनलाही आपल्याकडे कोणीही येत नाही आणि असलेले पैसेही मिळत नाहीत म्हणजे हे समजत नाही की, माननीय जयंत पाटील यांचा आमच्यावर राग आहे का ? काही आणखी प्रॉब्लेम आहे ? यासंदर्भात आम्हाला उत्तरामध्ये जर काही कळले तर बरे होईल. कारण आमच्या औरंगाबाद येथे नवसाच्या मंत्रिमंडळाच्या बैठका होतात परंतु खडकु काही हातात येईना असे झालेले आहे. तुमच्यासारखा मोठा मंत्री असतांना हे व्हायला पाहिजे,अशी आमची अपेक्षा आहे. परवा एका निविदेच्या संदर्भातील बैठकीमध्ये 75 टक्के शासनाच्या सहभागाची मागणी झालेली आहे आणि ती जर नसेल तर त्यासंदर्भातील प्रकल्प रद्द होईल, अशी चर्चा आहे. मराठवाडयातील तीनपदरी,चौपदरी रक्तवाहिन्या दुरुस्त करण्याचे जे काम आहे ते आपल्या काळामध्ये आपण पूर्ण करावे अशी मी विनंती करतो. मी गेले पाच वर्षे आमदार आहे आपण पी.डब्ल्यू.डी.मध्ये एखादी बैठक जरी आमच्या विभागामध्ये घेतली तरी आमच्या अडचणी तुम्हाला मनमोकळेपणाने सांगता येतील कृपा करुन एखादी तरी बैठक आपण बोलवावी म्हणजे ज्यात आम्हाला औपचारिकरित्या चहापान करता येईल. गृहमंत्री असतांना आपण खूप चांगले होता पण आजकाल आपण काही बोलतच नाही यासंदर्भात आपण संवाद चालू केला तर आमच्या मराठवाडयातील रक्तवाहिन्या मजबूत होतील असे मला वाटते.

बाब क्रमांक 102 पान क्रमांक 94 पॉलिटेक्निक कॉलेजच्या संदर्भातील ही मागणी आहे. माननीय श्री.दिलीप वळसे पाटील साहेब आपण हिंगोलीमध्ये एक पॉलिटेक्निक कॉलेज स्थापन करण्याकरिता आपण एकदम 14 कोटी रुपये दिले ही तर आणखी तुमची एक लोणकढी थाप म्हणता येईल. हिंगोलीमध्ये ते कॉलेज स्थापन करावयाला अजून जागाच मिळालेली नाही तरी आपण त्याकरिता तेथे एवढी मोठी प्रोव्हिजन करुन टाकलेली आहे. नवीन जिल्हा आहे तेथे पॉलिटेक्निक कॉलेज असणे ही उत्कृष्ट बाब आहे. पण ही तरतूद खर्च होणार नाही म्हणून माझी विनंती अशी आहे की, जिंतूरच्या पॉलिटेक्निक कॉलेजकरिता यामधील काही 2 ते 4 कोटी रुपयांचा निधी आपण ट्रान्सफर करु शकला तर बरे होईल. जिंतूर येथे पॉलिटेक्निक कॉलेज मध्ये येण्याजाण्यासाठी बसची व्यवस्था नाही आणि तेथे राहण्यासाठी निवासस्थानाची व्यवस्था नाही म्हणजे एकीकडे चांगले पॉलिटेक्निक कॉलेज बंद पडण्याच्या मागे आहे आणि दुसरीकडे आपण

N - 4



श्री.श्रीकांत जोशी......

जेथे जागाच नाही तेथे कॉलेज उभे करण्यासाठी आपण आधीच प्रोव्हिजन करुन ठेवलेली आहे. ते 14 कोटीचे प्रोव्हिजन इयरमार्क करुन कोठे डिपॉझिट करुन ठेवता येईल का ? म्हणजे हिंगोलीचे पॉलिटेक्निक कॉलेज कधी ना कधी तरी नशिबी लागेल. ही विनंती मी या निमित्ताने करतो.

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 11:10

श्री. श्रीकांत जोशी ....

सभापती महोदय, बाब क्र.128 पान क्र. 119 बायोटेक्नॉलॉजिकल पार्क सुरु करण्यासाठी 9 कोटी 83 लाखांची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु हे पैसे कुठे खर्च करणार याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. कशासाठी खर्च करणार हे स्पष्ट केलेले नाही. याचा उलगडा झाला पाहिजे. अशा प्रकारची नुसती तरतूद करणे चुकीचे आहे. बायोटेक्नॉलॉजी पार्क सुरु करण्याची घोषणा गेली 5 वर्षे सातत्याने होत आहे. त्यासाठी 9 कोटी 83 लाखांची जी तरतूद करण्यात आली आहे ती जालना किंवा परभणी येथील कृषी विद्यापीठांना देणार की राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांना ही रक्कम देणार हे स्पष्ट करण्यात आलेले नाही. नाही तर नुसती तरतूद करावयाची आणि नंतर वेगळयाच भानगडी निर्माण व्हावयाच्या असे होता कामा नये. त्यानंतर बाब क्र.131 पृष्ठ क्र.120 एमएसएफसी हे महामंडळ तोटयात आहे त्यासाठी 31 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. वित्तीय महामंडळाचे कार्यालय मुंबईमध्ये आहे ते बंद करुन टाका. मुंबईतील उद्योजकांना याची गरज राहिलेली नाही. ग्रामीण भागातील उद्योजकांना मदत करण्यासाठी या महामंडळाची One time settlement करा. नवीन उद्योजकांना मदत करण्यासाठी या महामंडळाचे कार्यालय लातूर,नांदेड,संभाजीनगर,धाराशिव किंवा बुलढाणा अशा मध्यवर्ती ठिकाणी सुरु करावे. लघुउद्योजकांना मदत करावी. शासनाने 100 कोटी रुपये भागभांडवल म्हणून दिले तर 1000 कोटी रुपये मिळू शकतील आणि लघुउद्योजकांना प्रत्येकी 10-20 लाखांची मदत करता येईल. 1000 लघुउद्योजकांना शासन उभे करु शकेल. एमएसएफसी चे Revival करताना ते मुंबईच्या बाहेर करावे अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्र.136,पृष्ठ क्रमांक 145 पंतप्रधान ग्रामसडक योजना. या योजनेतील पैसा 2000-2001 या वर्षापासून पडून आहे. या योजनेकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. अतिशय धीम्या गतीने प्रगती सुरु आहे. हा पैसा वेगळया खात्यात जमा करावा. प्रायॉरिटी ठरवायची आहे. म्हणून यासाठी काही तरतूद करता आली तर या योजनेतील पैशाची योग्य तऱ्हेने विल्हेवाट लावता येईल. यानंतर बाब क्र.138,पृष्ठ क्रमांक 129 गोडाऊनचा विषय आहे. गेल्यावेळी हा मुद्दा मी उपस्थित केला होता. 52 लाख रुपयांचा मका चोरीला गेला आहे. त्यावेळी मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिले होते की, सायलो नावाची टेक्नॉलॉजी वापरु. यामध्ये लाखो टन माल गोडाऊनमध्ये बसू शकतो. विशेषत: ॲग्रीकल्चरल प्रॉडक्ट आहेत त्यासाठी या योजनेचा

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी...

अभ्यास केला जाईल. गोडाऊनच्या पुढची ही स्टेज आहे. परंतु त्याबाबतचा उल्लेख यामध्ये आलेला नाही. मला वाटते की याबाबत अभ्यास करुन सरकारने याचा पाठपुरावा करावा. यानंतर मी एक गंभीर बाब सदनाच्या निदर्शनास आणून देणार आहे आणि त्याबाबत सभापती म्हणून आपण निर्देश द्यावेत अशी माझी विनंती आहे. बाब क्र. 149, पृष्ठ क्रमांक 139. भोकरदन,जि.जालना येथील आमदारांचा स्थानिक विकास निधी अखर्चित राहिल्यामुळे स्पेशल तरतूद करण्यात आलेली आहे. राज्य शासनाचे हे स्पेशल आमदार आहेत काय ? आम्ही आमदार निधी दिल्यानंतर त्या पध्दतीने कामाची तरतूद केली पाहिजे. निधी डिपॉझीट राहिला पाहिजे. आमदारांच्या कार्यकाळापर्यंत त्याला तो खर्च करण्याचा अधिकार असला पाहिजे. त्याने दिलेला पैसा खर्च करणे ही सरकारची जबाबदारी आहे. या मतदारसंघाचे आमदार श्री. चंद्रकांत दानवे हे आहेत. सर्व आमदारांना अशीच तरतूद केली गेली पाहिजे. ते जर होत नसेल तर ही शरमेची बाब आहे आणि ती खपवून घेतली जाणार नाही. यानंतर बाब क्र.150, पृष्ठ क्रमांक 140. यामध्ये बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दोन आमदारांच्या दबावामुळे जादा खर्च केला आहे त्याला शासन कार्योत्तर मान्यता देत आहे.

नंतर श्री.भोगले ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ 11:15

श्री.श्रीकांत जोशी........

त्या बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या पगारातून ही रक्कम का वसूल केली नाही? प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई का केली नाही? माझी विनंती आहे, आमदार निधीची रक्कम ठरलेली असताना त्यापेक्षा जास्त खर्च केला गेला असेल तर प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून वसुली केली पाहिजे. हे सरकारचे जावई आहेत का? विशिष्ट पध्दतीने एका सदस्याला वेगळा न्याय आणि दुसऱ्या सदस्यांना वेगळा न्याय कसा दिला जातो? जर प्रशासकीय गोंधळ झाला असेल तर संबंधितांवर कारवाई होत नाही, फक्त कारणे दाखवा नोटीस दिली जाते आणि इतरांना दुय्यम वागणूक दिली जाते ही खेदजनक बाब आहे. 40 लाख रुपयांचा जादा खर्च केला जातो ही गंभीर बाब आहे असे मला वाटते. खरे म्हणजे या प्रकरणी सभापती महोदय, आपण शासनाला निर्देश द्यावेत अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, बाब क्र.163, पृष्ठ क्रमांक-155 वर मेडिकल कॉलेजच्या यंत्रसामुग्रीची बाब नमूद केली आहे. महाराष्ट्र टाईम्समध्ये या संदर्भात बातमी छापून आली होती. 5 कोटी रुपयांची यंत्रसामुग्री लातूर येथे धूळ खात पडली आहे. मेडिकल कॉलेजमध्ये लवकर कार्पोरेट फन्कशनिंग करण्याची गरज आहे. ॲटॉनॉमी रिक्रूटमेंट न देता लवकरात लवकर रिजनल लेव्हलवर कार्पोरेट बॉडी फन्कशनिंग करुन मेडिकल इक्वीपमेंट युटिलाईज कशी करता येतील हे पाहण्याची गरज आहे. ज्या पध्दतीने मेडिकलचे फिल्ड बदलत चालले आहे ते विचारात घेता यामध्ये गती आणावी लागणार आहे. डिसीजन ताबडतोब घ्यावे लागणार आहेत. कार्पोरेट फन्कशनिंग, मॅनपॉवर, टेक्नीकल फिल्ड यामध्ये विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. याचा परिणाम महाराष्ट्राचा मेडिकल एज्यूकेशनमध्ये देशात नव्हे तर आशिया खंडामध्ये टॉपमोस्ट असलेला दर्जा आता मागे पडून केरळ पुढे गेले, कर्नाटक पुढे गेले, दिल्ली पुढे गेली, पंजाब पुढे चालला आहे आणि आपण मागे पडत चाललो आहोत. माझी सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांना विनंती आहे, या संदर्भात शासनाने धोरण जाहीर करावे. त्याचबरोबर ज्या ज्या यंत्रसामुग्री धूळ खात पडल्या आहेत त्यासाठी वेगळा कॉर्पस् निधी उपलब्ध करुन त्या यंत्रसामुग्री मार्गी लावाव्यात.

सभापती महोदय, बाब क्रमांक 194 व 195 संबंधी बोलत असताना बाब क्र.194 च्या माध्यमातून ऊसाचा प्रश्न विशेषत: मराठवाड्यामध्ये जटील झालेला असताना साखर कारखान्यांना उताऱ्यापोटी 75 कोटी रुपये दिले जाणार आहेत. त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो आणि

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.........

कडवी टीका बाब क्रमांक-195 संबंधी करु इच्छितो. ज्या शेतकऱ्यांचा ऊस महाराष्ट्र आणि केंद्र सरकारच्या दुर्लक्षामुळे शेतात पडून राहिला, 20-20 महिने ऊसाचे गाळप न झाल्यामुळे सगळ्यात जास्त फटका मराठवाड्यातील शेतकऱ्यांना तर बसलाच परंतु राणा जगतसिंह पाटील या मंत्रीमहोदयांना देखील त्याचा फटका बसल्यामुळे तेरणा कारखाना त्यांच्या हातून निसटला. आज सरकार 48 कोटी रुपये शेतकऱ्यांना देणार आहे. कारखाना कोण चालवितो? कारखाना चालविणाऱ्या शेतकऱ्यांसाठी काही नाही. काँग्रेस पक्षाच्या समितीने हेक्टरी 60 हजार रुपयांची मागणी केली. शासन कारखान्यांसाठी 75 कोटी रुपये देणार आणि शेतकऱ्यांना फक्त 48 कोटी रुपये देणार आहे. ही अत्यंत निषेध करावा अशा प्रकारची बाब आहे. 25 हजार रुपये हेक्टरी अनुदान दिले आहे. 60 हजार रुपये का घोषित केले नाहीत? राष्ट्रवादी पक्षाच्या लोकांनी 50 हजार रुपये हेक्टरी मदत देण्याची मागणी केली. भारतीय जनता पक्षाने मोठे आंदोलन केले. शिवसेना पक्षाने आंदोलन केले. अशा पध्दतीने अत्यंत गंभीर अशा मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा निर्णय शासनाने घेतला. 50 हजार रुपये हेक्टरी मदत का जाहीर केली नाही? मी याठिकाणी मागणी करतो. सरकारने या संदर्भात निवेदन करावे. 48 कोटी रुपये अधिक 48 कोटी रुपये असे एकूण 100 कोटी रुपयांचे अनुदान देऊन 50 हजार रुपये हेक्टरी अनुदान दिले जावे. अन्यथा आम्हाला सरकारचा निषेध करावा लागेल, सभात्याग करावा लागेल. यापूर्वी या प्रश्नावर आम्ही रस्त्यावर उतरलो होतो. यापुढच्या काळात आणखी संघर्ष करावा लागेल एवढे सांगून आपण मला बोलण्यास अनुमती दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SGB/ KGS/ MAP/ 11:15

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र.5, पृष्ठ क्र.5 वर सातारा जिल्हयात कै.बा.सि.मर्ढेकर यांचे स्मारक त्यांच्या जन्मगावी उभारण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे, ही गोष्ट स्वागतार्ह आहे. परंतु ज्या ज्या साहित्यिकांचे आपण स्मारक करीत आहात त्या ठिकाणी वाचनालय उभारुन त्यांच्या साहित्याचा वारसा जतन होईल अशा प्रकारे निधीचा उपयोग झाला पाहिजे. नाही तर रिकामी वास्तू पडून राहते, तिचा दुरुपयोग झाल्याचे दिसते. माजी विधानपरिषद सदस्य श्री.विलास अवचट व श्रीमती कांता नलावडे यांनी वारंवार या संदर्भात मागणी केली होती.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ...

त्यामुळे या मागणीची प्रतीपूर्ती झालेली आहे यासंदर्भात जर आपण सन्माननीय सदस्यांना कळविले तर ते चांगले होईल.

माननीय सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 9, पृष्ठ क्रमांक 6 वर माझे विचार मांडणार आहे. पुणे आणि मुंबई येथील राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाच्या नूतनीकरणासाठी 50 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. माहिती आयोगासाठी शासनाने जी तरतूद केलेली आहे ती स्वागतार्ह आहे. माहिती आयोगाचे सक्षमीकरण जिल्हावार होणे आवश्यक आहे.

माननीय सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 12, पृष्ठ क्रमांक 7 वरील माहिती व प्रसिध्दी विभागावर माझे विचार व्यक्त करणार आहे. "दिलखुलास" ही मराठी मालिका तयार करण्यासाठी 5 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे ती चांगली गोष्ट आहे. परंतु यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, जिल्हयाच्या ठिकाणी एफ.एम. वाहिन्या असतात. ग्रामीण भागात सुध्दा लोक रेडीओवरुन एफ.एम. ऐकत असतात. आकाशवाणीवरुन प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी एफ.एम. वाहिन्या ऐकविल्या जात असतात त्यामुळे या एफ.एम. वाहिन्या तालुक्याच्या ठिकाणी सुध्दा ऐकता येतील काय?

माननीय सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 229, 230 पृष्ठ क्रमांक 211 च्या संदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितासाठी सहाय्यक अनुदान म्हणून 2,00,00,000 रुपये दिलेले आहेत. तसेच कोल्हापूर चित्रनगरी महामंडळास बिनव्याजी कर्जे देण्यासाठी 50 लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. एवढी मोठी तरतूद केल्यामुळे मला आनंद वाटला होता परंतु नंतर कळले की, ही तरतूद आपण कोल्हापूर चित्रनगरी महामंडळातील कर्मचा-यांच्या स्वेच्छानिवृत्ती योनेसाठी बिनव्याजी कर्जे देण्यासाठी केलेली आहे. काही दिवसापूर्वी मी जयप्रभा स्टुडीओच्या संदर्भात एक लक्षवेधी सूचन या सभागृहात उपस्थित केली होती. या लक्षवेधीच्या संदर्भात शासनाने सांगितले होते की, जयप्रभा स्टुडीओचे जतन करण्याचा शासन निश्चित प्रयत्न करणार आहे. जयप्रभा स्टुडीओसाठी आदरणीय गायिका लता मंगेशकर यांची अतिरिक्त जमीन घेतली जाणार आहे परंतु असे असतांनाही यासंदर्भात अद्यापपावेतो काहीही कार्यवाही झालेली दिसत नाही.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ...

माननीय सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 228 पृष्ठ क्रमांक 211 वरील कला व संस्कृती विभागाच्या संदर्भात विचार व्यक्त करणार आहे. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक व पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र यांना 1 कोटी रुपयांचे सहाय्यक अनुदान देण्यात आलेले आहे. यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, शिवसेनेच्या ग्राहक संरक्षण कक्षाने मुंबईमधील मल्टीप्लेक्स थिएटरच्या संदर्भात आवाज उठविलेला आहे. मुंबईमधील 7 मल्टीप्लेक्स थिएटर मध्ये मराठी चित्रपट दाखविले जातात परंतु या ठिकाणी मराठी चित्रपट सकाळी 10 .00 वाजता दाखविले जातात. यासंदर्भात शिवसेनेचे नेते सुधीरभाऊ जोशी यांनी आवाज उठविलेला आहे. त्यामुळे मुंबई पुणे अशा 11 ठिकाणी मराठी चित्रपट दाखविण्याची वेळ बदलवण्याची आवश्यकता आहे. तसे केले गेले नाही तर शिवसेना आपल्या शैलीत आदोलन केल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे यासंदर्भात शासनाने दखल घ्यावी अशी विनंती आहे. सांस्कृतिक विभागाच्या संदर्भात तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उल्लेख केलेला आहे. एनडीटीव्हीवर "बॉम्बे लॉयर" या नावाची इंग्रजी मालिका दाखवली जात आहे. त्यामुळे "बॉम्बे" नावाऐवजी "मुंबई लॉयर" अशा नावाने मालिका दाखविणे आवश्यक आहे.

माननीय सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 117,118 पृष्ठ क्रमांक 110 वरील विधी व न्याय विभागाच्या संदर्भात विचार व्यक्त करणार आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.........

22 जिल्ह्यांमध्ये कौटुंबिक न्यायालये स्थापन केली जातील अशी घोषणा डिसेंबरच्या अधिवेशनात केली होती. या घोषणसे एक वर्ष होत आले आहे, परंतु त्यादृष्टीने कोणतीही हालचाल झालेली दिसत नाही. त्यावेळी शासनाने सांगितले होते की, आम्ही सर्व जिल्ह्यांमध्ये कौटुंबिक न्यायालये सुरू करु, स्टाफची व्यवस्था करु, त्यासाठी निधीची तरतूद करु. सरकारने फक्त घोषणाच केलेली आहे, त्याची अंमलबजावणी केलेली नाही. सन 1984 नंतर महाराष्ट्रात फक्त चारच जिल्ह्यांमध्ये कौटुंबिक न्यायालये सुरू झालेली आहेत. 22 जिल्ह्यांमध्ये कौटुंबिक न्यायालये सुरु करण्यासाठी शासनाला 22 वर्षे लागणार आहेत काय ? माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते की, प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी न्यायालये करणार आहोत, तेव्हा त्या बाबतची अंमलबजावणी केव्हा करणार आहात ?

बाब क्रमांक 37, पृष्ठ क्रमांक 31- महसूल व वन विभाग - राज्यमंत्री श्री.रविशेठ पाटील यांनी याठिकाणी आश्वासन दिले होते की, वन कर्मचाऱ्यांची थकबाकी दिली जाईल. त्यानुसार 38 वन कामगारांची थकबाकी जाहीर झालेली आहे. गेल्या वर्षी वन विभागात रोजंदारीवर काम करणाऱ्या जवळपास 9500 कामगारांची थकबाकी राहिली आहे. या कामगारांची थकबाकी देण्यासाठी वन विभागाने आणि महसूल विभागाने पावले उचलणे अत्यावश्यक आहे.

बाब क्रमांक 145, पृष्ठ क्रमांक 138 - ग्रामीण रोजगार - याठिकाणी संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना या विषयावर चर्चा झालेली नाही. अधिवेशनाच्या अगोदर माननीय वित्तमंत्री श्री.जयंत पाटील यांची वर्तमानपत्रात पहिल्या पानावर बातमी होती की, "आम्ही रोहयोचा निधी इतर योजनांच्या कामांमध्ये क्लब करणार आहोत." संपूर्ण ग्रामीण राष्ट्रीय रोजगार योजना ही केंद्र सरकारची योजना आहे. काही जिल्ह्यांमध्ये ही योजना जाहीर केलेली आहे. परंतु त्याची अंमलबजावणी चांगल्या रितीने होत नाही. या योजनेच्या संदर्भात शासनाकडूनही कोणतेही निवेदन होत नाही. आम्ही प्रत्येक गावामध्ये प्रचारासाठी वा अन्य कामांसाठी जात असतो. त्याठिकाणी रोजगार हमी योजनेची कामे चालू आहेत का असे तेथील लोकांना विचारले असता रोहयोची कामे चालू नाहीत असे सांगण्यात येते. शासनामार्फत सांगितले जाते की, मजुरांकडून कामाची मागणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.........

आली पाहिजे. मला शासनास सांगावयाचे आहे की, शासनाकडे कामाची मागणी केल्यास आपणास काम मिळते याची मजुरांना प्रथम माहिती करुन दिली पाहिजे. तरच ते कामाची मागणी करु शकतील. तेव्हा याबाबत शासनाने लक्ष घालावे.

महिला व बालविकास विभागाबाबत बोलावयाचे झाले तर "यशदा" संस्थेने एक कार्यशाळा आयोजित केली होती. तसेच बाल हक्क आयोग स्थापन करण्याचे जाहीर केलेले आहे. त्याची अधिकृत माहिती या सदनाला मिळालेली नाही. तेव्हा या आयोगाचे स्वरुप कसे असणार आहे ? त्यासाठी किती आर्थिक तरतूद करण्यात येणार आहे ? याबाबतची माहिती आम्हाला मिळालेली नाही. बाल कामगारांच्या संदर्भात एक जी.आर.काढण्यात आला होता. त्यानुसार त्यांना संरक्षण देण्यात येते काय ? वेगवेगळ्या राज्यातून मुले पळून येतात त्याबाबत कोणता कृती कार्यक्रम बाल विकास विभागाने जाहीर केलेला आहे याची माहिती मिळाली पाहिजे.

सभापती महोदय, एक महत्वाचा मुद्दा म्हणजे बुलढाणा जिल्ह्यात सात अर्भके मृतावस्थेत आढळली याबाबत चौकशी करण्यात यावी.

सभापती महोदय, सांगली येथील मेडिकल कॉलेजच्या संदर्भात अनेक तक्रारी आलेल्या आहेत. त्या सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित आहेत. त्याठिकाणी डॉक्टर्सना पाणी मिळत नाही. डॉक्टर्सना दोन-दोन दिवस आंघोळ न करता डयुटीवर जावे लागते. अशा अवस्थेत तेथील डॉक्टर्सकडून चांगल्या सेवेची अपेक्षा कशी करु शकता ? हे मेडिकल कॉलेज बंद करुन येथील इन्फ्रास्ट्रक्चर विनाअनुदानित कॉलेजला देण्याचा घाट चालू आहे. या मेडिकल कॉलेजमधील कर्मचाऱ्यांनी त्यांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी निवेदन दिलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. आम्ही माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनाचे लेखी उत्तर मिळते. परंतु मला सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.दिलीप वळसे-पाटील यांना सांगावयाचे आहे की, आपल्याकडे दिलेल्य निवेदनाचे लेखी उत्तर आम्हाला मिळत नाही. ते एक कार्यक्षम मंत्री आहेत. तेव्हा सांगली येथील मेडिकेल कॉलेजचे सक्षमीकरण करण्यासाठी कोणती पावले उचलणार आहात याची माहिती त्यांनी द्यावी.

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.........

बाब क्रमांक 46, पृष्ठ क्रमांक-38 नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य- अवर्षणग्रस्त लोकांना मदत करण्यासंदर्भातील बाब आहे. या संदर्भात सांगू इच्छिते की,"प्रयास" संस्थेने शासनाचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा पाहिला असता तो 2006 चा असल्याचे आढळून आले. शासन अशाप्रकारे आपत्ती व्यवस्थापन करणार आहे काय ? कॅगने सुध्दा आपत्ती व्यवस्थापन आराखडा जुनाच असल्याबाबत ताशेरे ओढलेले आहेत.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

अनेक जिल्हयांमध्ये त्याची अंमलबजावणी झालेली नाही. म्हणून आपण आपत्ती व्यवस्थापन आरखडयाबद्दल आढावा काय केला ? याची माहिती द्यावी. यासंदर्भातील ऑडीटर जनरलचा रिपोर्ट माझ्याकडे आहे, तो आपल्याकडेही असेलच. मुंबई शहर सोडले तर कुठलाही आढावा आपत्ती व्यवस्थापन आरखडयाचा झालेला नव्हता. आपण कोटयावधी रुपयांच्या रक्कमा देत असताना मला हा प्रश्न उपस्थित करावासा वाटतो की, आपण कोणता आपत्ती व्यवस्थापन आराखडा अंमलात आणणार आहोत ?

सभापती महोदय, गृह विभागाची एक छोटीसी मागणी आहे, त्यामध्ये आपण असे म्हटले आहे की, मंत्रालयातील सातव्या मजल्यावर एक पत्रा आहे, तेथे आपण छप्पर बांधणार आहोत. माझ्या माहितीप्रमाणे सातव्या मजल्यावर मशीद आहे. याबाबत मोठा वाद झाला होता, ती सातव्या मजल्यावरील जागा मुस्लीम बांधव नमाज पडण्यासाठी वापरतात. त्यांना ऊन लागू नये, म्हणून त्याठिकाणी पत्रा बांधला जात आहे, अशाप्रकारचे उत्तर 4 वर्षापूर्वी दोन्ही सभागृहात माननीय मंत्रिमहोदयांनी दिले होते. म्हणजे, आपण मंत्रालयातील सातव्या मजल्यावर पक्के बांधकाम करणार आहात, त्याचा आपण नक्की उपयोग कशासाठी करणार आहात, हे देखील येथे स्पष्ट होणे आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

धन्यवाद !

------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2007-08 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 5, पृष्ठ क्रमांक 5 -- सागरी महामार्गाच्या संदर्भात सन 1982 पासून 55 किलोमीटरचे बांधकाम सुरु असून त्यासाठी तरतूद होणे आवश्यक आहे. तसेच, कोकणातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन साकवासाठी भरीव निधी मिळणे आवश्यक आहे. घोडगे सोनवडे घाट हा कोल्हापूरला जोडणारा सर्वात सोपा आणि साधा घाट असून त्यासाठीही तरतूद होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 26, पृष्ठ क्रमांक 21-- मेरिटाईम बोर्डासंबंधी मी बोलणार आहे. देशांतर्गत जलवाहतुकीसाठी रुपये 7 कोटी 25 लाख 35 हजारांची तरतूद केलेली आहे. मालाड नदीमध्ये आणि नांदेडच्या इस्लामपूर नदीमध्ये इको टुरिझमच्या जलवाहतुकीसाठी तरतूद केलेली आहे, ही योजना 90 टक्के केंद्र सकरारची व 10 टक्के राज्य सरकारची आहे. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करावयाचा असेल तर त्याठिकाणी जलवाहतुकीसाठी भरपूर स्कोप आहे. म्हणून त्यासाठी तरतूद होणे आवश्यक आहे. तसेच, मेरिटाईम बोर्डाअंतर्गत धूप प्रतिबंधक बंधारे येतात. त्यासंदर्भातील जी कामे सिंधुदुर्ग जिल्हयात सुरु आहेत, त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध नाही. चिवला, मालवण, आचरा मालवण, मोनगे देवगड याठिकाणच्या कामांना प्रशासकीय मंजुरी मिळूनसुध्दा निधीची तरतूद झालेली नाही, ती व्हावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 32, पृष्ठ क्रमांक 24 वर मी बोलणार आहे. यामध्ये बंधारे आणि रस्ते आणि रेल्वेमार्गापर्यंत बांधकाम करण्याच्या दृष्टीने तरतूद केलेली आहे. त्याठिकाणी बॅकवॉटरसाठी भरपूर स्कोप असून त्यादृष्टीने विचार होणे आवश्यक आहे. तसेच कोकणातील 48 बंधाऱ्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने शासन सातत्याने याठिकाणी माहिती देते, परंतु त्यासाठी शासनाने भरीव निधी उपलब्ध करुन दिलेला नाही, तो त्वरीत उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी मागणी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3....

श्री.राजन तेली....

सभापती महोदय, बाब क्रमांक 107, पृष्ठ क्रमांक 102--मोठे व मध्यम पाटबंधाऱ्यासंबंधी मी बोलणार आहे. कोकण क्षेत्रामध्ये जवळपास 94 प्रकल्प असून त्यासाठी किमान 4 हजार 720 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. त्यामध्ये 4 मोठे, 13 मध्यम व 77 लघुसिंचन प्रकल्प आहेत. त्यासाठी भरीव निधीची आवश्यकता आहे. जलसंपदा विभागाचे निवृत्त सचिव श्री.पेंडसे यांच्या अध्यक्षतेखाली जो स्वतंत्र अभ्यास गट तयार करण्यात आला, त्यांनी त्यांचा रिपोर्ट माझ्या माहितीप्रमाणे सन्माननीय मंत्र्यांकडे दिलेला आहे, तो लवकरात लवकर पटलावर ठेवला तर बरे होईल. कारण, कोकणाच्या दृष्टीने तो रिपोर्ट फार महत्वाचा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 149, पृष्ठ क्रमांक 139--आमदारांच्या स्थानिक विकासामध्ये शासनाने वाढ केलेली आहे, त्याबद्दल मी शासनास धन्यवाद देतो. परंतु त्याचबरोबर दोडामल तालुका जो सन 1999 मध्ये नव्याने झाला, त्याच्यासाठी डोंगरीची रक्कम अजूनपर्यंत मिळत नाही, ती तरतूद होणे आवश्यक आहे. तसेच वेंगुर्ला तालुकाही पूर्णपणे डोंगरीत घ्यावा, अशी माझी यानिमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 39, पृष्ठ क्रमांक 32--जंगली हत्तीपासून संरक्षण होण्यासंबंधी केंद्राच्या योजनेतून 90 टक्के अनुदान मिळते. त्यासाठी आपण 25 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. याबाबतीत माझी अशी मागणी आहे की, त्याठिकाणी जे बंदुकधारी माणसे आहेत, ज्यांच्याकडे तसे लायसन्स् आहेत त्यांना हत्तीपासूनचे नुकसान मिळत नाही. म्हणून त्यांना नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे. त्याचबरोबर...

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/ प्रथम श्री.पुरी.......... 11:35

श्री.राजन तेली...........

गेल्या चार वर्षात सिंधुदूर्ग जिल्हयात हत्तींचा फार मोठया प्रमाणावर प्रार्दुभाव वाढला आहे. कोणत्याही परिस्थितीत यामधून मार्ग निघण्यासाठी, तेथील लोकांना संरक्षण मिळण्यासाठी प्रयत्न शासनाकडून होणे आवश्यक आहेत व त्यासाठी आवश्यक तेवढी तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाची बाब क्रमांक 153, पृष्ठ क्रमांक 148, संदर्भात बोलतांना मला असे लक्षात आणून द्यावयाचे आहे की, कणकवली व सावंतवाडी येथे ट्रामा केअर युनिट सुरु करण्याबाबतची मागणी करण्यात आली होती, ती मान्यही केली आहे. त्या ठिकाणी डॉक्टरांची संख्या कमी आहे. त्यामुळे सिंधुदूर्ग जिल्हयामध्येच नव्हे तर कोकणपट्टीमध्ये डॉक्टर्स उपलब्ध करुन द्यावेत, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, महसूल व वन विभागाची बाब क्रमांक 38, पृष्ठ क्रमांक 31 अंतर्गत चक्रीवादळ व मुसळधार पावसामुळे उन्मळून पडलेली झाडे काढून टाकण्याकरिता तरतूद करण्यात आली आहे व रुपये 1,74,50,000 एवढया रकमेची मागणी करण्यात आली आहे. कोकणात अशा प्रकारे चक्रीवादळामुळे बरीचशी झाडे पडतात, त्यामध्ये प्रामुख्याने माड, सुपारीच्या बागा नष्ट होतात, त्यांना सुध्दा नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या बाब क्रमांक 51, पृष्ठ क्रमांक 39, बाब क्रमांक 52, पृष्ठ क्रमांक 40 अन्वये अनुक्रमे एकात्मिक दुग्धव्यवसाय विकास प्रकल्पांतर्गत दुग्धशाळा सहकारी संस्थांना केंद्रीय अर्थसहाय्य व राष्ट्रीय मत्स्यबीज उत्पादन केंद्र, इसापूर यांच्याकरिता संपादित केलेल्या जमिनीसाठी शेतक-यांना मोबदला देण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. मत्स्य व्यवसाय विभागाकडून कोकणातील मच्छिमारांना चार महिन्यांपासून परताव्याची रक्कम मिळालेली नाही. ही परताव्याची रक्कम त्वरित अदा करावी, अशी विनंती मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या बाब क्रमांक 54, पृष्ठ क्रमांक 49 अन्वये जालना जिल्हा परिषदेला खर्च न केलेले वेतनेतर अनुदान खर्च करण्याची परवानगी देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. कोकणामध्ये प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत 498 शिक्षकांची पदे रिक्त आहेत, ती भरण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली..........

सभापती महोदय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या बाब क्रमांक 192, 193, 194, 195, पृष्ठ क्रमांक 186 अन्वये अनुक्रमे अल्पमुदतीच्या कर्जाची पुर्नआखणी करणे, सडलेल्या कांद्यांच्या विल्हेवाटीसाठी वापरण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीचे भाडे देणे, साखरेचा उतारा कमी पडल्यामुळे साखर कारखान्यांना वित्तीय सहाय्य करणे, गाळप न झालेल्या ऊसाला वित्तीय सहाय्य करणे यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे याच विभागाच्या बाब क्रमांक 197 पृष्ठ क्रमांक 198 अंतर्गत सहकारी साखर कारखान्यांना साखर निर्यातीसाठी आर्थिक सहाय्य करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. माझे असे म्हणणे आहे की, कांद्यासाठी, द्राक्षांसाठी, साखरेसाठी आर्थिक सहाय्य शासनाकडून दिले जाते. परंतु, कोकणावर सातत्याने अन्याय केला जातो. गेल्या दोन अधिवेशनांमध्ये आंब्याला नुकसान भरपाई देण्याबाबत मागणी करुन सुध्दा शासनाने या मागणीकडे दुर्लक्ष केले आहे. कोकणातील आंबे, मासे, काजू यांच्या झ ालेल्या नुकसानीसाठी तेथील शेतक-यांना देखील आर्थिक मदत शासनाने याच धर्तीवर करावी, अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाब क्रमांक 227 व 228, पृष्ठ क्रमांक 211 अंतर्गत फर्निचर आणि खुर्च्या खरेदी करणे, दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक व पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र यांना सहायक अनुदान देण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. परंतु, राज्यातील पर्यटन विकासासाठी म्हणावी तशी तरतूद केलेली नाही. पर्यटन हे उत्पन्नाचे एक महत्वाचे अंग आहे व त्यासाठी भरीव तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 202, पृष्ठ क्रमांक 192 अंतर्गत विद्यापीठांमध्ये शिक्षकांची पदे निर्माण करण्याकरिता निधीची तरतूद करण्यात आली आहे. कोकणमध्ये आय.टी.आय.चे जे ट्रेड आहेत ते शिकविण्यासाठी शिक्षक उपलब्ध नाहीत, त्यामुळे हे ट्रेड बंद पडलेले आहेत. पर्यटनाच्या दृष्टीने काही नवीन ट्रेड देखील निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यादृष्टीने शासनाने विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

..3.........





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली...........

सभापती महोदय, ग्राम विकास विभागाच्या बाब क्रमांक 134, पृष्ठ क्रमांक 124 अंतर्गत पंचायती राज संस्थांना पारितोषिकांचे वितरण करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. जिल्हा परिषदांमध्ये फार मोठया प्रमाणावर पदे रिक्त आहेत. ती भरण्याबाबत शासनाने विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत मी जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्याबाबत शासनाने विचार करावा, अशी विनंती करतो आणि मला बोलण्यासाठी वेळ दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

----------------

..4...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2007-2008 च्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेत असतांना शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 55, पृष्ठ क्रमांक 49 अंतर्गत दुपारचे जेवण योजनेचे व्यवस्थापन, संनियंत्रण करण्यासाठी आणि स्वयंपाकाची साधनसामग्री इत्यादी खरेदी करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. ज्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे ती योजना राबवित असतांना शासन भेदभावाची वागणूक देते, असे मला वाटते. कायम विनाअनुदानित प्राथमिक शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांना ही योजना लागू नाही. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात. मात्र जी मुले कायम विनाअनुदानित शाळेत शिक्षण घेतात त्यांना ही योजना लागू केली जात नाही. त्यांच्यासाठी पोषण आहाराची योजना नाही, गणवेशाची योजना नाही, शालेय साहित्याची योजना नाही. अशा प्रकारे भेदभाव होतो. "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो ते प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही", "शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे", हे फक्त बोलण्यासाठी आहे काय ?

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड .......

6 ते 14 या वयोगटातील मुलांना मोफत शिक्षण देणे, ही शासनाची जबाबदारी आहे. ग्रामीण भागागातील विद्यार्थ्यांना कमीत कमी मराठी तरी शकू द्या. तेथे काही कायम विनाअनुदानित शाळा होत्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसते. ज्या शाळेमध्ये सुविधा उपलब्ध आहेत त्या शाळेमध्ये श्रीमंतांची मुले शिक्षण घेतात. गरीबांच्या मुलांना शासनाने मराठी तरी शिकू द्यावे. तेथे सुध्दा मराठी माध्यामाच्या कायम विनाअनुदानित शाळा देऊन ठेवलेल्या आहेत. शासन त्यांना पोषण आहार योजना, गणवेश योजना लागू करीत नाही. शासन दुजाभाव करीत आहे. कायम विनाअनुदानित शाळेत शिकणा-या मराठी माध्यामाच्या सर्व विद्यार्थ्यांना पोषण आहार योजना, गणवेश योजना आणि शासनाच्या इतर सर्व योजना लागू झाल्या पाहिजेत. कायम विनाअनुदानित शाळेमध्ये शिकणा-या मुलींना दैनिक भत्ता दिला जात नाही. शिक्षणाचा फक्त गवगवा केला जातो, सावित्रीबाई फुलेंचे नाव घेतले जाते. ग्रामीण भागातील मराठी माध्यामाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शासनाच्या सर्व योजना लागू करुन मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन द्यावी, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, क्रीडा विभागाच्या पृष्ठ क्र.53 वरील बाब क्र.63 वर मी बोलणार आहे. सभापती महोदय, गाव तेथे क्रीडांगण, क्रीडा विकास झाला पाहिजे, महाराष्ट्रातील खेळाडू देश पातळीवर चमकले पाहिजेत, अशी शासन घोषणा करीत असते. परंतु एकही योजना मंजूर होत नाही. योजना मंजूर झाली तर त्यासाठी निधी मिळत नाही. वर्षानुवर्षे शासन दरबारी चकरा माराव्या लागतात. मग क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थी देश पातळीवर कसे काय चमकतील, क्रीडा विभागाने याकडे लक्ष द्यावे, अशी मी विनंती करतो आणि एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभाग, पृष्ठ क्र.5 वरील बाब क्र.5 व 6 मध्ये कै.बा.सी.मर्ढेकर आणि कै.बालगंधर्व यांचा पुतळा उभारण्यासाठी तरतूद केलेली आहे, त्याबद्दल मी शासनाचे मनापासून कौतुक करतो. कै.बा.सी.मर्ढेकर यांचा पुतळा उभारण्यासाठी 25 लाख रुपयांची आणि कै.बालगंधर्व यांचा पुतळा उभारण्यासाठी 10 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे, हा फरक कशासाठी ? याचा माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये खुलासा केला पाहिजे. मुंबईमध्ये कै.बालगंधर्व यांचे एकमेव स्मारक आहे आणि ते म्हणजे वांद्रे येथील बालगंधर्व खुले नाटयगृह. या नाटयगृहाचा विकास करण्यासाठी शासनाने खाजगी विकासकाला परवानगी दिलेली आहे. कै.बालगंधर्व यांचे एकमेव स्मारक जतन करण्यासाठी शासनाने बिल्डरकडून ही जागा परत घ्यावी, अशी माझी शासनाला विनंती आहे. ही जागा परत घेण्यासाठी शासन काय प्रयत्न करणार आहे, याचा माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये खुलासा करावा.

सभापती महोदय, गृह विभाग, पृष्ठ क्र.15 वरील बाब क्र.16 मध्ये राज्य पोलीस दलातील पोलीस कर्मचा-यांसाठी गणवेशविषयक वस्तू खरेदी करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, मुंबईतील पोलीस शिपायाला गणवेशापोटी फक्त एक पँट आणि एक शर्ट मिळतो. पोलीस शिपायांनी वर्षभर एका पँटवर आणि एका शर्टावर रहावयाचे काय ? त्यांना किमान दोन पँटस् आणि दोन शर्टस् दिले पाहिजेत. पोलीस शिपायाला एका वर्षाला एक पँट आणि एक शर्ट दिला जातो. मग तो ते कपडे धुणार कधी ? त्याने कपडे धुतले नाही तर तो गलिच्छ दिसेल. म्हणून शिपायांना किमान दोन पँट आणि दोन शर्ट दिले पाहिजेत. मी अहमदनगरला गेलो तेव्हा मला दोन बॉडीगार्ड देण्यात आले होते. त्यांनी मला असे सांगितले की, आम्हाला तीन वर्षाला तीन पँट आणि तीन शर्ट मिळतात. आम्ही आज स्वत: च्या पैशातून विकत घेतलेला ड्रेस घातलेला आहे. त्या पोलीस शिपायांचे बुटाचे जोडे आणून ते मी शासनाला दाखविणार होतो. त्यांना सात नंबरचा बुटाचा जोड लागत असेल आणि त्यांना जर 6 नंबरचा जोड मिळाला तर त्यांनी तो घेऊन जायचे, परंतु काही बोलावयाचे नाही. त्यांना वर्षातून तीन नाही तर किमान दोन बुटांचे जोड आणि एका वर्षासाठी किमान दोन पँट आणि दोन शर्ट दिले पाहिजेत. तसेच त्यांना गणवेश धुलाई भत्ता मिळत नाही. त्यांना गणवेश धुलाई भत्ता मिळावा, अशी मी शासनाला विनंती करतो.

यानंतर श्री.गागरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MAP/ श्री.बोरले 11:45

श्री.अरविंद सावंत.....

त्यांना फक्त 1 पॅंट व 1 शर्ट दिला जातो. ही निषेधार्ह बाब आहे. यामध्ये सुधारणा करावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 24, मोटारींच्या अपघाताबाबत आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी वाहनांवरील नंबरच्या पाटयाबाबत सांगितले आहे याबाबत केंद्राचे परिपत्रक आहे, या परिपत्रकातील वाक्य मी वाचून दाखवितो. "The Government of Maharashtra hereby directs that an additional plate displaying the letters and figures of the registration marks in Marathi language may also be displayed on the motor vehicle, if so desired by the owner of the vehicle" हे डायरेक्टीव आल्यानंतरसुध्दा आजही महाराष्ट्रातील पोलीस दंड आकारत आहेत.

सभापती महोदय, मराठी भाषेच्या वापराच्या उदासिनतेबद्दल मी सांगत आहे. विधिमंडळ सदस्याचे हजेरीपत्रक ठेवले जाते. या हजेरीपत्रकावर मराठीमध्ये सदस्यांची नावे दोन नंबरवर लिहिली आहेत. त्यावरील इंग्रजीमधील नाव मी दररोज खोडत आहे. त्रिभाषा सुत्रानुसार प्रथम राज्यभाषा, दुसरी राष्ट्रभाषा व तिसरी आंतरराष्ट्रीय भाषा हा क्रम येथे घेतला पाहिजे. कोण एवढे मुजोर अधिकारी आहेत ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हजेरीपटावर रोज लिहित आहेत की, हजेरीपत्रक मराठीत कधी करणार ? आज मी हजेरीपत्रकावर लिहिले आहे की, तुम्हाला त्रिभाषा सुत्रही माहिती नाही. आमचे नाव पहिल्यांदा मराठीत लिहा, दुसऱ्यांदा इंग्रजीत लिहा. मराठीत लिहिण्यासाठी तुम्हाला अगदी पोटशूळ येतो. पहिली राज्याची भाषा, दुसरी राष्ट्राची भाषा व तिसरी आंतरराष्ट्रीय भाषा त्रिभाषा सुत्राप्रमाणे काम केले पाहिजे. केंद्र सरकारने असे सांगितले तरी आम्ही पुन्हा पुन्हा चुकीचे लिहित आहोत. निदान त्या हजेरीपटावरील नाव बदला व मराठीला न्याय द्या, अशी मी या निमित्ताने मागण्ी करतो.

सभापती महोदय बाब क्र.24 बाबत मला सांगावयाचे आहे. वाहन निरीक्षक काय करतात ? किती अपघात होत आहेत ? टेल लॅम्प नसणे व ओव्हरटेक करणे ही अपघाताची दोन महत्वाची कारणे आहेत. टेल लॅम्पला मराठीमध्ये शेपटीचा दिवा किंवा पृष्ठदिवा म्हणता येईल. मुंबई नाशिक रस्ता अपघातासाठी फार प्रसिध्द आहे. अपघातांच्या वाढत्या प्रमाणावर लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MAP/

श्री.अरविंद सावंत .....

सभापती महोदय, बाब क्र.36 वर मी बोलू इच्छितो. 1984 मधील दंगलीत झळ पोहोचल्यांना आर्थिक मदत करण्यासाठी 2007 मध्ये शासनाला जाग आली, याबद्दल शासनाचे मी कौतुक करतो. रेल्वे बॉम्बस्फोटामध्ये मरण पावलेल्या व्यक्तींना केंद्राने आजही मदत केलेली नाही. जखमी असलेल्या व्यक्तींच्या हॉस्पीटलची देणी अद्याप दिली जात नाहीत. सुशिक्षित असलेल्यांनाही केंद्रसरकारच्या रेल्वे खात्याकडून चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या दिल्या जात आहेत.. महाराष्ट्र शासन याबाबत काही पुढाकार घेणार आहे किंवा नाही ? जसलोक हॉस्पीटलमध्ये आजही रुग्ण पडून आहे. याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी अपेक्षा करतो.

सभापती महोदय, बाब क्र.39 व 43 एकत्रच मांडतो. वनातील वणव्याबद्दल मी सातत्याने सभागृहात प्रश्न मांडत आहे. प्रत्येकवेळी माननीय वन मंत्री महोदय श्री.बबनराव पाचपुते हे सांगतात की, "आपली सूचना अतिशय चांगली आहे" परंतु अद्यापपर्यंत त्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही. यावर उपाययोजना करण्यासाठी मी मंत्री महोदयांना योग्य त्या सूचना केलेल्या आहेत. वणवा लागल्यानंतर त्याचे विश्लेषण करण्यासाठी 2, 3 किंवा 4 अंकी नंबर द्यावा असे सांगितले आहे. आग लागल्यानंतर काही कार्यवाही करावयाची आहे की नाही ? याबाबत खुलासा करावा.

सभापती महोदय, वृक्षतोड व जंगलतोड मोठया प्रमाणावर चालू आहे. बाब क्रमांक 43 मध्ये रायगड उपवन विभागातील वनरोपन कामासाठी तरतूद केली आहे. याच परिसरात फणसाड हे गाव मुरुड जंजिरा जवळ आहे. माझे आपणास आवाहन आहे की, तेथे जाऊन पहावे. अलिबाग, पेण व पनवेल जवळील हया भागात सकाळी पाहिले तर आदिवासी प्रचंड वृक्षतोड करुन लाकडे घेऊन जाताना दिसतात. याबाबत मी माननीय मंत्री महोदय श्री.रविशेठ पाटील यांनाही माहिती आहे. परंतु पर्वा कोणाला आहे ? वारंवार बोलून वेदना व्यक्त करण्यापलिकडे आमच्याकडे काही शिल्लक राहिलेले नाही. यावर कार्यवाही कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

यानंतर श्री.सुंबरे.....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

सभापती महोदय, इंग्रजी भाषेबद्दल बोलताना मी बाब क्रमांक 49 कडे आपले लक्ष वेधू इच्छितो. या ठिकाणी 'शेतकरी मॅगेझिन' असा उल्लेख केलेला आहे. वास्तविक आपल्याला येथे 'नियतकालिक' 'पाक्षिक' वगैरे शब्द वापरता आले असते. पण आपण त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. तसेच बाब क्रमांक 50 - यामध्ये आपण म्हटले आहे की, पशुधनातील पोषक द्रव्यांची कमतरता मापणे यासाठी रूपये 45 लाखांची पूरक मागणी केलेली आहे. सभापती महोदय, कोकणामध्ये काय पशुधन आहे ? आज कोकणामध्ये पूरक व्यवसायदेखील करता येत नाही. दुधाचे उत्पन्न इतर जिल्ह्यातून घेतले जाते. कोकणामध्ये दमट हवामान असल्याने तेथील जनावरे जास्त दूध देत नाहीत आणि अजूनही याबाबत कोणताही तोडगा काढला जात नाही, पर्याय पुढे येत नाही. तेव्हा कोकणातील पशुधनाच्या संदर्भात पोषक द्रव्यांची कमतरता मापण्यासाठी आपण काय कारवाई करणार आहात ते या निमित्ताने सभागृहापुढे येऊ द्यात एवढीच मागणी या ठिकाणी मी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 60 - ही पूरक मागणी आपण करीत आहात पण हा निधी परत जातो आहे. संस्कृत पाठशाळांचे आधुनिकीकरण करण्यासाठी 1996-97 मध्ये प्राप्त झालेल्या अनुदानापैकी खर्च न णालेले अनुदान केंद्र सरकारला परत करण्यासाठी म्हणून ही तरतूद केली जात आहे. यापेक्षा नामुष्कीची दुसरी कोणतीही गोष्ट नरसेल. या ठिकाणी आपण म्हटले आहे की, राज्यातील 11 मान्यताप्राप्त संस्कृत पाठशाळांमधील 31 शिक्षकांकडून इंग्रजी, गणित व विज्ञान हे विषयक शिकविले जातात. भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी, 1996-97 या वर्षाकरिता या 11 संस्कृत पाठशाळांच्या शिक्षकांचे वेतन व भत्ते यासाठी सहाय्यक अनुदानाला मंजुरी दिली आहे. परंतु या 11 शाळांमध्ये इंग्रजी, गणित व विज्ञान विषयांचे शिक्षक आपण नेमू शकला नाहीत त्यामुळे हे अनुदान आता परत करावे लागते आहे. यापेक्षा लांच्छनास्पद गोष्ट दुसरी कोणतीही नसेल. या गोष्टीचा मी येथे निषेध करतो आणि या गोष्टीची दखल घेऊन आपण पुढे तरी या शाळांमध्ये या विषयाचे शिक्षक नेमून यासाठी केंद्राकडून मिळणारे संपूर्ण अनुदान खर्च होईल याची दक्षता घ्यावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, त्यानंतर बाब क्र. 63 च्या संदर्भात बोलताना मी सांगेन की, आपल्या पुणे येथील बालेवाडी क्रीडा संकुलामध्ये 2008 मध्ये राष्ट्रकूल युवा स्पर्धा होणार आहेत. नुकताच

....... डब्ल्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आम्ही चीनचा दौरा करून आलो आहोत, त्या ठिकाणी आम्ही पाहिले आहे की, तेथे ऑलंपिकच्या बाबतीत आता काऊंट डाऊन सुरू झालेले आहे. आता आमच्या येथे 2008 मध्ये राष्ट्रकूल युवा स्पर्धा होणार आहेत पण त्या ठिकाणी त्या दृष्टीने असे काही काऊंट डाऊन सुरू झाले असल्याचे दिसून येत नाही वा समजून येत नाही. खरे तर साऱ्या देशाला हे समजले पाहिजे की, तेथे त्या दृष्टीने काऊंट डाऊन सुरू झाले आहे. पण आमचे अधिकारी आणि पदाधिकारी केवळ टक्केवारीशिवाय दुसरीकडे लक्ष देत नसल्याने त्यांच्या ही बाब लक्षातच येत नाही. तेव्हा बालेवाडी येथे या स्पर्धेच्या दृष्टीने काऊंट डाऊन करून काही ठोस प्रयत्न करावेत अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 77 संबंधात बोलताना मी सांगू इच्छितो की, मुंबईतील वरळी, नायगाव, शिवडी येथील बीडीडी चाळींच्या दुरुस्तीसाठी अतिरिक्त निधी म्हणून 2 कोटी रूपयांची तरतूद करण्यासाठी ही पुरवणी मागणी येथे करण्यात आली आहे. सभापती महोदय, या चाळींच्या अवस्थेबद्दल आणि दुरूस्ती संबंधात मी माननीय मंत्री महोदयांना पत्र पाठविले आहे. त्यात वरळी येथील बीडीडी चाळींची अवस्था काय आहे तेही नमूद केले आहे. या बीडीडी चाळींची अवस्था पाहता त्यांची दुरूस्ती करण्यासाठी हा 2 कोटी रूपयांचा निधी पुरेसा होईल काय ? तेथील चाळींमध्ये शौचालयांची अवस्था तर अत्यंत वाईट आहेच पण इतर खोल्यांमध्ये देखील मोठ्या प्रमाणात गळती सुरू असल्याने पत्रे लावले आहेत पण तरीही गळती थांबत नाही. तेव्हा हा 2 कोटी रूपयांचा निधी या चाळींच्या दुरूस्तीसाठी अपुरा वाटतो. तरीही लवकरात लवकर अधिकची तरतूद करून या चाळी आपण दुरूस्त कराव्यात अशी विनंती मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, त्यानंतर बाब क्रमांक 107 आणि 108 या जलसंपदा विभागाच्या पूरक मागण्यांसंबंधात मी बोलणार आहे. आता येथे माननीय पाटबंधारे राज्यमंत्री उपस्थित आहेत. मध्यम पाटबंधारे प्रकल्पांसाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. या प्रसंगी मी आपल्याला सांगू इचिछतो की, अहमदनगर जिल्हयातील जामखेड तालुक्यामध्ये यंदाही पाऊस पडलेला नाही. त्यामुळे तेथील खैरी धरणामध्ये जेमतेम 38 टक्के पापणी शिल्लक आहे. या धरणातील पाणी सिंचनासाठी वापरायचे नाही कारण तेथे अवघे 38 टक्के पाणी आहे त्यामुळे ते पाणी केवळ पिण्याच्या पाण्यासाठी म्हणूनच वापरावे म्हणून तसेच ठेवले आहे. गेल्या पंधरवड्यामध्ये नगर

......डब्ल्यू 3 ...

जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना उस्मानाबाद जिल्ह्याचे जिल्हाधिकारी पत्र लिहून कळवितात आणि तेथील पाणी सोडण्यास सांगतात. सभापती महोदय, उस्मानाबाद जिल्ह्यातील पाटबंधारे अधिकाऱ्यांनी फोन करून नगर जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांना खैरी धरणातील पाणी सोडायला लावले. कारण उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा येथील एका गावाला पाणी मिळत नाही म्हणून. पण मी येथे असा आरोप करतो की, तेथे वाळू उचलण्यासाठी म्हणून पाणी आवश्यक असते आणि त्यासाठी ते पाणी सोडले गेले आहे. सभापती महोदय, जेथे पिण्याला पाणी नाही ते पाणी आपण अशा कारणांसाठी सोडता आहात हे योग्य आहे काय ? ...

( यानंतर श्री. सरफरे .... एक्स 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

आणि म्हणून या संदर्भात माझी माननीय मंत्र्यांकडे मागणी आहे की, ज्या संबंधित अधिकाऱ्यांनी त्या धरणामधील पाणी सोडले आहे त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी. सभापती महोदय, खैरी धरणामधील पाणी सिंचनासाठी वापरण्यात आले म्हणून ऊर्जा खात्याने त्या धरणाचा विजेचा पुरवठा खंडीत केला. विजेचा पुरवठा खंडीत केल्यानंतर देखील तेथील शेतकऱ्यांना विजेची बिले पाठविण्यात येत आहेत. गेल्या दोन वर्षापासून तेथील शेतकरी विजेची बिले भरीत आहेत. नगर जिल्हयातील, जामखेड तालुक्यातील खैरी धरणाच्या खंडीत करण्यात आलेल्या वीज पुरवठयाबाबत चौकशी करुन वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत आपण लक्ष घालावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, कोकण पाटबंधारे विकास महामंडळाला भाग भांडवल अंशदान करण्यासाठी पैसे दिले आहेत की कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी दिले आहेत? असा माझा प्रश्न आहे. या अंशदानामधून कोकणातील एकही प्रकल्प गेल्या दहा वर्षामध्ये पूर्ण झालेला नाही. सिंधुदुर्ग जिल्हयातील 15 प्रकल्पांची कामे निधीअभावी अपूर्ण आहेत. त्या जिल्हयामधील महंमदवाडी हे धरण बांधून पूर्ण केले आहे. परंतु त्या ठिकाणी पाटचाऱ्या, कालव्यांची कामे नसल्यामुळे तेथील लोकांना प्यायला पाणी मिळत नाही. म्हणून मला आपल्याला विचारावयाचे आहे की, जलसंपदा विभागामार्फत करण्यात आलेली निधीची तरतूद फक्त कर्मचाऱ्यांच्या पगारावर, एस्टॅब्लिशमेंटवर खर्च करावयाची काय? ही बाब निषेधार्ह असल्यामुळे शासनाने यामध्ये लक्ष घालून हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी देण्यात यावा अशी विनंती करतो.

**<u>(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)</u>**

सभापती महोदय, बाब क्रमांक 143 मध्ये आश्रमशाळेच्या निधीकरिता तरतूद करण्यात आली आहे. याबाबत मी आपल्याला स्पेसिफिक उदाहरण देतो. मी मोखाडा तालुक्यातील एका आश्रमशाळेला भेट दिली. त्या आश्रमशाळेमधील मुलींना आज नैसर्गिक विधीकरिता उघडयावर जावे लागते. म्हणून माझी या निमित्ताने अशी सूचना आहे की, या आश्रमशाळांना केवळ निधी देऊन चालणार नाही तर त्या ठिकाणी मुलांकरिता सोयी सुविधा निर्माण केल्या पाहिजेत. सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील व कणकवली तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता आहे. या बाबत मी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. अरविंद सावंत...

वारंवार सभागृहामध्ये मागणी केलेली आहे. या निमित्ताने माझी माननीय आरोग्य मंत्र्यांकडे मागणी आहे की, कणकवली तालुक्यातील व सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे गेल्या वर्षभरामध्ये किती मृत्यू झाले? याची चौकशी करुन सभागृहामध्ये माहिती द्यावी. त्यामुळे तेथील लोकांना किती त्रास होत आहे हे सर्वांना कळेल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/ MAP/ KGS/ 12:00

श्री.रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात दलितांवर अन्याय होत आहे. याबाबत मी उदाहरण देत आहे. या संबंधाने माननीय मुख्यमंत्री आणि मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे, अशी विनंती करतो.

"जली जो शॉखे चमन, तो बागवां जला,
जला के अपने नशेमन को, खुद आसमाँ भी जला,
जली को बुझाना नहीं कोई मुश्किल, बुझी को जलाना नहीं कोई मुश्किल,
पर यारो, दिल की लगी को बुझाना बड़ा मुश्किल."

**उप सभापति** : जानबूझकर जो लगी, उसको बुझाना मुश्किल.

श्री.रमेश निकोसे : सभापति महोदय, जानबूझकर नहीं. मैं आपको अभी उदाहरण देकर बताऊंगा कि कैसे एक अधिकारी ने एक महिला पर अन्याय किया है.

सभापती बाब क्रमांक 3 आणि 4, पान, क्रमांक 4 आणि 5 यावर मला बोलायचे आहे. शासनाच्या सेवेमध्ये मागासवर्गीय कर्मचारी नोकरी करत आहेत. त्यांच्याशी संबंधित फाईल जेव्हा माननीय मुख्यमंत्री पर्यन्त जाते,तेव्हा ती निगेटिव करून पाठविली जाते. त्याचे उदाहरण मी देतो. श्रीमती अनुजा मोरे ही लघुलेखिका ठाणे येथे अन्न व नागरी पुरवठा विभागामध्ये 30 वर्षापासून नोकरी करीत आहे. त्या ठिकाणी श्री.पराग नावाचे अधिकारी आहेत. त्यांनी तिच्यावर नजर टाकली. पुढचे आपण काय ते समजून घ्यावे. तिने त्यास नकार दिल्यामुळे तिला असे सांगण्यात आले की, " मैं तुम्हे बर्बाद कर दूंगा ". त्याप्रमाणे तिची एक वर्षामध्ये सात ठिकाणी बदली करण्यात आली. त्यानंतर तिने महिला आयोगाकडे दाद मागितली, त्याचबरोबर समाजकल्याण विभागाकडे दाद मागितली. ती लघुलेखनाची शासन मान्य परीक्षा पास झाली नाही म्हणून तिला नोकरीमधून काढून टाकण्यात आले. त्यानंतर ती मॅटमध्ये गेली. त्यांनी तिला अमुक कालावधीमध्ये शासनाची परीक्षा पास होण्याची मुदत द्यावी, आता तिला नोकरीमध्ये घ्या असे आदेश देण्यात आले. तिने शासन मान्य संस्थेचे सर्टिफिकेट सादर करून विनंती केली की, मी 30 वर्षापासून स्टोनो म्हणून नोकरी करीत आहे. माझा प्रति मिनिटास 100 पेक्षा जास्त लघुलेखनामधील स्पीड आहे. त्या संदर्भाने विभागाने तिला कोणतेही उत्तर दिले नाही. त्यानंतर आत तिला असे सांगण्यात आले की, शासकीय परीक्षा मंडळ, पुणे विभागाची परीक्षा पास झाली

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/ MAP/ KGS/ 12:00

श्री.रमेश निकोसे....

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे)**

पाहिजे. त्याप्रमाणे ही महिला परीक्षेला बसली. यानंतर श्री.पराग यांनी पुणे येथील परीक्षा मंडळामध्ये मॅनेज केले, त्यामुळे ती पास होऊ शकली नाही. यानंतर तिने कल्याण येथील केंद्र घेऊन परीक्षा दिली. त्या परीक्षेमध्ये तिला 100 पैकी 92 गुण मिळाले. पहिल्या परीक्षेमध्ये तिला 100 पैकी 0 गुण मिळाले. त्यानंतर ती महिला नंतर कोर्टामध्ये गेली. त्यानंतर दुसऱ्यांदा दिलेल्या परीक्षेमध्ये तिला 100 पैकी 92 गुण मिळाले आणि ती उत्तीर्ण झाली. त्यामुळे तिने कोर्टातून केस मागे घेतली. त्यानंतर मी सामान्य प्रशासन विभागातील श्री.कुडे आणि श्री.बोभाटे यांना भेटलो आणि विनंती केली. घटनेतील कलम 15 (4), 16 (4) आणि 16 (4) अे आणि कलम 46 यामध्ये " स्पेशल कंसीडरेशन " या शब्दाचा उल्लेख आहे, असे निदर्शनास आणून दिले. परंतु हायकोर्टाचा निर्णय आहे, सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे, असे सामान्य प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सांगितले जाते.

यानंतर श्री बरवड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे .......

मग माननीय मंत्रिमहोदय घाबरुन जातात. सुप्रीम कोर्टाचा, हायकोर्टाचा आदेश असल्यामुळे काही करावयाचे नाही असे सांगून हे अधिकारी त्यांची दिशाभूल करतात. जे अधिकारी माननीय मंत्रिमहोदयांची दिशाभूल करतात त्यासंदर्भात आय.पी.सी. कलम 463, 464, 465, 466, 467, 468 तसेच महाराष्ट्र सर्व्हिस रुल्स, 1981 प्रमाणे त्यांच्यावर खटला होऊ शकतो व त्यांच्यावर कारवाई होऊ शकते. म्हणून मी शासनाला विनंती करतो की, माननीय मंत्रिमहोदयांची किंवा माननीय मुख्यमंत्र्यांची दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी खटले दाखल झाले पाहिजेत.

सभापती महोदया, मी दुसरे एक उदाहरण देतो. कु. एस. के. गणवीर ही महिला शिक्षण विभागात लघुलेखिका म्हणून शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा येथे कार्यरत आहे. मी माननीय मंत्रिमहोदय प्रा. वसंत पुरके यांना धन्यवाद देतो. तिच्या संदर्भात निगेटिव्ह फाईल तयार केली होती. कोर्टाचा जो निर्णय असेल त्यामध्ये नमूद केले पाहिजे की, हा निर्णय अनुसूचित जातीसाठी, अनुसूचित जमातीसाठी लागू आहे. तसे काही नसताना त्यांनी निगेटिव्ह फाईल पाठवली. माननीय मंत्रिमहोदय, प्रा. वसंत पुरके यांनी ती फाईल परत पाठवली आणि पुन्हा रिव्हाईज फाईल पाठविण्यास सांगितले.

सभापती महोदया, तिसरे उदाहरण म्हणजे डॉ. विजया मोडक या हिवताप अधिकारी आहेत. शासनाचे असे आदेश गेले की, रिझर्व्हेशनमधील उमेदवार भरावेत. त्यांनी 12 लोकांना कामावर लावावे. लातूर, पुणे, औरंगाबाद या सगळ्या ठिकाणी नोकरभरती झाली. त्या सगळ्या ठिकाणची नोकरभरती बरोबर ठरवली गेली परंतु तिला नोटीस पाठवली की, आपण बेकायदेशीरपणे लोकांना कामावर लावले. त्यांना काढून टाकले. ही बाब आरोग्य खात्याशी संबंधित आहे. ही बाब माननीय मंत्रिमहोदय डॉ. विमलताई मुंदडा यांच्या निदर्शनास आणून दिली. त्या ठिकाणी सुध्दा प्रकरण निगेटिव्ह करुन माननीय मुख्यमंत्र्यांकडे फाईल गेली. अशा तऱ्हेने मागासवर्गीयांवर अन्याय होत असेल तर शासनाने आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी तसेच संबंधित मंत्रिमहोदयांनी लक्ष देण्याची गरज आहे. त्यांनी तसे लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, यानंतर पृष्ठ क्रमांक 5 वरील माननीय मुख्यमंत्र्यांच्या सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित बाब क्रमांक 5 व 6 बाबत सांगू इच्छितो. शासनाने कै. बा. सी. मर्ढेकर तसेच

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

श्री. रमेश निकोसे .....

कै. बालगंधर्व यांचा पुतळा उभारण्यासाठी या ठिकाणी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. त्यासाठी जो निधी दिला आहे त्याबद्दल शासनाला धन्यवाद देतो. मी गेल्या तीन अधिवेशनांमध्ये उल्लेख केला की, दलित साहित्यिक कै. ना. रा. शेंडे, राहणार भंडारा, हे विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष होते तसेच ते महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सभासद होते. ते फार मोठे दलित साहित्यिक होते. त्यांचे स्मारक व्हावे अशी मी मागणी केली होती. त्यांचे घर पडून जमीनदोस्त झाले पण शासनाने त्याकडे लक्ष दिले नाही. मृत्यूपूर्वी त्यांनी आपली समाधी वैनगंगेच्या तिरावर बांधली. त्या ठिकाणी त्यांच्या अस्थी ठेवण्यात आल्या. तो भाग सुशोभित करण्यात यावा अशी विनंती मी केली होती. परंतु शासनाने त्याकडे लक्ष दिले नाही. मी माननीय अर्थमंत्री तसेच माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी याबाबतीत लक्ष घालून काही तरी करावे. ज्याप्रमाणे आपण देशपांडे सभागृह बांधले त्याप्रमाणे कै. ना. रा. शेंडे सभागृह बांधावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 203 वरील महिला व बालविकास विभागाच्या बाब क्रमांक 222, 223 व 224 बाबत सांगू इच्छितो. महाराष्ट्रात लहान बालकांसाठी अंगणवाडी केंद्रे सुरु केलेली आहेत. यापूर्वी त्यांचे काम महिला संस्था आणि खाजगी लोकांना देत होतो परंतु सुप्रीम कोर्टाने सांगितले की, बचत गट आणि महिला संस्थांना काम द्यावे. त्यामुळे आता घरोघरी बचत गट तयार झालेले आहेत. हजारो बचत गट तयार झालेले आहेत. दोन तीन घरातील 11 महिला एकत्र आल्या की बचत गट तयार होतो. महिला संस्था किंवा खाजगी संस्था मुलांसाठी जो पोषण आहार बनवितात त्यासाठी महापालिकेचा परवाना पाहिजे. तसेच अन्न व औषधीद्रव्ये विभागाचा परवाना पाहिजे. त्याला सॉल्वंसी पाहिजे. आर्थिक स्थिती बरोबर आहे की, नाही हे पाहिले पाहिजे. यासंबंधी अभ्यास गट तयार करावा आणि त्यानंतरच टेंडर मागवावे. नागपूरमध्ये जे टेंडर मागविले ते रद्द करुन पुन्हा टेंडर मागवावे अशी विनंती करतो.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 12:10

(श्री. रमेश निकोसे......

तसेच शहरी आणि ग्रामीण विभागामध्ये जो पोषण आहार दिला जातो त्यासाठी केन्द्र सरयकारचा 2.50 रु. हा दर लागू करावा अशी मी मागणी करतो.

सांस्कृतिक कार्य विभाग, बाब क्रमांक 228, पृ.क्र. 22. रविन्द्र नाट्य मंदिराप्रमाणे शासनाने बांधलेली जी नाट्यगृहे आहेत त्यांचे दर मागील वेळसे कमी करण्यात आले असतानाही नागपूर येथील वसंतराव देशपांडे सभागृहाचे दर 14 ते 15 हजार रु. आहे.हे दर कमी करावेत अशी मी शासनाला विनंती करतो.

गृहनिर्माण विभाग, बाब क्रमांक 151 व 152 पृ.क्र. 143. सभापती महोदय, भंडारा येथील श्री. ताराचंद साकुरे यांची 9 एकर जमीन म्हाडाने 20 वर्षापूर्वी ताब्यात घेतली होती. त्या जमिनीचे श्री. साकुरे यांनी पैसे घेतले नाहीत. आता फक्त त्यांच्याकडे सव्वा एकर जमीन शिल्लक राहिलेली आहे. या संदर्भात त्यांनी म्हाडाकडे विचारणा केल्यानंतर त्यांनी सांगितले की, पिल्ले-नायर केस, ही ज्या लोकांना पैसे दिलेले आहेत परंतु प्रोजेक्ट पूर्ण झालेले नाहीत त्यांना लागू होते. ज्यांनी पैसे घेतलेले नाहीत त्यांच्या बाबतीत ही केस लागू होत नाही. अशा प्रकारची दिशाभूल करणारी उत्तरे म्हाडाच्या अधिका-यांकडून दिली जातात. तेव्हा या प्रकरणाची फाईल शोधून श्री. साकुरे यांना न्याय द्यावा अशी माझी मागणी आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, बाब क्रमांक 157, पृ.क्र. 149. सभापती महोदय, डॉ. चौबे हे मेडिकल कॉलेजचे डीन होते. ते गरिबांना मोफत औषधोपचार करीत होते. त्यांच्या मुलाने सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटलमध्ये ऑनररी डॉक्टर म्हणून काम करण्याची संधी मिळावी असा अर्ज केलेला आहे. संचालक, आरोग्य यांनी यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे असे सांगितले. तेव्हा या प्रस्तावाची शासनस्तरावर दखल घेऊन त्यांची ऑनररी डॉक्टर म्हणून नेमणूक करावी अशी मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, या निमित्ताने माननीय ऊर्जा मंत्र्याचे लक्ष एक गोष्टीकडे वेधित आहे की, राज्यामध्ये नवीन ऊर्जा प्रकल्प सुरु करावेत यासाठी मी मागील 4 वर्षापासून सातत्याने मागणी करीत आहे. खापरखेडा, कोराडी, पारस, मौदा या विद्युत केन्द्रा बरोबरच विदर्भातील अनेक विद्युत

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रमेश निकोसे....)

प्रकल्पांसाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याबाबतीत मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. तसेच दाभोळ येथील एन्रॉन प्रकल्प लवकर कार्यान्वित झाला तर राज्यातील विजेचे भारनियम संपुष्टात येईल आणि त्यामुळे शेतक-यांच्या वीज पंपाना वीज उपलब्ध होऊन शेतकरी शेतातून भरघोस उत्पन्न घेईल. तेव्हा एन्रॉन प्रकल्प लवकरात लवकर सुरु होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

--

नंतर कु. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, अजून किती सदस्य बोलावयाचे आहेत आता सव्वा बारा वाजले रिप्लायही सुरु करावयाचा आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांना बोलावयाचे आहे त्यांना प्रथम बोलू द्यावे.

प्रा.शरद पाटील : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना बाहेर जावयाचे असल्याकारणाने त्यांना प्रथम बोलू द्यावे.

--------

**( सभापतीस्थानी : माननीय उपसभापती )**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : मराठवाडा विभागामध्ये औरंगाबाद येथे पद्मविभूषण श्री.गोविंदभाई श्रॉफ यांची जी सामाजिक संस्था आहे त्याकरिता मराठवाडयातील इतिहास आणि त्यासंबंधीचे अभिलेख तयार करण्याचे काम सुरु आहे. याच्यासाठी शासनाने 10 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

बाब क्रमांक 53 - महाराष्ट्र राज्यातील शिक्षक - शिक्षकेतर कर्मचा-यांच्या महागाई भत्त्यांसाठी 348 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे,त्याबद्दल मी या ठिकाणी शिक्षण मंत्र्यांचे अभिनंदन करतो.

बाब क्रमांक 54 - जालना जिल्हापरिषदेतील सन 2002-03-04 साली वेतनेतर अनुदान वाटप करण्यासाठी 77लाख रुपये 41 हजार रुपये दिले होते,परंतु लोकांची मागणी असतांना सुध्दा ते पैसे वाटप केले नाहीत याच्याबद्दल आपण पहिल्यांदा संबंधित अधिका-यांवर कारवाई करावी आणि आता ते पैसे आपण परत दिले त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो.

बाब क्रमांक 56 - शालेय विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण देण्याकरिता आपण 87 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे, त्याबद्दल मी प्रथमत: अभिनंदन करतो. ही योजना विनाअनुदानित शाळा आणि कायम विनाअनुदानित शाळा या दोहोंनाही कोणताही भेदभाव न करता लागू झाल्या पाहिजेत. खर म्हणजे कायम विनाअनुदानित शाळांना कोणत्याही प्रकारचे अनुदान नसतांना आपण त्यांना याप्रकारे मदत करण्याचे धोरण ठेवले पाहिजे मग भलेही त्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पगाराकरिता आपण अनुदानाची वाट पाहू पण त्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मध्यान्ह भोजनाची योजना लागू करण्यासाठी देखील शासनाने सर्वंकष विचार केला पाहिजे. तसेच त्यांना ई.बी.सी.ची सवलत,पाठयपुस्तके मोफत आपण देत होतो म्हणून ही मध्यान्ह भोजन या योजना देखील आपण त्यांच्याकरिता सुरु करावी, अशी मी आपल्याला विनंती करतो.

बाब क्रमांक 58 - प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती देतो त्याकरिता आपण तरतूद वाढवून ती एक कोटी 91 लाख रुपयांची केलेली आहे,त्याकरिता मी आपले अभिनंदन करतो परंतु हे शिष्यवृत्तीचे पैसे त्या विद्यार्थ्यांना परीक्षेच्या पूर्वी मिळावे यासाठी जी उपाययोजना केली पाहिजे ती लवकरात लवकर शासनातर्फे करण्यात आली पाहिजे कारण कधी कधी एखाद्या शाळेमध्ये असतांना तेथील वार्षिक परीक्षा संपल्यानंतर ते विद्यार्थी

BB - 3



JPK/ MAP/ SBT/ प्रथम श्री.शिगम एम. ...... 12:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

बदलीमुळे किंवा इतर कारणास्तव दुस-या शाळांमध्ये प्रवेश घेतात आणि मग त्यानंतर मे किंवा जूनमध्ये ते पैसे शाळेला मिळतात आणि मग ते पैसे शाळा सोडून गेलेल्या विद्यार्थ्यांना पोहोचतच नाहीत.

बाब क्रमांक 59 - डोंगराळ क्षेत्रातील 103 शाळांना संगणक खरेदीसाठी 114 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे त्याचप्रमाणे फक्त डोंगराळ क्षेत्रातील शाळांसाठी ही तरतूद करुन चालणार नाही तर ग्रामीण भागातील छोटया छोटया खेडेगावातील शाळांसाठी देखील संगणक खरेदी करण्यासाठी शासनातर्फे निधी देण्यात यावा,यासाठी भाविष्यामध्ये तरतूद करावी, अशी सुध्दा मी या निमित्ताने विनंती करतो.

बाब क्रमांक 61 - लातूर येथे जे नवीन व्यवसाय मार्गदर्शन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याकरिता व त्या कार्यालयामध्ये नवीन 06 पदे निर्माण करण्यासाठी शासनाने 07 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे, त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो.

बाब क्रमांक 65- स्काऊट गाइर्डला प्रोत्साहन देण्यासाठी आपण चांगली तरतूद केलेली आहे. जांबोरी येथील स्काऊट गाईड टीम लंडन येथे जाणार आहे त्यासाठी आपण 12 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे........आणखी दोन बाब क्रमांक फक्त राहिलेल्या आहेत.....

. **उपसभापती** : आता पूरक मागण्यांवरील चर्चा संपलेली आहे. पूरक मागण्यांवरील चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय मंत्रिमहोदय भाषण सुरु करतील.

श्री.विक्रम काळे : ठीक आहे, मी माझे भाषण येथेच थांबवितो.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम ( परिवहन,सामाजिक न्याय,महिला व बालकल्याण राज्यमंत्री ) : परिवहन विभाग,सामाजिक न्याय,महिला व बालकल्याण आणि खनिकर्म विभाग या चार विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशा प्रकारची या निमित्ताने मी सभागृहाला विनंती करतो. एकूण सहा सन्माननीय सदस्यांनी या विभागाच्या मागण्यांवर आपल्या सूचना मांडलेल्या आहेत, त्या सूचनांचा मी विचार करीन तेव्हा सभागृहाकडे अशी मागणी करतो की, परिवहन विभाग,सामाजिक न्याय विभाग,महिला व बालकल्याण विभागाच्या सर्व पूरक मागण्या मंजूर करण्यात याव्यात.

यानंतर श्री.कानडे.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर (गृहनिर्माण,खार जमीन व बंदरे राज्यमंत्री) : सभापती महोदय, बाब क्र. 26 देशांतर्गत जलवाहतुकीच्या संदर्भातील ही मागणी आहे. यामध्ये केंद्र शासनाचे 6 कोटी 52 लाख 86 हजार आणि राज्य शासनाचे 72 कोटी 53 हजार अशी रक्कम खर्च होणार आहे. त्याचप्रमाणे बाब क्र. 32 यासाठी 60 कोटी त्याचप्रमाणे बाब क्र. 26 व 32 यासाठी एकूण 1385.12 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. ही पुरवणी मागणी सभागृहाने मंजूर करावी अशी मी विनंती करतो. त्याचप्रमाणे आगरदांडा व म्हसळा येथील वाहतुकीच्या विकासाची कामे आहेत. माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी बंदर विकासाच्या बाबतीत विस्थापितांना मोबदला आणि नोकऱ्या देण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. या विस्थापितांना न्याय दिला जाईल एवढे मी यानिमित्ताने सांगू इच्छितो. शासनाने दिघी,रेवस,मांडवा त्याचप्रमाणे जयगड,विजयदुर्ग आणि रेड्डी या बंदरांचा विकास खाजगीकरणाच्या माध्यमातून करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याचप्रमाणे मेरीटाईम बोर्डाची प्रशासकीय रचना करताना बंदर अधिकारी पद पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आलेले आहे. माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी बाब क्र. 26 आणि 32 अंतर्गत जलवाहतुकीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. यामध्ये जलव्यवस्थापनाकडून 90 टक्के आणि शासनाचे 10 टक्के याप्रमाणे निधी मिळणार आहे. तरतूद प्रस्तावित केलेली आहे. सिंधुदूर्ग जिल्हयात सुध्दा ही योजना राबविण्यात येईल. खार जमिनी व बंदरे विकास विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, बांधकाम विभागाच्या 573 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मी सादर करु इच्छितो. अनेक माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा केलेली आहे आणि रस्ते विकासाची कामे लवकरात लवकर व्हावीत असा आग्रह धरलेला आहे. मराठवाडयातील माननीय सदस्यांनी विचारणा केली की आतापर्यंत खाजगीकरणातून किती रस्ते सुरु केले आहेत आणि कामांची संख्या किती आहे ? खाजगीकरणातून सुरु झालेल्या कामांची संख्या 4 आहे आणि 161 कि.मी.रस्त्यासाठी एकूण 477 कोटी रुपये खर्च होणार आहेत. औरंगाबाद-लातूर,औरंगाबाद-नांदेड,लातूर-औसा अशी कामे आहेत. नांदेड-लातूर दोन कामे निविदा स्तरावर आहेत.

सभापती महोदय, आतापर्यंत पावसामुळे 121 कोटी रुपयांचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे नुकसान झालेले आहे. यामध्ये रस्ते आणि इमारतींचे नुकसान झालेले आहे. मागील दोन वर्षात 661 कोटी आणि 1521 कोटी यावर्षी 421 कोटी अशा प्रकारे गेल्या तीन वर्षात एकूण 2703 कोटी रुपयांचे रस्ते,पूल आणि बांधकाम खात्याच्या इमारतींचे नुकसान या विभागामध्ये झालेले आहे.

नंतर श्री. भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ.........

सार्वजनिक बांधकाम विभागाला एस.आर.च्या माध्यमातून जो काही पैसा मिळतो तो पैसा काही प्रमाणात वळविला आहे. थोडा निधी उपलब्ध झाला आहे. दुरुस्ती आणि कायम दुरुस्तीचे काम आहे त्यासाठी जवळजवळ 2 हजार कोटी रुपयांचे शॉर्टेज रस्त्याच्या कामासाठी आहे. असे असले तरी सुध्दा जो काही निधी उपलब्ध होईल त्या निधीच्या माध्यमातून सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या काही मागण्या मांडलेल्या आहेत त्या मागण्यांमध्ये जरुर लक्ष घातले जाईल. त्यातील अडचणींची तीव्रता कमी होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जाईल. मी सभागृहाला विनंती करतो की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्या मान्य कराव्यात.

**उपसभापती** : सभागृहाची वेळ दुपारी 12.45 पर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवरील चर्चेला तीन दिवसांचा अवधी दिलेला होता. नंतर कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्यामध्ये हा कालावधी दोन दिवसांवर आणण्यात आला. काल या मागण्यांवर चर्चा सुरु झाल्यानंतर हा कालावधी काही तासांवर आणण्यात आला आहे. जवळजवळ सर्वच विभागाचे मंत्री उत्तर देणार आहेत. आता शिल्लक असलेल्या 10 ते 15 मिनिटांमध्ये उत्तरांचे भाषण कसे पूर्ण होणार आहे? एवढी मोठी चर्चा झाल्यानंतर मागण्या अशाच मंजूर करावयाच्या असतील तर या चर्चेला काही अर्थ राहणार नाही. या सदनातील चर्चेला कोणतेही गांभीर्य उरलेले नाही. अशा परिस्थितीत आम्ही बोलायचे तरी कशाला? केवळ कामकाज उरकून घ्यायचे असेल तर उरकून घ्यावे.

**उपसभापती** : उर्वरित मंत्रीमहोदयांचे उत्तरासाठी माननीय सभापतींच्या अनुमतीने संध्याकाळी वेळ ठरविता येईल. आजची कामकाजपत्रिका आपल्याला सकाळीच प्राप्त झाली होती. तक्रार करावयाची होती तर ती सकाळी सभागृह सुरु होतानाच करणे योग्य ठरले असते. आता पुरवणी मागण्यांवरील कामकाज संपत आले आहे.

श्री.दिवाकर रावते : उर्वरित वेळेत संपूर्ण पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर येणे कसे अपेक्षित आहे?

**उपसभापती** : कामकाज सल्लागार समितीमध्ये सर्व गटनेते असतात. त्या बैठकीमध्ये हे कामकाज ठरलेले आहे. अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी आपले उत्तराचे भाषण सुरु करावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाबा सिद्दीकी (अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2007-08 च्या पुरवणी मागण्यांमधील राज्य उत्पादन शुल्क विभागाशी संबंधित बाब क्र.23, कामगार विभागाशी संबंधित बाब क्र.123, अन्न व नागरी पुरवठा विभागाशी संबंधित बाब क्र.138, 139, 140, 141 व 142 सन्माननीय सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी आपल्या अनुमतीने सदनाला विनंती करतो.

---------------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, वित्त विभागाची बाब क्रमांक-67, 68, 69 व नियोजन विभागाची बाब क्रमांक-146, 147, 148, 149 व 150 यासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने दोन अत्यंत महत्वाचे मुद्दे याठिकाणी उपस्थित करण्यात आले आहेत. आमदार निधी व्यपगत होऊ नये यासाठी कायमस्वरुपी तरतूद करावी, मार्चपर्यंत निधी खर्च न झाल्यास पुढील वर्षी खर्च करण्यास मान्यता द्यावी असे विचार काही सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केले आहेत. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, राज्याचा अर्थसंकल्पीय जो निधी असतो तो त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे अपेक्षित असते. अर्थसंकल्पाच्या नियमानुसार तसे होणे अत्यंत आवश्यक असते. शासनाचा निधी शासनाच्या तिजोरीबाहेर कायमस्वरुपी ठेवणे किंवा जास्त वेळ प्रलंबित ठेवणे हे अर्थसंकल्पाच्या मुलभूत धोरणाविरुध्द असते. आमदार निधी वेळीच खर्च करावा यासाठी आमदार निधीच्या दीडपट कामांची शिफारस करण्याची तरतूद केली आहे. आता आमदार निधी 1 कोटी रुपयांचा असून दीड कोटी रुपयांची कामे शिफारस करता येतील. जेणेकरुन निधी व्यपगत होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे. यासाठी आमदारांनी अनुज्ञेय कामांची आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला आणि वेळीच शिफारस केली तर 31 मार्चच्या आत निधी खर्च होऊ शकतो. आमदार निधीखेरीज इतर यंत्रणा, ज्यामध्ये जिल्हा परिषदा, नगरपालिका आणि महानगरपालिकांचा समावेश आहे.

श्री.दिवाकर रावते : आचारसंहिता लागू झाली तर त्या जिल्हयाची काय स्थिती असेल?

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख ....

स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत कामे केली जातात. 15 मार्चपूर्वी जर निधी दिला तर सन्माननीय सदस्यांनी हा निधी 31 मार्चपर्यंत खर्च करावयाचा असतो. आचारसंहिता असेल तर जून एंडपर्यंत शासनाची, वित्त विभागाची पूर्वपरवानगी घेऊन हा निधी खर्च करावयाचा असतो. वर्षाच्या प्रारंभी किंवा मध्यावर दिले तर हा निधी बरोबर खर्च होऊ शकतो. आपण सन्माननीय सदस्यांना त्यांच्या रक्कमेच्या दीडपट कामे करण्याची परवानगी दिलेली आहे. राज्याचा अर्थसंकल्पीय निधी फार काळ तिजोरीबाहेर राहणे हे मुलभूत धोरणाशी, अर्थसंकल्पाच्या धोरणाशी विसंगत ठरते त्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात नोंद घ्यावी.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय मंत्रीमहोदय, बजेट डिसीप्लीन बद्दल बोलत आहेत. बजेट डिसीप्लीनमध्ये खासदारांचा निधी व्यपगत होत नसेल तर आमदारांचा निधी कसा काय व्यपगत होऊ शकतो. खासदारांचा निधी वर्ष, दोन वर्ष, तीन वर्षे कॅरी फॉरवर्ड होत असतो. खासदारांचा निधी जर व्यपगत होत नसेल तर आमदारांचा निधी का व्यपगत होतो? दर्यापूर,रामटेकची निवडणूक लागली म्हणून त्या ठिकाणचा निधी त्या जिल्हाधिका-यांनी परत पाठविलेला आहे.

डॉ. सुनील देशमुख : सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब तपासून घेतली जाईल. निवडणूकीच्या वेळी स्पेशल केस म्हणून आपण मान्यता देत असतो. तसेच सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी वेंगुर्ला तालुक्याचा डोंगरी तालुक्यात समावेश करावा अशी मागणी केलेली आहे. डोंगरी विभाग निश्चित करण्यासाठी 1988 मध्ये मंत्रीमंडळाने डोंगरी तालुक्यांच्या संदर्भात काही विशेष क्रायटेरिया निश्चित केलेले आहेत. त्यानुसार सध्या 21 जिल्हयात 73 पूर्ण गट 35 उपगट डोंगरी तालुके निश्चित झालेले आहेत. परील निश्चित निकषानुसार राज्यातील डोंगरी विभागातील तालुक्यांची पुनर्रतपासणी करण्यासाठी महाराष्ट्र रिमोट सेन्सींग ॲथोरीटीकडून करुन घेण्यात आलेले आहे. त्या अहवालाची शासन स्थरावर तपासणी सुरु आहे. वेंगुर्ला तालुका डोंगरी विभागात आहे की, नाही ते तपासून घेण्यात येईल.

तसेंच पाटबंधारे विभागाच्या बाब क्रमांक 106,107,108,109,110,111,112,113 अशा योजनांतर्गत 1.06 दत्तमत 60 लक्ष 4 हजार आणि योजनेतर 19,28,38,000 रुपये असे एकंदर 19,89,48,000 रुपयांच्या मागण्या केलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख ....

यानी खैरी मध्यम प्रकल्पाबाबत येथे जी माहिती दिलेली आहे ती तपासून घेण्यात येईल. जर वाळू उपसण्यासाठी पाणी सोडले असेल तर संबंधित अधिका-यांची चौकशी करुन निश्चित कारवाई एक महिन्याच्या आत केली जाईल असे सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे जर तथ्य आढळले तर निश्चित कारवाई करण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. "तथ्य आढळले तर आम्ही त्याची चौकशी करु" असे माननीय मंत्रीमहोदयांनी जे वक्तव्ये केलेले आहे ते बरोबर नाही. ज्यावेळी या सन्माननीय सदनामध्ये एखादा लोकप्रतिनिधी माहिती देतो तेव्हा ती सत्य मानूनच पुढच्या गोष्टीची चौकशी केली पाहिजे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला तो योग्य असून सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी जी माहिती दिलेली आहे ती सत्य समजून चौकशी करण्यात येईल. चौकशीमध्ये जर तथ्य आढळले तर निश्चित कारवाई केली जाईल.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी काल वैतरणाच्या अतिरिक्त कालव्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता त्यासंदर्भात या कामास प्रशासकीय मान्यता 16.3.200 अन्वये 259.99 लक्ष रुपये रक्कमेची किमतीची मिळाली असून खर्चाच्या दरसूचीत बदल, तांत्रिक सुधारणा इत्यादीमुळे 2005-2006 च्या दरसूची नुसार आधारीत 423.5 या रक्कमेत 17.4.2007 रोजी सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. आतापर्यंत जवळ जवळ 282 लक्ष रुपये खर्च झालेला आहे. हे काम 2008 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित केलेले आहे. सन्माननीय सभापती महोदय, मी आपल्या मार्फत नियोजन विभाग, वित्त विभाग तसेच जलसंपदा विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी आपल्यामार्फत सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो.

--------------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा, वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, ऊर्जा,वैद्यकीय शिक्षण आणि उच्च व तंत्र शिक्षण या विभागांच्या मागण्या सभागृहासमोर मांडलेल्या आहेत त्या मान्य कराव्यात अशी मी सुरुवातीलाच विनंती करीत आहे. या चर्चेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्यांचे मी आभार मानतो.

सभापती महोदय, ऊर्जा विभागाबाबत बोलावयाचे झाल्यास उरण गॅस प्लान्टच्या पुनर्वसनासाठी केंद्र सरकारकडून मिळालेली रक्कम वर्ग करण्यात आलेली आहे हे सभागृहाच्या निदर्शनास आणत आहे.

नाशिक आणि नंदूरबार या जिल्ह्यांसाठी आदिवासी विभागाने 10 कोटीचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. या निधीच्या माध्यमातून नाशिक आणि नंदूरबार येथे नवीन सबस्टेशन्स उभी करणे आणि क्षमतेमध्ये वाढ करणे हा कार्यक्रम घेतलेला आहे.

वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत 16 कोटी 23 लक्ष निधी उपलब्ध झालेला आहे. या निधीतून वैद्यकीय शिक्षणा संदर्भातील यंत्रसामुग्री खरेदी करणार आहोत. वेळ कमी असल्यामुळे ती यादी मी वाचून दाखवीत नाही.

बाब क्रमांक 164- केंद्र सरकारने राज्यातील आयुर्वेदिक, होमिओपॅथी व युनानी महाविद्यालय, रुग्णालय व आयुष संस्था यांना 72 लाख इतके वित्तीय सहाय्य मंजूर केले आहे. हा निधी केंद्र सरकारकडून येतो. यामध्ये राज्याचा रोल तपासून घेतला जाईल. केंद्राकडून आलेला निधी संबंधित संस्थांना हस्तांतरीत करायचा आहे एवढाच हा विषय आहे. ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणण्यासाठी मांडण्यात आलेली आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने 40 कोटी रुपयांची मागणी सादर करण्यात आलेली आहे. आदिवासी विभागाच्या अंतर्गत 4 कोटी 78 लाख रुपये व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे 29.50 कोटी रुपये वर्ग करण्यात आलेले आहे. या मागण्यांमध्ये प्रामुख्याने चार विद्यापीठांमध्ये 137 शिक्षकी पदे निर्माण करणे, एका विद्यापीठामध्ये 16 शिक्षकी पदे निर्माण याबाबी समाविष्ट आहेत.

तंत्र शिक्षण विभागामध्ये 301 शिक्षकी पदे निर्माण करणे तसेच आणखी 12 पदे निर्माण करणे. सोलापूर विद्यापीठात 109 शिक्षकेतर पदे निर्माण करणे इत्यादी बाबी या मागणीमध्ये समाविष्ट आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील.......

राज्याच्या प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी आयटीआय ही संकल्पना शासनाने स्वीकारलेली आहे. 1999 नंतर 32 नवीन तालुके निर्माण झाले. या 32 तालुक्यांमध्ये आयटीआय स्थापन करण्याच्या संदर्भात घोषणा केली होती. 21 तालुक्यांमध्ये आयटीआय सुरु करण्यासाठी 4 कोटी 49 लक्ष रुपये आणि 3 कोटी 10 लक्ष रुपये इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. जी आयटीआय सुरु आहेत त्यांच्यामध्ये सेंटर ऑफ एक्सीलन्स निर्माण करण्याच्या संदर्भात एक नवीन स्कीम स्वीकारलेली आहे. या स्कीमच्या अंतर्गत प्रत्येक आयटीआयला 2 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देणार आहोत. सिलेक्ट झालेल्या आयटीआयला 1 कोटी रुपये 5 लाख रुपये आणि 2 कोटी रुपये असा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्याचप्रमाणे यंत्रसामुग्रीच्या खरेदीसाठी 4 कोटी 83 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

या राज्यामध्ये वाढत असलेला सिव्हील एव्हीएशनचा स्कोप लक्षात घेऊन ठाणे येथील आयटीआयमध्ये एव्हीएशन ट्रेनिंग इन्स्टीटयूट सुरु करण्याचा सरकारने निर्णय घेतलेला आहे. प्राथमिक खर्चासाठी 65 लक्ष रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत. तसेच प्रवेश नियंत्रण समितीला 1 लक्ष रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत. राज्यातील जी शासकीय तंत्रनिकेतने आहेत त्यामध्ये बांधकाम करणे वगैरे कामे आहेत त्यासाठी आणि यंत्रसामुग्रीच्या कामासाठी 8 कोटी 76 लाख रुपयांची मागणी सादर केलेली आहे. या सर्व मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो. तसेच सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याबाबत त्यांना लेखी उत्तरे पाठविण्यात येतील.

------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, आरोग्य विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य सर्वश्री राजन तेली आणि अरविंद सावंत यांनी रुग्णालयामध्ये डॉक्टर्सची कमतरता असल्याचा उल्लेख केला. मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, जवळपास 904 डॉक्टर्सची कमतरता आहे. ही कमतरता पूर्ण करण्यासाठी विभागाने निर्णय घेतला की, प्रत्येक पीएचसीमध्ये बीएएमएसच्या डॉक्टर्सची नियुक्ती करणार आहोत.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे...

हा विषय पुढच्या कॅबिनेटमध्ये घेऊन जाऊ. त्याशिवाय एमपीएससीकडे आम्ही मागणी करु की, आरोग्य विभागाचे जे प्रस्ताव आपल्याकडे आहेत ते लवकरात लवकर पूर्ण करावेत. सभापती महोदय, मी आपल्या वतीने सभागृहाला विनंती करतो की, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या सर्व पुरवणी मागण्यांना मान्यता द्यावी.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम ( सहकार, पुनर्वसन व मदत मंत्री ) : सभापती महोदय, सहकार विभागाच्या माध्यमातून कर्जासंबंधी एक नवे धोरण घेतलेले आहे. या वर्षी 6 टक्क्याने शेतकऱ्यांना कर्ज देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. डॉ.पंजाबराव देशमुख योजनेमध्ये 2 टक्क्यांची मुदत होती, ती आपण आता 3 लाखापर्यंत वाढवलेली आहे. यावर्षी महाराष्ट्रामध्ये ऊसाचे उत्पादन विक्रमी झाले. विशेषत: मराठवाडयात जास्तीचे झाले. गेल्यावर्षी बंद पडलेले 23 कारखाने सुरु करुनसुध्दा मराठवाडयात ऊस शिल्लक राहिलेला आहे. म्हणून शासनाने प्रती हेक्टरी 25 हजार रुपये उतारा आणि ट्रान्सपोर्टसाठी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. तो आणखी वाढवून देण्यासंबंधी आम्ही मंत्रिमंडळापुढे जाऊन जरुर विचार करु. याठिकाणी ऊसाच्या उताऱ्यासंबंधी मागणी करण्यात आली. मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, माझ्याकडे असलेल्या विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात.

-----

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या रुपये 895 कोटी 23 लाख 62 हजारांच्या पुरवणी मागण्यांस सभागृहाने मान्यता द्यावी, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

-----

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाची बाब क्रमांक 170 व 190 ही बाब सारखीच आहे. त्या माध्यमातून 35 लाख 10 हजार 500 रुपयांची मागणी डबल करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यासंबंधीचा खुलासा याठिकाणी होणे आवश्यक आहे.

डॉ.विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या मागण्यांवर ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला, त्या सर्वांना मी मन:पूर्वक धन्यवाद देतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दोन बाबी सारख्याच असल्याचा प्रश्न उपस्थित केला. त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, एका ठिकाणी भागभांडवल आहे आणि एका ठिकाणी शेअर्स् आहेत. अशाप्रकारे दोन्ही ठिकाणी अर्धीअर्धी रक्कम द्यावी लागणार आहे. अशाप्रकारे त्या बाबी आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा गंभीर विषय आहे. दोन्ही बाबी एकच आहेत, त्यातील शब्दश: वाक्य एकच आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी बाब क्रमांक 170 व 190 तपासून पहाव्यात आणि नंतर उत्तर द्यावे.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, त्यामध्ये शेअर्स आणि बाकीचे निम्मे अनुदान आहे, त्यामुळे या दोन्ही बाबींची अमाऊंट सारखीच आहे, त्यामुळे ती त्याठिकाणी दिलेली आहे. त्यामध्ये अर्धे शेअर आणि अर्धे भागभांडवल आहे. त्यामुळे माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आदिवासी विकास विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम, वने, पर्यावरण व आदिवासी विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, आज पर्यावरण विभागाच्या पुरवणी मागण्यांवर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे व सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सहभाग घेतला. त्यांनी याठिकाणी ज्या सूचना केल्या, त्यांचा निश्चित प्रकारे विचार केला जाईल. त्यामुळे माझी सभागृहाला विनंती आहे की, पर्यावरण विभागाची बाब क्रमांक 191 आणि वन विभागाच्या बाब क्रमांक 37 ते 44 ला मान्यता द्यावी, ही विनंती.

------

..6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन, माहिती व प्रसिध्दी, भूकंप पुनर्वसन व मदतकार्य, क्रीडा आणि युवक कल्याण, माजी सैनिक कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, सभागृहाने महसूल, पुनर्वसन, वस्त्रोद्योग, सामान्य प्रशासन, गृह विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे...........

त्याचबरोबर या ठिकाणी सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांनी दिलखुलास कार्यक्रमाची अंमलबजावणी जनतेच्या हिताची आहे किंवा नाही, त्याचा लोकांवर प्रभाव पडणार आहे किंवा नाही, याची तपासणी करावी, अशी मागणी केली आहे. निश्चित याबाबतची तपासणी करण्यात येईल आणि पाठपुरावा केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.अरविंद सावंत यांनी सन 1982 च्या दंगलीतील आपद्ग्रस्तांना उशिरा मदत दिल्याची बाब नमूद केली आहे. केंद्र शासनाने सूचविल्याप्रमाणे या आपद्ग्रस्तांना शासन वाढीव मदत या पुरवणी मागणीव्दारा देत आहे.

सभापती महोदय, महसूल व पुनर्वसन, मदत कार्य, माजी सैनिक कल्याण, क्रिडा व युवक कल्याण या विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी आपल्यामार्फत माझी विनंती आहे.

---------------

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिस अहमद (पशुसंवर्धन, दुग्ध विकास, मत्स्योद्योग व औकाफ मंत्री) : सभापती महोदय, पशुसंवर्धन, दुग्ध विकास, मत्सोद्योग या विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी माझी विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पंतप्रधान पॅकेज अंतर्गत विदर्भातील सहा जिल्हयात गाई, म्हशी, बकरे किती वाटले असा प्रश्न मी उपस्थित केला होता. याबाबत सन्माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा, अशी माझी विनंती आहे.

श्री अनिस अहमद : सभापति महोदय, सम्माननीय सदस्य श्री रावते जी ने पूछा है कि विदर्भ के वर्धा, यवतमाल,अमरावती, बुलढाणा, अकोला एवं वाशिम इन 6 जिलों में कितनी गाय, भैंस एवं बकरी वितरीत की गई है. इस संबंध में मैं यह बताना चाहता हूं कि इन 6 जिलों में पिछले दिनों 25 हजार गायें बांटी हैं, 6 करोड़ रुपये की बकरियाँ बांटी हैं. एनीमल हसबेंडरी विभाग के माध्यम से किसानों को कृषि के साथ जोड़ धंधा मिला है. दूध का उत्पादन भी बढ़ा है. अब किसानों को 15 हजार रुपये के बजाए 20 हजार रुपये की गाय दी जाएगी. किसानों में चेतना लाने के लिए दिंडी निकाली गई थी. मैं यह बताना चाहता हूं कि किसानों को जोड़ धंधा मिल जाने के कारण किसानों की आत्महत्या की संख्या में कमी आई है. किसानों की फसलों का उत्पादन बढ़ गया है. उनकी प्रति व्यक्ति आय बढ़ गई है.

सभापति महोदय, मेरा यह अनुरोध है कि सदन पशुसंवर्धन, दुग्ध विकास, मत्सोद्योग विभागों की मांगे मंजूर करें.इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

...........

...3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MAP/ SBT/ 12:45

श्री.राणा जगजितसिंह पाटील (कृषी, उद्योग, सांस्कृतिक कार्य, राज शिष्टाचार, रोजगार आणि स्वयंरोजगार, रोजगार हमी योजना राज्यमंत्री) : सभापती महोदय, या विभागाच्या मागण्यांवर चर्चा करतांना सन्माननीय सदस्य, श्री.श्रीकांत जोशी यांनी उद्योग विभागाबाबत दोन महत्वाचे मुद्दे उपस्थित केले होते. या पुरवणी मागणी अंतर्गत 50 कोटी रुपयांचा बी.टी.फंड आपण निर्माण करीत आहोत व त्यासाठी काही रकमेची तरतूद करीत आहोत. पुढील काळात बी.टी.उद्योगाशी रिलेटेड जे नवीन उद्योग येतील त्यांना खास पॅकेज देण्याचा विचार केला आहे. डॉ.माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली असून कोणत्या बी.टी.कंपन्यांना मदत केली पाहिजे, याचा निर्णय ही समिती घेणार आहे. हा एक कॉरपस फंड असून बी.टी.च्या प्रमोशनसाठी त्याची निर्मिती करण्यात आली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.श्रीकांत जोशी यांनी एम.एस.एफ.सी.बाबत चांगली सूचना केली आहे. याबाबत निश्चित विचार केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या, श्रीमती सुधाताई जोशी यांनी औद्योगिक वापरासाठी असलेल्या जागेचा वाणिज्यिक वापर केला जातो. यासाठी अटी घालण्यात याव्यात, अशी सूचना केली आहे. यासंदर्भात अगोदरच अटी घालण्यात आल्या आहेत.

सन्माननीय सदस्य, श्री.जयंत प्र.पाटील यांनी कृषि विभागाच्या मागण्यांवर बोलत असतांना आंब्याचा उल्लेख केला. त्याबाबत निश्चित विचार केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या, डॉ.नीलम गो-हे यांनी मल्टिप्लेक्सचा उल्लेख केला. मराठी चित्रपटासाठी प्राईम टाईममधील स्लॉट देण्यात यावा, अशा प्रकारची त्यांची मागणी आहे. यासंदर्भात एक बैठक आयोजित करण्यात आली होती. संबंधितांकडून प्रपोजल अपेक्षित आहेत, ही एक चांगली सूचना आहे, निश्चित त्यावर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सभागृहाला अशी विनंती करतो की, उद्योग विभागाच्या पुरवणी मागण्या, बाब क्रमांक 124, 125, 126, 127, 128, 130 व 131, राजशिष्टाचार विभागाची बाब क्रमांक 3 व 4, सांस्कृतिक कार्य विभागाची बाब क्रमांक 227, 228, 229, 230, कृषि विभागाची बाब क्रमांक 46, 47, 48 व 49, जलसंधारण विभागाची बाब क्रमांक 133, या सर्व पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी आपल्या माध्यमातून विनंती आहे.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

24-07-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) HH-4

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी आमदार निधीबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. लोकसभेमध्ये खासदार निधी लॅप्स होत नाही. त्याच धर्तीवर आमदार निधी देखील लॅप्स होणार नाही, याची संबंधित विभागाने नोंद घ्यावी.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .....

आमदार निधी त्या आर्थिक वर्षामध्ये खर्च झाला नाही तर तो लॅप्स होतो. लोकसभेच्या धर्तीवर आमदार निधी लॅप्स होणार नाही, याबाबत वित्त व नियोजन विभागाने कार्यवाही करावी.

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, आमदार निधीसंदर्भात आपण जे निदेश दिलेले आहेत, त्या अनुषंगाने ही बाब मंत्रिमंडळासमोर न्यावी लागेल. ही बाब मंत्रिमंडळासमोर नेऊन त्यावर योग्य तो निर्णय घेतला जाईल.

**उपसभापती** : मी सर्वसमावेशक निर्णय घेतलेला आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : आमदार निधी त्या आर्थिक वर्षात खर्च झाला नाही तर आपण तो लॅप्स करतो. ही बाब मंत्रिमंडळासमोर नेऊन निर्णय घ्यावा लागेल.

**उपसभापती** : निर्णय घेण्यात येईल, असे आपण सांगावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, होय.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आम्हाला शासनाला काही सूचना करावयाच्या होत्या. परंतु आपण विनंती केल्यावरुन वेळे अभावी आम्ही त्या सूचना मांडलेल्या नाहीत. आम्ही आमच्या लेखी सूचना संबंधित विभागांकडे देऊ त्यावर संबंधित विभागाने उत्तर द्यावे, असे आपण निर्देश द्यावेत, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना त्यांच्या सूचना मांडावयाच्या होत्या. परंतु वेळे अभावी सन्माननीय सदस्य त्यांच्या सूचना मांडू शकले नाहीत. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या लेखी सूचना संबंधित विभागाकडे पाठविल्या तर त्या सूचनांचा सर्व विभागाच्या मंत्री महोदयांनी विचार करावा, असे मी निर्देश देत नाही, पण विनंती करतो.

सन 2007-08 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 52 मिनिटांनी दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**वेतनातील फरकापोटी मिळणारी रक्कम अदा करतांना होणारा भेदभाव**

**(१) * २९२८६ श्री. वसंतराव खोटरे , प्रा. बी. टी. देशमुख :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन निर्णयाप्रमाणे वेतनातील फरकाची रक्कम कशी अदा करावी याबाबत दिनांक १७ जानेवारी, २००४ च्या शासननिर्णयामध्ये स्पष्ट तरतुद असतांना तंत्र माध्यमिक शाळा तथा किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमातील अशासकीय माध्यमिक शाळांच्या शिक्षकांना थकबाकीचे एकूण ४ हप्ते रोखीने व ५० टक्के रक्कम भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात येऊन आर्थिक लाभ देण्यात आला मात्र अशाच प्रकारची कारवाई आय.टी.आय. निदेशकांच्या बाबतीत करण्यात न आल्याने त्यांना भेदभावपूर्ण वागणूक देण्यात आली आहे, अशी तक्रार सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य आय.टी.आय. निदेशक संघटना यांनी दिनांक १४ मे, २००७ रोजी किंवा त्यादरम्यान एका निवेदनाद्वारे मा.तंत्रशिक्षण मंत्री यांचेकडे केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबतीत घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय ,
(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता** : (१) होय.
(२) व (३) दिनांक १८.१२.२००३ रोजी मंत्री मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार दिनांक १७ जानेवारी, २००४ च्या शासन निर्णयाअन्वये अनुज्ञेय केलेली सुधारित वेतनश्रेणी लागू करतांना त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्या आहेत, त्या त्रुटी दूर करण्याकरिता मंत्री मंडळाच्या मान्यतेची आवश्यकता आहे. त्यानुसार मंत्री मंडळापुढे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. मंत्री मंडळाच्या मान्यतेनंतर सुधारित वेतनश्रेणीची थकबाकी अदा करण्याचा पुरवणी मागणीचा प्रस्ताव विधानमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, आय.टी.आय. निदेशकांवर शासनाचा कोणता राग आहे हे समजत नाही. आय.टी.आय. निदेशकांनी अतिशय परिश्रमपूर्वक त्यांच्या मागण्या मान्य करुन घेतलेल्या आहेत. माध्यमिक शाळेतील शिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी द्यावी म्हणून त्यांनी अनेक आंदोलने केली आहेत. त्यांच्या स्वत:च्या रक्ताने लिहिलेले निवेदन माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांना दिलेले आहे. त्यानंतर नागपूर येथील अधिवेशनादरम्यान अभूतपूर्व लॉंग मार्च त्यांनी काढला होता. हा प्रश्न चिघळत आहे. शासनाने त्यांच्या मागण्या मान्य केल्या होत्या व वेतनातील फरकाची रक्कम

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कशी अदा करावी याबाबत दिनांक 17 जानेवारी 2004 रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या परिपत्रकानुसार तंत्र माध्यमिक शाळा तथा किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमातील अशासकीय माध्यमिक शाळांच्या शिक्षकांना थकबाकीचे 4 हप्ते रोखीने व 50 टक्के रक्कम भ.नि.निधीमध्ये जमा करण्यात येऊन आर्थिक लाभ देण्यात आला मात्र अशाच प्रकारची कार्यवाही आय.टी.आय. निदेशकांच्या बाबतीत न करण्यात आल्याने त्यांना भेदभावपूर्ण वागणूक देण्यात आलेली आहे. त्यांना अजूनही वेतन न मिळण्याचे कारण काय ? लेखी उत्तरात म्हटले आहे की, दिनांक 17 जानेवारी 2004 च्या शासन निर्णयामध्ये अनुज्ञेय केलेली सुधारित वेतनश्रेणी लागू करताना त्यामध्ये काही त्रुटी आढळून आलेल्या आहेत, त्या त्रुटी दूर करण्याकरिता मंत्रिमंडळाच्या मान्यतेची आवश्यकता आहे. येत्या एक महिन्याच्या आत हा निर्णय घेऊन तुम्ही त्यांना थकबाकी देणार का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, होय.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, एक महिन्याच्या आत थकबाकी देण्यात येईल असे समाधानकारक उत्तर मंत्री महोदयांनी दिले आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, कर्मचाऱ्यांनी आंदोलने करावयाची व सभागृहात चर्चेसाठी प्रश्न निर्माण करावयाचा हे योग्य नाही. शासनाने दिनांक 17 जानेवारी, 2004 रोजी परिपत्रक काढले आहे. कॅबिनेटच्या मान्यतेनंतर परिपत्रक काढले आहे. आय.टी.आय. निदेशकांची वेतनश्रेणी कमी करण्याबाबत एका डेस्क ऑफिसरने पत्र पाठविले आहे. परंतु त्याला अद्याप कॅबिनेटची संमती घेतलेली नाही. माझा प्रश्न असा आहे की, दिनांक 17 जानेवारी, 2004 च्या शासन निर्णयाप्रमाणे आय.टी.आय. निदेशकांना थकबाकी दिली जाईल का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबद्दल मी माहिती देत आहे. शासनाने जी.आर. काढला होता परंतु त्यामध्ये काही चूका झाल्या होत्या. कॅबिनेटसमोर गेलेल्या नोटींगमध्ये टायपिंग मिस्टेक झाली होती. या नोट मध्ये 7500 ऐवजी 4550 अशी फिगर नमूद चुकीने नमूद करण्यात आली होती. तसेच 12000 ऐवजी 11500 लिहिलेले होते. नजरचुकीने कॅबिनेटने यास मान्यता दिलेली आहे. कॅबिनेटची मान्यता मिळाल्यानंतर पुरवणी मागण्यामध्ये तरतूद करण्यासाठी फायनान्स डिपार्टमेंटकडे फाईल गेली.

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फायनान्स डिपार्टमेंटने वरील चूक शिक्षण विभागाला कळविली आहे. मिस्टेक असलेल्या फिगरची दुरुस्ती करुन पुन्हा कॅबिनेटकडे नोट पाठवावी लागेल. योग्य ती दुरुस्ती करुन पुन्हा कॅबिनेटकडे फाईल सादर करुन मंजूरी घेण्यात येईल. पुढच्या पुरवणी मागण्यामध्ये त्याची तरतूद करण्यात येईल व सर्व शिक्षकांना थकीत वेतन देण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना मी पॉईंटेड प्रश्न विचारला होता की, शासनाच्या दिनांक 17 जानेवारी 2004 च्या निर्णयाप्रमाणे आय.टी.आय. निदेशकांना थकबाकी देणार का ? पाचव्या वेतनआयोगापर्यत आय.टी.आय. निदेशकांना शिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी देण्यात आली होती.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख (पुढे चालू....) ता.प्र.क्रमांक 29286 ....

पाचव्या वेतन आयोगामध्ये मात्र त्यांच्यावर अन्याय करण्यात आलेला होता. 2-4 वर्षे त्यामध्ये गेली. त्यानंतर या सभागृहाने त्याबाबतीत या लोकांना न्याय दिला. शासनाने त्याबाबत जी.आर.काढला. अर्थात मंत्र्यांनी याला न्याय दिला असे म्हणायलाही हरकत नाही, कारण शेवटी न्यायाच्या झऱ्याची तोटी त्यांच्याजवळच आहे. आता त्यात काही चुका झाल्यामुळे त्रुटी राहिली असे आपण सांगितले. त्या चुका कोणाच्या झाल्या वगैरे बद्दल मी काही म्हणत नाही. मात्र माध्यमिक शिक्षकांची जी पॅरिटी होती ती 17.1.2004 च्या शासन निर्णयाने आपण पूर्ण केली. तेव्हा 17.1.12004 च्या शासन निर्णयानुसारच हे ॲरिअर्स दिले जातील का ?

श्री. सुरेश शेट्टी : होय.

***

...... केके 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता. प्र. क्रमांक 31146**

सन्माननीय सदस्य अनुपस्थित.

**ता.प्र.क्र. 31146 - संबंधित सदस्य अनुपस्थित असण्याबाबत..**

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, प्रश्न देणारे सन्माननीय सदसय अनुपस्थित आहेत पण हा महत्त्वाचा प्रश्न असल्याने आपण खास बाब म्हणून यावर उपप्रश्न विचारण्यास आम्हाला परवानगी द्यावी.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, प्रश्न देणाऱ्या सदस्यांनी प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. ...

**सभापती** : मी सर्वच सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, एकदा प्रश्न दिल्यानंतर सदस्यांनी तो प्रश्न सभागृहामध्ये येईल त्यावेळी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे. यापूर्वी देखील मी याबाबत सर्वांना सूचना दिलेल्या आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, प्रश्न महत्त्वाचा असल्याने आपण आपल्या अधिकारात तो चर्चेला घ्यावा आणि आम्हाला उपप्रश्न विचारण्यास परवानगी द्यावी.

**सभापती** : प्रश्न महत्त्वाचा असला तरी, प्रश्नकर्ते सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसतील तर आपल्याला तो नियमानुसार चर्चेला घेता येत नाही. परंतु प्रश्न महत्त्वाचा असल्याने मी यावर आपल्याला सांगू इच्छितो की, अन्य माध्यमातून या प्रश्नाला आपल्याला न्याय देता येऊ शकतो. तेव्हा आपण अन्य माध्यमातूनर हा विषय, हा प्रश्न सभागृहात उपस्थित करण्याचा प्रयत्न केल्यास मी त्याला न्याय कसा देता येईल हे मी जरूर पाहीन. मात्र आज आता त्यावर आपल्याला चर्चा करता येणार नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण संबंधित सदस्यांना गैरहजेरीबद्दल समज द्यावी.

**सभापती** : तशी समज देण्याची गरज नाही, यापूर्वी देखील मी त्याबद्दल बोललो आहे. तरी आता या प्रश्नावर आपल्याला चर्चा करता येणार नाही. आपण पुढील प्रश्न चर्चेला घेऊ.

***

...... केके 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कोल्हापूर जिल्हयातील वडगाव-टोप-कासारवाडी-अंबप-अंबपवाडी येथील प्रस्तावीत जमिन औद्योगिक वसाहतीसाठी संपादित करण्याबाबत**

(3) *** 29312 प्रा. शरद पाटील, श्री. जयंत पाटील** : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोल्हापूर जिल्ह्यातील वडगाव-टोप-कासारवाडी-अंबप-अंबपवाडी तालुका हातकंणगले या गावांतील सुमारे 1000 जमिन नियोजित औद्योगिक वसाहतीसाठी संपादीत करण्याची प्रक्रिया सुरु झ ाली हे खरे आहे काय,
(2) तसेच त्यामुळे शेतीवर अवलंबून असलेले 15 शेतकरी भूमिहीन होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, शेतकऱ्यांचा व स्थानिक जनतेचा विरोध विचारात घेऊन भूसंपादनाची प्रक्रिया शासन रद्द करेल काय ?

**श्री.अशोक चव्हाण** : (1) अंशत: खरे आहे, कोल्हापूर जिल्ह्यात अतिरिक्त शिरोली औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मौजे वडगांव (कसबा पेठ) व मौजे वाठार तर्फ वडगांव तालूका हातकणंगले येथील जमीनी संपादित करण्याची कार्यवाही सुरु आहे. मात्र यात कासारवाडी व अंबप-अंबपवाडी येथील जमीनीचा समावेश नाही.
(2) व (3) म.औ.वि.मं. अधिनियम 1961 मधील कलम 32(2) तरतुदीनुसार व्यक्तिगत नोटिसा तसेच वृत्तपत्रात जाहिर नोटिस देण्याची कार्यवाही उपविभागीय अधिकाऱ्यांच्या स्तरावर सुरु आहे. यानुसार प्राप्त हरकतींच्या अनुषंगाने भूसंपादनाबाबत अंतिम निर्णय शासन स्तरावर घेण्यात येईल. यामूळे सद्य:स्थितीत अंतिमत: किती शेतकरी भूमीहीन होतील याची आकडेवारी शासनाकडे उपलब्ध नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील वडगाव-टोप-कासारवाडी येथील जमीन औद्योगिक वसाहतीसाठी संपादित करण्याची कारवाई केव्हा पासून सुरू केलेली आहे आणि आज त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, हातकणंगले तालुक्यातील वडगाव येथील 106 हेक्टर आणि वडगाव कसबा पेठ येथील 334 हेक्टर अशी सुमारे 440 हेक्टर जमीन संपादित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आज ही प्रक्रिया 32(2) च्या स्थितीवर आलेली आहे आणि तेथील उपविभागीय अधिकाऱ्यांनी तेथे 32(2) चे सेक्शन लागू केलेले आहे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी प्रांत यांनी भूसंपादनाची कारवाई 9 जुलैला सुरू केलेली आहे आणि त्या विरोधात शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे हरकती देखील नोंदविल्या

....... केके 4 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील (पुढे चालू...) ता.प्र.क्र.29312 .....

आहेत. वडगावला एकंदर 1500 एकर जमीन आहे त्यापैकी 884 एकर जमीन भूसंपादनाखाली आलेली आहे. त्यामुळे 550 शेतकरी पूर्णपणे भूमिहीन होणार आहेत आणि ते सारे अल्पभूधारक शेतकरी आहेत. त्याचबरोबर वडगाव नगरपालिकेच्या पाणीपुरवठा योजनेच्या पाणलोट क्षेत्रामध्ये असलेली जमीन देखील भूसंपादनासाठी घेतलेली आहे. जर या जमिनीचे भूसंपादन झाले तर त्यामुळे तेथील पाणीपुरवठ्यावर देखील मोठा प्ररिणाम होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आणि नगर पालिकेने या भूसंपादनास विरोध केलेला आहे. तो लक्षात घेऊन अशा प्रकारे सरसकट सर्व जमीन संपादित करू नये असे आदेश आपण देणार काय ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, अद्यापही ही भूसंपादनाची कारवाई प्राथमिक अवस्थेतच आहे. वडगाव गावामध्ये कसबा पेठ मध्ये 334 हेक्टर जमिनीचा प्रस्ताव आहे आणि तेथे 32(2) सेक्शनची कारवाई सुरू आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ...... एलएल 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29312....

श्री. अशोक चव्हाण...

जर तेथील जमीन संपादनाच्या प्रक्रियेमुळे नगरपालिकेच्या पाणी पुरवठयावर परिणाम होणार असेल तर त्याबाबत निश्चितपणे वेगळा विचार करण्यात येईल. अशाप्रकारे तेथील नागरी विभागामध्ये पाणी पुरवठयाचा कोणताही प्रश्न उपस्थित होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, जे शेतकरी भूमिहीन होणार आहेत त्यांना पर्यायी जागा देणार काय? ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात येणार आहेत त्यांच्या जमिनींना कोणत्या दराने मोबदला देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, यामध्ये 248 लोक भूमिहीन होण्याची शक्यता दिसते. एम.आय.डी.सी. च्या धोरणानुसार जी जमीन संपादीत करण्यात येते त्यामधील 15 टक्के जमीन जर त्याठिकाणी एखाद्याला उद्योग टाकावयाचा असेल तर औद्योगिक दराच्या 50 टक्के सबसिडाईज दराने उपलब्ध करुन दिली जाते. किंवा ही जमीन वाणिज्य वापरासाठी हवी असेल तर 5 टक्के जमीन वाणिज्य दराच्या 50 टक्के सबसिडाईज दराने उपलब्ध करुन दिली जाते. तसेच, एम.आय.डी.सी. च्या धोरणानुसार तेथील लोकांचे पुनर्वसन करण्यात येईल. माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, वाठार तर्फे वडगाव या गावच्या आसपासच्या जमिनींचा दर निश्चित झालेला नाही. ज्यावेळी ॲवॉर्ड डिक्लेअर होईल त्यावेळी तो दर अंतिम केला जाईल. माझ्याकडे उपलब्ध असलेल्या प्राथमिक माहितीनुसार वाठार तर्फे वडगाव येथील जमिनीचा दर 5 लाख 52 हजार प्रति हेक्टर इतका आहे. आणि वडगाव (कसबा पेठ) येथील जमिनीचा दर 8 लाख 10 हजार रुपये प्रति हेक्टर इतका आहे. हा दर मागील पाच वर्षाच्या रेडी रेकनरप्रमाणे काढण्यात आलेला आहे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, ही हायवे लगत असलेली जमीन आहे. या जमिनीची खरी किंमत 10 लाख रुपये एकर या बाजार भावानुसार दिली जाते. आपण रेडी रेकनरप्रमाणे 5 लाख आणि 8 लाख रुपये हेक्टरी दर सांगितला आहे. त्यामुळे त्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला त्या ठिकाणी असलेल्या बाजार भावानुसार दिला तर शेतकरी आपल्या जमिनी देण्यास तयार होतील. त्यामुळे बाजार भावाप्रमाणे विचार करुन हेक्टरी न देता एकरी 10 लाख रुपये या दराने कुणी जमिनी घेण्यास तयार असतील तर हे शेतकरी आपल्या जमिनी त्यांना देण्यास तयार आहेत. त्यादृष्टीने शासन विचार करणार आहे काय?

DGS/

ता.प्र.क्र. 29312....

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. शरद पाटील साहेबांनी केलेल्या वक्तव्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तेथील शेतकऱ्यांचा एम.आय.डी.सी. होण्यास विरोध नाही तर त्यांच्या जमिनीला दिल्या जाणाऱ्या दराला त्यांचा विरोध आहे. तेव्हा निश्चितपणे एम.आय.डी.सी. च्या ॲक्टप्रमाणे त्या जमिनीचा दर वाटाघाटीने जिल्हाधिकारी वाढवून देऊ शकतात. एम.आय.डी.सी. च्या दरामध्ये आणि बाजार भावानुसार असलेल्या दरामध्ये जर तफावत असेल तर निश्चितपणे त्याबाबत विचार करुन त्या शेतकऱ्यांना बाजार भावानुसार असलेला दर देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील. जेणेकरुन त्याठिक्राणी एम.आय.डी.सी. करिता जमीन संपादन करण्यामध्ये अडचण येणार नाही. आज संपूर्ण राज्यामध्ये जे चित्र दिसत आहे त्यामध्ये लोकांचा औद्योगिकीकरणाला विरोध नाही तर त्यांच्या जमिनीला लावल्या जाणाऱ्या दराला विरोध आहे. त्यामुळे जमीन संपादनाचे प्रचलित दर आणि बाजार भावानुसार असलेले दर यामध्ये तफावत असेल तर त्यादृष्टीने नव्याने धोरणात्मक निर्णय घेण्याची शासनाची तयारी आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विठ्ठलवाडी ता. निफाड जि. नाशिक येथील महिलेवरील**

**कुटूंब कल्याण शस्त्रक्रियेबाबत**

**(४) * ३०९४२ श्रीमती उषाताई दराडे , श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. फौजीया खान :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड तालुक्यातील (जि.नाशिक) विठ्ठलवाडी येथील एका महिलेवर नैताळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दिनांक ३० डिसेंबर, २००४ रोजी कुटूंबकल्याण शस्त्रक्रिया करण्यात येऊनही तीन वर्षानी सदर महिला गर्भवती राहिल्याचे उघड झाले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषी डॉक्टरांविरुध्द पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. रणजित कांबळे डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता** : (१) हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, नाशिक यांना चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, निफाड तालुक्यातील विठ्ठलवाडी येथील एका महिलेवर नैताळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ३० डिसेंबर २००४ रोजी कुटुंब कल्याणाची शस्त्रक्रिया केल्यानंतर तीन वर्षानी ती महिला गर्भवती असल्याचे उघड झाले हे खरे आहे काय? याबाबत आपण चौकशी केली आहे काय? चौकशीचे निष्कर्ष प्राप्त झाले आहेत काय? त्यानुसार संबंधित दोषी डॉक्टरांवर आपण कोणती कारवाई केली आहे?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे लेखी उत्तरामध्ये दिलेली आहेत.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, माझा पुढील प्रश्न असा आहे की, अशाप्रकारच्या घटना महाराष्ट्रामध्ये वारंवार घडत आहेत. त्यादृष्टीने कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेच्या संदर्भात अधिक दक्षता घेऊन त्यामध्ये नवीन तंत्रज्ञान वापरण्यात येईल काय? आणि अशाप्रकारच्या घटना वारंवार घडू नये याकरिता आपण कोणती पावले उचलणार आहात?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30942 (पुढे सुरू.....

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, ही शस्त्रक्रिया ट्युबॅक्टॉमी आहे. त्यामध्ये .1 ते .5 टक्क्यापर्यन्त अयशस्वीतेचे प्रमाण येऊ शकते. तशीच ही घटना आहे. आम्ही त्याबाबतीमध्ये लक्ष घालणार आहोत. ट्युबॅक्टॉमी शस्त्रक्रिया ही राज्यामध्ये चालू रहाणार आहे. त्याबाबतीत वेगळी पध्दती सध्यातरी नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सुधारणा करायला पाहिजे होती. प्राथमिक आरोग्य केंद्रात दिनांक 30 डिसेंबर, 2004 रोजी कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया करण्यात येऊनही तीन वर्षांनी सदर महिला गर्भवती राहिल्याचे उघड झाले आहे. आता 2007 साल चालू आहे. त्यामुळे प्रश्नाच्या उत्तरामध्ये दुरुस्ती करावी अशी विनंती आहे. दुसरा प्रश्न असा की, अनेक कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया कागदावर दाखविल्या जातात, टारगेट दाखविले जाते आणि पैसे लाटले जातात, असा प्रकार महाराष्ट्रामध्ये सातत्याने घडत असतात. या संदर्भाने व्हीजिलन्स कमिटी किंवा मॉनिटरींग कमिटी नेमणार आहात काय ? दुसरे असे की, चौकशी करून अहवाल देण्याचे आदेश दिलेले आहेत. ही चौकशी किती दिवसामध्ये पूर्ण होईल ?

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांनी पहिली सूचना केली ती सजेशन फॉर ॲक्शन. सन्माननीय सदस्यांनी सदस्यांनी चौकशीच्या संबंधात मुद्दा उपस्थित केला. ही चौकशी 15 दिवसाच्या आत करण्यात येईल.

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : मंत्री महोदयांनी चौकशी करण्याबाबत सांगितलेले आहे. ही चौकशी पूर्ण झालेली आहे काय ? यासाठी किती कालावधी लागेल ? दुसरा प्रश्न असा आहे की,या महिलेची 30 डिसेंबर 2004 रोजी कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया करण्यात आली आणि त्यानंतर तीन वर्षनी ती महिला पुन्हा गरोदर राहिली. म्हणजे हे प्रकरण 2007 चे आहे. माझे म्हणणे आहे की, चौकशीचा अहवाल काय आलेला आहे ? चौकशी अहवाल आला नसेल तर ही चौकशी केव्हा पूर्ण होईल ? अशाप्रकारच्या यापुढे घटना होणार नाहीत या दृष्टीने शासनाने काय खबरदारी घेतलेली आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, 2007 रोजी याबाबतची चौकशी पूर्ण झालेली आहे. त्या चौकशीमध्ये निष्पन्न झालेले आहे की, अशाप्रकारची रॅडम केस आहे. यामध्ये रिकॅनलायझेशन

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

ता.प्र.क्र.30942.....

श्री.रणजित कांबळे (पुढे सुरू....

होऊ शकते. मी सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, त्याच डॉक्टरांनी पाच केसेसमध्ये शस्त्रक्रिया केलेल्या आहेत] त्यापैकी या एका केसमध्ये रिकॅनलायझेशन झालेले आहे. अशा .1 टक्के केसेस होतात.

डॉ.नीलम गोऱ्हे : कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेमध्ये खोट्या केसेस असण्याची शक्यता आहे, त्याला प्रतिबंध करण्यासाठी व्हीजिलन्स कमिटी नेमणे आवश्यक आहे. माझी अशी सूचना आहे की, त्या पेशंटचा फोटो त्यांच्या केस पेपरवर आपण लावू शकतो. बऱ्याचवेळेला पेशंटची खोटी नावे दिली जातात. ऑपरेशन झाल्यानंतर त्या पेशंटचे छायाचित्र त्यांच्या केस पेपरवर लावले पाहिजे. दुसरा प्रश्न असा की, शस्त्रक्रियेमध्ये टेक्निकल चूक झाल्यामुळे टयुब ओपन झाली. पती-पत्नींना डॉक्टरांनी कल्पना दिली पाहिजे की,एखादेवेळेस असे होऊ शकते. डॉक्टर तशी कल्पना देत नसतील तर ती त्यांनी दिली पाहिजे.-जेणेकरून त्यांच्या कुटुंबावर परिणाम होणार नाही.

श्री.रणजित कांबळे : शस्त्रक्रियेनंतर त्या पेशंटचा फोटो केस पेपरवर लावण्याबाबतच्या सूचनेची अंमलबजावणी करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न असा की, त्या पेशंटना याबाबतची माहिती देण्यात येते काय ? परंतु जो प्रोफार्मा असतो त्यामध्ये तसा कॉलम आहे. पण हेही खरे आहे की, डॉक्टरनी पेशंटना अशी माहिती देणे आवश्यक आहे. यापुढे प्रत्येक पेशंटला माहिती देण्याबाबतची काळजी घेण्यात येईल.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30942 ......

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय नाजूक आहे. ज्यामुळे समाजामध्ये संशयाचे वातावरण तसेच कुटुंबामध्ये वाद निर्माण होतो अशा प्रकारचे हे प्रकरण आहे. एखादी कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया झाल्यानंतर अशा पध्दतीने गर्भधारणा झाली तर कुटुंबात संशयाचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे संघर्ष निर्माण होतो. त्यादृष्टीने शस्त्रक्रिया करण्यापूर्वी जे कौन्सिलिंग करावयाचे आहे, नवऱ्याला किंवा घरातील मोठ्या माणसांना जे समजावून सांगावयाचे आहे त्यामध्ये आम्ही जी शस्त्रक्रिया करतो त्यामध्ये अमूक टक्के यश मिळते आणि एखादवेळी अमूक टक्के यश मिळण्याची शक्यता नाही हे सांगणे आवश्यक आहे. हे जर झाले नाही तर घरामध्ये संघर्ष निर्माण होऊ शकतो. अनेक चित्रपटांच्या स्टोरीज यावर आधारलेल्या असतात. यादृष्टीकोनातून आपण अशा कोणत्या प्रिव्हेंटिव ॲक्शन सुचविणार आहात किंवा करणार आहात ? केंद्राने जे सांगितले आहे तसेच सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जी सूचना केली ती आपण स्वीकारणार आहात. परंतु हा अतिशय नाजूक विषय आहे. त्यादृष्टीकोनातून त्या व्यतिरिक्त अशा प्रकारच्या कोणत्या प्रिव्हेंटिव ॲक्शन घेणार की, ज्यामुळे संभ्रम आणि कौटुंबिक वादविवाद वाढणार नाहीत ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, महिलेवर शस्त्रक्रिया झाल्यानंतर ती गर्भवती झाली तर संशयाचे वातावरण निर्माण होत नाही. जेव्हा नवरा शस्त्रक्रिया करतो आणि महिला गर्भवती होते त्यावेळी संशयाचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे हा प्रश्न थोडासा उलटा आहे. नवरा किंवा बायको या दोघांसाठी जी काही माहिती अगोदर देणे आवश्यक आहे ती माहिती यापुढे आम्ही जे कोणी पेशन्ट असतील त्यांना शस्त्रक्रियेच्या अगोदर डॉक्टरांच्या माध्यमातून देऊ.

**सभापती** : मी सन्माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, कुटुंब कल्याण कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता स्त्रिची शस्त्रक्रिया असो किंवा पुरुषाची शस्त्रक्रिया असो, या शस्त्रक्रिया बिनचूक होतील याची 100 टक्के खात्री देण्याचा प्रयत्न आपल्या विभागाकडून झाला तर हा कार्यक्रम यशस्वी होण्यामध्ये मदत होणार आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, होय.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30942 ......

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या महिलेने कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया शासकीय रुग्णालयामध्ये करुन घेतलेली आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, काही प्रमाणामध्ये अशा प्रकारची शस्त्रक्रिया तांत्रिक कारणामुळे अयशस्वी होऊ शकते. तीच घटना या ठिकाणी घडलेली आहे. त्या कुटुंबाने चांगल्या राष्ट्रीय कार्यक्रमाला सहकार्य केलेले असताना हा घडलेला प्रकार अनपेक्षित आहे. म्हणून या घडलेल्या तांत्रिक घटनेबद्दल शासनाकडून त्या कुटुंबाला काही मदत दिली जाणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, एखादवेळी अशी चूक घडते किंवा शस्त्रक्रियेमध्ये रिव्हर्स ॲक्शन येते म्हणून केंद्र शासनाची ओरिएंटल इंश्योरंसच्या माध्यमातून 25 हजार रुपये देण्याची तरतूद आहे. जे पेशन्ट आहेत त्यांनी मागणी केली तर शासन 25 हजार रुपये प्रोत्साहन देऊ शकते. हे इंश्योरंस आहे. त्यासाठी त्यांना क्लेम फाईल करावा लागतो. त्यांनी क्लेम फाईल केला तर त्यांना 25 हजार रुपयांपर्यंत रक्कम मिळते.

**सभापती** : मी सन्माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आरोग्य विभागाने याबाबतीत पुढाकार घेऊन इंश्योरंस क्लेम करण्याचा प्रयत्न करावा.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, होय.

-----

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

**ठाणे जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या अनुदानित संस्थामधील शिक्षक शिक्षकेतरांना एकस्तर वेतनवाढीबाबत**

**(५) * २९३२२ श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर , श्री. श्रीकांत जोशी , श्री. प्रतापराव सोनवणे : तारांकित प्रश्न क्रमांक २२२२३ ला दिनांक २१ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिनांक ६ ऑगस्ट, २००२ च्या शासन निर्णयानुसार एकस्तर वेतनवाढीची वेतन श्रेणी व १५ टक्के प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय आहे हे खरे आहे काय,

(२) ठाणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना व जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांना एकस्तर वेतनवाढीचा लाभ देण्यात येत आहे हे खरे आहे काय,

(३) याच विभागात कार्यरत असणाऱ्या अनुदानित संस्थांमधील माध्यमिक, उच्चमाध्यमिक व प्राथमिक शिक्षक-शिक्षकेतरांना एकस्तर वेतनवाढ लागू न करण्याची कारणे काय आहेत ?

**प्रा.वसंत पुरके** : (१) होय.

(२) होय.

(३) याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना, निमशासकीय कर्मचाऱ्यांना किंवा त्या भागामध्ये काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मग ते जिल्हा परिषदेचे कर्मचारी असोत किंवा अनुदानित संस्थांमधील कर्मचारी असोत,

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 13:25

(ता. प्र.क्र. 29322.... (श्री. रामनाथ मोते....

एका विशिष्ट बिकट परिस्थितीमध्ये ही सर्व मंडळी काम करीत असल्यामुळे शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने त्यांना ऑगस्ट 2002 रोजी काही सवलती लागू केलेल्या आहेत. त्यापैकी काही सवलती त्यांना मिळत आहेत. परंतु एकस्तर वेतन वाढीची सवलत अन्य सर्व विभागामध्ये मिळत होती. फक्त अनुदानित संस्थामध्ये काम करणा-या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना ही सवलत दिली गेली नाही. ही योजना 2002 सालापासून लागू झालेली आहे. ही योजना विचाराधीन आहे असे शासनाने सांगितले. खरे म्हणजे या योजनेबाबत सामान्य प्रशासन विभागाने आदेश काढलेले आहेत. तेव्हा ही बाब विचाराधीन आहे असे उत्तर न देता ही एकस्तर वेतनवाढीची सवलत अनुदानित संस्थामध्ये काम करणा-या शिक्षक आणि शिक्षकेतरांना तातडीने लागू करण्याचा निर्णय मंत्री महोदय घेणार आहेत काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी आपल्या अध्यक्षतेखाली 21 जूनला बैठक झाली होती आणि आपण दोन महिन्याच्या आत या प्रकरणी निर्णय घेण्याचे निदेश दिलेले आहेत. तेव्हा याबाबतीत दोन महिन्याच्या आत निर्णय दिला जाईल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : 6.2.2001च्या जी.आर.मध्ये अनेक योजना लागू झालेल्या आहेत. ज्या कर्मचा-यांची जीवित हानी होण्याची शक्यता आहे त्यांना ही योजना लागू असेल असा शब्दप्रयोग जी.आर.मध्ये करण्यात आलेला आहे. त्या आदिवासी क्षेत्रामध्ये काम करणा-या अनुदानित शाळातील शिक्षक आणि शिक्षकेतरांच्या जीविताची हानी होण्याची शक्यता नाही काय ? सभापती महोदय,14व्या वेळा हा प्रश्न या सभागृहामध्ये उपस्थित होत आहे. आपल्या दालनात चर्चा होऊन आपण मंत्री महोदयांना दोन महिन्याच्या आत निर्णय घेण्यास सांगितले. परंतु दोन महिन्यानंतर याबाबतीत मंत्री महोदय पॉझिटिव्ह निर्णय घेणार आहेत काय ?

प्रा. वसंत पुरके : जी.आर.प्रमाणे जे बदलीस प्रात्र आहेत अशा लोकांसाठी ही योजना लागू झालेली आहे. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी देखील "बदली" असा शब्द प्रयोग केलेला आहे काय असे विचारले होते. जे आदिवासी आणि नक्षलग्रस्त भागामध्ये जावयास तयार आहेत त्यांना तेथे जाण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून ही योजना लागू केलेली आहे. ही योजना तीन वर्षे सेवा करणा-यासाठी लागू आहे. त्यांची तेथून बदली झाली तर ही योजना त्यांना लागू होणार नाही. परंतु पसंती नुसार त्यांची बदली करावी असा जी.आर.आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता. प्र.क्र. 29322....

श्री. श्रीकांत जोशी : प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे असे उत्तर देण्यात आलेले आहे. या योजनेअंतर्गत येणा-या कर्मचा-यांची संख्या आणि त्यासाठी पडणारा वित्तीय भार किती असेल यासंबंधीचे नियोजन शासनाने केलेले आहेत काय ? 35 दिवसापासून हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे. या कालावधीमध्ये शासनाने कोणती कारवाई केलेली आहे ? आदिवासी क्षेत्रात ही योजना लागू करण्यासाठी किती वित्तीय भार पडेल ? यासंबंधी नियोजन विभागाकडे फाईल पाठविण्यात आलेली आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सामान्य प्रशासन विभागाकडे तपासणी करण्यासाठी प्रस्ताव पाठविलेला आहे. टीएसपी आणि नॉन टीएसपी खाली एकून 27675 कर्मचारी आहेत. एकस्तरीय वेतनवाढीच्या योजन अंतर्गत 16604 कर्मचारी आहेत. त्यासाठी 26.21 कोटी रु. खर्च येणार आहे.अतिरिक्त घरभाड्यापोटी 11.92 रु. खर्च येणार आहे.

श्री. कपिल पाटील : आदिवासी भागामध्ये दर्जेदार शिक्षक मिळावयास पाहिजे असतील तर हा निर्णय सर्वांना समान पध्दतीने लागू करावयास पाहिजे. या बाबतीत शिक्षकांच्या बदलीचा प्रश्न येत नाही.

प्रा. वसंत पुरके : खाजगी शिक्षण संस्थामध्ये शिक्षक स्वत:च्या सोयी नुसार नोकरी पत्करतात. त्यांना रिस्क वगैरे नसते...

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती :** अनेक माननीय सदस्यांनी एकाच वेळी बोलण्याची आवश्यकता नाही.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29322....

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय,शासकीय कर्मचा-यांची बदली होते त्याची बदली होऊन जर तो तेथे गेलेला असेल तेव्हाच त्याला तो विशेष भत्ता मिळेल दुसरीकडे गेलात तर मिळणार नाही. सदर कर्मचारी जर दुसरीकडे गेलर तरीदेखील तो भत्ता त्याला मिळेलच असा त्याचा अर्थ होत नाही. या अर्थाने ते शब्द वापरलेले आहेत. आपण माननीय सभापतींच्या दालनामध्ये या प्रश्नाच्या संदर्भात ज्यावेळी बैठक घेतली होती त्यावेळी सुध्दा आपण या गोष्टीस मान्यता दिली होती आणि आपण जे येथे सांगितले त्यासंदर्भात माझे म्हणणे असे आहे की, या बाबीमध्ये आता काही लॉजिक नाही. म्हणजे गडचिरोलीसारख्या भागामध्ये जर शासकीय अनुदानित शाळेमध्ये एखादा शिक्षक असेल तर त्याला सर्व विशेष भत्ते प्राप्त होतील आणि जर तो बदली होऊन नागपूरला गेला तर त्याला हे विशेष भत्ते मिळणार नाही. ही गोष्ट कारण नसतांना ताणली जात आहे. असा भेदभाव योग्य नाही आणि हा भेदभाव संपुष्टात आणण्याचा निर्णय आपण दोन महिन्यामध्ये घेणार आहात का ?

श्री.वसंत पुरके : सभापती महोदय,जर एखाद्या गावामध्ये जर कोणी राहत असेल आणि आपल्या सोयीसाठी दीर्घकालीन स्थायी स्वरुपाची बदली त्याने दुसरीकडून आपल्या त्या राहत्या गावी करुन घेतली असेल तर त्याच्यासाठी हे विशेष भत्ते लागू होणार नाहीत. आदिवासी दुर्गम भागामध्ये ते त्यांचे स्वत:चे गाव नसतांनाही केवळ किमान तीन वर्ष सेवा म्हणून किंवा केवळ नियुक्ती म्हणून जर कोणी तेथे जात असेल तरच त्यांच्याकरिता फक्त तेथील सेवेच्या कालावधीपर्यंत ही योजना संबंधित शिक्षकाला किंवा इतर कर्मचा-याला लागू असेल.

गोंधळ

श्री.व्ही.यू डायगव्हाणे : सभापती महोदय, यामध्ये जिवितहानी शब्द वापरलेला आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेबांनी बदली हा शब्द कशासाठी वापरला ? जे शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचारी दुर्गम भागामध्ये कायमस्वरुपी काम करतात त्यांना दुर्गम भागामध्ये जिवितहानीचा धोका नाही का ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, जिवितहानीच्या धोक्यासंदर्भात म्हणत असणार तर

PP - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29322....

प्रा.वसंत पुरके.......

आता या सभागृहामधून निघून घरी जाईपर्यंत तरी आपल्या जीवाची गॅरंटी आहे का ?

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**सभापती** : सर्व सनमाननीय सदस्य जर असे एकदम उभे राहिले तर यावर काहीही निर्णय होणार नाही सनमाननीय मंत्रिमहोदय आपण दिलेल्या उत्तराप्रमाणे एखाद्या कर्मचा-याला अशा विशिष्ट भागामध्ये जर नियुक्तीवर पाठविले गेले तर त्या कर्मचा-याला प्रोत्साहन पर भत्ता शासन देते. यासंदर्भात सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख व इतर सदस्यांचे म्हणणे आहे की, अशा दुर्गम किंवा आदिवासी विभागामध्ये जर काही कर्मचारी स्थायी स्वरुपात किंवा कायमस्वरुपी काम करीत असतील तर त्यांना असा विशेष भत्ता देणे शक्य आहे का ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी जो आदेश निघालेला आहे त्यामध्ये सनमाननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, दिनाक 06 ऑगस्ट,2002 चा जो जी.आर.आहे तो मी आपल्या माहितीसाठी पाठवित आहे. एकस्तर वेतनवाढीच्या संदर्भात, बदलीच्या संदर्भात हा जी.आर.त्या आदिवासी भागात किंवा दुर्गम ठिकाणी कार्यरत असेपर्यंतच्या कालावधीसाठी ती एकस्तर सवलत लागू आहे पण यामध्ये असे स्पष्टपणे म्हटले आहे की, या निर्णयाचे काटेकोरपणे सर्वांनी करावे आणि तरीदेखील शालेय शिक्षण विभागाकडून कारण नसतांना या जी.आर.च्या अंमलबजावणीबाबत दिरंगाई होत आहे. याची आपण तातडीने अंमलबजावणी करणार का ?

प्रा.वसंत पुरके : या जी.आर.ची तातडीने अंमलबजावणी केली जाईल.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अ जीवनसत्वाची जादा मात्रा दिल्याने इंदिरानगर (नागपूर) येथील पन्नास बालकांना विषबाधा झाल्याबाबत**

**(६) * ३३०९६ श्री.राजन तेली , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "अ" जीवनसत्वाची जादाची मात्रा दिल्याने उत्तर नागपूरातील इंदिरानगर येथील पन्नास बालकांना विषबाधा झाल्याने त्यांना मेयो हॉस्पिटलमध्ये दिनांक १० मे, २००७ रोजी वा त्या सुमारास उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, व त्यानुसार दोषी असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(३) तसेच मेयो हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलेल्या बालकांच्या पालकांना शासनाने आर्थिक मदत दिली आहे काय,

(४) नसल्यास, होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री . रणजित कांबळे डॉ . विमल मुंदडा यांच्याकरिता** : ( १ ) नागपूर येथील इंदिरानगर भागात रोटरी क्लबच्या सहकार्याने दिनांक ७ मे, २००७ रोजी १५८ बालकांना जीवनसत्व "अ" औषधाची मात्रा देण्यात आली. त्यापैकी ७३ मालकांना डोकेदुखी, पोटदुखी व उलट्यांचा त्रास होवू लागल्याने मेयो रुग्णालयातील बाह्य रुग्ण विभागात त्यांना तपासण्यात आले. ७ बालकांना निरिक्षणाखाली ठेवण्यासाठी दाखल करुन घेण्यात आले. सदर बालकांच्या प्रकृतीमध्ये सुधारण झाल्याने ५ ते ६ तासानंतर त्यांना घरी सोडण्यात आले.

(२) याबाबत चौकशी करण्यात आली असता, "अ" जीवनसत्व औषधांची अतिरिक्त मात्रा दिल्यामुळे बालकांना वरील प्रकारचा त्रास झाल्याचे निष्पन्न झाले. "अ" जीवनसत्वांचे वाटप शासकीय कर्मचाऱ्यांकडून करण्यात आले नव्हते. सदर औषधांचे वाटप रोटरी क्लबच्या स्वयंसेवकांनी केले होते. त्यामुळे त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही पुढील मोहिमेच्यावेळी स्वयंसेवी संस्थांना सहभागी करुन घ्यावयाचे झाल्यास योग्य ती काळजी घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) शासनाकडून बालकांच्या पालकांना आर्थिक मदत देण्याची तरतूद नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.राजन तेली : सदर प्रश्नाच्या उत्तरामध्ये उत्तर क्रमांक ०२ मध्ये असे म्हटलेले आहे की, " याबाबत चौकशी करण्यात आली असता, "अ" जीवनसत्व औषधांची अतिरिक्त मात्रा दिल्यामुळे बालकांना वरील प्रकारचा त्रास झाल्याचे निष्पन्न झाले. "अ" जीवनसत्वांचे वाटप शासकीय कर्मचाऱ्यांकडून करण्यात आले नव्हते. सदर औषधांचे वाटप रोटरी क्लबच्या स्वयंसेवकांनी केले होते. त्यामुळे त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही." माझा प्रश्न असा आहे की, " अ "

PP - 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

24-07-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) PP - 4

JPK/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम एम. ..... 13:30

ता.प्र.क्र.33096........

श्री.राजन तेली.....

या मुलांना जीवनसत्व मात्रा देण्याबाबत कोणाची परवानगी घेण्यात आली होती ?  एकूण ७३ मुलांना ज्यादा मात्रा दिल्यामुळे डोकेदुखी,पोटदुखी,उलटयांचा त्रास झाला यासंदर्भात ज्यांनी हलगर्जीपणा केला त्यांच्यावर कारवाई करणार आहात का ?

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 13:35

ता.प्र.क्र. 33096.....

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, नागपूर येथील इंदिरानगर भागातील विद्यार्थ्यांना "अे" जीवनसत्वाची मात्रा देण्याचा कार्यक्रम होता. हे औषध नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून मिळाले होते आणि ते देण्याचा कार्यक्रम रोटरी क्लबने आयोजित केला होता. महानगरपालिकेचे मानसेवी डॉक्टर श्री. खान यांनी हे औषध रोटरी क्लबला दिले होते. त्यांनी स्वयंसेवकांमार्फत त्याचे वाटप केले. याच वेळी टी शर्ट वाटपाचा कार्यक्रम देखील आयोजित केलेला होता. त्यावेळी जास्त टी शर्ट मिळावेत यासाठी लहान लहान मुले 2/3 वेळा आली त्यामुळे त्यांना जीवनसत्वाचे जास्त डोस दिले गेले. अशी घटना पुन्हा घडू नये म्हणून फिंगर मार्कींग करण्याचे आदेश दिलेले आहेत. स्वयंसेवकांवर कारवाई करणे शक्य नाही. परंतु महानगरपालिकेचे डॉ.खान आहेत त्यांनी यावर सुपरव्हीजन करणे आवश्यक होते ती केलेली नाही त्यामुळे महानगरपालिकेने त्यांना पॅनलवरुन काढून टाकले आहे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले की, लहान मुले 2/3 वेळा टीशर्ट घेण्यासाठी आली. या मुलांची नोंदणी केली नव्हती काय ? रोटरी क्लबने सेवाभावी वृत्तीने जरी हा कार्यक्रम घेतला होता तरी मुलांच्या जिवावर ही घटना बेतली असताना त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करणे हे बरोबर नाही. अशा प्रकारची शिबिरे आयोजित करताना संबंधितांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे नव्हे ते अनिवार्य आहे. याबाबतीत शासन काही पावले उचलणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, संस्थेचा उद्देश अत्यंत चांगला होता. यामध्ये डॉक्टरांचा सहभाग होता त्यामुळे प्रशिक्षण देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. यापुढे यासंदर्भात काळजी घेण्यात येईल इतकेच आश्वासन मी यानिमित्ताने देऊ इच्छितो.

-------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शिक्षक प्रतिनिधी (वि.प.स.) व शिक्षक महामंडळाचे प्रतिनिधी सोबत बैठकीचे आयोजन करणे**

**(७) * २९४३२ श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख : तारांकित प्रश्न क्रमांक २४४४८ ला दिनांक २३ मार्च, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरकार्यवाह विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांचे दिनांक ४ नोव्हेंबर व ६ जानेवारी, २००७ च्या १८ मागण्यांच्या निवेदनांवर पहिले अधिवेशन, २००७ संपण्यापूर्वी किंवा लगेच पहिल्या आठवड्यात बैठकीचे आयोजन करण्यात येईल असे मा.शिक्षण मंत्र्यांनी दिलेल्या अश्वासनाची सद्य:स्थिती काय आहे,

(२) निवेदनातील विना अनुदानित सेवा वरिष्ठ/निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरणेबाबत दिनांक १८ नोव्हेंबर, २००६ च्या निर्णयास सुस्पष्टता आणून पुन:निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वसंत पुरके** : (१) बैठकीचे आश्वासन दिले होते, तथापि वेळे अभावी बैठकीचे आयोजन करणे शक्य झाले नाही.

(२),(३) व (४) शासन निर्णय दिनांक २८.११.२००६ च्या निर्णयास सुस्पष्टता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. व्हि.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला जे उत्तर दिलेले आहे ते मंत्रिमहोदयांच्या स्वभावाला आणि प्रकृतीला साजेसे आहे. मागील अधिवेशनात मंत्रिमहोदयांनी स्पष्ट आश्वासन दिले होते की, अधिवेशन संपल्याबरोबर शिक्षक प्रतिनिधी व शिक्षक महामंडळाचे प्रतिनिधी यांची एक बैठक घेण्यात येईल. परंतु वेळेअभावी बैठकीचे आयोजन करणे शक्य झाले नाही असे उत्तर दिले आहे....

**सभापती** : मंत्रिमहोदयांना बैठक बोलाविणे शक्य झाले नाही असे जे आपण सांगितले तेथपर्यंत ठीक आहे. परंतु माननीय मंत्रिमहोदयांच्या स्वभावाबद्दल आणि प्रकृतीबद्दल आपण जे बोललात त्याबाबत " I feel that it is in a bad test ".

श्री. व्हि. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, मी गेल्या 12 वर्षापासून या सदनाचा सदस्य आहे. परंतु गेल्या 3 वर्षात अशा प्रकारची बैठक घेतलेली नाही. त्यामुळे मी आता बैठकीची मागणी करणार नाही. परंतु याबाबतीत निश्चितपणाने काही मागण्या आहेत. वेतनेतर अनुदानाची मागणी आहे. सभापती महोदय, याबाबतीत मी 23 मार्च,2007 रोजी ता.प्र.क्र.24494 विचारला होता आणि आपण तो राखून ठेवला होता. (नंतर श्री.भोगले

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29432............ श्री.व्ही.यू.डायगव्हाणे.....

पण तो प्रश्न अजूनही चर्चेला आलेला नाही. त्यावेळी आपण स्पष्टपणे निर्देश दिले होते की, तुम्ही मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करा. चर्चेच्या अनुषंगाने आलेले उत्तर किंवा तुमचे धोरण सभागृहामध्ये विशद करा. याचे अद्याप उत्तर आलेले नाही. वेतनेतर अनुदानाच्या संदर्भात 2004 मध्ये जे महाराष्ट्रात देय आहे ते तातडीने देणार का? 2004 पासून पुढील 2-3 वर्षाचे थकित आहे याबद्दल शासनाचे स्पष्ट धोरण काय आहे?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, नेहमीप्रमाणे प्रश्न विचारला असल्यामुळे उत्तर देणे आवश्यक आहे. जरी मध्यंतरी बैठक झाली नसली तरी सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, प्रा.बी.टी.देशमुख येऊ शकले नाहीत. एक बैठक झाली हे त्यांनी मान्य करावयास हवे होते. दि.23.11.2006 रोजी सर्व सन्माननीय सदस्यांसमवेत बैठक झाली. नेहमीप्रमाणे सविस्तर मुद्दे चर्चेला आले होते. त्यानंतर दि.31.1.07 रोजी बैठकीचे आयोजन केले होते. शिक्षक संघटना राज्यामध्ये कमी नाहीत. शिक्षक बांधवांच्या समस्या देखील कमी नाहीत. शिक्षकांच्या समस्यांचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी एक महासंघ निर्माण करावा आणि त्या महासंघाची किमान सहा महिन्यातून एक बैठक व्हावी. सभापती महोदय, या संदर्भात वारंवार बैठका होणे गरजेचे आहे. मूळ प्रश्न शिल्लक राहतो तो वेतनेतर अनुदानाचा आहे. या संदर्भात सभागृहात वारंवार चर्चा होते. पूर्ण अधिवेशनामध्ये लागलेले सर्व प्रश्न शेवटच्या दिवशी एकत्रित होतात आणि समस्यांचे निराकरण केले जात असले तरी मूळ प्रश्न वेतनेतर अनुदानाचा सरकारने देखील गांभीर्याने घेतला आहे. 2004 पर्यंत वेतनेतर अनुदान दिले गेले आहे. काही शिल्लक राहिले असले तरी थकबाकी अदा केली आहे. एका महिन्याच्या आत वेतनेतर अनुदान द्यायचे किंवा कसे याचा प्रस्ताव कॅबिनेटपुढे सादर करु. वेतनेतर अनुदान दिले पाहिजे अशा प्रकारची सकारात्मक भूमिका विभाग घेईल आणि कॅबिनेटपुढे प्रस्ताव पाठविला जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अनुक्रमांक 2 वरील, निवेदनातील विनाअनुदानित सेवा वरिष्ठ/निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरणेबाबत दिनांक 18.11.2006 च्या निर्णयास सुस्पष्टता आणून पुन:निर्णय घेतला आहे काय या प्रश्नाला "शासन निर्णय दि.18.11.2006 च्या निर्णयास सुस्पष्टता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे" असे उत्तर देण्यात आले आहे. या निर्णयामध्ये अनेक दोष आहेत. ते दोष दुरुस्त करावेत. एक अतिशय महत्वाची गोष्ट सभागृहात





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगितली होती, त्यावर पॉईंटेड आश्वासन मंत्रीमहोदयांनी दिले होते. त्यामध्ये एक वाह्यात तरतूद आहे. निर्णयातील परिच्छेद 11 मध्ये नमूद केले आहे की, आर्थिक तरतुदीखेरीज करुन अन्य कारणास्तव ज्याला संबंधित माध्यमिक शाळा किंवा व्यवस्थापन जबाबदार आहे अशा त्रुटी सक्षम प्राधिकरणाने त्या शाळेच्या निरीक्षणाच्या वेळी संबंधितांच्या निदर्शनास आणून दिल्यास, त्यामुळे त्यास अनुदानास अपात्र ठरविल्यास अशा संस्थेतील वा शाळेतील शिक्षकाच्या अर्हताकारी सेवेच्या कालावधीची गणना करताना अशा त्रुटी दर्शविल्याच्या वा कळविल्याच्या दिनांकापासून त्या त्रुटी दूर केल्याच्या दिनांकापर्यंतचा कालावधी विचारात घेऊ नये, अशी तरतूद आहे. सभापती महोदय, त्रुटी कोणाची आणि वेठीस कोणाला धरले जाते? नॅचरल जस्टीसनुसार व्यवस्थापनाच्या त्रुटी असतील तर त्या त्रुटीबद्दल शिक्षकांना सांगायचे, तूझी सेवा धरणार नाही. कारण त्याने त्रुटी दूर केली नाही. म्हणजे हे नॅचरल जस्टीसला सोडून आहे. सभापती महोदय, शासन निर्णयामध्ये त्रुटी असतील तर त्या दूर केल्या जातील असे त्यावेळी सभागृहात आश्वासन दिले होते. इतर त्रुटी ज्या आहेत त्या आपण पहात रहा. परंतु हे नॅचरल जस्टीसच्या विरुध्द आहे. सांगण्यासही संकोच वाटतो. याबाबत शासन ताबडतोब परिपत्रक काढणार का?

प्रा.वसंत पुरके : व्यवस्थापनामार्फत राहिलेल्या त्रुटी आमच्या सन्माननीय शिक्षक बांधवांसाठी त्रासदायक ठरु नयेत..........

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 29432** .........

प्रा. वसंत पुरके ....

म्हणून यासंदर्भात शुध्दीपत्रक निश्चितपणे निर्गमित केले जाईल. व्यवस्थापकाची त्रुटी असेल तर त्याचा त्रास शिक्षकाला होऊ नये याची दखल घेतली जाईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय मंत्रीमहोदयांनी असा उल्लेख केला आहे की, "व्यवस्थापकाची त्रुटी असेल तर त्यासंदर्भात शिक्षकाला जबाबदार धरणे बरोबर होणार नाही." परंतु सभापती महोदय, त्रुटीला जे जबाबदार असतील त्यांना जबाबदार धरले गले पाहिजे. शिक्षकांची त्रुटी असेल तर शिक्षकाला जबाबदार धरण्यास काय हरकत आहे? त्यामुळे त्रुटी दुरुस्त करण्याच्या संदर्भात आपण परिपत्रक केव्हा काढणार आहात?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, एक महिन्याच्या आत परिपत्रक काढले जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, शिक्षकांच्या मागण्यांच्या सदर्भात सभागृहात नेहमी चर्चा केली जाते, निवेदने केली जातात परंतु शिक्षणाचा स्तर उंचावा, शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ होण्याच्या संदर्भात आपण आतापर्यंत कधी बैठक घेतलेली आहे काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सभागृहात यासंदर्भात मागणीच झालेली नाही. शिक्षणावर जवळ 11 ते 12 हजार कोटी रुपये खर्च होत असतो त्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेच्या संदर्भात तीन तास तरी चर्चा झाली पाहिजे ही माझी स्वत:ची मागणी आहे.

**सभापती** : सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी या ठिकाणी जी सूचना केली तसेच सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सुध्दा जो प्रश्न उपस्थित केला त्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेच्या संदर्भात मी अडीच तासाची चर्चा याच अधिवेशनामध्ये देण्याचा प्रयत्न करणार आहे.

प्रा.वसंत खोटरे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय शिक्षण मंत्र्यांनी सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी सांगितले आहे की, बैठकीचे आयोजन करण्यास वेळेअभावी शक्य झाले नाही. मी गेल्या पाच वर्षापासून या सभागृहाचा सदस्य असून संघटनेचा अध्यक्ष म्हणून अनेक वर्षापासून काम सुध्दा पाहतो आहे. ज्यावेळी सन्माननीय शिक्षण मंत्री सुधीर जोशी होते त्यावेळी त्यांच्या बरोबर आमच्या संघटनेच्या 3 बैठका झाल्या होत्या. तसेच माननीय अमरीश पटेल, माननीय रामकृष्ण मोरे हे शिक्षणमंत्री होते तेव्हा त्यांच्या बरोबर सुध्दा आमच्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 29432** .........

प्रा. वसंत खोटरे....

बैठका झालेल्या आहेत. आतापर्यंत जे जे शिक्षण मंत्री झालेत त्यांच्या बरोबर आमच्या बैठका झ ाालेल्या आहेत. परंतु आताच्या मंत्र्यांना बैठकीसाठी वेळ मिळत नाही. त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदय येत्या 15 दिवसात बैठक घेणार आहात काय? सभागृहात सर्वच प्रश्नांना न्याय मिळतो असे नाही तर बैठकीमध्ये ब-याच वेळा न्याय मिळत असतो व प्रश्न सुटत असतो.

प्रा. वसंत पुरके : सन्माननीय सदस्यांच्या मागणी प्रमाणे 15 दिवसाच्या आत बैठक घेण्यात येईल. सभापती महोदय, यापूर्वी 23.11 व 31.1 रोजी बैठका झालेल्या आहेत. त्या बैठकीत सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील, रामनाथ मोते साहेब सुध्दा उपस्थित होते.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, शिक्षणाच्या गुणवत्तेच्या संदर्भात सभागृहात चर्चाच मागितली गेली नाही परंतु यासंदर्भात श्री. अरविंद सावंत व स्वत: मी नियम 289 अन्वये चर्चेची मागणी केली होती त्यामुळे चुकीचे रेकॉर्डवर राहू नये एवढाच माझा मुद्दा होता.

**सभापती** : आतापर्यंत शिक्षणाच्या संदर्भात चर्चा दिली गेली नव्हती परंतु आता निश्चितपणे शिक्षणाच्या गुणवतेच्या वाढीच्या संदर्भात चर्चेसाठी वेळ दिला जाईल.

प्रा. वसंत पुरके : शिक्षणाच्या चर्चेच्या संदर्भात आपण वेळ दिला त्याबद्दल धन्यवाद. यासंदर्भात माझी काही हरकत नाही.

-------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातील नाट्यमंदीराला आग लागल्याबाबत**

**(८) * ३०९०७ डॉ. वसंत पवार , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. जगन्नाथ शेवाळे , प्रा. फौजीया खान , श्रीमती उषाताई दराडे :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातील नाटयशास्त्र विभागाच्या भव्य नाटयमंदिराला दिनांक २२ एप्रिल, २००७ रोजी भीषण आग लागून नाटयगृहातील सर्व वस्तू खाक झाल्याची घटना घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाटयगृहाला लागलेल्या आगीबाबत सखोल चौकशी करण्यांत आली आहे काय,

(३) चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यांत आली आहे वा येत आहे ?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता**: (१) होय, दिनांक २२.४.२००७ रोजी विद्यापीठातील नाट्यगृह इमारतीतील प्रेक्षागृहास आग लागून प्रेक्षागृह व त्यात बसविलेल्या खुर्च्या व इतर वस्तु जळून नष्ट झाल्या.

(२) विद्यापीठाने या घटनेच्या चौकशीसाठी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेतील ४ सदस्यांची एक समिती नियुक्त केली आहे. समितीमार्फत प्रकरणाची चौकशी करण्यात येत आहे.

(३) समितीची चौकशी सुरु आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातील नाटयशास्त्र विभागाच्या भव्य नाट्यमंदिराला दिनांक 22 एप्रिल, 2007 रोजी भीषण आग लागून नाट्यगृहाची सर्व वास्तू जळून खाक झाल्याची घटना घडलेली आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न आहे की, या ठिकाणी आगीची घटना घडली त्याचे कारण काय? या ठिकाणी आग का लागली याचा तपास करण्यात आलेला आहे काय? या आगीत मालमत्तेचे एकूण किती रुपयांचे नुकसान झालेले आहे? भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी शासनाने काही काळजी घेतली आहे काय?

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30907.....

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, दिनांक 22.4.2007 रोजी औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातील सभागृहात काम चालू असताना आग लागली. या आगीत सभागृहातील 950 खुर्च्या, कारपेट, लाईट सिस्टीम, स्टेज इत्यादींचे एकूण 296.37 लाख रुपयांचे नुकसान झाले. त्यासाठी इन्शुरन्स कंपनीकडे क्लेम केलेला आहे. ही आग दुपारी 1.15च्या सुमारास लागली. इलेक्ट्रिक इन्स्पेक्टर, अग्निशमन दलाचे अधिकारी आणि लोकल पोलीस स्टेशनचे ऑफिसर या तिघांकडून आग कशामुळे लागली याचा अहवाल मागविला होता. या तिन्ही अहवालामध्ये आगीचे कारण शॉर्ट-सर्कीट असे दिलेले आहे. याशिवाय या आगीची चौकशी करण्यासाठी विद्यापीठातील पाच सदस्यांची एक समिती डॉ.राजाळे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेली आहे. ही समिती आगीची चौकशी करुन विद्यापीठाला अहवाल देणार आहे. सहा महिन्यात या सभागृहाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब आहे. या सभागृहातील इंटेरिअरचे काम पूर्ण झालेले असताना व माननीय मुख्यमंत्र्यांना उद्घाटनासाठी वेळ नसल्यामुळे उद्घाटनाच्या प्रतिक्षेत असलेल्या या सभागृहास आग लागलेली आहे. या प्रकरणात कोणावरही गुन्हा दाखल करण्यात आलेला नसून कोणालाही निलंबित करण्यात आलेले नाही. याठिकाणी मंत्रिमहोदयांनी चुकीचे उत्तर दिलेले आहे. बांधकाम चालू असताना आग कशी लागेल ? तसेच ही आग त्वरित विझविण्याचा प्रयत्न झालेला नाही. तेव्हा माझे मंत्रिमहोदयांना स्पेसिफीक प्रश्न आहेत की, या आगीची पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यात आली काय ? या बाबत कोणावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे ? तसेच जी समिती नेमण्यात आलेली आहे त्यांच्यावर विद्यापीठातील विद्यार्थी संघटनेने हरकत घेतलेली आहे. ज्यांच्यावर वेस्टेड इंटरेस्ट आहे त्यांनाच चौकशीचे आदेश दिलेले आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. तेव्हा या संदर्भात उच्च स्तरावर चौकशी करणार आहे काय ? या आगीची कोणावर जबाबदारी निश्चित करणार आहात ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30907.....

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, इलेक्ट्रिक इन्स्पेक्टर, अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांकडून आणि पोलीस ठाण्याचे अधिकारी यांच्याकडून आलेल्या रिपोर्टमध्ये आगीचे कारण शॉर्ट सर्कीट असे दिलेले आहे. त्यांच्याकडून आलेला रिपोर्ट मी आपणास वाचून दाखवितो. "Electrical short circuit reported to be the possible cause of fire as per the preliminary investigation. त्याचप्रमाणे अग्निशमन अधिकाऱ्यांकडून जो रिपोर्ट आलेला आहे त्यामध्ये सुध्दा आग शॉर्ट-सर्कीटमुळे लागली असा अहवाल दिलेला आहे. आग लागल्यानंतर त्याची पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यात आलेली आहे. त्यानंतर तिघा अधिकाऱ्यांकडून रिपोर्ट मागविण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठातील पाच सदस्यांची एक समिती नेमलेली आहे. त्या समितीचा अहवाल लवकरच प्राप्त होईल. त्या समितीवर जर संशय असेल तर विभागाकडून एका अधिकाऱ्यामार्फत पुन्हा चौकशी करु.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ KGS/ MAP/ MAP/ पूर्वी श्री.अजित.... 13:55

ता.प्र.क्र.30907....

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी हे बोलताना असे म्हणाले की, मंत्र्यांना व मुख्यमंत्र्यांना वेळ मिळाला नाही, म्हणून हे सभागृह जळाले, ते योग्य नाही.

**सभापती** : ते वाक्य मी कामकाजातून काढून टाकतो.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, सदर नाटयगृहाचे हस्तांतरण विद्यापीठाकडे झाले होते का ? नसेल तर यामध्ये जे नुकसान झालेले आहे ते कंत्राटदाराचे झाले की विद्यापीठाचे झाले ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, हे संपूर्ण काम पी.डब्ल्यू.डी.मार्फत केले जात होते व बाकीचे थोडेसे काम विद्यापीठ स्वतंत्र करीत होते. त्याठिकाणी जे नुकसान झालेले आहे ते संपूर्ण इन्शूअर्ड आहे. या नाटयगृहाच्या नुकसानीसंबंधी आपण 496.37 लाखाचा क्लेम इन्शुरन्स कंपनीकडे केलेला आहे, ते पैसे येतीलच. परंतु आपण त्या पैशांची वाट न पाहता, या विद्यापीठाच्या नाटयगृहाचे काम 6 महिन्यांत पूर्ण करु.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या निमित्ताने अतिशय महत्वाच्या प्रश्नाकडे याठिकाणी लक्ष वेधण्यात आलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, या नाटयगृहाचे जे नुकसान झाले त्यास मुख्य जबाबदार कोण ? व त्याच्याकडून आपण ही नुकसानीची रक्कम वसूल करणार का ? सभापती महोदय, भारनियमनामुळे अनेक जास्त पटीने व्होल्टेज वाढून इलेक्ट्रीक सिस्टीमवर परिणाम होतो, त्यामुळेच अशा प्रकारची ही घटना घडलेली आहे. त्यामुळे माझा याठिकाणी असा प्रश्न आहे की, महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी विद्यापीठे आहेत व त्याठिकाणी जे नाटयगृहे आहेत, तेथे आपण आग प्रतिबंधक यंत्रणा बसवली असल्याचा आढावा घेतला का ? नसल्यास, तो कधी घेणार ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय,...

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, नाटयगृह बांधकामासाठी अनुभवी कंत्राटदार लागतो. आपण जो याठिकाणी कंत्राटदार नेमला, तो अनुभवी होता का ? सभापती महोदय, मी स्वत: नाटयगृह बांधत आहे. त्यामुळे या कामासाठी जो कंत्राटदार नेमला तो अनुभवी होता का ? व तशा प्रकारचे टेंडर बी.ॲण्ड.सी.ने घेतले होते का ?

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30907....

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारले, त्यासंबंधी मी उत्तर देऊ इच्छितो. चिफ फायर ऑफिसरने एक्झीस्टींग फायर प्रीकॉशन्ससंबंधी ज्या सजेशन्स दिल्या होत्या, त्याची यादी माझ्याकडे आहे. त्यामध्ये स्मोक डिटेक्टर, स्प्रींकल सिस्टम, फायर हायड्रंट अशाप्रकारच्या फायर प्रिव्हेंशन्स्संबंधी प्रोव्हीजन आपण नवीन सभागृहात करणार आहोत....

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ते आधीच केले असते तर हा प्रश्न आलाच नसता.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, कन्स्ट्रक्शनचे काम चालू नव्हते, इंटेरिअरचे काम चालू होते. एकदा सभागृहाचे काम संपल्यानंतर फायर प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात. पी.डब्ल्यू.डी.ने काम विद्यापीठाला हॅण्डओव्हर केले नव्हते.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी अशी माहिती दिली की, ठेकेदारांकडून ते काम करणे सुरु आहे, तसेच ते काम हॅण्डओव्हर झाले नव्हते. मग, त्याचा फायदा विद्यापीठाला कसा मिळणार ? याचा अर्थ, सदरचे काम हॅण्डओव्हर झालेले नाही. बांधकाम होण्यापूर्वी ऑडिटोरीअममध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना केलेल्या नसल्यामुळे इन्शूरन्स क्लेम सेटल होऊ शकतो आणि इन्शुरन्स कंपनीद्वारे सादर करण्यात आलेल्या अहवालामध्ये जर या मुद्यामुळे आग लागली असे नमूद करण्यात आले असेल तर पैसे मिळतील,

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब...........

अन्यथा पैसे मिळणार नाहीत, त्याबाबत मंत्री महोदयांकडे काय तपशील आहे ते सांगावे व हे नाट्यगृह हॅण्डओव्हर केले होते किंवा नाही तेही सांगावे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाने विद्यापीठाला नाटयगृह हॅण्डओव्हर केले नव्हते. विद्यापीठाने इन्श्युरन्सचा जो क्लेम केलेला आहे तो गव्हर्नमेंट इन्श्युरन्स फंडमध्ये क्लेम केला आहे. हा क्लेम विद्यापीठाला मिळणार आहे की सार्वजनिक बांधकाम विभागाला मिळणार आहे, ही बाब मी तपासून बघतो व त्याची माहिती सभागृहाला देण्यात येईल.

**सभापती** : आता प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

--------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ.सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचा (औरंगाबाद) सन 2001-2002 चा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळाचा (जळगाव) सन 2005-2006 चा आठवा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----------------

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## औचित्याच्या मुद्यासंबंधी माननीय सभापतींची घोषणा

**सभापती** : सभागृहाच्या माहितीकरिता मी एक घोषणा करतो. कामकाज सल्लागार समितीत ठरल्याप्रमाणे 'औचित्याचे मुद्दे' शुक्रवारी प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर घेण्यात यावेत असा निर्णय झालेला आहे. या सप्ताहात सोमवार, मंगळवार व बुधवार या दिवशीच सभागृहाचे कामकाज होणार असून गुरुवार व शुक्रवारी सभागृहाची बैठक होणार नाही त्यामुळे या सप्ताहात सदस्यांना 'औचित्याचे मुद्दे' उपस्थित करण्याची संधी मिळणार नाही. तसेच पुढील आठवडयातदेखिल सभागृहाची बैठक सोमवार ते गुरुवार होणार असून त्या सप्ताहातदेखिल शुक्रवारी सभागृहाची बैठक नसल्यामुळे सदस्यांना 'औचित्याचे मुद्दे' उपस्थित करण्याची संधी मिळणार नाही.

माझ्या मते सदस्यांना प्रत्येक आठवडयात किमान एक दिवस तरी 'औचित्याचे मुद्दे'उपस्थित करण्याची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. त्यामुळे मी या संबंधात असा निर्णय घेतला आहे की, तांत्रिकदृष्टया जरी 'औचित्याचे मुद्दे'उपस्थित करण्याकरिता शुक्रवार हा दिवस नेमून दिला असला तरी ज्या सप्ताहात शुक्रवारी सभागृहाची बैठक होणार नसेल त्या सप्ताहातील अखेरच्या दिवशी सदस्यांना 'औचित्याचे मुद्दे' उपस्थित करण्याची संधी देण्यात यावी.

यानुसार सद्य सप्ताहातील बुधवारी व पुढील सप्ताहातील गुरुवारी सदस्यांना 'औचित्याचे मुद्दे' उपस्थित करता येतील. हा निर्णय यापुढेही अंमलात राहील.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये ज्यावेळी हा विषय निघाला होता त्यावेळी मी अशी सूचना केली होती की, औचित्याचे मुद्दे उपस्थित करण्याचे आयुध बंद करु नये. याचे कारण असे आहे की, औचित्याचे मुद्दे येतात ते आपल्या माध्यमातून येतात, आपल्याकडे सन्माननीय सदस्यांकडून ते लेखी दिले जातात, त्यानंतर ते मुद्दे उपस्थित करण्यास परवानगी द्यावयाची की नाही, हे आपण ठरविता. ही पद्धत ज्यावेळी ठरविण्यात आली होती त्यावेळी आपण कामकाज सल्लागार समितीमध्ये याची चर्चा केली नव्हती, या सार्वभौम सभागृहात ही पद्धत ठरविण्यात आली होती. एकदा ही पद्धत ठरविल्यानंतर हा विषय कामकाज सल्लागार समितीमध्ये आणून अशा पद्धतीने त्याला वळण देणे योग्य नाही. 'औचित्याचा मुद्दा' हे

..4.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..........

असे आयुध आहे की, दुस-या कुठल्याही आयुधाचा ज्यावेळी वापर करता येत नाही त्यावेळी औचित्याच्या मुद्याचा आधार घेतला जातो. असे नेहमी घडत नाही. औचित्याच्या मुद्यांचे प्रमाण वाढले आहे, हे आपले म्हणणे मान्य आहे. त्यामुळे औचित्याच्या मुद्याचा हा जो विषय आहे तो सभागृहासाठी खुला रहावा, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात यापूर्वीही आपली चर्चा झाली होती. कामकाज सल्लागार समितीमध्ये हा मुद्दा यासाठी उपस्थित करण्यात आला होता की, ब-याच वेळा औचित्याच्या मुद्यांची मागणी मोठया प्रमाणावर होते. औचित्याच्या मुद्याचा निर्णय आपण सर्वानुमते घेतला आहे. औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याविषयीचा निर्णय माननीय सभापती घेतात. परंतु, असा विषय औचित्याला धरुन असावा, यावर देखील बरीच चर्चा झाली आहे. आता आपण बुधवारी औचित्याचे मुद्दे उपस्थित करण्यास परवानगी देणार आहात, हरकत नाही.

श्री.दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, मुद्दा औचित्याला धरुन असावा. हे आपण कोण ठरविणार ? आपण यासंदर्भात कॉमेंट कशाला करता ?

श्री.हर्षवर्धन पाटील : औचित्याचा मुद्दा स्वीकारावयाचा किंवा नाही, याचा निर्णय माननीय सभापती करतात. या मुद्याव्दारे ब-याच वेळा अनेक प्रश्न उपस्थित व्हावयास लागले होते, अशी चर्चा झाली होती म्हणून हा प्रश्न निर्माण झाला होता.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, औचित्याचे मुद्दे घ्यावयाचे की नाही, हे सभागृहाने ठरवावयाचे आहे.

**सभापती** : पूर्वी सुध्दा आपण औचित्यांचे मुद्दे मांडण्यासाठी परवानगी देत होतो. औचित्याचे मुद्दे घेण्याऐवजी दररोज विशेष उल्लेख घ्यावेत, असा निर्णय घेण्यात आला आणि आपण नियमामध्ये तसा बदल केला. तरी सुध्दा मधल्या काळामध्ये औचित्याचे मुद्दे थांबले नाहीत किंबहुना वाढले, या अनुषंगाने औचित्यांच्या मुद्यांची मर्यादा कमी करावी यादृष्टीने आपण औचित्याचे मुद्दे फक्त शुक्रवारी घेण्याचा निर्णय घेतला. माझ्या असे लक्षात आले की, काही वेळा शुक्रवारी सभागृहाची बैठक नसते. तेव्हा मी यासंदर्भात असा निर्णय घेतला आहे की, ज्या आठवडयात शुक्रवारी सभागृहाची बैठक होणार नसेल त्या आठवडयातील शेवटच्या दिवशी मी औचित्याचे मुद्दे मांडण्याची परवानगी देईन.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला आम्ही गैरहजर होतो. ज्या दिवशी कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली त्या दिवशी आम्ही मुंबईमध्ये नव्हतो. हा कामकाज सल्लागार समितीचा विषय नाही. औचित्यांच्या मुद्याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावयाचा आहे, आपण निर्णय घ्यावयाचा आहे. औचित्याचे मुद्दे बंद करु नयेत. औचित्याचे मुद्दे आठवडयाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे शुक्रवारलाच का ठेवावेत ? मला असे वाटते की, औचित्यांच्या मुद्यांवर बंधन आणू नये. अतिरेक होणार नाही याची काळजी घेऊन औचित्याचे मुद्दे सुरु ठेवले पाहिजेत.

Shri Madhukar Sarpotdar : Sir, it is a device to ventilate public grievances.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मी आपल्या सूचनेचे स्वागत करतो. औचित्य या शब्दाचा अर्थ नियमाला धरुन, संकेताला धरुन असा आहे. परंतु ज्यावेळी नियमाला धरुन काही गोष्टी घडत नाहीत त्यावेळी औचित्याचा भंग होतो. अनेक गंभीर विषय असतात. आम्ही नियम 93 अन्वये सूचना देतो किंवा औचित्याचा मुद्दा मांडतो. लक्ष्मी छाया बिल्डींग कोसळली, हा नियम 93 अन्वये सूचनेचा विषय होऊ शकतो. परंतु अन्य सदस्याने जर औचित्याच्या मुद्याद्वारे हा विषय उपस्थित केला तर नियम 93 अन्वये सूचना देणा-या सदस्यावर अन्याय होतो. सभापती महोदय

..2...



श्री.अरविंद सावंत ..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी द्यावयाची की नाही, हा आपला अधिकार आहे. औचित्याचे मुद्दे सुरु ठेवावेत आणि योग्य मुद्दे मांडण्याची परवानगी द्यावी, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे अत्यंत महत्वाचा मुद्दा असेल आणि तो मुद्दा माननीय विरोधी पक्ष नेते किंवा गट नेत्यांच्या माझ्यामातून माझ्याकडे आला तर तो मुद्दा मांडण्यास मी जरुर परवानगी देईन. परंतु दररोज परवानगी देणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला उपस्थित होते. त्यावेळी आपण औचित्याच्या मुद्यासंदर्भात निर्णय घेतलेला आहे. माननीय विरोधी पक्ष नेते, गट नेते आणि सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले तर मी औचित्याचा मुद्दा मांडण्यास जरुर परवानगी देईन. मध्यल्या काळामध्ये एका दिवशी 16 औचित्याचे मुद्दे आले होते. ठीक आहे, आता आपण पुढचे कामकाज घेऊ.

---------

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

24-07-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) WW-3

GRB/ SBT/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ........ 14:05

**पृ.शी.**: राज्यातील मागासवर्गीय भूमिहिनांना शासनामार्फत स्वाभिमान योजने अंतर्गत जमीन खरेदी करुन देणे.

**मु.शी.**: राज्यातील मागासवर्गीय भूमिहिनांना शासनामार्फत स्वाभिमान योजने अंतर्गत जमीन खरेदी करुन देणे याबाबत डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.चंद्रकांत हंडोरे (सामाजिक न्यायमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी "राज्यातील मागासवर्गीय भूमिहिनांना शासनामार्फत स्वाभिमान योजने अंतर्गत जमीन खरेदी करुन देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, मागासवर्गीय भूमिहिनांनी आम्ही मागासवर्गीय आहोत, आम्हाला जमीन पाहिजे अशा प्रकारची मागणी शासनाकडे किती भूमिहिन मागासवर्गीयांनी केलेली आहे, याबातची माहिती शासनाकडे आहे काय ? सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "... वितरणासाठी संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे."

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे .....

खैरलांजीसारखे प्रकरण महाराष्ट्रात घडले तेव्हा दलित हक्क समित्या जिल्हयामध्ये अस्तित्वात नव्हत्या. आता शासन समित्यावर समित्या नियुक्त्या करीत आहे. या समित्यांचे काम चांगले चालले आहे की नाही हे पाहण्यासाठी समिती नेमली जात आहे. माझा प्रश्न असा आहे की, भूमिहिन लाभार्थ्यांना जमीन देण्याचे टारगेट तुम्ही किती दिवसात साध्य करणार आहात ?

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, महाराष्ट्रातून लाभार्थींचे मोठया प्रमाणावर अर्ज आलेले आहे. याचा निश्चित आकडा आज माझ्याकडे नाही. परंतु जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे. जमीन खरेदी करण्याच्या बाबतीत व भूमिहिनांना जमिनी देण्याच्या बाबतीत काही तांत्रिक व कायदेशीर अडचणी निर्माण झाल्यामुळे मोठया प्रमाणावर लाभार्थ्यांना व भूमिहिनांना लाभ देता आला नाही. जमिनीची प्रतवारी, जमिनीचे सातबारे, जमीन पिकविण्यासाठी योग्य आणि किंवा अयोग्य आहे हे पाहण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर वेळ जातो म्हणून त्यांना सहाय्य करण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे, ज्यामध्ये संबंधित तहसिलदार, संबंधित तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, तालुका कृषी अधिकारी, मंडळ अधिकारी, गावातील सरपंच, तलाठी, ग्रामसेवक, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांची एक समिती गठीत करण्यात आलेली आहे. ही समिती याबाबत तात्काळ कार्यवाही करेल व लाभार्थींना मोठया प्रमाणावर लाभ मिळेल. या दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येईल व नजिकच्या काळामध्ये मोठया प्रमाणावर भूमिहिनांना जमीन देण्यात येईल. उद्दिष्टाबाबत निश्चित असे बोलता येणार नाही कारण यामध्ये काही अडचणी आहेत. काही भागामध्ये जमीन मिळत नाही. कोकण विभाग डोंगराळ आहे. सातारा-सांगली-कोल्हापूर भागात सुपीक जमीन असल्यामुळे जमीन द्यावयास कोणी तयार नाही. नाशिक, अमरावती, गडचिरोली भागात आदिवासी मोठया प्रमाणावर आहेत, ती जमीन ट्रान्फर करता येत नाही. अशा अडचणी असल्यातरी त्यातून मार्ग काढून भूमीहिनांना जमीन देण्यासाठी शासन कटीबध्द आहे.

.....2



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शासनाचा निर्णय आहे की, जमीन किंवा घर देताना पती-पत्नी दोघांच्या नावाने देण्यात यावी.शासन आता देणार असलेली जमीन पती-पत्नी दोघांच्याही नावाने देणार का ? काही ठिकाणी एकटया कुटुंब प्रमुख असणाऱ्या काही विधवा व परितक्त्या स्त्रिया आहेत. त्यांनी त्यांच्या नावावर जमीन देण्याची मागणी केल्यास त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याची शासनाची तयारी आहे का ?

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मांडलेली सूचना चांगली आहे. लाभार्थी ज्या नावाने अर्ज देतो त्या नावाने जमीन दिली जाते. परंतु पती व पत्नीच्या नावे जमीन करण्याची सूचना निश्चितपणे अंमलात आणली जाईल. विधवा किंवा परितक्त्या महिला असेल तर तीच्या नावावर ती जमीन करण्यात येईल.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3



PNG/ SBT/ MAP/

**पृ.शी.**: शहरातील धोकादायक इमारतीतील रहिवाशांना देण्यात आलेल्या संक्रमण शिबीरातील गाळयात अनाधिकृत रहिवाशांनी केलेली घुसखोरी .

**मु.शी.**: शहरातील धोकादायक इमारतीतील रहिवाशांना देण्यात आलेल्या संक्रमण शिबीरातील गाळयात अनाधिकृत रहिवाशांनी केलेली घुसखोरी बाबत श्री.मधुकर चव्हाण यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर (गृहनिर्माण राज्यमंत्री ): सभापती महोदय, श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी "शहरातील धोकादायक इमारतीतील रहिवाशांना देण्यात आलेल्या संक्रमण शिबीरातील गाळयात अनाधिकृत रहिवाशांनी केलेली घुसखोरी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती महोदय, निवेदनामध्ये मी काही दुरुस्ती करु इच्छितो. पृष्ठ क्र.2 वरील शेवटच्या दुसऱ्या परिच्छेदामध्ये तिसऱ्या ओळीतील "2540 अनिवासी गाळे या ऐवजी 2540 निवासी गाळे" असे वाचावे.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे

`

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....4

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी आपला अत्यंत आभारी आहे की, दोन दिवसापूर्वी निवेदन दिल्यानंतर त्याची उत्तरे लवकर येत आहेत. आपण न्याय दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. सभापती महोदय, सभागृहाच्या नियमांचे पालन करुन मी 2 प्रश्न विचारु इच्छितो, आपण परवानगी द्यावी अशी माझी कळकळीची व आग्रहाची विनंती आहे. निवेदनातील पान क्र.2 वर म्हटले आहे की, "दिनांक 12.7.2007 रोजी मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली संक्रमण शिबीराची तपासणी केली असता 259 गाळे तपासण्यात आले. त्यामध्ये 70 अधिकृत भाडेकरु, 7 घुसखोर असून 101 घरांची तपासणी करावयाची प्रलंबित आहे". निवेदनात सुरुवातीस म्हटले आहे की, गाळे तपासण्यात आले व पुढे असे लिहिले आहे की, 81 गाळे टाळेबंद आढळून आले. तसेच निवेदनातील पान क्र.3 वर गोराई रोड, बोरीवलीबाबत लिहिले आहे, "संक्रमण शिबीरामध्ये घुसखोरासह एकूण 247 गाळयांची तपासणी केली असता 203 संक्रमण शिबीर गाळयांमध्ये घुसखोरी दिसून आलेली आहे"

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

तेव्हा माझा प्रश्न सरळ असा आहे की, हायकोर्टाने या संबंधात स्पष्ट निर्णय दिला आहे की, घुसखोरांना कोणतीही संधी द्यायची नसते. त्यांना एकच प्रश्न विचाराचा असतो की, तुम्ही यापूर्वी कोठल्या इमारतीत रहात होता आणि तेथील व्हॅकेशन नोटीस दाखवा आणि त्याप्रमाणे तो दाखवू शकला नाही तर त्याचे सामान सरळ बाहेर काढावे. सभापती महोदय, अगोदरच मुंबईमध्ये 1600 इमारती धोकादायक आहेत आणि त्यातील गाळेधारकांना तात्पुरते पुनर्वसन करून देण्यासाठी आपल्याकडे जागा नाही. असे असताना अशा लोकांसाठी बांधण्यात आलेल्या आपल्या संक्रमण शिबिरातील अनेक गाळ्यांमध्ये दलालांच्या माध्यमातून या जागा घूसखोरांना जागा दिल्या गेल्या आहेत. सायन येथील ट्रांझिट कॅम्पमधील 22 क्रमांकाच्या इमारतीत बारबाला व अन्य घूसखोर राहत आहेत आणि हे तुमच्या चीफ ऑफिसरने देखील मान्य केलेले आहे. असे असताना आपण येथे हे संपूर्ण चुकीचे उत्तर देत आहात. तेव्हा या सर्व प्रकरणाची आपण सीआयडी मार्फत चौकशी करणार काय ? हा माझा या निवेदनाच्या अनुषंगाने पहिला प्रश्न आहे. तसेच सभापती महोदय, काल-परवाच या सभागृहामध्ये सेवायोजन कार्यालयाबाबत चर्चा झाली त्यावेळी त्या चर्चेला दिलेल्या उत्तरात सांगण्यात आले की, शासकीय, निमशासकीय कार्यालयांमध्ये जे जे कर्मचारी भरायचे असतील तर ते सेवायोजन कार्यालयामार्फतच मागविण्यात येतील. आता म्हाडाकडे देखील पुरेसा स्टाफ नाही हे आपण या निवेदनात म्हटलेले आहे तसेच त्यातच पुढे म्हटले आहे की, म्हाडामध्ये कर्मचारी भरतीसाठी जाहिरात देण्यात आलेली आहे. खरे तर यासाठी आपण सेवायोजन कार्यालया र्मांफतच उमेदवार मागविले पाहिजेत. कारण तेथे 4-5-10 वर्षे त्या तरूणांनी आपली नावे नोंदविलेली आहेत. तेव्हा म्हाडातील कर्मचारी भरतीसाठी आपण सेवायोजन कार्यालयामार्फत उमेदवारांची मागणी करणार काय आणि संक्रमण शिबिरांतील तसेच म्हाडाच्या इमारतीतील घूसखोरासंबंधातील प्रकरणांची चौकशी आपण सीआयडीमार्फत करणार काय ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी येथे या निमित्ताने जी मागणी केलेली आहे ती मी मान्य करतो आणि त्याप्रमाणे स्टँडींग कमिटी करून चौकशी निश्चितपणे होईल. तसेच यामध्ये धूसखोरांबाबत माहिती दिलेली आहे ती बरोबर आहे. ती देताना सांगितले आहे की, 101 घरांची तपासणी करावयाची राहिली आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे त्या घरांना चेकिंगच्या वेळी कुलूप होते त्यामुळे त्यांची कागदपत्रे पाहता आली नाही, तपासणी करता

....... वायवाय 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. शेगावकर .....

आली नाही. परंतु त्याही बाबत निश्चितपणे आपण मागणी केल्याप्रमाणे समिती नेमण्यात येईल आणि तिच्यामार्फत यासंबंधात तपासणी, चौकशी करण्यात येईल. तसेच घूसखोरांना काढण्यासाठी आपल्याकडे स्टाफ कमी आहे हे खरे आहे आणि त्यासाठी त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना स्टाफ देण्याची व्यवस्था आम्ही करणार आहोत आणि लवकरात लवकर घूसखोर आपण काढणार आहोत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आमची मागणी मान्य केली त्याबद्दल धन्यवाद. पण या प्रकरणांची चौकशी सीआयडी चौकशी करणार आहात तर ती किती दिवसात करणार आहात ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : होय, ती चौकशी पावसाळ्यानंतर करण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : पावसाळ्यानंतर करण्याचे कारण काय ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : ही चौकशी पावसाळयानंतर करण्यात येईल कारण चौकशी करून या घूसखोरांना काढण्यास वेळ लागेल.

***

....... वायवाय 3 ....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पुणे येथील हिंजवडी येथे तसेच सिटी पोस्टात पार्सलद्वारे आलेले जीवंत बॉंब सापडणे.

**मु.शी.** : पुणे येथील हिंजवडी येथे तसेच सिटी पोस्टात पार्सलद्वारे आलेले जीवंत बॉंब सापडणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.अरविंद सावंत, ॲड.अनिल परब, डॉ.दीपक सावंत, श्री.परशुराम उपरकर, श्री.सुरेश जेथलिया, वि.प.स., यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.अरविंद सावंत, ॲड.अनिल परब, डॉ.दीपक सावंत, श्री.परशुराम उपरकर, श्री.सुरेश जेथलिया यांनी "पुणे येथील हिंजवडी येथे तसेच सिटी पोस्टात पार्सलद्वारे आलेले जीवंत बॉंब सापडणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती. तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित करण्यात आलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

....... वायवाय 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 च्या सुचनेवरील मा.गृह राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...(नि.क्र.3) ..)

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुण्यातील आयटी क्षेत्र आणि बंगलोर येथील आयटी क्षेत्र हे संगणकीकरणामुळे जोडले गेले आहे. बंगलोर येथील आयटी क्षेत्र दहशतवाद्यांचे लक्ष्य आहे आणि त्याचप्रमाणे पुणे देखील होईल असे वाटते. आता पुण्यामध्ये घडलेल्या या घटनांचा दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे दिसत नाही असे आपण यात म्हटले आहे. परंतु तरीही संपूर्ण आयटी क्षेत्राया सुरक्षिततेच्या दृष्टीने आपल्या पोलीस विभागातील दहशतवाद विरोधी पथक जे आहे त्यांच्याकडून आपण यांना संरक्षण देणार का ? कारण आज हिंजवडी येथील आयटी क्षेत्रा संबंधात अनेक अशा तक्रारी आहेत. तेव्हा आपल्या पोलीस विभागातील सायबर गुन्हे शाखा आणि दहशतवाद विरोधी पथकाचा समन्वय साधून या आयटी क्षेत्राला संरक्षण देण्यासाठी आपण काय पावले उचलणार आहात ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जी चिंता व्यक्त केली आहे ती बरोबर आहे. पुण्यामध्ये आता आयटी क्षेत्राचा पसारा वाढतो आहे आणि त्यामुळे तेथे जाणून बुजून कोणी तरी काही करीत आहे अशी शंका येते. या ठिकाणी घडलेल्या प्रकरणांचा दहशतवाद्यांशी काही संबंध नसला तरी त्या संबंधात संबंधित विभागांनाही सूचना करण्यात आल्या आहेत की, या क्षेत्राला आपल्याकडून संरक्षण दिले जावे म्हणून.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी दोन घटना घडलेल्या आहेत. एक 13जुलै रोजी आणि दुसरी 18 जुलै रोजी घडलेली आहे. यामध्ये कॉग्निजन्ट टेक्नॉलॉजी सोल्यूशन इं. (प्रा.) लि. या कंपनीतील दोन व्यक्तींची नावे आपण दिली आहेत. पैकी एक सी.तबस्सूम आणि दुसरी एम.साईश्रीधर हे आहेत. तर यातील श्री.साईश्रीधर हे कोण आहेत ? ते या कंपनीतील कर्मचारी आहेत का ? दुसरी जी 13 जुलैची धटना आहे त्यामध्ये बॉम्बसदृश्य वसू असल्याचे दिसून आले आणि नंतर तो बॉम्ब होता हे सिद्ध झाले आणि तो बॉम्ब आपण निकामी देखील केला आहे. याबाबत पुढील तपास करण्यात येत आहे असेही यात सांगण्यात आले आहे.

( यानंतर श्री. सरफरे ...... झेडझेड 1 ...-

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

या संदर्भात न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, पुणे यांच्याकडे पार्सलमधील अवशेषाची तपासणी करण्यासाठी पाठविण्यात आले आहे. हा अहवाल किती दिवसात अपेक्षित आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सी तबसुम आणि एम. साईश्रीधर हे आंध्र प्रदेशातील अनंतपूर येथील रहिवाशी आहेत. हे दोघेही एकत्र शाळेमध्ये शिकत होते, कॉलेजमध्ये शिकत होते ते कामावर वेगवेगळया ठिकाणी होते. परंतु त्यांचे एकमेकांवर प्रेम नव्हते. यामधील मुलगी ही पुण्याच्या कॉग्नीइजन्ट टेक्नॉलॉजी सोल्युशन इं. कंपनीमध्ये कामाला होती आणि एम.साईश्रीधर हा हैद्राबाद येथे होता. आपले पोलीस चौकशीकरिता आनंदपूरला गेले. आणि त्या मुलीच्या पालकांकडे चौकशी केली असता त्यांना देखील कुणाचे तरी धमकीचे फोन येत असल्यामुळे ते परेशान झालेले आहेत. या दोघांचे लग्न असून त्याबाबत जेवण ठेवण्यात आले आहे अशाप्रकारची लग्न पत्रिका तेथील वर्तमानपत्रामध्ये छापण्यात आली आहे. त्या पत्रिकेमध्ये छापण्यात आलेले मुलीचे मोबाईल नंबर बरोबर आहे. हे कृत्य कुणी तरी करीत आहे म्हणून आंध्र प्रदेशच्या पोलीस स्टेशनमध्ये त्या मुलीच्या पालकांनी तक्रार केली आहे. या प्रकरणी आंध्र प्रदेशचे पोलीस तपास करीत आहेत, त्याचप्रमाणे सी.बी.आय.तपास करीत आहे. त्या मुलीचा कॉग्नीइजन्ट टेक्नॉलॉजी सोल्युशन कंपनीचा पत्ता दिला असला तरी ती मुलगी त्या ठिकाणी कामाला नसून दुसरीकडे आहे. त्या मुलीच्या नावाने सारख्या धमक्या येत असल्यामुळे आणि बॉम्बचे पार्सल येत असल्यामुळे त्या मुलीला मुद्दाम वेगळया ठिकाणी ठेवण्यात आले आहे. अगोदर 13 जुलैला पोस्टामध्ये पोस्ट मास्तरांच्या नावाने पार्सल पाठविण्यात आले आणि त्यासोबत एक पत्र देण्यात आले. त्या पत्रामध्ये म्हटले आहे की, आम्ही दोघे जण प्रेम करीत असून आमच्या घरातील लोक आम्हाला विरोध करीत आहेत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांचा उत्तर सांगतांना गोंधळ होत आहे. याठिकाणी दोन वेगवेगळया घटना घडलेल्या आहेत. पहिली घटना 13 जुलै रोजी घडली आहे तर दुसरी घटना 18 जुलै रोजी घडली आहे. 13 जुलै रोजी पोस्टामध्ये पार्सल आले त्याबाबत पोस्टाच्या अधिकाऱ्यांनी तक्रार केली. 18 जुलैची घटना कॉग्नीइजन्ट टेकनॉलॉजी सोल्युशन या कंपनीची आहे. 13 जुलै रोजी पोस्टामध्ये आलेले पार्सल कुणासाठी आणि कोठून आले होते?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्या पार्सलवर कुणाचाही पत्ता नव्हता. ते पार्सल पोस्ट मास्टर यांच्याकडे आले होते. त्या सोबत असलेल्या पत्रामध्ये म्हटले होते की, सी. तबसुम व एम. साईश्रीधर आम्ही गेल्या सहा वर्षापासून प्रेम करतो. मी बी.टेक. ही डिग्री संपादन केली असून एम. साईश्रीधर यांनी एच के. युनिव्हर्सिटी अनंतपूर येथून एम.एस्सी. मायक्रो बायॉलॉजी केलेले आहे. तबसुम ही कॉग्नीइजन्ट टेक्नॉलॉजी सोल्युशन कंपनी, पुणे येथे नोकरी करीत असून एम. साईश्रीधर हा हैद्राबाद येथे नोकरीला आले. आमचे पालक आमचे लग्न स्वीकारीत नसून तबसुमचे वडिल अल्लाबक्ष हे नेहमीच आम्हा दोघांना धमकी देत असतात. आमच्या पालकांकडून आमचा जीव वाचवा अशी आम्ही विनंती करतो. नाहीतर आम्ही दोघेही आत्महत्त्या करु. हा इशारा आमच्या आई-वडिलांना असून ते आम्हा दोघांना विभक्त करु इच्छितात. मी इंजिनिअरींगची विद्यार्थी असून मला बॉम्ब करण्याची माहिती आहे. कृपया आमच्या पालकांपासून आम्हाला वाचवावे. नाहीतर आम्ही आत्महत्त्या करु. सोबत बॉम्ब पाठविला आहे. त्याखाली त्यांनी त्यांचा मोबाईल नंबर दिलेला आहे. हे सर्व त्यांच्या पालकांना कळविण्याचा त्यांचा उद्देश आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कामतेवाडी ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील बंद पडलेले लघुपाटबंधाऱ्याचे काम सुरु करण्याबाबत

मु.शी. : कामतेवाडी ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील बंद पडलेले लघुपाटबंधाऱ्याचे काम सुरु करण्याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रा. शरद पाटील, जयंत प्र. पाटील वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. सुनील देशमुख ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रा. शरद पाटील, जयंत प्र. पाटील वि.प.स. यां-नी "कामतेवाडी ता.राधानगरी, जि. कोल्हापूर येथील बंद पडलेले लघुपाटबंधाऱ्याचे काम सुरु करण्याबाबत " या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, या लघुपाटबंधाऱ्याच्या कामाला 1996 मध्ये मान्यता देण्यात आली. गेली दहा ते बारा वर्षे हे काम सुरु होऊ न शकल्यामुळे 440 हेक्टर जमीन सिंचनाखाली आलेली नाही. दिनांक 1.11.2006 रोजी राज्य सरकारच्या दिल्ली येथील वकिलांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये इंटर लॉक्युटरी ॲप्लिकेशन दाखल करण्याच्या सूचना दिल्या. याबाबत उत्तरामध्ये वारंवार माहिती देण्यात आली आहे. प्रश्न असा आहे की, सर्वोच्च न्यायालयामध्ये आपल्या वकिलांनी इंटर लॉक्युटरी ॲप्लिकेशन दाखल केले आहे काय? केले नसेल तर कां केले नाही? केले असेल तर सर्वोच्च न्यायालयाने त्यासंबंधी आपली प्रतिक्रिया किंवा त्याला मान्यता दिली आहे काय?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : लघुपाटबंधारे सावर्दे, जि.कोल्हापूर या योजनेसाठी एकंदर 44.12 हेक्टर एवढी जमीन आवश्यक असून त्यामध्ये 14.12 हेक्टर जमीन राधानगरी अभयारण्यातील वन्यजीव क्षेत्रातील आहे. अभयाराण्यातील वन्यजीव क्षेत्रातील जमीन अधिग्रहित करण्यासाठी सुप्रीम कोर्टाची परवानगी लागते. सुप्रीम कोर्टाचे याबाबतचे धोरण रिजिड आहे. यासाठी दिनांक 2-11-2006 रोजी राज्य शासनाच्या दिल्लीतील वकिलांना सर्वोच्च न्यायालयात इंटर लॉक्युटरी ॲप्लीकेशन दाखल करण्याबाबत कळविले होते. अजून ते ॲप्लीकेशन दाखल झालेले नाही. या संदर्भात राज्याच्या दिल्ली येथील वकिलांनी कागदपत्रे मागितली. कारण यासाठी खूप कागदपत्रे लागतात. त्यामध्ये बारीकबारीक तपशील द्यावे लागतात. ही कागदपत्रे जमा करण्याचे शासन स्तरावर काम सुरू आहे. ती कागदपत्रे जमा होतील तशी दिल्लीतील वकिलांना पाठविण्यात येतील. त्यानंतर सर्वोच्य न्यायालयात इंटर लॉक्युटरी ॲप्लीकेशन दाखल करण्यात येईल.

प्रा.शरद पाटील : वकिलांनी मागणी केलेल्या कागदपत्रांची पूर्तता करण्यास किती कालावधी लागणार आहे ? ही कागदपत्रे उपलब्ध झाल्यानंतर त्वरित इंटर लॉक्युटरी ॲप्लीकेशन सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केले जाणार आहे काय ?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सन्मानीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी या संदर्भात तत्कालीन जलसंपदा मंत्री श्री.अजित पवार यांची भेट घेतलेली होती, त्यावेळेस असा निर्णय झालेला होता की, कोल्हापूर मधील धामणी मध्यम प्रकल्पाअंतर्गत वन्य जीव क्षेत्र निर्माण करण्याच्याबाबतीत सुप्रीम कोर्टाचा निर्णय काय होतो, ते पाहून या एम.आय.टँकच्याबाबतीत निर्णय करू. यासाठी काही अवधी गेलेला आहे. धामणी वन्यजीव क्षेत्रासाठी सुप्रीम कोर्टाने परवानगी दिलेली आहे, त्याच धर्तीवर हा प्रोजेक्ट करणार आहोत. त्यामुळे सुप्रीम कोर्ट मंजुरी देण्यास तयार होईल. आवश्यकता वाटली तर मी स्वत: सुप्रीम कोर्टामधील आपल्या राज्याच्या वकिलांना मुंबईमध्ये बोलावून घेतले जाईल, त्यावेळेस आपल्यालाही बोलाविण्यात येईल आणि हा प्रश्न मार्गी लावण्यात येईल.

---

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

**पृ.शी.** : बुलढाणा जिल्ह्यात सेंद्रीय शेती तंत्रज्ञान अभियानात घडलेला गैरप्रकार

**मु.शी.** : बुलढाणा जिल्ह्यात सेंद्रीय शेती तंत्रज्ञान अभियानात घडलेला गैरप्रकार याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता वि.प.स. यांनी "बुलढाणा जिल्ह्यात सेंद्रीय शेती तंत्रज्ञान अभियानात घडलेला गैरप्रकार " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विदर्भ पॅकेज सेंद्रिय शेती तंत्रज्ञान अभियान योजनेमध्ये सेंद्रिय शेती शाळांचा कार्यक्रम बुलढाणा जिल्ह्यामध्ये राबविला. परंतु ज्या संस्थांची यामध्ये निवड केली, ती निवड वर्तमानपत्रामध्ये जाहिरात न देता केलेली आहे. प्रती शेती शाळेसाठी 22680 रुपये खर्च केलेला आहे, याला माझा आक्षेप आहे. या शेती शाळा न भरविता कागदावर त्या भरविल्याचे दाखवून पैसे काढलेले आहेत.. शेती शाळेचे आयोजन करण्यात आलेले नाही. तेव्हा या संपूर्ण प्रकरणाची मंत्री महोदय चौकशी करणार आहेत काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सूचना केल्याप्रमाणे चौकशी करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : मागच्या वर्षी म्हणजे 2006-07 मध्ये ज्या शेती शाळेचे आयोजन करण्यात आले त्यासाठी किती खर्च करण्यात आलेला आहे ? त्याचबरोबर पुढच्या वर्षी किती खर्च केला जाणार आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : बुलढाणा जिल्ह्यामध्ये सन 2006-07 मध्ये सात सेंद्रीय शेती शाळा घेतलेल्या आहेत. यासाठी 22680 इतका प्रत्येकी निधी देण्याचे ठरविले होते. यामध्ये 15 हजार रुपये प्रशिक्षणार्थीसाठी तरतूद केलेली होती. प्रत्येक प्रशिक्षणार्थींना 150 रुपये देण्याचे ठरलेले होते. यानंतर 2007-08 मध्ये बुलढाणा जिल्ह्यामध्ये 20 शेती शाळांचे आयोजन करणार आहोत.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शासन त्या शेतकऱ्यांना 15 हजार रुपये देणार होते. ते सर्वच बोगस आहे. त्या ठिकाणी शेतकऱ्यांना बोलाविले नाही. शेतीशाळा झालेल्या नाहीत. कागदोपत्री बोगस सह्या करुन सर्व पैसे काढण्यात आलेले आहेत. त्याची संपूर्ण चौकशी करुन अधिवेशन संपण्याच्या आत माहिती पटलावर ठेवणार काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, अधिवेशन संपण्याच्या आधी माहिती पटलावर ठेवणे कठीण आहे परंतु येत्या पंधरा दिवसामध्ये जॉइन्ट डायरेक्टरच्या माध्यमातून चौकशी करण्यात येईल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

**पृ. शी.** : बालविकास प्रकल्प अधिकारी, खामगाव यांच्या कार्यालयाकडून अंगणवाडी मदतनीस या पदासाठी करण्यात आलेल्या नेमणुकांमध्ये झालेला गैरप्रकार

**मु. शी.** : बालविकास प्रकल्प अधिकारी, खामगाव यांच्या कार्यालयाकडून अंगणवाडी मदतनीस या पदासाठी करण्यात आलेल्या नेमणुकांमध्ये झालेला गैरप्रकार याबाबत श्री. पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हर्षवर्धन पाटील ( महिला व बालविकास मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "बालविकास प्रकल्प अधिकारी, खामगाव यांच्या कार्यालयाकडून अंगणवाडी मदतनीस या पदासाठी करण्यात आलेल्या नेमणुकांमध्ये झालेला गैरप्रकार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही नियम 93 अन्वयेची सूचना त्या ठिकाणी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या ज्या नियुक्त्या करण्यात आल्या त्यामध्ये जो घोळ झालेला आहे त्यासंदर्भात आहे. त्यातील एक उदाहरण या सूचनेच्या माध्यमातून दिलेले आहे. या निवेदनामध्ये असे सांगितले आहे की, एका नागरिकाने या अंगणवाडी सेविकेची तोंडी तक्रार केली होती. तिने राजीनामा दिलेला आहे, तिच्याकडून मानधन वसूल करण्यात येत आहे असे निवेदनात म्हटले आहे. माझा मूळ आक्षेप असा आहे की, अंगणवाडी सेविकेसाठी अर्ज करीत असताना तिने जे सर्टिफिकेट दाखल केले होते त्यामध्ये शाळा बदलण्याचे जे ट्रान्सफर सर्टिफिकेट दिले त्यामध्ये तिच्या जन्माचे वर्ष 1968 असे दाखविले आहे आणि त्यामध्ये असे लिहिले आहे की, शाळेच्या दाखल खारीज रजिस्टरप्रमाणे तिची जन्म तारीख 15.10.1968 आहे आणि दुसरे सर्टिफिकेट त्यांनी असे दिले आहे की, 1964 ते 1972 या कालावधीत ती शाळेत शिकत होती. म्हणजे तिचा जन्म 1968 ला झाला आणि त्याच सर्टिफिकेटमध्ये असे सांगितले आहे की, 1964 ते 1972 या कालावधीत ती शाळेत शिकत होती. एकाच सर्टिफिकेटमध्ये हे दिलेले आहे. एवढे फॉल्टी सर्टिफिकेट असताना तिची अंगणवाडी सेविका म्हणून नियुक्ती कशी झाली ? आपली जी कमिटी आहे त्या कमिटीने हे सर्टिफिकेट पाहिले नाही काय ? त्यांच्यासमोर हे सर्टिफिकेट दिले नाही काय ? असे फॉल्टी सर्टिफिकेट असताना तिची नियुक्ती झाली. एका नागरिकाने तोंडी तक्रार केली असे निवेदनात म्हटले आहे. त्यांनी लेखी तक्रार केलेली आहे. तिने राजीनामा दिला आहे आणि तिच्याकडून फक्त 4 हजार रुपये वसूल करण्याचे आदेश दिलेले आहेत. या ज्या नियुक्त्या केलेल्या आहेत त्यामध्ये अनेक नियुक्त्या बोगस आहेत. त्यापैकी हे एक उदाहरण आपल्या डोळ्यासमोर आणले आहे. अनेक नियुक्त्या बोगस आहेत. निकष बाजूला सारुन अंगणवाडी सेविकांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत. त्याची शासन चौकशी करणार काय ? जे दोषी असतील, फॉल्टी सर्टिफिकेट, बोगस सर्टिफिकेट असताना ज्यांनी अंगणवाडी सेविका म्हणून नियुक्ती केली त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितली ती गोष्ट खरी आहे. मी सुध्दा तो दाखला पाहिलेला आहे. त्या दाखल्यामध्ये स्पष्टपणे 27.8.1964 ते

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील .....

9.5.1972 एवढा शाळेचा कालावधी दाखविलेला आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे तिची जन्म तारीख आहे. मी सुध्दा दाखल उपलब्ध करुन घेतलेला आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात येईल. तिच्या संदर्भात जे मानधन दिले ते वसूल करुन संबंधित अधिकाऱ्यावर सुध्दा निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा पुन्हा आरोप आहे. हे असे एकच प्रकरण नाही. मी आपल्याला आणखी 10 अंगणवाडी सेविकांची प्रकरणे देऊ शकतो. ज्यांनी निकष पूर्ण केलेले नाहीत, खोटे दाखले लावलेले आहेत अशा अंगणवाडी सेविकांच्या नियुक्त्या झालेल्या आहेत. जे खरे लाभार्थी आहेत, ज्यांना मूळ गरज आहे त्यांना बाजूला ठेवून या नियुक्त्या केलेल्या आहेत. या संपूर्ण नियुक्त्यांची चौकशी शासन करणार काय ? ज्यांनी या नियुक्त्या केल्या त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, जवळपास 50 अंगणवाडी केंद्रातील सेविका आणि मदतनीस यांची रिक्त पदे भरण्यासाठी 1.3.2006 ला ज्या मुलाखती झाल्या त्या मुलाखतीच्या सर्व केसेसची तपासणी करण्यात येईल आणि त्यासंदर्भात कारवाई करण्यात येईल. दुसरे म्हणजे आता राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अंगणवाड्या मंजूर करीत आहोत. त्याचे जे निकष आहेत त्या निकषामध्ये आणि यामध्ये अशा प्रकारचे गैरप्रकार होऊ नयेत म्हणून या निवड प्रक्रियेमध्ये अमुलाग्र बदल करणार आहोत. कोणावरही अन्याय होणार नाही यासाठी निकषामध्ये बदल करणे आवश्यक आहे. त्याबाबतीत निश्चितपणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेडी येथील मायनिंग प्रकल्पात उत्खनन करताना सी.आर.झेड. कायद्याचे झालेले उल्लंघन

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेडी येथील मायनिंग प्रकल्पात उत्खनन करताना सी.आर.झेड. कायद्याचे झालेले उल्लंघन याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. धर्मरावबाबा आत्राम ( खनिकर्म राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी " सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेडी येथील मायनिंग प्रकल्पात उत्खनन करताना सी.आर.झेड. कायद्याचे झालेले उल्लंघन " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 14:35

श्री. परशुराम उपरकर : निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, खाणकामानंतर टाकावू माती काही ठिकाणी समुद्राच्या काठावर टाकल्याने अतिरिक्त जमीन तयार झाल्याचे आढळते. समुद्रामध्ये भराव टाकून ही जमीन तयार झालेली आहे. हे सीआरझेड कायद्याचे उल्लंघन नाही काय ? तसेच हत्तीची सोंड या ठिकाणी उत्खनन केल्यामुळे त्या विरोधात ग्रामस्थंनी आंदोलन केलेले आहे. त्या ठिकाणी करण्यात येणा-या ब्लास्टिंगमुळे तेथील तलावातील पाण्याचा साठा कमी होण्याची शक्यता आहे. तेव्हा हा पाण्याचा साठा कमी होऊ नये म्हणून तेथील ब्लास्टिंग बंद करण्यात येईल काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : त्या ठिकाणी सीआरझेडचे उल्लंघन झालेले नाही. तेथील तलावाच्या पाण्याचा शेतीसाठी उपयोग केला जातो. तेथील ब्लास्टिंग बंद केलेले असून यापुढेही ते करु देणार नाही.

श्री. परशुराम उपरकर : समुद्रामध्ये मातीचा भराव टाकून अतिरिक्त जमीन तयार केलेली आहे. हे सीआरझेडचे उल्लंघन नाही असे मंत्री महोदय कसे काय म्हणू शकतात ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : याबाबतीत भारतीय खाण ब्युरो यांच्याकडून माहिती घेण्यास सांगितलेले आहे. त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतर ताबडतोब कारवाई केली जाईल.

मेजर सुधीर सावंत : समुद्रामध्ये भराव टाकणे किंवा कोणतेही बांधकाम करणे हे सीआरझेड कायद्याचे उल्लंघन आहे. या प्रकरणी सीआरझेड कायद्याचे उल्लंघन झालेले आहे. त्यामुळे याप्रकरणी संबंधितावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : याबाबतीत भारतीय खाण ब्युरोकडून माहिती घेण्यास सांगितलेले आहे. त्यांच्याकडून रिपोर्ट आल्यानंतर ताबडतोबीने कारवाई केली जाईल.

---

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) मौजे खिरकंडी येथील प्राथमिक शाळागृहाची इमारत पार्ले बिस्किट कंपनीला देणे

**मु.शी.**: खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) मौजे खिरकंडी येथील प्राथमिक शाळागृहाची इमारत पार्ले बिस्किट कंपनीला देणे यासंबंधी श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे (ग्राम विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.जयंत प्र. पाटील, यांनी खालापूर तालुक्यातील (जि. रायगड), मौजे खिरकंडी येथील प्राथमिक शाळागृहाची इमारत पार्ले बिस्किट कंपनीला देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 14:35

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या सूचनेवरील निवेदन तीन वेळा तहकूब करुन ते आज वितरित करण्यात आलेले आहे. आधीच्या निवेदनामध्ये आणि आताच्या निवेदनामध्ये फरक आहे. त्याबाबत माझे काही म्हणणे नाही. प्रश्न असा आहे की, पार्ले बिस्किट कंपनीला सरपंच, ग्रामसेवक यांनी जिल्हा परिषदेची शाळा 10 लाख रुपयांस विकली. पार्ले कंपनीने असा कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. माझ्याकडे पार्ले कंपनीने जिल्हापरिषदेकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती आहेत. ही शाळा आश्वासित रोजगार योजनेअंतर्गत बांधलेली असून ती जिल्हा परिषदेमार्फत कुणालाही हॅण्ड ओव्हर होऊ शकत नाही. तेव्हा या प्रकरणी उच्चस्तरीय अधिका-यामार्फत चौकशी करण्यात येईल काय ? माझ्याकडे ज्या पत्रव्यवहाराच्या प्रती आहेत त्या मी माननीय मंत्री महोदयांकडे देतो. ही कागदपत्रे देखील त्यांनी विचारात घ्यावीत.

श्री. रणजित कांबळे : मौजे खिरकंडी येथे राहाणारे श्री. लक्ष्मण हरीबा जाधव यांनी त्यांची जागा ग्रामपंचायतीला दान दिली होती. त्या जागेवर आश्वासित योजनेअंतर्गत शाळेचे बांधकाम झालेले आहे. श्री. लक्ष्मण जाधव यांनी उर्वरित जागा पार्ले बिस्किट कंपनीला विकली. परंतु त्या बरोबर त्यांनी दान केलेली जागा देखील त्या कंपनीस विकली. एका बाजूला ही जागा ग्राम पंचायतीच्या ताब्यात असताना ती जागा पार्ले बिस्किट कंपनीला विकली. ग्राम पंचायतीच्या ताब्यात असलेली जागा विकणे योग्य नव्हते. तेथील सरपंचांनी असा ठराव पाठविलेला आहे की आम्ही लोकवर्गणीतून वेगळी शाळा बांधू. त्या प्रमाणे शाळेचे बांधकाम झालेले आहे.

...नंतर कु. खर्चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे......

त्यांनी जागा घेतली त्याच्या परवानगीसाठी बी.डी.ओ.कडून तो प्रस्ताव सी.ई.ओ.पर्यंत आलेला होता. यावर सी.ई.ओ.चे असे मत होते की, आम्ही परवानगी देऊ पण जागा किंवा जागेची मालकी ही जिल्हापरिषदेच्या नावावर राहिली पाहिजे त्यच्यानंतर ती जी शाळेची बिल्डींग होती ती तेथील ग्रामस्थांनी पाडली असाही चौकशीअंती अहवाल आमच्याकडे आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील ज्याप्रमाणे विनंती करीत आहेत की, त्यांच्याकडे असलेल्या कागदपत्रांच्या आधारे एक सविस्तर उच्चस्तरीय चौकशी आम्ही करावी. यासंदर्भात कमिशनरच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांची जी कागदपत्रे आहेत किंवा त्यांना विश्वासात घेऊन त्यांच्यासोबत यासंदर्भात चर्चा करुन ती कागदपत्रे तपासून आणि त्याच्या आधारावर चौकशी करु मग या चौकशी अंतर्गत जर कोणी दोषी आढळले तर मग तो सरपंच,ग्रामपंचायत सदस्य असो आम्ही त्यापैकी कोणालाही पाठिशी घालणार नाही त्याच्यावर सविस्तर चौकशी करुन आम्ही ॲक्शन घेऊ.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेल्या उत्तराने माझे समाधान झालेले आहे परंतु माझी यासंदर्भात एकच विनंती आहे की, ही जी पारले कंपनी आहे, ती जागा तेथील कलेक्टरला सांगून शासनाकडे किंवा जिल्हापरिषदेकडे घेण्याची तरतूद शासन करेल का ?

श्री.रणजित कांबळे : पारले कंपनीला जी जागा दिलेली आहे ती जागा एकूण 1500 चौरसफुट असून ती जागा श्री.लक्ष्मण जाधव नावाच्या ज्या व्यक्ती आहेत त्यांची विक्रीपात्र जागा आहे या जागेसंदर्भातील केस कोर्टमध्ये चालू आहे. या जागेवर पारले कंपनीचे बांधकाम झालेले तरीदेखील आम्ही यासंदर्भातील सर्व तपशील तपासून घेऊ व समजा जर स्थगिती देऊ शकलो तर देऊ परंतु मला वाटत नाही की, सध्याच्या स्थितीमध्ये याचे जे बांधकाम झालेले ते या ....जागेमध्ये आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय,या ठिकाणी एक गोष्ट स्पष्ट होते की, ती जमीन खाजगी मालकाची होती परंतु जिल्हापरिषदेला ती बक्षीस - पात्र करुन दिली होती त्यावर जिल्हापरिषदेचा मालकी हक्क होतो त्यामुळे ही इमारत ज्यांनी पाडली त्यांच्यावर तुम्ही पोलीस केस दाखल करणार आहात का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हे दान जिल्हापरिषदेला केलेले नसून ग्रामपंचायतीला केलेले आहे पण त्या दान केलेल्या जागेवर शासकीय खर्चाने शाळेचे बांधकाम केलेले आहे आणि ही बांधकाम झालेली शाळेची इमारत तेथील ग्रामस्थांनी पाडलेली आहे.

श्री.रामनाथ मोते : यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर शासन पोलीस केस दाखल करणार आहात का ?

श्री.रणजित कांबळे : Suggestion for action.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



JPK/ MAP/ SBT/ प्रथम श्री.शिगम एम. ...... 14:40

**पृ.शी.**: विदर्भ मराठवाडयातील निम्न वैनगंगा प्रकल्प निम्न पैनगंगा प्रकल्प निम्न प्रकल्प निर्मिती स्थळी जमीन मोजणीसाठी गेलेल्या कर्मचारी, अधिका-यांना व पोलिसांना आंदोलकांच्या जमावाकडून जबर मारहाण होणे.

**मु.शी.**: विदर्भ मराठवाडयातील निम्न वैनगंगा प्रकल्प निम्न पैनगंगा प्रकल्प निम्न प्रकल्प निर्मिती स्थळी जमीन मोजणीसाठी गेलेल्या कर्मचारी, अधिका-यांना व पोलिसांना आंदोलकांच्या जमावाकडून जबर मारहाण होणे याबाबत श्री.श्रीकांत जोशी,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय,सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी "विदर्भ मराठवाडयातील निम्न वैनगंगा प्रकल्प, निम्न पैनगंगा प्रकल्प, निम्न प्रकल्प निर्मिती स्थळी जमीन मोजणीसाठी गेलेल्या कर्मचारी, अधिका-यांना व पोलिसांना आंदोलकांच्या जमावाकडून जबर मारहाण होणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

3D - 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सदर निवेदनामध्ये आमचीही नावे जोडण्यात यावीत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या निवेदनामध्ये आमचीही नावे घालण्यात यावीत.

श्री.नितीन गडकरी : या निवेदनामध्ये माझे व सन्माननीय सदस्य प्रा. बी . टी. देशमुख, सर्वश्री.व्ही.यू.डायगव्हाणे,मधुकर सरपोतदार,पांडुरंग फुंडकर,दिवाकर रावते यांची नावे सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांच्या नावासमवेत घालण्यात यावीत.

**उपसभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी सदर निवेदनावर जरुर प्रश्न विचारावे. माझा आपल्यावर पूर्ण विश्वास आहे. नावे जोडण्याबाबत काय कार्यवाही करावयाची ते नंतर बघू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





श्री.नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी अतिशय गंभीर गुन्हा घडला तो असा की, पाटबंधारे खात्याचे अधिकारी ज्यावेळी त्या ठिकाणी जमीन मोजमाप करण्याकरिता गेले त्यावेळी तेथील आंदोलकांच्या जमावाने त्यांना फार वाईट रितीने मारहाण केली आणि त्यांचे कपडे काढले

गेले आणि त्यांचे फोटोदेखील वर्तमानपत्रात छापून आले होते. मी यवतमाळ येथे गेलो असता तेथील लोक मला भेटले जर त्यांना माहित होते की, तेथील जनता एवढी प्रक्षुब्ध झालेली आहे तर त्यांना पूरेसे पोलीस प्रोटेक्शन का दिले नाही ? वर्तमानपत्रामध्ये मारहाण झालेल्या व कपडे काढून नंगे उभे केलेल्या अधिका-यांचे फोटो व त्यांच्या बाजूला उभे राहिलेले पोलीस असे या दोघांचे फोटो अशा रितीने छापले होते की, जणू काही एखाद्या मंत्र्यांच्या बाजूला त्यांचे चेले - चपाटे उभे राहतात तसे ते पोलीस त्या अधिका-यांच्या बाजूला फोटोमध्ये उभे राहिले होते. हे फार वाईट आणि दुर्दैवी आहे या प्रकरणामध्ये हे असे का घडले ? आणि याबाबत पोलिसांनी काय कारवाई केली ?

यानंतर श्री.कानडे.....

`

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, घटना घडली त्याठिकाणी एकूण 27 पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी देण्यात आले होते. ज्यावेळी संयुक्त मोजणी सुरु होती त्यावेळी एकदम तीन-साडेतीन हजार लोकांचा जमाव तेथे आला आणि तो डोंगरावरुन दगडफेक करु लागला. त्यातील 300-350 लोक मोजणी सुरु होती तेथे खाली आले आणि त्यांनी मारामारी सुरु केली. पोलिसांनी त्यावेळी समयसूचकता दाखवून दोघांमध्ये जास्त अनर्थ घडू नये म्हणून लोकांना वाचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. जे दोषी आहेत त्यांच्यावर गुन्हा दाखल केलेला असून गुन्हयाचा तपास सुरु आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मा.मंत्रिमहोदय सांगतात तेवढी साधी आणि सरळ गोष्ट नाही. साऱ्या राज्यामध्ये या लोकांनी जिल्हयाच्या ठिकाणी विभागीय आयुक्तांच्या कार्यालयावर मोर्चा काढून सरकारवर आरोप केलेला आहे. त्यांनी आरोप असा केला आहे की, उपस्थित पोलिसांनी आंदोलकांची संख्या पाहून पुरेसे पोलीस बळ मागविण्याऐवजी त्यांना मरणाच्या दारात ठेऊन पळ काढला. ही बाब अभियंत्यांना क्षेत्रीय काम करण्यास बाधा पोहोचविणारी आहे. पुरेसे पोलीस बळ नसेल तर अभियंत्यांना क्षेत्रीय कामे बंद करावी लागतील. ही काय पध्दत आहे ? राज्याचे राज्यपाल देशाच्या पंतप्रधानांना पत्र लिहितात आणि सांगतात की 10 वर्षापासून हा प्रकल्प रखडला आहे त्याला तुम्ही मान्यता द्या. 1996 ची मूळ मान्यता आहे. पर्यावरणाची मान्यता आता आली आणि वन खात्याची मान्यता आता येत आहे. राज्यपालांनी पत्र दिल्यानंतर पंतप्रधान पॅकेज अंतर्गत या प्रकल्पाची मोजणी जर सरकारला करता येत नसेल तर दुर्दैवाची गोष्ट आहे आणि तीव्र निषेध करण्यासारखी गोष्ट आहे. या सर्व अभियंत्यांनी आपणांला नोटीस दिलेली आहे की शासनाने योग्य कलमाखाली कारवाई केलेली नाही. सा-या राज्यभर पाहिले तर फोटोमध्ये पट्टयांनी मारले जात आहे. तेव्हा योग्य कलमाखाली कारवाई केली नाही ही गोष्ट खरी आहे काय आणि फोटोमध्ये जे लोक दिसत आहेत त्यांना तरी अटक केलेली आहे काय

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आरोपींवर योग्य कलमे लावलेली आहेत. कलम 307,395,333,353,323,427 आहे त्याचप्रमाणे 323 आहे आणि 506 आहे. 120 ब(क) आहे.त्याचप्रमाणे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे कलम 3,4 आणि 5 आहे. मुंबई पोलीस अधिनियम 34(1) एवढी कलमे लावलेली आहेत. आतापर्यंत 11 लोकांना अटक करण्यात आलेली आहे आणि उर्वरित लोकांना अटक करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, एफआयआरमध्ये ज्या आरोपींची नांवे आहेत त्यांना तरी अटक करण्यात आलेली आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, एकूण जे आरोपी आहेत त्यापैकी 11 आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. उर्वरित आरोपींना अटक करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.

------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील बंद झुणका-भाकर केंद्रांची जागा
शासनाने ताब्यात घेतल्याबाबत

**मु.शी.**: राज्यातील बंद झुणका-भाकर केंद्रांची जागा
शासनाने ताब्यात घेतल्याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर,
नितीन गडकरी,जगदीश गुप्ता,वि.प.स.यांनी दिलेली
नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुनील तटकरे (अन्न व नागरीपुरवठा मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी व जगदीश गुप्ता यांनी "राज्यातील बंद झुणका-भाकर केंद्रांची जागा शासनाने ताब्यात घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-----

......4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनानंतर**

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या निवेदनासंबंधी माझा हरकतीचा मुद्दा आहे. झुणका-भाकर केंद्रासंबंधी शासनाने जे निवेदन केलेले आहे ते अत्यंत भयंकर आहे. यात लिहिलेले आहे की......

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ SBT/ 14:50

नियम 93 चे निवेदन क्रमांक-10.........

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण आदेश दिले, परंतु सन्माननीय मंत्री श्री.तटकरे म्हणाले की, माझ्यापर्यंत आदेश आले नाहीत.

श्री.अरविंद सावंत : मी सभागृहात विचारले होते, माननीय उपसभापतींनी निर्देश दिले त्यावर काय कारवाई केली? मंत्रीमहोदय म्हणाले की, मला माहिती नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हे उच्चार आपला अपमान करणारे आहेत. ते आपण रेकॉर्डवरुन काढून टाकावे. ही फार गंभीर बाब आहे. सभागृहाचे कामकाज पुढे चालवू नये. अन्यथा आपण या पदाचा राजीनामा द्यावा. ही कृती चांगली नाही. आपल्या प्रतिष्ठेकरिता सांगतो. या निवेदनामध्ये म्हटले आहे की, झुणका भाकर योजने संदर्भातील पार्श्वभूमी व विधान परिषदेतील उपस्थित लक्षवेधीवरील चर्चेदरम्यान माननीय सभापती महोदयांनी दिलेले आदेश व सभागृहास आश्वासित केल्यानुसार प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आला होता. याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यात अस्तित्वात असलेली 801 झुणका भाकर केंद्रे रद्द करुन सदर केंद्राच्या जागा दि.27 जून, 2000 च्या शासन निर्णय व शासन परिपत्रकात आदेशीत केल्याप्रमाणे ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना दि.6 जून, 2007 च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत. सभापती महोदय, यानंतर या सभागृहात आपण स्वत: आदेश दिले. आम्ही आपले स्वागत केले, अभिनंदन केले याचा निवेदनामध्ये उल्लेख नाही. तुम्ही आदेश दिल्यानंतरही सरकार ऐकायला तयार नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : कॅबिनेटची बैठक झाल्यानंतर सभागृहात माननीय सभापतींनी निर्णय दिला होता.

श्री.नितीन गडकरी : तुमच्या आदेशाला या सरकारने केराची टोपली दाखविली आहे. तुमच्या पदाचा अवमान केला आहे. तुम्ही दिलेले आदेश पाळायला सरकार तयार नाही. तुम्ही दोन-तीनवेळा सांगितले. एक तर आपण आदेश देऊ नयेत किंवा आपला अवमान करणाऱ्या सरकारचा निषेध म्हणून राजीनामा द्यावा. तुम्ही आदेश दिल्यानंतर देखील सरकार त्याची दखल घेत नाही ही मुजोरी आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 चे निवेदन क्रमांक-10.........

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्यावेळी नियम 93 अन्वये सूचना दिली त्यावेळी आपण आदेश दिले नव्हते. आदेश देण्यापूर्वीच कॅबिनेटची बैठक झाली होती. या ठिकाणी निवेदनात म्हटले आहे की, "झुणका भाकर योजने संदर्भातील पार्श्वभूमी व विधान परिषदेतील उपस्थित लक्षवेधीवरील चर्चेदरम्यान माननीय सभापती महोदयांनी दिलेले आदेश व सभागृहास आश्वासित केल्यानुसार प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आला होता." आपण आदेश परवाच्या दिवशी दिले होते आणि काल संध्याकाळी 6.00 वाजेपर्यंत निवेदन करण्यास सांगितले होते. आपण आदेश देऊन 48 तासाच्या आत केंद्रांचे सील काढावे असे सांगूनही त्याची अंमलबजावणी झाली नाही म्हणून संध्याकाळपर्यंत निवेदन करण्यास सांगितले होते.

**उपसभापती** : या संदर्भात माझा आणि माननीय सभापतींचा आजच विचारविनिमय झालेला आहे. या संदर्भात शासनाच्या वतीने माननीय सभापतींच्या दालनामध्ये सोमवारी निश्चित बैठक बोलावण्यात येणार आहे. शासनाच्या वतीने माननीय मुख्यमंत्री, अन्न व नागरी पुरवठा मंत्री, सभागृहाचे विरोधी पक्षनेते, गटनेते आणि मी स्वत: एकत्रित बसून या प्रश्नावर कायमस्वरुपी मार्ग काढण्याकरिता ही बैठक सोमवार, दिनांक 30 जुलै, 2007 रोजी घेण्याचे माननीय सभापती महोदयांनी मला सूचित केले होते. आता माननीय सभापती सभागृहात उपस्थित असते तर त्यांनी तसे घोषित केले असते. परंतु हे निश्चित आहे की, यावर मार्ग काढण्याच्या संदर्भात ज्या दिवशी या ठिकाणी राष्ट्रपतीपदाची निवडणूक होती त्या दिवशी सन्माननीय श्री.मनोहर जोशी हे मुख्यमंत्र्यांकडे आले होते. त्यांनीच हा विषय माझ्याकडे उपस्थित केला. ते म्हणाले होते की, डावखरे साहेब, तुम्ही चांगला निर्णय घेतला. माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय सभापतींसमोर काल सांगितले की, कोर्टाच्या काही अडचणी आलेल्या आहेत. हा निर्णय नक्की चांगला आहे. परंतु त्याची अंमलबजावणी करायची झाली तर त्याकरिता पुन्हा एकदा पुनर्विचार करावा लागेल. मला वाटते, घाईगर्दीने कोणतीही टीका न करता सोमवारी जी बैठक होणार आहे त्या बैठकीमध्ये आपण एकत्र बसून मार्ग काढू. तोपर्यंत मी हे निवेदन राखून ठेवतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपले मन मोठे आहे. परंतु राष्ट्रपतीपदाची निवडणूक झाली त्या दिवशी आपण आदेश दिले तरी त्याची दखल सरकार घेत नाही.

(नंतर श्री.जुन्नरे....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

सभापती महोदय, झुणकाभाकर केंद्राच्या संदर्भात आपण जे निदेश दिलेले आहेत त्यासंदर्भात निवेदनात काहीच उल्लेख करण्यात आलेला नाही. माननीय सभापती महोदयांनी जे आदेश दिलेले आहेत त्या आदेशाच्या विरोधात अशा प्रकारे वक्तव्ये करणे बरोबर नाही. खरे म्हणजे यासंदर्भात माननीय तटकरे साहेबांना उभेच नाही तर त्यांना बेंचवर उभे केले पाहिजे. सभागृहामध्ये माननीय सभापती महोदयांचा अशा प्रकारे अवमान करणे योग्य नाही. सभागृह काय आहे, सभागृहाची काय परंपरा आहे, सभागृहात कशा प्रकारे कामकाज चालते, सभागृहाचे नियम काय आहेत हे मंत्री महोदयांना माहिती नाही काय ? माननीय सभापती महोदयांच्या निर्णयाची अशा प्रकारे अवहेंलना करणे योग्य नाही. माननीय सभापती महोदय, आपण मोठया मनाचे आहात.

**उपसभापती** : मी मनाचा मोठा आहे असे तुम्हाला वाटते ना. तर मग तुम्ही माझा फोटो मोठा करुन त्याला हार घाला. परंतु यासंदर्भात एक गोष्ट नक्की सांगू इच्छितो की, हे निवेदन मी राखून ठेवतो. अशा प्रकारे जेव्हा निवेदन तयार केले जाते त्यावेळेस माननीय मंत्रीमहोदयांनी स्वत: निवेदन डोळयाखालून घालणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य पिकनिकसाठी सभागृहात आलेले नाहीत. या सभागृहात जेव्हा सभापती निर्देश देतात तेव्हा त्यासदर्भात प्रशासनामध्ये काम करणा-या अधिका-यांनी त्याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. सभागृहात जी काही चर्चा होत असते त्याचे रेकॉर्ड तयार होत असते व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही केली जात असते. या ठिकाणी सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना केल्या होत्या त्यासंदर्भात मी हे निर्देश दिलेले होते की, शासनाने यासंदर्भात पुनरर्विचार कराव. झुणकाभाकर केंद्र हा गरीब लोकांच्या रोजीरोटीचा प्रश्न आहे. झुणकाभाकर केंद्र चालविण्या-या काही लोकांनी गैरफायदा घेतला असेल. अनेक योजनेच्या संदर्भात काही लोक गैरफायदा घेत असतात. हे प्रकार जवळपास सर्वच योजनेत होत असतात. परंतु असे गैरप्रकार जेथे झालेले आहेत त्यासंदर्भात आपण कारवाई करु शकतो परंतु झुणकाभाकर केंद्र चालविणारे सर्वच चोर आहेत असे म्हणणे योग्य होणार नाही. त्यामुळे सर्वच झुणकाभाकर केंद्र रद्द करणे बरोबर होणार नाही. या ठिकाणी मी जे निर्देश दिलेले आहेत त्याचा न्यायालयात सुध्दा उपयोग होऊ शकतो. या ठिकाणी मी जे

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .....

निर्देश दिलेले आहेत व जी चर्चा झालेली आहे ती आपण पाहिली तर असे दिसून येईल की, या सार्वभौम सभागृहात या विषयाच्या संदर्भात दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी समर्थन केलेले आहे. ज्यावेळेस मी निर्देश दिले त्यावेळी विरोधी पक्षाकडून तसेच सत्ताधारी पक्षाकडून या निर्णयाचे स्वागत करण्यात आले होते, पाठिंबा देण्यात आला होता. असे असतांना या सार्वभौम सभागृहात झ ुणकाभाकर केंद्राच्या संदर्भात जे निर्देश दिले गेले त्याचा दुरान्वयाने सुध्दा निवेदनात उल्लेख करण्यात आला नाही हा सदनाचा अपमान आहे. हायकोर्ट, सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाचे आपण दाखले देता परंतु सभागृहात दिलेल्या निर्देशाचा निवेदनात साधा उल्लेख करत नाही हे योग्य नाही. आपण त्या खात्याचे कार्यक्षम मंत्री आहात, आपल्या हाताखाली काम करणारे अधिकारी जर अशाप्रकारे काम करणार असतील तर यासंदर्भात निश्चितपणे दखल घ्यावी लागेल. अन्न व नागरी पुरवठा विभागात सर्व काही आलबेल आहे असे मानण्याचे काही कारण नाही. या निवेदनाच्या संदर्भात मी अन्न व नागरी विभागाच्या मंत्र्यांना जबाबदार धरत नाही. परंतु ज्या अधिका-यांनी संबंधित निवेदन तयार केले त्यांच्यावर आपण त्या खात्याचे मंत्री म्हणून काय कारवाई करणार आहात?

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापती महोदय, निवेदनात म्हटले आहे की, झुणकाभाकर केंद्रे ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. परंतु सभापती महोदय, निर्देश दिल्यानंतरही झुणकाभाकर केंद्र बुलडोझर लावून पाडले जात आहेत. या ठिकाणी निवेदन झाल्यानंतर झुणकाभाकर केंद्र पाडण्याचे काम थांबवले पाहिजे.

**उपसभापती** : आधीच्या प्रश्नाच्या संदर्भात जशी त्या अधिका-यावर लोकांकडून कारवाई झ ाालेली आहे तशाच प्रकारची कारवाई तुमच्या अधिका-यांवर होईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी माननीय मंत्रीमहोदय श्री. सुनील तटकरे साहेबांच्या संदर्भात असे वक्तव्य केले आहे की, "त्यांना उभेच नाही तर त्यांना बेंचवर उभे केले पाहिजे." हे वक्तव्य कामकाजातून काढून टाकण्यात यावे.

...3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : झुणकाभाकर केंद्राच्या संदर्भात मी पोटतिडकीने विचार मांडलेले आहेत. या ठिकाणच्या ब-याच सन्माननीय सदस्यांनी गरिबीचे चटके सोसले असून मी स्वत: गरिबीचे चटके सोसले आहेत. यासंदर्भात मी आपल्याला एक उदाहरण देतो की, माझी आई ठाणे रेल्वेस्टेशनच्या बाहेर टोपलीत भाजी घेऊन विकत असे, ज्यावेळी नगरपालिका किंवा पोलीस हे हातगाडयांवरील किंवा टोपलीतील माल घेऊन जात असे. त्यावेळी मी माझ्या आईच्या डोळयातील अश्रू पाहिलेले आहेत. त्यावेळी आमच्या घरात तीन-तीन दिवस अन्न शिजवले जात नसे. गरीबीचे चटके मी स्वत: सहन केलेले आहेत. या ठिकाणी पक्षीय अभिनिवेश ठेवून निर्देश दिले गेले नसून गरीब लोकांची काय परिस्थिती आहे ते सगळे चित्र डोळयासमोर ठेवून निर्णय दिलेला आहे. मी सामाजिक जाणीव ठेवून निर्देश दिलेले होते. हा निर्देश देण्यामागे या पदाचा गैरफायदा घेणे किंवा या आसनाचा फायदा घेणे असा माझा मुळीच उद्देश नव्हता.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .......

वा कोणताही अभिनिवेष नव्हता. ज्या एका कारणाकरिता आपण सर्वजण जनसामान्यांच्या हितासाठी झटतो, गरिबांच्या घरात चूल पेटली पाहिजे असे आपण याठिकाणी सांगतो. परंतु जेव्हा आपण अशाप्रकारची कृती करीत नाही तेव्हा स्वत:ची स्वत:ला लाज वाटू लागते. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की, "आपल्या आदेशाचा अवमान झालेला आहे, आपण उपसभापती पदाचा राजीनामा द्यावा." मी उपसभापती पदाचा राजीनामा देण्यास कधीही तयार आहे. मी पदापेक्षा पद श्रेष्ठ समजतो. एकवेळ आपण माझ्या आदेशाचा अवमान केला तरी चालेल, पण या पदाचा अवमान करु नका. कारण या ठिकाणावरुन दिलेला निर्णय हा सर्वसामान्यांचा आवाज असतो,तो कुणा एका व्यक्तीचा आवाज नसतो. मला माननीय सभापतींनी जे सूचित केले ते मी सभागृहाला सांगितलेले आहे. माननीय सभापतींच्या दालनात या विषयावर सांगोपांग चर्चा होऊ द्यावी. परंतु त्या अगोदर अशाप्रकारची चर्चा करुन कोणत्याही निर्णयाप्रत येण्याआधीच तहसिलदार नोटीस बजावतो हे योग्य नाही. या सभागृहात माननीय सभापती किंवा उपसभापती किंवा तालिका सभापती यापैकी कोण निर्देश देतात याला महत्व नाही. या आसनावरुन जो निर्णय दिला जातो तो सर्वसामान्याच्या हिताचा असतो. या आसनावरुन दिलेल्या आदेशाची दखल न घेता एक तहसिलदार ताबडतोब नोटीस बजावतो. त्यामुळे या सभागृहाच्या निर्णयाचा अवमान होतो. आपण कार्यक्षम मंत्रिमहोदय आहात. अशाप्रकारची कृती आपल्या अधिकाऱ्यांकडून होत असेल तर त्यास तो अधिकारी जबाबदार की आणखी कोण जबाबदार आहे हा देखील संशोधनाचा विषय होऊ शकतो. किमानपक्षी आज माझी आपणाला सूचना आहे की, आपण सर्व नोटीस थांबवाव्यात. माननीय सभापतींच्या दालनात जी चर्चा होईल त्याचा संपूर्ण अहवाल सभागृहापुढे ठेवू आणि प्रत्यक्ष कृती करण्याकरिता जो काही निर्णय त्याठिकाणी होईल तो आपण स्वीकारु.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या विषयावर जी चर्चा झालेली आहे त्याबाबत आपण भावना व्यक्त केलेल्या आहेत. आपल्या स्थानाबद्दल आणि या सदनाच्या अधिकाराबद्दल कोणाच्याही मनात अनादर असण्याचे कारण नाही. या विषयावरील निवेदन शुक्रवार दिनांक 20 जुलै, 2007 रोजी होते. माझी निवेदनास उत्तर देण्याची तयारी होती. परंतु त्यावेळी माननीय

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.........

सभापती यांनी सांगितले की, सोमवार, दिनांक 23 जुलै रोजी निवेदन करावे. त्यावेळी मी माननीय सभापतींनी सांगितले होते की, "सोमवार ऐवजी मी मंगळवार, दिनाक 24 जुलै रोजी निवेदन करीन". सभापती महोदय, शुक्रवारी जे निवेदन करणार होतो ते याच पध्दतीने तयार केले होते. त्या संदर्भात जी काही प्रश्नोत्तरे होतील त्यास उत्तरे देण्याची माझी तयारी होती. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सांवत यांनी काल सुध्दा हा विषय उपस्थित केला होता. परंतु मी या विषयावर मंगळवार, दिनांक 24 जुलै रोजी निवेदन करीन असे सांगितले होते. सभापती महोदय, आपण जे निर्देश दिले होते ते मला वर्तमानपत्रातून समजले. तसेच या निर्देशासंबंधी मला काही चॅनेल्सनी सुध्दा विचारले होते. आपले आदेश मला विधानमंडळ कार्यालयाकडून........ ( अडथळा ) मी जे बोलत आहे ते खरे आहे. मी रेकॉर्डवर बोलत आहे याची मला जाणीव आहे. मी सुध्दा सभागृहात दीर्घकाळ कामकाज केलेले असल्यामुळे मला देखील कामकाजाची माहिती आहे. तेव्हा मी पूर्ण माहिती घेऊनच बोलत आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, श्री. नितीन गडकरी, श्री. मधुकर सरपोतदार, श्री.दिवाकर रावते या ज्येष्ठ सदस्यांचे मार्गदर्शन घेऊन काम करणारा मी कार्यकर्ता आहे. राजकीय मार्गदर्शन नाही. कार्यप्रणालीमध्ये काम करीत असताना आपण नेहमीच एकमेकांचे मार्गदर्शन घेत असतो. तेव्हा मी जे बोलत आहे ते रेकॉर्डवर बोलत आहे. मी जे बोलतो आहे त्याचे मला भान आहे, त्यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. सभापती महोदय, आपले आदेश मला गुरुवार, दिनांक 19 जुलै रोजी सायंकाळी उशिरा प्राप्त झाले. त्या आदेशात म्हटले होते की, 48 तासात निवेदन करावे. त्या दिवशी मंत्रिमंडळाची बैठक होती. परंतु माझी तब्बेत ठीक नसल्यामुळे मी त्या बैठकीला उपस्थित राहू शकलो नाही. मला आपल्या निदर्शनास एक गोष्ट नम्रपणे आणावयाची आहे की, मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानंतर त्यावर माझा कोणाताही अधिकार राहत नाही, याची कल्पना श्री.नितीन गडकरी तसेच श्री.दिवाकर रावते यांनी मंत्रिमंडळात काम केलेले आहे त्यांना असेलच. सभागृहामध्ये व्यक्त झालेल्या भावना आणि मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय यामध्ये काही फरक असेल तर ती बाब पुन्हा मंत्रिमंडळापुढे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.........

आणण्याखेरीज विभागाच्या प्रमुखाला काही अधिकार उरत नाही हे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी आणि श्री.दिवाकर रावते हे त्यांच्या अनुभवावरुन सांगू शकतील. मागील अधिवेशनात जी चर्चा झाली त्यावेळी माननीय सभापतींनी जे निर्देश दिले होते. त्यावेळी सुध्दा मी सांगितले होते की, सन्माननीय सदस्यांच्या भावना मी मंत्रिमंडळात मांडतो. मंत्रिमंडळाने जो निर्णय घेतला तो निवेदनात नमूद केलेला आहे. यामध्ये आपला अनादर करणे अशी भावना असण्याचे काही कारण नाही. त्यावेळेला जे आदेश दिले होते, ते आदेश सभागृहाच्या समोर आणावे एवढाच हेतू होता.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला एक विनंती करावयाची आहे. मला माननीय मंत्रिमहोदयांवर कुठलाही आक्षेप घ्यावयाचा नाही. परंतु ही गोष्ट खरी आहे की, याबाबत मागच्यावेळी चर्चा झाली होती, त्यांनीही मान्य केले आणि आपणही निर्देश दिले, यासंबंधी माननीय मंत्रिमहोदय मंत्रिमंडळासमोर गेले, मंत्रिमंडळाने त्यांचा तो व्हयू रिजेक्ट केला. मंत्रिमंडळाचा निर्णय होऊन तो माननीय मंत्रिमहोदयांकडे आला, इथपर्यंत सगळे बरोबर आहे. मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर आम्ही सगळयांनी मिळून पुन्हा सभागृहात चर्चा उपस्थित केली. यासंदर्भातील मंत्रिमंडळाचा निर्णय नकारात्मक झाला अहे, हे मान्य आहे. सरकार म्हणून कॅबिनेट सुप्रिम आहे, हेही आम्हाला मान्य आहे. पण कॅबिनेटच्या नियमांबाबत मी एक गोष्ट आपल्याला सुचवू इच्छितो, ती आपण तपासून पहावी. या सभागृहाची जी भींत व कम्पाऊँड वॉल आहे, या कम्पाऊँड वॉलमध्ये विलासराव देशमुखांचे राज्य नाही, या कम्पाऊँड वॉलच्या आतमध्ये माननीय सभापतींचे राज्य आहे, हे सार्वभौम सभागृह आहे. कॅबिनेटने एखादा निर्णय जरी घेतला असला तरी तो सरकारवर व मंत्र्यांवर बंधनकारक आहे. पण हा निर्णय माननीय सभापतींवर बंधनकारक नाही. कारण कॅबिनेटने निर्णय घेतल्यानंतर देखील या सभागृहाचे सार्वभौम सभापती म्हणून पुन्हा आम्ही चर्चा उपस्थित केली. त्यावेळी आम्हाला याची माहिती होते की, आपण याबाबतीत पॉझीटीव्ह ॲप्रोचने मंत्रिमंडळासमोर गेला होतात परंतु तुमच्या कॅबिनेटने हे रिजेक्ट केले होते, हे आम्हाला माहिती होते. तरीही याबाबत दाद मागण्याकरिता आम्ही माननीय सभापतींकडे आवाज उचलून माननीय सभापतींकडे विनंती केली. मला या प्रसंगातून या सभागृहाचे उपसभापती श्री.वसंत डावखरे यांच्या एका वेगळया व्यक्तिमत्वाचे दर्शन घडले. त्यांनी आज जी गोष्ट सांगितली त्यामुळे माझ्या डोळयात पाणी आले. त्यांनी सांगितले की, माझी आई भाजी विकत असताना ती टोपली उचलून नेल्यानंतर 3 दिवस त्यांच्या घराची काय अवस्था झाली, ती त्यांनी याठिकाणी मांडली. ते या सभागृहाचे सार्वभौम सभापती असून ते संवेदनशील आहेत. म्हणून या लोकांवर बुलडोजर्स् फिरवण्याच्या कारवाया झाल्या, म्हणून त्यांनी यात कॉन्सेश डिसीजन घेतला. यातील पहिला लिगल मुद्दा असा की, कॅबिनेटने निर्णय घेतल्यानंतरही, आपला प्रस्ताव रिजेक्ट केल्यानंतरही या सभापतींना या सभागृहामध्ये निर्देश देण्याचा अधिकार आहे का ? हा प्रश्न आपण उपस्थित केला.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

त्यादिवशी श्री.गुरुनाथ कुलकर्णी..(अडथळा) आपण म्हणालात की, कॅबिनेटचा निर्णय सुप्रिम आहे, त्यामुळे मी काही करु शकत नाही.

श्री.सुनील तटकरे : कॅबिनेटचा निर्णय मला बंधनकारक आहे, ते मी सांगितले.

श्री.नितीन गडकरी : बरोबर आहे. तुम्हाला बंधनकारक आहे, हे मला मान्य आहे.

श्री.सुनील तटकरे : तो निर्णय सभागृहाच्या निदर्शनास आणणे हे माझे काम आहे. मी मघाशी तेच म्हणालो की, आपण आणि सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी मंत्रिमंडळात काम केलेले आहे, त्यामुळे आपणांस या सगळया निर्णयांची चांगली माहिती आहे.

श्री.नितीन गडकरी : मला आपले म्हणणे मान्य आहे. कॅबिनेटचा निर्णय आपल्यावर बंधनकारक आहे. हा निर्णय रिजेक्ट करण्याचा कॅबिनेटला अधिकार आहे, तो जो निर्णय रिजेक्ट केला, तो आपल्यावर बंधनकारक आहे, इथपर्यंत इतिहास संपला. येथून दुसरा अंक सुरु झ ालेला आहे. त्या अंकामध्ये आम्ही पुन्हा सभागृहामध्ये उभे राहून सभापतींकडे न्याय मागितला की, कॅबिनेटने निर्णय रद्द केला तरी सभापती महोदय, हे मानवतेच्या दृष्टीने बरोबर नाही, आज ते बुलडोझर्स् फिरवत आहेत, दुकाने जप्त होत आहेत, त्यामुळें याबाबत आम्ही माननीय सभापतींकडे न्याय व संरक्षण मागितले. पहिला अंक संपल्यानंतर दुसऱ्या अंकामध्ये, या सभागृहात या विषयावर चर्चा झाली, त्यावेळी माननीय मंत्रिमहोदय आपण सभागृहात उपस्थित नव्हता. त्यावेळी याविषयी बोलत असताना, या सभागृहामध्ये माननीय डावखरे साहेबांनी आपल्या संवेदनशीलतेचा परिचय देऊन सांगितले की, मी एक गरीब व्यक्ती आहे, मी यातना भोगून गेलो आहे, आज मी या सभापतीस्थानी स्थानापन्न झालो आहे, मी माझ्या अधिकारात सरकारला असे निर्देश देत आहे की, ताबडतोब ज्यांची कुलपं तोडली आहेत, त्यांना त्यांच्या जागा पुन्हा रिस्टोअर करुन ताब्यात द्या, त्याचबरोबर आपण जी कारवाई केलेली आहे, ती त्वरीत थांबवा, असा मी या सभागृहाचा सर्वंग सभापती म्हणून शासनाला निर्देश देत आहे. परंतु आता स्थिती काय आहे ? कॅबिनेटने निर्णय रद्द केलेला आहे. कॅबिनेटचा निर्णय आपल्यावर बंधनकारक आहे, असे आपण म्हणता, तेही बरोबर आहे. परंतु नंतर जेव्हा हा विषय सभागृहात झाला, तेंव्हा तो सभागृहाची प्रॉपर्टी झालेला आहे. "Any discussion in the House is the property of the House and

..3....



SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 15:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

it is not a property of an individual member" आणि पुन्हा एकदा हा विषय ओपन झ ााल्यानंतर आम्ही याबाबत जेव्हा न्याय मागितला तेव्हा माननीय सभापतींनी न्याय दिला. म्हणून मी त्राग्याने शेवटी म्हटले की, आपले निर्देश जर सरकार पाळत नसेल व आपला अपमान करत असेल तर आपण या खुर्चीवर राहून उपयोग काय ? माननीय डावखरे साहेब, आपण राजीनामा देण्याची गरज नाही. मी याठिकाणी त्राग्याने बोललो. आपल्यासारख्या संवेदनशील व्यक्तीची या सभागृहाला गरज आहे. परंतु आमचा मुद्दा एवढाच आहे की, कॅबिनेटने प्रस्ताव रद्द केल्यानंतर व या सभागृहात चर्चा झाल्यानंतर या सभागृहात पुन्हा निर्देश दिल्यानंतर, माननीय मंत्रिमहोदय, आपण आपल्या निवेदनामध्ये त्याचा उल्लेख करत नाहीत, तो स्वीकारत नाहीत, त्याबद्दल रेफरन्स देत नाहीत, त्याबद्दल आपण पध्दतीशीरपणे काहीच बोलत नाहीत आणि जून्या इतिहासावर सगळे बोलता, हे आपण का बर टाळता ?

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MAP/ KGS/ प्रथम श्री.पुरी.......... 15:10

श्री.नितीन गडकरी.........

आम्ही लक्षात आणून दिल्यावरही का टाळता ? आपल्या निवेदनात त्या घटनेचा साधा उल्लेख करीत नाही, तो स्वीकारीत नाही, रेफरन्स देत नाही, त्याबद्दल पद्धतशीरपणे तुम्ही काहीच बोलत नाही आणि जुन्या इतिहासावर सर्व बोलता. हे का टाळता ? त्या घडलेल्या घटनेचा उल्लेख का करीत नाही ? तुमचे कॅबिनेट सुप्रिम आहे, या ठिकाणी हे सार्वभौम सभागृह सुप्रिम आहे. मुख्यमंत्री हे राज्याचे नेते आहेत, त्यांचे स्थान येथे आहे. या सभागृहात सर्वोच्च स्थान हे माननीय सभापतींचे आहे, त्याचे स्थान वर आहे. या दोन्ही स्थानांमध्ये अंतर किती आहे ते बघा. या खुर्चीवर बसणारी व्यक्ती मोठी नाही तर हे पद मोठे आहे. आणि वेळ पडली तर त्या पदावरुन ते सांगतील की, मुख्यमंत्र्यांनी थांबावे, मंत्र्यांनी थांबावे, तर ते ऐकावे लागते. मी ज्यावेळी या सभागृहाचा नव्याने सदस्य झालो होतो त्यावेळी सभापती म्हणून माननीय जयंतराव टिळक हे होते. ते मला म्हणायचे की, नितीन खाली बैस, मी ऐकत होतो. ते मंत्र्यांना सांगायचे की, हे बरोबर नाही, आपण थांबावे, तुमचा प्रश्न मी नंतर घेईन. या सभागृहामध्ये सभापतींना लोकशाहीने दिलेले अधिकार आहेत. त्यांनी काय बोलावे, सूचना द्याव्यात की नाही, निर्देश द्यावेत की नाहीत, त्याबाबतची पार्श्वभूमी माननीय सभापती सांगतील. परंतु, या सभागृहाच्या संसदीय इतिहासामध्ये गरीब माणसाबद्दल संवेदनशीलता ठेवून झुणका-भाकर केंद्राबाबत अभूतपूर्व असा ऐतिहासिक निर्णय त्यांनी आपल्या मुखातून सरकार म्हणून तुम्हाला दिला. शासनाने निवेदनात त्याची साधी दखल घेतली नाही, साधी नोंद घेतली नाही, प्रतिक्रिया दिली नाही, साधा उल्लेखही केला नाही आणि केवळ जुना इतिहास काढून आमच्यासमोर आणून ठेवता, हे काय बरोबर आहे काय ? तुम्हाला जर अडचण असेल तर तुम्ही माननीय सभापतींना भेटा, त्यांना सांगा की मी धर्मसंकटात सापडलो आहे, मी काय करु, सध्या निवेदन लावू नका, मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक घ्या, जी काही अडचण असेल ती त्यांच्या कानावर घाला, बैठक लावा, त्यांना अशा प्रकारे सांगता आले असते. आता माझ ी एवढीच विनंती आहे की, साहेबांनी सांगितल्याप्रमाणे हे जे निवेदन माननीय मंत्री महोदयांनी केले आहे, ते त्यांनी मागे घ्यावे. माननीय मंत्री महोदयांनी माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना सभागृहातील वैधानिक स्थिती समजावून सांगावी, आमची भावना समजावून सांगावी आणि माननीय सभापतींचा आदर करण्याच्या दृष्टीने सभापतींच्या दालनात बैठक घेऊन त्यांना अडचण सांगावी, आम्हीही त्या बैठकीला उपस्थित राहू. जे झाले ते पुष्कळ झाले. येथील चर्चा मला क्लेषदायक

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.........

आहे, दु:खदायक आहे. यासंबंधीचे वृत्त जेंव्हा वर्तमानपत्रात छापून येईल, तेव्हा या सभागृहाच्या सभापतींचे कुणी ऐकले नाही, त्यांच्या निर्देशाला काही अर्थ नाही, तेव्हा माझ्या मनाला भयंकर वाईट वाटेल. म्हणून एवढीच विनंती आहे की, झाले तेवढे पुष्कळ झाले, आता आम्ही सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य अशी अपेक्षा करतो की, आमचा जेवढा अपमान झाला तेवढा पुरे झाला, माननीय सभापतींचा जेवढा अपमान झाला तेवढा पुष्कळ झाला. सभापती महोदय, या प्रसंगी आपण बोललात, आपण सांगितलेले उदाहरण फार महत्वाचे आहे. आपण या ठिकाणी संवेदनशीलता दाखविली, मी आपले आभार मानतो, आपण मनाचे मोठे आहात, आपण एक बैठक घ्या. आपल्याकरिता आम्ही शांत रहातो. एक बैठक घेऊन आपण दिलेल्या सभागृहातील जाहीर निर्देशाचा, ज्याचे कौतुक सर्व वर्तमानपत्रांनी केले, महाराष्ट्राच्या जनतेने केले आणि सभापती म्हणून तो तुमचा अधिकार आहे, त्यानंतरही मल्लिनाथी होता कामा नये. जे झाले ते योग्य झालेले नाही. यातून नक्की मार्ग निघेल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे बोलणे थांबवितो.

श्री.कमलकिशोर कदम : सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, या विषयीची चर्चा त्वरित थांबविण्यात यावी. सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी हे वारंवार उल्लेख करतात की, तुमच्या आदेशाला किंमत नाही, तुमच्या आदेशाला कच-याची टोपली दाखविली, तुम्हाला कोणी विचारीत नाही, हे सर्व वक्तव्य या उच्च स्थानाचा अवमान करणारे आहे. बाकी संपूर्ण नियमावलीत मी जात नाही. विरोधी पक्षाला माननीय सभापतींनी पूर्ण संरक्षण दिले पाहिजे, कारण त्यांच्याकडे सत्ता नाही, बोलणे हाच त्यांचा अधिकार आहे आणि त्यांनी आपले प्रश्न मांडले पाहिजेत. पण ते त्यांचे अधिकार पूर्ण वापरु दिल्यानंतर निर्णय घेण्याचा अधिकार शासनाचा आहे. शासनाच्या निर्णय घेण्याच्या अधिकारामध्ये दुसरा कोणीही हस्तक्षेप करु शकत नाही. आपल्याला याबाबतचे दाखले द्यावयाचे झाले तर अनेक दाखले देता येतील. शासकीय निर्णय हे शासनानेच घेतले पाहिजेत. आता आपण काही प्रश्न मांडले आणि माननीय सभापतींनी काही निर्देश दिले. पण यावरील वक्तव्य एवढे वादळी करुन त्या स्थानाला अवमानित करण्याचे काम करु नका. माननीय सभापतींनी विरोधी पक्ष आणि सत्तारुढ पक्ष यांच्या दरम्यान नियमाच्या बंधनात चर्चा घडवून

..3..........

श्री.कमलकिशोर कदम.........

आणावी, विरोधी पक्षाचे म्हणणे काय असेल ते त्यांना मांडू द्यावे, त्यांना पूर्ण संरक्षण द्यावे आणि त्यावर शासनाचे काय म्हणणे आहे ते शासनाला मांडू द्यावे, यामध्ये कदापिही माननीय सभापतींनी एक बाजू घेऊन हस्तक्षेप करु नये.  Speaker could not speak.

यानंतर श्री.बोरले............

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर .......... 15:15

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सभापतींनी एक बाजू घेऊन हस्तक्षेप करु नये, हे वाक्य कामकाजातून काढून टाकावे.

श्री.कमलकिशोर कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी बोलत असतांना आम्ही त्यांचे बोलणे शांतपणे ऐकून घेतले. आता आपण असे म्हणत असाल तर मी खाली बसतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम असे म्हणत आहेत की, सभापतींना निर्देश देण्याचा अधिकार नाही, हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. सभागृहामध्ये सभापतींनी अनेक वेळा निर्देश दिलेले आहेत. माननीय कृषिमंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांना तुम्ही निर्देश दिल्यानंतर त्यांनी असे सांगितले की, होय तुमच्या निर्देशाचे पालन करण्यात येईल. हे सर्व रेकॉर्डवर आहे आणि आता सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम असे म्हणतात की, सभापतींना निर्देश देण्याचा अधिकार नाही.

श्री.कमलकिशोर कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी सागू इच्छितो की, या विषयावरील चर्चा थांबविली गेली तर बरे होईल. सभापतींनी एखाद्या विषयावर चर्चा घडवून आणत असतांना विरोधी पक्षाला चर्चेचे पूर्ण स्वातंत्र्य द्यावे. परंतु शासनाला जो निर्णय घेण्याचा अधिकार आहे तो शासनालाच घेऊ दिला पाहिजे. त्यामध्ये सभापतींची ढाल पुढे करुन तुम्हाला तुमच्या मनातील निर्देश लादता येणार नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम असे म्हणत आहेत की, आम्ही सभापतींची ढाल केली. त्यांनी ते शब्द मागे घ्यावेत.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, तुमचे अधिकार सांगणारे हे कोण आहेत ?

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आम्ही सभापतींची ढाल केली, हे शब्द कामकाजातून काढून टाकावेत.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, जी चर्चा होत आहे, ती अत्यंत दु:खद अशा प्रकारची आहे. या सभागृहामध्ये काम करीत असतांना सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांनी जे सांगितले ते खरे आहे. नॉर्मली शासनाने निर्णय घ्यायचे असतात. प्रशासन ही शासनाचीच अधिकार क्षमता असते, या विषयी कोणाचे दुमत नाही. प्रश्न असा आहे की, सभागृहामध्ये ज्यावेळी शासनाचा एखादा निर्णय येतो त्यावेळी त्यावर सभागृहात चर्चा होते आणि चर्चा झाल्यानंतर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावनांची तीव्रता लक्षात घेऊन सभापतींनी अनेक वेळा आदेश दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांना मी उदाहरण देतो. मी अकोला पूर नियंत्रणाच्या संदर्भातील उदाहरण देतो. माझ्याकडे पुष्कळ उदाहरणे आहेत. परंतु लवकर लक्षात येण्यासारखे उदाहरण मी सांगतो. यासंदर्भात सभागृहामध्ये वारंवार अनेक आश्वासने देण्यात आली की, त्या शहराच्याबाबतीत 10 टक्के लोकवर्गणी क्षमापित करण्यात येईल. नंतर सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी हे त्या विभागाचे मंत्री झाले. श्री.अरुणभाई गुजराथी ज्यावेळी त्या विभागाचे मंत्री म्हणून सभागृहात आले त्यावेळी ते असे म्हणाले की, ज्या मंत्री महोदयांनी हे आश्वासन दिलेले आहे, ते आज मंत्री नाहीत. माझ्याकडे या विभागाचा चार्ज आहे. त्यांनी जे आश्वासन दिलेले आहे, ते बरोबर आहे. परंतु मला मंत्रिमंडळासमोर जावे लागेल आणि अपवादात्मक 10 टक्के लोकवर्गणीचा निर्णय घ्यावा लागेल, हे सभागृहातील शब्द मी जसेच्या तसे सांगत आहे.

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बी.टी.देशमुख ......

श्री.अरुणभाई गुजराथी आज सभागृहात उपस्थित असते तर त्यांनी या गोष्टीला दाद दिली असती. यानंतर ती बाब मंत्रिमंडळासमोर गेली होती. 10 टक्केच्या बाबतीत एका गावाला अपवाद करता येत नाही, 10 टक्के भरले पाहिजेत असा मंत्रिमंडळाचा निर्णय झाला होता. दुर्देवाने मंत्रिमंडळाने उलट निर्णय घेतला होता. अशा वेळी काय करणार ? याबाबत माननीय मंत्री महोदय श्री.सुनील तटकरे यांनी सांगितले ते खरे आहे. त्यावेळी मंत्री महोदयांनी त्यांच्या शक्तीनुसार मंत्रिमंडळासमोर मांडले परंतु मंत्रिमंडळाच्या बैठकीत ही बाब मान्य होऊ शकली नाही. हे उदाहरण मी आपल्याला जसेच्या तसे सांगितले आहे. त्यावेळी सभागृहात अत्यंत तीव्र भावना दोन्ही बाजूंनी व्यक्त करण्यात आल्या. म्हणजे "The city of Akola will have to be evacuated" असा ऑफिशियल रिपोर्ट असताना दिलेले आश्वासन मागे घेणे बरोबर नाही. त्यावेळचे माननीय सभापती श्री.जयंतराव टिळक यांनी निदेश दिले होते की, "सभागृहात इतक्या वेळा आश्वासन दिल्यानंतरही यावर कार्यवाही होत नाही, हे बरोबर नाही. तेव्हा अकोल्याच्या बाबतीत हा नियम लागू पडणार नाही". मी माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांना सांगू इच्छितो की, त्यावेळचे प्रोसिडींग तुम्ही आजही पाहू शकता. नंतर शासनाने माननीय सभापतींच्या निदेशाचा आदर केला व त्याप्रमाणे पुढच्या अधिवेशनामध्ये उत्तर आले. ही जुलै 1993 मधील गोष्ट आहे. घडलेली घटना 100 टक्के जशीच्या तशी मी आपल्याला सांगितली आहे. अशी अनेक उदाहरणे असून कागद न पाहता मी सांगू शकतो. माननीय सदस्य श्री.कमलकिशोर म्हणतात ती बाब तांत्रिकदृष्टया बरोबर व खरी आहे. परंतु हे सभागृह लोकांच्या भावनांचा विचार करण्याचे ठिकाण आहे. पीठासीन अधिकाऱ्यांनी ज्या बुध्दीने निर्णय दिला, तिचा आम्ही तीव्र आदर करतो. परंतु मंत्रिमंडळाने जो निर्णय घेतला आहे तो सभागृहात सांगणे भाग आहे, यात काही चूक आहे असे मला वाटत नाही. अधिवेशन काळामध्ये मंत्रिमंडळाची बैठक रोजच होत असते. पुन्हा मंत्रिमंडळासमोर जाऊन निर्णयात बदल केला जाऊ शकतो. अशा प्रकारे कितीतरी निर्णय बदलले आहेत. पीठासीन अधिकाऱ्यांनी दिलेला निदेश न पाळणे अत्यंत अयोग्य आहे. पीठासीन अधिकाऱ्यांनी सांगितलेले निदेश ऐकले जात नसतील तर दुसऱ्यांनी येथे काही बोलण्याचे कारणच नाही. सभापती महोदयांचा अनादर होऊ नये.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MAP/

प्रा.बी.टी.देशमुख .....

याचा शास्त्र म्हणून विचार झाला पाहिजे. आपण म्हणालात ते या मर्यादेपर्यंत बरोबर आहे की, निर्णय घेण्याचे काम शासनाचे आहे. परंतु सभागृहातील सर्व चर्चा ही शासनाच्याच निर्णयाची होते. दोन्ही बाजूच्या सदस्यांचे म्हणणे ऐकून घेऊन एखादी भावना व्यक्त होते. सभागृहात हजारो निर्णय होतात. एखाद्या प्रश्नावर भावना लक्षात घेऊन निर्णय दिला असेल तर अधिवेशन काळातसुध्दा त्याबाबत पुन्हा मंत्रिमंडळासमोर जाऊन या निर्णयामध्ये अनेक वेळा बदल झालेला आहे हे मी सांगू इच्छितो.

(अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपला आदर राखण्यासाठी काही सन्माननीय सदस्यांनी मनोगत व्यक्त केले आहे. यावर पुन्हा पुन्हा माननीय सदस्य बोलत राहिले तर त्याच विषयाची चर्चा होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MAP/ KGS/ श्री. गागरे नंतर --- 15:25

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी अत्यंत गंभीर असा प्रश्न निर्माण झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांनी माननीय सभापतींच्या आदेशाबाबत, त्यांच्या अधिकाराचा प्रश्न येथे उपस्थित केलेला आहे. सभापती महोदय, लोकशाही प्रणालीमध्ये, संसदीय लोकशाहीमध्ये लोक राजे असतात आणि लोकांचे प्रतिनिधी म्हणून आम्ही येथे उपस्थित राहून त्यांचे प्रश्न मांडत असतो व ते सोडवून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. अशा वेळी त्या प्रश्नावर जेव्हा सभापती काही आदेश देतात तेव्हा तो आदेश, त्याचे गांभीर्य, हे सरकारवर बंधनकारक आहे की नाही असा प्रश्न येथे निर्माण करण्यात आला आहे. या ठिकाणी चर्चा जी सुरू झाली ती यासाठी की, सरकारने आपल्या आदेशानुसार कारवाई करायला पाहिजे होती पण ती सरकारने केली नाही. त्यामुळे सेपरेशन ऑफ पॉवरचा प्रश्न येथे उपस्थित झालेला आहे. मला असे वाटते की, जेव्हा सदनामध्ये कोठल्याही गोष्टीची चर्चा होते आणि त्या चर्चेचा परिपाक म्हणून सभापती आदेश देतात तेव्हा तो आदेश सरकारवर बंधनकारक असला पाहिजे आणि याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. अन्यथा लोकशाहीबद्दल काही अर्थच राहणार नाही. लोक, जनता राजे आहे असे आपण जेव्हा म्हणतो आणि लोकशाही मध्ये लोकशाहीच्या कोठल्याही सदनामध्ये मग ती विधानसभा असो वा विधान परिषद असो, लोकसभा असो वा राज्यसभा असो, त्यामध्ये एखाद्या प्रश्नाबाबत चर्चा होऊन जेव्हा अंतिमत: सभापती आदेश देतात त्या आदेशाबाबत दुमत असण्याचे कारणच नाही. त्यामुळे यावर आपण जे आदेश दिले त्याचा सन्मान करणे, त्याचा अमल करणे हे सरकारचे काम आहे आणि म्हणूनच सभापती महोदय, आपण दिलेल्या आदेशाचे पालन होणे आवश्यक आहे. अन्यथा बाहेर या संबंधात वेगळी चर्चा जाईल, वेगळा मेसेज जाईल. तसे होऊ नये म्हणून सरकारला, माननीय मंत्री श्री.तटकरे यांना मी विनंती करीन की, या विषयावर आताच जास्त चर्चा झालेली आहे, तेव्हा ती अधिक होऊ न देता, ती बंद करावे आणि प्रथमत: आपण जे निवेदन येथे केले आहे ते मागे घ्यावे. तसेच या संबंधात माननीय सभापतींच्या दालनामध्ये जी बैठक होणार आहे त्यामध्ये याबाबत अंतिम निर्णय घ्यावा आणि आता ही चर्चा येथेच थांबवावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सदस्य या विषयावर बोलले आहेत त्यामुळे मी फारसे बोलणार नाही. परंतु या साऱ्या घटनाक्रमामध्ये मी देखील एक साक्षीदार आहे. माझीच या विषयावर नियम 93 ची सूचना होती आणि त्यावर आपण शासनाला निवेदन करण्याचे निदेश दिले होते. मागील अधिवेशनामध्ये देखील झुणका भाकर केंद्रांचा विषय सभागृहात

....... 3एम 2 ...

श्री. फुंडकर ....

उपस्थित केला गेला होता त्यावेळेस देखील आपण आदेश दिले होते आणि त्या आदेशा वरूनच माननीय मंत्र्यांनी त्याबाबत कॅबिनेटसमोर जाण्याचा मनोदय येथे बोलून दाखविला होता व त्याप्रमाणे त्यांनी कॅबिनेटपुढे हा विषय नेलाही होता. पण तोवर झुणका-भाकर केंद्रांवरील कारवाई थांबविली होती. आता या अधिवेशनामध्ये दोन दिवसापूर्वी, राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीच्या दिवशी मी नियम 93 ची सूचना या विषयावर दिली होती आणि ती मांडण्यासाठी मी उभा राहिलो. त्या वेळी आपण स्वत: सभापती आसनावरून सांगितले होते की, ज्या झुणका-भाकर केंद्रांना सील लावले आहे ते काढून घ्यावे आणि त्याबाबत 48 तासाच्या आत सभागृहाला अहवाल सादर करावा तसेच झुणका-भाकर केंद्रांच्या बाजूने सरकारने निर्णय घ्यावा. आता ही चर्चा अशा प्रकारे थांबविणे` हे या सभागृहाला आणि आपल्या पदाच्या दृष्टीनेही बरोबर नाही. आता आपण सांगितले की, या संबंधात सोमवारी माननीय सभापतींच्या दालनामध्ये बैठक घेऊन चर्चा होणार आहे. त्यावर सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम हे उठून उभे राहिले आणि ते येथे जे काही बोलले त्यातील दोन वाक्ये जी त्यांनी उच्चारली आहेत त्यांना माझा आक्षेप आहे आणि ती दोन्ही वाक्ये सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकली पाहिजेत असे मला वाटते. त्यातील पहिले वाक्य त्यांनी असे म्हटले की, सभापतींना अशा पद्धतीने हस्तक्षेप करता येत नाही आणि दुसरे वाक्य असे म्हणाले की, सभापतींची ढाल करून तुम्ही हे बोलत आहात. सभापती महोदय, या सभागृहामध्ये प्रत्येक सदस्याला संरक्षण देणे ही आपली जबाबदारीच आहे. म्हणूनच सन्माननीय सदस्य श्री.कदम यांनी याबद्दल दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. तसेच 'सभापतींची ढाल करून विरोधक यावर चर्चा करीत आहेत' असे जे वाक्य त्यांनी उच्चारले आहे ते सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकले पाहिजे आणि 'सभापतींना हस्तक्षेप करता येत नाही' हा जो त्यांनी आपल्यावर हेत्त्वारोप केला आहे तोही त्यांनी मागे घेतला पाहिजे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम यांनी आता सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे जी दोन वाक्य आपल्या बोलण्यामध्ये उच्चारली आहेत आणि त्या बोलण्यामध्ये त्यांनी पार्लमेंटचा जो उल्लेख केला आहे त्याला माझा आक्षेप आहे. पार्लमेंटमध्ये काय घडते हे आम्ही पाहिले आहे, सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनीही ते अनुभवले आहे. सन्माननीय सदस्य श्री.कदम यांनी ते अनुभवले आहे की नाही हे मला माहीत नाही. पण पार्लमेंटमध्ये काय घडते ते सांगण्यासाठीच मी उभा आहे.

( यानंतर श्री. किल्लेदार .... 3एम 1 ..

SKK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.सुंबरे 15:30

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू....

सभापतींना किती अधिकार असतात, किती नसतात याचे उत्कृष्ट उदाहरण हवे असेल तर पार्लमेंटचे देता येईल. आज या ठिकाणी माननीय सभापती आणि उपसभापतींचे आदेश किंवा निर्देशाच्या संबंधात प्रश्न उपस्थित करण्यात आला. याचा परिणाम असा होणार आहे की, या सदनाला काही अर्थच रहाणार नाही. या सदनामध्ये आपण सगळेजण बसतो. सभापतींनी दिलेला निर्देश किंवा त्यांच्याकडून मिळणारा सल्ला, त्यांनी दाखविलेला मार्ग या माध्यमातून, नियमांच्या मदतीने आपण सगळे कामकाज करत असतो. आम्ही जो विषय मांडला तो नियमाच्या आधारानेच मांडलेला आहे, नियमाला सोडून मांडलेला नाही. विरोधी पक्ष म्हणून आमची जी काही आयुधे आहेत त्या आयुधांचा उपयोग करून शासकीय पक्षाने जो निर्णय घेतलेला आहे तो कसा चुकीचा आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसे केले नाही तर आम्हाला येथे बसण्यात काय स्वारस्य आहे ? ते आमचे काम आहे. पार्लमेंटमध्ये महिला आरक्षणाच्याबाबतीत विधेयक आलेले होते. मला वाटते, त्यावेळेस पार्लमेंटमध्ये सन्मानीय सदस्य श्री.सावंत साहेब नव्हते, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेब होते. या संबंधाने केंद्रीय मंत्रीमंडळाची बैठक होऊन महिला विधेयक मंजूर करण्याचा निर्णय घेतलेला होता. मी ही 13 सप्टेंबर 1996 सालची गोष्ट सांगतो आहे. हे महिला विधेयक मंजूर करायचे होते. त्यावेळेस श्री.देवेगौडा हे पंतप्रधान होते. पंतप्रधानांच्या एका हातात लुंगी आणि दुसऱ्या बील घेऊन त्यांनी सभागृहात प्रवेश केला. त्यावेळेस सदनामध्ये 38 महिला खासदार होत्या. त्या सगळया महिला पहिल्या बेंचवर बसलेल्या होत्या. सत्ताधारी पक्षाने महिला विधेयकावर चर्चा करायची नाही, ते असेच मंजूर करायचे असे ठरविलेले होते. या विधेयकावर सत्ताधारी पक्षाच्या बरोबरच भारतीय जनता पक्षाचाही पाठिंबा होता. त्यावेळस श्रीमती सुषमा स्वराज होत्या. मी आणि माझ्या पक्षाचे 14 खासदार गप्प बसून होतो. सभापतींच्या आदेशाची ढाल करून कोणाचा फायदा होत नाही, असे येथे सांगितले गेले. परंतु या संदर्भात मी मुद्दाम उदाहरण देतो. ज्यावेळी हे विधेयक मतासाठी टाकले जाणार होते, त्यावेळेस मी उठून उभा राहिलो. त्यावेळेस लोकसभेचे अध्यक्ष श्री.संगमाजी होते. त्यांच्यासमोर मी माझी व्यथा मांडली. पार्लमेंट हे सुप्रीम आहे, संपूर्ण देशाचे प्रश्न येथे मांडले जातात. जशी महिलांची बाजू आहे तशीच दुसरीही बाजू आहे, ती बाजू पूर्ण समजून घेतली जात नाही. यावर आपण चर्चा करत नाही. "No Bill can be passed unless it is adequately deliberated in the



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू....

House," असा मुद्दा मी उपस्थित केलेला होता. त्यावर अध्यक्षांनी निर्णय दिला की, "Yes, what Mr. Sarpotdarji says is correct. I cannot pass this Bill unless it is adequately deliberated in the House" सन्माननीय सदस्य श्री. कदम साहेबांना सांगावयाचे आहे की, आमचा आम्ही अनुभव सांगतो. आपला वेगळा अनुभव असेल. आम्ही लोकांचे प्रश्न उपस्थित करतो. आमच्यापैकी कोणाचेही झुणकाभाकर केंद्र नाही. तरी देखील हा प्रश्न आम्ही उपस्थित करीत आहोत. आमचा साखरकारखाना नाही तरीही साखर कारखान्याचा प्रश्न येतो त्यावेळेस आम्ही काही म्हणत नाही. इंजिनियरींग कॉलेजेस, मेडिकल कॉलेजेसचा प्रश्न येतो, त्यावेळेस आम्ही विरोध करत नाही. Let is have deliberations. Let us exchange our views. There is nothing wrong in exchanging and deliberating the views in the process of the democracy. म्हणून सन्माननीय सदस्यांनी जे आक्षेप घेतलले आहेत, ते आमच्यावर हेत्वारोप करणारे आहेत. पीठासीन अधिकाऱ्यांवर हेत्वारोप करून या प्रश्नाचे महत्व कमी करण्याचा उद्देश दिसतो. आपण सन्माननीय मंत्री महोदयांना संरक्षण देण्याच्या भूमिकेतून नको त्या विषयावर बोलला अशी आमची भावना झालेली आहे. माझे काही चुकत असेल तर माफ करा. अशी एकतर्फी चर्चा झालेली नाही. विरोधी पक्षाबरोबर सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनीही या विषयावर पाठिंबा दिलेला आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ......

या सदनाचा तो निर्णय होता असे मला मुद्दाम आपल्याला सांगावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार हे या सभागृहात उपस्थित होते. तेही त्यामध्ये सहभागी झाले होते. अनेक सन्माननीय सदस्य त्यामध्ये सहभागी झाले होते. या दृष्टीकोनातून माझी सन्माननीय पीठासीन अधिकाऱ्यांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांचा जो आक्षेप आहे तो कामकाजातून काढून टाकावा. अशा प्रकारची चर्चा, अशा प्रकारचे हेत्वारोप भविष्य काळामध्ये त्या आसनावर होणार नाहीत याची दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. आज आपण त्या आसनावर आहात कदाचित उद्या ते त्या आसनावर बसतील. सन्माननीय सदस्य डॉ. कमलकिशोर कदम यांना सांगू इच्छितो की, कदाचित आपण सभापती होऊ शकता. त्यामुळे असे आरोप कोणावर झाले तर त्यावेळी त्यांच्या वेदना काय असतील हे समजून घ्यावे. त्या पध्दतीने सदनामध्ये कामकाज होऊ द्यावे. आमचा जो ज्वलंत प्रश्न आहे तो मार्गी लागला पाहिजे. याबाबतीत सन्माननीय मंत्रिमहोदयांनी दखल घेऊन त्या प्रश्नाकडे पहावे. सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय श्री. अनिल देशमुख हे बोलण्यासाठी उभे आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, माझे बोलणे अजून संपलेले नाही. सभापती महोदय, मला या निमित्ताने एवढेच सांगावयाचे आहे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, माझी एकच विनंती आहे. या सभागृहात या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे. आपण सांगितले की, याबाबतीत माननीय मुख्यमंत्री साहेबांची आपल्या दालनामध्ये बैठक होणार आहे.

**उपसभापती** : जे तोंडी बोलणे झाले ते मी सांगितले.

श्री. अनिल देशमुख : आपण सांगितले की, स्वत: ते येणार आहेत आणि सर्वांना बोलविणार आहेत आणि चर्चा करुन निर्णय घेणार आहेत. याबाबतीत भरपूर चर्चा झाली आहे. याबाबत जास्त चर्चा होणे बरोबर नाही. माझी एकच विनंती आहे की, दोन्ही बाजूकडून जी चर्चा झाली ती बाहेर जाणे योग्य नाही. ते रेकॉर्डमधून काढून टाकावे अशी आमची विनंती आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सभागृहातील वरिष्ठ सन्माननीय सदस्य बोललेले आहेत. त्या मानाने आम्ही नवखे सदस्य आहोत. मला एवढेच

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख ......

म्हणावयाचे आहे की, कॅबिनेटने जो घेतलेला निर्णय आहे त्याच्या विपरित निर्णय आपण केला आहे. त्याच्या मेरीट, डिमेरीटमध्ये आम्ही जात नाही. सन्माननीय सदस्य अनुभवाने बोलले. आपण दिलेले आदेश पाळले नाहीत त्यामुळे आपला अनादर झाला एवढे बोलून सन्माननीय सदस्यांनी त्यांचे बोलणे संपवावयास पाहिजे होते. परंतु आपला निर्णय कचऱ्याच्या पेटीत टाकला असे सांगण्यात आले. त्याने आपला आदर वाढला काय ?

श्री. नितीन गडकरी : जे सत्य आहे ते सांगितले. आपल्याला जर एवढे वाटते तर आदेशाचे पालन का केले नाही ?

डॉ. सुनील देशमुख : मघाशी सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार साहेब माननीय मंत्रिमहोदय श्री. अनिल देशमुख यांना असे म्हणाले की, आपण मध्येच कसे उभे राहिला ? मध्येच उभे राहण्याचे आम्ही आपल्याकडून शिकलो आहोत. सभापती महोदय, आपल्या निर्णयाचा अनादर झाला एवढेच बोलले असते तर हा विषय संपला असता. परंतु त्याला जी झालर देण्यात आली त्यामुळे त्या खुर्चीचा आदर वाढला असे कोणी म्हणणार नाही. त्यामुळे ते सर्व वक्तव्य कामकाजातून काढून टाकावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या सर्वोच्च सभागृहात सर्वोच्च पदावरुन दिलेल्या निर्णयाबद्दल झालेली चर्चा माझ्या मताप्रमाणे ॲकॅडमिक चर्चा असली तरी भावी पिढी जेव्हा हे पुस्तक वाचेल तेव्हा त्यांच्या मनात जे येईल ते चुकीचे असेल. या सभागृहाचे काही लेखी नियम आहेत तर काही अलिखित नियम आहेत. काही परंपरा पाळावयाच्या असतात परंतु त्याबाबत काही लिहिलेले नाही. त्यामुळे आपण परंपरेबद्दल चर्चा करणे चुकीचे आहे. यातून मार्ग काढण्याच्या दृष्टीने सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार जे म्हणाले ते "I can read between the lines". आपल्याला डिसिप्लीनरी प्रोसीजरप्रमाणे बोलण्याचा अधिकार दिलेला आहे. That is the part of the disciplinary proceedings in the Parliament. That is his right. माझे असे म्हणणे आहे की, आपण चर्चा करा. माननीय उपसभापती श्री. डावखरे साहेब किंवा सभापती श्री. शिवाजीराव देशमुख साहेब, माननीय मुख्यमंत्री, कोणीही चर्चा करावी. सर्व ज्येष्ठ सन्माननीय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. जितेंद्र आव्हाड ......

सदस्यांनी बसावे. परंतु आज जी चर्चा झाली त्यामध्ये कोणाचा आदर किंवा कोणाचा अनादर याबाबत सर्वोच्च सभागृहामध्ये चर्चा होणे, उद्याच्या वर्तमानपत्रामध्ये ते येणे आणि त्याचे वाचन होणे चुकीचे होईल. या ठिकाणी ही चर्चा समाप्त करुन आपण निर्णय द्यावा. तो निर्णय शासन आणि विरोधी पक्ष या दोघांना बॅलंस करणारा असावा. त्यातून जी चर्चा होईल ती न्याय देणारी ठरावी अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कमलकिशोर कदम : सभापती महोदय, सर्वप्रथम मी हे स्पष्ट करु इच्छितो की या सभागृहाच्या उच्च स्थानाबाबत माझ्या मनामध्ये अतिशय आदर आहे. कोणत्याही प्रकारची अनादराची भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा नाही. परंतु माझ्या समोरच्या सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये जे आहे ते मला स्पष्टपणे सांगितले पाहिजे. ..(अडथळा) ..सभापती महोदय, आपणाला निर्णय घेण्याचे अधिकार आहेत असे या ठिकाणी सांगण्यात आले. मी त्यावर फक्त एवढेच म्हणेन की, लोकशाहीमध्ये निर्णय हे मतदानाने होतात. एखाद्या विषयावर विरोधी पक्षाने काही मत व्यक्त केले आणि त्यावर सरकारी पक्षानेही काही मत व्यक्त केल्यानंतर जेव्हा निर्णय घेण्याची वेळ येते त्यावेळी मतदाने निर्णय होणे, त्यालाच लोकशाही म्हणतात...(अडथळा) .. सभापती महोदय, हे उच्च स्थान यासाठी आहे की, या सभागृहातील सन्माननीय सदस्यांना संरक्षण देत असताना सन्माननीय सदस्य हे विविध आयुधांचा वापर करुन आपले प्रश्न सभागृहात मांडत असतात, पण त्यावरचा निर्णय ज्यावेळी होईल आणि ज्यावेळी शासन आपले मत मांडील त्यावेळी एकमत नसेल तर त्याबाबतचा निर्णय हा मतदानाने होईल. या ठिकाणी निर्देश असा शब्दप्रयोग करण्यात आला. लोकशाहीतील मुख्य तत्व असे आहे की, Speaker should not speak. कोणत्याही प्रकारच्या वादामध्ये मग तो सत्ताधारी पक्षाकडील असेल किंवा विरोधी पक्षाकडील असेल, स्पीकरने पडू नये. अनेक वेळा अशी परिस्थिती उद्भवते की, विरोधी पक्ष एखादी बाजू मांडत असताना मुद्दे सुचले नाहीत की त्याबाबतीत संरक्षण कोठे मागायचे .........(अडथळा)..... मला सन्माननीय सदस्यांना नम्र विनंती करावयाची आहे की, या सभागृहाचे कामकाज चालत असताना कोणत्याही मुद्यावर माननीय सभापतींच्या सर्वोच्च स्थानाला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करु नये. झुणका-भाकर केंद्रे चालू ठेवायची की नाहीत यासंबंधीचा निर्णय मतदानाने घ्यावा. मतदानाने आपण निर्णय घेऊ शकता. लोकशाहीत आपण जगतो.या सभागृहामध्ये मतदानाने जे निर्णय होतील ते लोकशाहीचे निर्णय होतील ...

श्री. मधुकर चव्हाण : माझा हरकतीचा मुद्दा आहे.....

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

...नंतर कु. खर्चे।

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अडथळा....

श्री.कमलकिशोर कदम : कोणालाही अडचणीत आणल्यावर ज्यांना आनंद होतो, या सभागृहाची प्रतिष्ठा आपण सांभाळली नाही. आपण जे वक्तव्य केले "तुमचे आदेश कचराकुंडीत फेकून दिले, इकडे फेकून दिले, असे म्हणणे तिकडे फेकून दिले" ही काही सभागृह चालविण्याची रीत नाही. जर आपल्याला याबाबतीत काही बोलावयाचे असते तर पाच मिनिटे सभागृह स्थगित करा आणि आपल्या दालनामध्ये बोलवा आपण याच्यावर चर्चा करु असे जर म्हटले असते तर आमची तयारी होती परंतु तुम्हाला सरकारवर आरोप करतांना ते उच्चस्थान सुध्दा अडचणीत आणावयाचे होते,असा आपला मनोमन हेतू आहे म्हणून मी सुरुवात करतांनाच सांगितले की, अध्यक्ष महोदय, याच्यावरील चर्चा थांबवा, असे मी सुरुवातीलाच सांगितले होते कारण ही चर्चा करण्याचा त्यांचा हेतू वेगळा आहे. आमचा हेतू होता तो या सदनाची प्रतिष्ठा सांभाळण्याचा आणि अप्रतिष्ठा करण्याचा तुमचा हेतू होता.

(अडथळा)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हे माझ्यावर केलेले हेत्वारोप आहेत,मला बोलू द्या, याबाबत मला एक खुलासा करावयाचा आहे.

(गोंधळ)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, यासंदर्भात माझा पॉईंट ऑफ एक्प्लनेशन आहे.

(अडथळा)

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसून घ्यावे. तुम्ही सर्व खाली बसत आहात की, की मी निघून जाऊ ? मूळ प्रश्न झुणका भाकरीचा आहे, त्याच्या संदर्भात मी आधीच सांगितले आहे की, सोमवारी माननीय सभापतींच्या दालनात यासंदर्भात शासन आणि यासंदर्भातील जे कोणी प्रमुख प्रतिनिधी असतील त्यांची एक संयुक्त बैठक बोलाविण्यात आलेली आहे, त्या बैठकीमध्ये मी देखील असेन त्यानंतर या अनुषंगाने जी चर्चा येथे झाली, त्यासंदर्भात काहींचे म्हणणे असे आहे की, ही चर्चा कामकाजातून काढून टाकावी, ही जी चर्चा या सभागृहामध्ये झाली ती काढून टाकण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही कारण सर्वांसमक्ष ही चर्चा झालेली आहे आणि "अंधाराला पांघरुण घालण्याचा जरी प्रयत्न केला तरी कोंबडा आरवल्याशिवाय राहत नाही." ही चर्चा सर्वांनी

3Q - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**......

ऐकलेली आहे. मला एकच गोष्ट या ठिकाणी विनम्रपणे सांगावयाची आहे की, सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम हे एक ज्येष्ठ आणि अनुभवी सदस्य असून, त्यांनी या पदावर देखील काम केलेले आहे तसेच, ते माझ्यापेक्षा ज्ञानाने आणि अनुभवाने निश्चितपणाने मोठे आहेत आणि त्यांचा मी आदर करतो. मी एक गोष्ट सन्माननीय श्री.कमलकिशोर कदम साहेब यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, राजकीय क्षेत्रामध्ये आपला अनुभव निश्चितच माझ्यापेक्षाही मोठा आहे परंतु आजवर राजकारणामध्ये आणि समाजकारणामध्ये मी देखील तळागाळापासून वर येथपर्यंत आपल्यासारख्यांच्याच आशिर्वादाने पोहोचलेलो आहे. मी एक सर्वसाधारण कार्यकर्ता या नात्याने वावरत असतांना माझ्या एका हातात ढाल आणि दुस-या हातात तलवार ठेवतो त्यामुळे येणारा वार ढालीवर झेलतांनाच वार करणा-यावर देखील मी दुस-या हातात असणा-या तलवारीने समोर वार करीत होतो. माझ्या हातात ही दोन्ही आयुधे नेहमी असतात त्यामुळे कोणी माझी ढाल करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. या पदावर बसल्यानंतर या पदाला न्याय देण्याचे काम जर मी करु शकलो नाही तर मग एक सक्षम लोकप्रतिनिधी म्हणून मला स्वत:ला म्हणून घ्यावयाला मी नालायक ठरेन त्यामुळे या खुर्चीवर बसल्यानंतर माझ्या सद्‌सद्‌विवेकबुध्दीला साक्षी ठेवून या ठिकाणी एखादा निर्देश दिला तर....

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, "नालायक" या शब्दाऐवजी आपण "अपात्र" हा शब्द वापरावा.

**उपसभापती** : ठीक आहे, चुकलो मी भावनेच्या भरामध्ये वापरलेला "नालायक" हा शब्द मागे घेतो व त्याऐवजी "अपात्र" हा शब्द वापरतो. शासनाची कार्यपध्दती मला माहीत आहे, माहीत नाही असे नाही परंतु या ठिकाणी गेली 12 वर्ष झाले काम करीत आहे, ही माझी तिसरी टर्म आहे. ब-याचशा सभापतींना लोकहितास्तव असे निर्देश देतांना मी पाहिलेले आहे. हा निर्णय गोर-गरिबांच्या भल्यासाठी होता, त्यामुळे त्याच्यामध्ये मला कोणताही संकोच वाटून घेण्याचे करण नव्हते म्हणून असे निर्देश मी दिले. सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम या ठिकाणी आपण आता म्हणालात की, Speaker should not speak " पण म्हणून काय येथे बसणा-या प्रत्येक स्पीकरने मूग गिळून बसावयाचे का ? शेवटी येथे बसल्यानंतर देखील ज्या संवेदना असतात, समाजामध्ये वावरतांना ज्या अडचणी येतात. समजा आता माझे आणि तुमचे कार्यक्षेत्र जरी वेगळे





**उपसभापती**.....

असले तरी आपण तर शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रामध्ये काम करता, ज्यावेळी आपल्यालाही कॉलेजेस चालविण्यामध्ये ब-याचशा अडचणी येतात त्यावेळी आपण शासनाला कित्येक वेळेला धारेवर धरतांना आणि मार्गदर्शन करतांनाही मी पाहिलेले आहे. लोकप्रतिनिधींचा बोलण्याचा तो हक्क आहे आणि आपण एक म्हणता की, निरपेक्ष बुध्दीने या ठिकाणी बसून निर्णय घेतले पाहिजेत किंवा निर्देश दिले पाहिजेत, परंतु माझा आजवरचा कोणताच निर्देश हा एकीकडे झुकणारा होता अशातला भाग कधीच नव्हता. मी त्या दिवशी जो निर्देश दिला होता त्यावेळचे सर्व डिबेट जर आपण पाहिले तर सभागृहातील सर्वच पक्षाच्या बहुतेक सदस्यांच्या चर्चेचा आशय झुणका -भाकर केंद्रे सुरु व्हावीत अशा प्रकारचा होता.

यानंतर श्री.कानडे.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती ....**

त्यावेळी जे अभिनंदन करण्यात आले ते अभिनंदन माझे नव्हते. ते या सभागृहाचे होते. तो निर्णय सार्वत्रिक होता. त्यामुळे या चर्चेला कोणताही पक्षीय अभिनिवेश कृपया आणू नका. कॉंग्रेस असो,शिवसेना असो,बीजेपी असो,राष्ट्रवादी असो कोणताही पक्ष असो तो कधीही असे कधीही म्हणणार नाही की भुकेलेल्याची रोजी-रोटी काढून घ्या किंवा तहानलेला आहे त्याचे पाणी काढून घ्या. या क्षेत्रात काम करीत असताना बऱ्याचशा गोष्टी अशा असतात की, त्या नियमात कधी कधी बसवाव्या लागतात. याबाबतीत मी ज्यांना आदर्श मानतो ते म्हणजे स्वर्गीय बाळासाहेब देसाई. मला त्यांची सेवा करण्याची संधी त्यांच्या आयुष्याच्या शेवटी शेवटी मिळाली. परंतु त्या माणसामध्ये समाजाच्या कल्याणाचा जो पॉझीटीव्ह ॲप्रोच होता तो पाहिला तर त्यांना जर एखाद्या सचिवाने सांगितले की असा असा निर्णय शासनास घ्यावा लागेल त्यावेळी ते म्हणायचे " Who is the Govt. I am the Govt." मी म्हणतो तेच. हे म्हणण्याचे धाडस आजच्या राज्यकर्त्यांमध्ये आले तर मला वाटते न्यायाकरिता वंचित राहिलेली आणि न्यायाची अपेक्षा व प्रतिक्षा करीत असलेली जनता निश्चिपणाने सुखी होईल. त्याच सद्‌भावनेने मी हा निर्देश दिला होता. त्या निर्देशाचा शासनाने पुनर्विचार करावा अशी मी शासनाला विनंती करीन.अर्थात निर्णय शासनाने घ्यावा. परंतु माझी पूर्ण खात्री आहे की, जे शासन गोरगरीब जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी काम करीत आहे त्यांच्याकडून गोरगरिबांशी प्रतारणा होणार नाही अशी माझी सद्‌भावना आहे.अशी माझी अपेक्षा आहे आणि या सदनाची ही अपेक्षा आहे. या विषयावर माननीय सदस्यांनी मनापासून चर्चा केली. जे आक्षेपार्ह आहे ते काढून टाकले जाईल. परंतु ज्या भावना सर्वच सदस्यांनी व्यक्त केल्या त्या भावनांचा मी आदर करतो आणि हा विषय येथे संपला असे जाहीर करतो. या विषयावर आज केलेले हे निवेदन मी राखून ठेवीत आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थागित होईल आणि दुपारी 4.30 वा पुन: भरेल.

( 3.52 ते 4.30 मध्यंतर )

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 च्या सूचना

**उपसभापती** : श्री.गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यांनी "अकोला महानगरपालिकेच्या क्षेत्रातील 125 अंगणवाड्यांना पोषण आहार पुरविणाऱ्या महिला बचत गटांना पोषण आहाराची लाखो रुपयांची देयके ऑगस्ट, 2006 पासून शासनाने मंजूर केली नसल्याने महिला बचत गटांना स्वस्त धान्य दुकानातून धान्य पुरवठा न होणे, त्यामुळे महिला बचत गटांची आर्थिक कोंडी होणे" याविषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

यानंतर सर्वश्री जयंत प्र. पाटील, शरद पाटील, वि.प.स. यांनी "पनवेल तालुक्यातील जि.रायगड मोरबे धरणाची देखभाली अभावी पूर्णत: दुरावस्था होणे, धरणाला ठिकठिकाणी तडे गेले असून यामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता बळावली असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

यानंतर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी "डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने अकोला येथील 942 शेतकऱ्यांची शेतजमीन संपादित केलेली असून त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीला प्रकल्पग्रस्त म्हणून नोकरीत सामावून घेऊन त्यांच्या नियुक्तीपत्रात ते प्रकल्पग्रस्त असल्याची नोंद न करणे"याविषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने 942 शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करुन आज अनेक वर्षे झाली. परंतु नोकऱ्या देताना 50 टक्के नोकऱ्या प्रकल्पग्रस्तांना द्याव्यात असा निर्णय झालेला असताना फक्त 350 लोकांना नोकऱ्या दिल्या. त्यातही नावांमध्ये द्विरुक्ती झालेली असून फ्रॉड करण्यात आलेला आहे. माझ्याकडे फोटो उपलब्ध आहेत. आज 21 व्या शतकात सुशिक्षित बेरोजगारांनी काय गुन्हा केला? त्यांना नांगराला जुंपले गेले आहे. कोणता अधिकारी आहे याची मला माहिती नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर........

परंतु या बेरोजगार मुलांना वर्षानुवर्षे नोकऱ्या दिल्या जात नाहीत. त्यांच्या जमिनी संपादित केल्या आहत. त्यांना नांगराला जुंपून बैलासारखे उपयोगात आणले जात आहे. या संदर्भात शासनास निवेदन करण्यास सांगावे. पुढील आठवड्यात अधिवेशन 2-3 दिवस चालणार असल्यामुळे उद्याच या विषयावरील निवेदन करण्याचे आदेश शासनाला द्यावेत अशी मी विनंती करतो.

**उपसभापती** : हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने उद्या निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

यानंतर सर्वश्री रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, संजय केळकर, वि.प.स. यांनी "उत्तर महाराष्ट्रात एप्रिल ते जून या 3 महिन्यात कुपोषणाने 523 बालकांचा मृत्यू झाला असून सुमारे 2188 बालके मृत्युशी झुंज देत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

यानंतर डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी "पंढरपूरच्या यात्रेला जाणाऱ्या चैतन्य महाराजांची पालखी घेऊन निघालेल्या दिंडीला दि.23.7.07 रोजी पहाटे अडीच गावाजवळ भरधाव ट्रकने धडक दिल्याने तीन वारकरी ठार व चारजण जखमी होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

यानंतर सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, केशवराव मानकर, वि.प.स. यांनी "राजा हिंदुस्थानी हा इसम सिंधी कॅम्प, मेकोसाबाग, नागपूर येथील रहिवासी असून गुन्हेगारी प्रवृत्तीचा असणे व त्याने आतापर्यंत 3 नावे बदलणे, सदर नावे बदलण्यामागील उद्देश त्याच्यावर फौजदारी अथवा फसवणुकीचे गुन्हे दाखल होण्यापासून मुक्ती मिळणे हा असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

यानंतर श्री. व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स. यांनी "सरकारी-निमसरकारी संघटना समन्वय समिती यांनी मा.मुख्यमंत्री यांना दि.5 जून, 2007 रोजीच्या नोटीशीद्वारे कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी दि.24 व 25

..3...



SGB/ MAP/ MAP/ KGS/ 16:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**.............

जुलै आणि 28, 29 व 30 ऑगस्ट, 2007 रोजी नियोजित राज्यव्यापी संप करण्याचा दिलेला इशारा व सदर संप दि.24 जुलैपासून मागे घेतलेला असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा विषय आहे. सभागृहाबाहेर काहीतरी झाले आहे. खरे म्हणजे सभागृहात निवेदन होणे आवश्यक आहे. दि.24 व 25 जुलै रोजी संप करण्याची नोटीस दिली होती. परंतु शासनाने सोमवारी किंवा मंगळवारी या विषयावर निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

**उपसभापती** : हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने सोमवारी निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

यानंतर सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, वि.प.स. यांनी "श्री.दादू मन्सुरी यांच्या अमरावती शहरातील गोदामात दि.13.7.07 रोजी पोलीस व अन्नधान्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी छापा टाकून कापसाच्या गंजीमागे अवैधरित्या लपवून ठेवलेले सुमारे 1 लाख 64 हजार रुपये किंमतीचे 471 पोती गहू जप्त करणे, हा गहू दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी असल्याचा व्यक्त होत असलेला संशय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

यानंतर सर्वश्री शरद पाटील, जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी "सांगली येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील तंत्रनिकेतनच्या प्रवेश क्षमतेत घट केल्याने जिल्हयातील गरीब विद्यार्थ्यांवर आलेले शैक्षणिक संकट"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

--------

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील हलबा समाजावर होत असलेल्या अन्यायाविरोधात हलबा समाजाने नागपूर येथे काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी विविध प्रकारचे गुन्हे दाखल करणे.

**मु. शी.** : राज्यातील हलबा समाजावर होत असलेल्या अन्यायाविरोधात हलबा समाजाने नागपूर येथे काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी विविध प्रकारचे गुन्हे दाखल करणे यासंबंधी सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सागर मेघे ( नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील हलबा समाजावर होत असलेल्या अन्यायाविरोधात नागपूर येथे हलबा बांधवांनी माहे मे,2007 पासुन तीव्र आंदोलन सुरु करणे, अनेक ठिकाणी आंदोलकांवर पोलिसांनी लाठीहल्ला करुन मारहाण करणे, यामुळे सदर समाजाच्या आंदोलनाला हिंसक वळण लागणे, हलबा बांधवांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी लाठीहल्ला करणे, या विरोधात अनेक ठिकाणी जाळपोळ व तोडफोडीच्या घटना घडणे, शहरात तणावाचे वातावरण निर्माण होणे, हलबा बांधवांवर शासनाने केलेला अन्याय, हलबा समाजाच्या मागण्या मान्य करण्याची गरज, याकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, मे, 2007 पासून नागपूर शहरात हलबा समाजाच्या वतीने गोळीबार चौक, नवाबपुरा, रामटेक इत्यादी ठिकाणी मोठया प्रमाणात अंदोलन सुरु आहे. हे अंदोलन सामाजिक स्वरुपाचे असून नागपूर शहरातील विविध पोलीस स्टेशन्समध्ये हलबा समाजाने केलेल्या अंदोलन प्रकरणी विविध गुन्हे दाखल केलेले आहेत. हे सर्व गुन्हे सामाजिक स्वरुपाचे असल्याने शासनाने ते वापस घेऊन हलबा समाजातील युवकांना गुन्हयातून मुक्त करावे अशी माझी प्रमुख मागणी आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आंदोलन, निदर्शने होतात तेव्हा ब-याच वेळा लाठीमार होतो, गुन्हे दाखल होतात परंतु जोपर्यंत केसची पूर्ण पडताळणी होत नाही, जोपर्यंत चार्जशिट दाखल केल्याशिवाय हे गुन्हे काढून घेता येणार नाहीत. जेव्हा दोषारोपपत्र दाखल होईल त्यानंतर कोणत्या केसेस काढाव्यात यासंदर्भात शासन विचार करेल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, विदर्भातील हलबा समाजाच्या दृष्टीने हा विषय अतिशय महत्वाचा आहे. या आधी सरकारने हलबा समाज अनुसूचित जमातीत आहे म्हणून केंद्र शासनाला पत्र पाठविले होते व 15 दिवसानंतर हे पत्र वापस सुध्दा घेण्यात आले. कधी या समाजाला शासनाने जातीचे प्रमाणपत्र दिले तर कधी दिले नाही. माझ्याकडे 1939 मधील सी.पी.एंड बेरारचे रेकॉर्ड आहे. त्यावेळी जुन्या मध्यप्रदेशामध्ये हलबा, कोष्टी यांना सवलती मिळाल्या होत्या परंतु आता आपण या समाजाला या सवलती देत नाहीत. त्यांच्या लोकसंख्येमुळे हलबा आदिवासी रिझर्व्ह फॉर शिडयूल्ड ट्राईब. या ठिकाणी हलबा समाजाने नगरसेवकाचे फॉर्म भरले तरी काही फरक पडत नाही काही कारण हा समाज सोडून दुसरे कोणीही तेथे नाही. आता जेव्हा निवडणूका होतील तेव्हा त्या त्या वार्डातून उभे राहण्यासाठी सुध्दा उमेदवार नाहीत. या ठिकाणी सामाजिक संघर्ष सुरु आहे. या ठिकाणी कोणी जातीचे खोटे प्रमाणपत्र देत नाहीत. या जातीच्या सवलतीच्या संदर्भात वाद सुरु आहेत. एका केसच्या संदर्भात सुप्रिम कोर्टाने निर्णय सुध्दा दिलेला आहे. त्यामुळे या ठिकाणची वस्तुस्थिती लक्षात घेता तुम्ही नगरसेवकांवर क्रिमिनल केसेस लावल्या आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, हा सामाजिक वादाचा मुद्दा आहे. हलबा समाजाच्या जातप्रमाणपत्राच्या संदर्भात सरकारने एक भुमिका घेतली तर दुस-यावेळी दुसरी भुमिका घेतलेली आहे. शासनाने नगरसेवकांवर हलबा समाजाच्या जातीचे सर्टीफिकेट दिले म्हणून ज्या केसेस

...3

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

लावल्या आहेत त्या तुम्ही मागे घेणार का? हलबा समाज हा गरीब समाज असून हातमाग, विणकाम करुन आपली रोजी रोटी तो कमावित आहे. या समाजाची अतिशय दयनीय स्थिती आहे. हा समाज आता खाण्यासाठी मौताद झालेला आहे. या परिस्थितीमुळे सर्व समाजात तीव्र असंतोष पसरलेला आहे. त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राच्या संदर्भात वाद सुरु आहे. त्यामुळे माझे म्हणणे असे आहे की, अशा कारणावरुन या समाजाला मारहाण करणे, त्यांच्यावर केसेस नोंदविणे हे योग्य नाही. या ठिकाणी सामाजिक संघर्ष असल्यामुळे शासनाने नगरसेवकावरील तसेच इतर लोकांवरील केसेस मागे घ्याव्यात यासंदर्भात शासन कारवाई करेल काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, हलबा समाजाला आम्ही एस.टी. म्हणून घेण्यास तयार आहोत यासंदर्भात शासनाने दिल्लीला पत्र पाठविले आहे. परंतु दुस-यावेळेस हा निर्णय आपण वापस घेतलेला आहे. त्यामुळे या समाजाला न्याय देण्यासाठी शासन पुढे काय कार्यवाही करणार आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे :सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर आहे, सर्व कायदेशीर बाबी तपासून जे गुन्हे दाखल झालेले आहे ते काढण्यासंबंधी निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, 9 नगरसेवकांनी हलबा समाजाचे सर्टीफिकेट दिले म्हणून त्यांच्याविरुध्द शासनाने क्रिमिनल केसेस लावलेल्या आहेत. या नगरसेवकांनी हलबा समाजाचे सर्टीफिकेट दिले म्हणजे त्यांनी काय फसवणूक केली आहे काय? त्यामुळे यासंदर्भात जे खटले भरण्यात आलेले आहेत ते वापस घेण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, नगरसेवक उमेदवारी अर्ज भरताना ॲफिडेव्हीट देतो. त्यामध्ये नमूद केलेले असते की, दिलेली माहिती खोटी असल्यास अर्जदार कारवाईस पात्र राहील. ही कायदेशीर बाब तपासून शासन निश्चितपणे निर्णय घेईल. हलबा-कोष्टी समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करावा अशी त्यांची मागणी आहे. या विषयासंदर्भात मंत्रिमंडळात चर्चा झालेली आहे. केंद्रीय सरकारच्या थर्ड सूचीमध्ये हे समावेश करण्यात यावे अशी चर्चा मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेली आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत. नागपूर शहरामध्ये हलबा-कोष्टी समाजासाठी महानगरपालिकेचे जवळपास 20-22 वॉर्ड रिझर्व्ह आहेत. नागपूरच्या सदस्यांना याची कल्पना असेलच. हलबा-कोष्टी समाजाची व्यक्ती एस.टी.साठी राखीव असलेल्या मतदारसंघातून निवडणुकीसाठी उभी राहते आणि निवडून येते. त्यानंतर जातपडताळणी समितीकडून त्याच्या जातीच्या दाखल्याची तपासणी होते तेव्हा त्याचा जातीचा दाखला वैध नसल्याचे सांगून त्यास अपात्र ठरविण्यात येते. कारण अनुसूचित जमातीच्या लिस्टमध्ये हलबा-कोष्टीचा समावेश नसल्यामुळे त्याची उमेदवारी नाकारली जाते. असे प्रकार अनेक ठिकाणी झालेले आहेत. तेव्हा असे वॉर्ड आपण रद्द करावेत जेणेकरुन हलबा-कोष्टीचे उमेदवार ओपनमध्ये आपला उमेदवारी अर्ज भरु शकतील. तेव्हा ही जी विसंगती आहे ती दूर केली पाहिजे. अन्यथा आपल्याला पोटनिवडणुकीसाठी उमेदवार मिळणार नाहीत. मागे एकदा असाच बहिष्कार टाकण्यात आला होता. तेव्हा ही जी विसंगती आहे ती दूर करण्यासाठी शासन स्तरावर मार्ग काढला पाहिजे. जर उमेदवार मिळत नसतील तर तो वॉर्ड ओपन केला पाहिजे आणि त्याप्रमाणे निवडणूक आयोगाकड शिफारस केली पाहिजे. तेव्हा या संदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ज्यावेळी जनगणना केली जाते त्यावेळी त्या भागात राहणारे लोक कोणत्या जातीचे आहेत, कोणत्या धर्माचे आहेत याची नोंद केली जाते. त्याप्रमाणे त्या-त्या समाजाची संख्या लक्षात घेऊन त्या आधारावर वॉर्ड रिझर्व्ह करण्यात येतात. जनगणनेमध्ये हलबा-कोष्टी समाजाची एस.टी.मध्ये नोंद झालेली आहे. परंतु जातपडताळणीमध्ये जेव्हा हे लक्षात येते की, हलबा-कोष्टी समाज एस.टी.मध्ये येत नाही. तेव्हा तो उमेदवार अपात्र

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.........

ठरविला जातो. नगरसेवकाने निवडून आल्यानंतर 90 दिवसांच्या जात जातपडताळणी प्रमाणपत्र आणले पाहिजे अशी अट आहे. या कालावधीत त्याने जातीचे प्रमाणपत्र दिले नाही तर त्याचे सदस्यत्व रद्द होते. सातत्याने असे प्रकार काही ठिकाणी घडत आहेत. तेव्हा या संदर्भात काही मार्ग काढता येतो काय हे अभ्यास करुन पाहिले जाईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, जे नगरसेवक हलबा-कोष्टी म्हणून निवडून आलेले आहेत त्यामध्ये काही नगरसेवक आपल्या पक्षाचे देखील आहेत. माननीय श्री.शरद पवार मुख्यमंत्री असताना त्यांनी या समाजाचा एस.टी.मध्ये समावेश करावा अशी शिफारस केली होती. आताचे मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांचे एक पत्र माझ्याकडे आहे. गोवारी समाजाचा संबंधी आहे. त्यांना एस.टी.मध्ये समावून घेतले, पुन्हा तो आदेश परत घेतला. या वादात मी पडत नाही. मला याठिकाणी एवढेच नमूद करावयाचे आहे की, ज्या नगरसेवकांनी अशी प्रमाणपत्रे दिलेली आहेत त्यांच्यावर क्रिमिनल स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. हे गुन्हे सिव्हील स्वरुपाचे आहेत. त्यांनी ॲफिडेव्हीट दिले असले तरी, त्यांच्यावर क्रिमिनल केस कशाला दाखल करता ? तेव्हा त्यांच्यावरील क्रिमिनल केसेस मागे घेणार आहात काय ? खोटी जात दाखविली असेल, खोटे शिक्के मारुन प्रमाणपत्र सादर केले असेल तर ते प्रकरण क्रिमिनल होऊ शकते. परंतु येथे त्यांनी खोटी प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर क्रिमिन केस दाखल करु नये. त्यांना अपात्र घोषित केलेले आहे, त्यामुळे त्यांना शिक्षा झाली आहे. ही शिक्षा पर्याप्त आहे. त्यामुळे आता त्यांच्यावरील क्रिमिनल केस काढून टाकाव्यात. हलबा समाजाचे लोक गरीब आहेत. त्यांचा हातमागाचा धंदा बंद झालेला आहे. आंदोलनात ज्यांच्यावर केसेस दाखल केलेल्या आहेत त्या काढून घेणार आहात काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ज्या क्रिमिनल केसेस दाखल केलेल्या आहेत त्या परत घेता येतील काय याचा अभ्यास करण्यात येईल. परंतु सातत्याने आंदोलने होत आहेत. माझे आवाहन आहे की, लोकशाहीमध्ये कायदेशीर मार्ग चोखाळला पाहिजे. आंदोलन करताना मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. काही प्रकरणात सुप्रीम कोर्टाने घेतलेल्या निर्णयामुळे राज्य सरकारला निर्णय घेता येत नाहीत.

यानंतर श्री.पुरी.........

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

तेथे मालमत्तेचे विद्रुपीकरण करणे, त्या नष्ट करणे, यामुळे फार मोठा फायदा होतो, असे काहीही नाही. दरवर्षी आपल्या राज्यामध्ये विविध आंदोलनामध्ये कोटयावधी रुपयांच्या मालमत्ता जळत असतात. म्हणून माझे त्यांना आवाहन आहे. या केसेमध्ये त्यांची गरिबी, त्यांचा लढा, त्यांचे वय हे सर्व लक्षात घेऊन व त्यांचे नुकसान होऊ नये यादृष्टीने विचार करुन त्यांच्यावर जे गुन्हे नोंदले गेले आहेत, त्याबाबतीत सुप्रिम कोर्टाच्या निर्देशाप्रमाणे केस टू केस निर्णय घेतला जाईल व त्यांच्यावरील गुन्हे परत घेण्याची प्रक्रिया सुरु केली जाईल.

श्री.सय्यद कमरुझ जामा :सभापति महोदय, हलबा समाज का मुद्दा आज संवेदनशील हो गया है. पिछले 10-15 सालों में 15-20 नगरसेवक अपात्र हो गए हैं. कोई भी पार्टी का नगरसेवक हो, जब वह चुन कर आता है तो उसकी जाति का प्रमाणपत्र जांचपड़ताल के लिए भेजा जाता है. कई सदस्य जांचपड़ताल के बाद अपात्र घोषित किए गए हैं. माननीय उपमुख्यमंत्री जी ने अभी बताया कि सेंसस के समय जो जानकारी इकट्ठी की जाती है उसके आधार पर वार्ड आरक्षित किए जाते हैं. लेकिन जब कोई एस.टी. का व्यक्ति एस.टी. के लिए आरक्षित वार्ड से चुनकर आता है और बाद में उसकी जाति के प्रमाणपत्र की जांचपड़ताल में वह अपात्र घोषित होता है तो उस पर अन्याय होता है. अगर आप एस.टी. के उम्मीदवार को अपात्र घोषित करते हैं तो आप उस वार्ड को ओपन में रखिए. दोनों बात सही नहीं हो सकती. इस विसंगति को दूर किया जाए. दूसरी बात यह है कि गरीब लोगों के खिलाफ क्रिमिनल केस दाखिल किए गए हैं, वे वापस लिए जाने चाहिए. इस बारे में जो आंदोलन किया गया था, वह लोगों ने अपने हक के लिए किया था. जो आंदोलन पोलेटिकली मोटिवेटेड होते हैं, उसके बारे में आप निर्णय लें. लेकिन इन गरीब लोगों के खिलाफ क्रिमिनल केस दाखिल न करें. आज बुनकरों का धंधा बंद पड़ा है. यह संवेदनशील मामला है. इस मामले में बायफरकेशन हो रहा है. इसलिए इस मामले में शासन को उचित निर्णय लेना चाहिए.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या केसमध्ये शासन उचित निर्णय घेईल.

श्री.सागर मेधे : सभापती महोदय, याठिकाणी प्रथमत: माननीय गृह राज्यमंत्र्यांचे मी आभार मानतो की, त्यांनी या विषयावर सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे मान्य केले. याठिकाणी मी अशीही विनंती करतो की, हलबा समाजाचे ले लोक 10-12 वर्षापासून नोकरी करीत आहेत,

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सागर मेघे...

त्यांना जातीचे प्रमाणपत्र अवैध असल्याचे कारण सांगून सेवेतून कमी केले जात आहे किंवा त्यांचे डिमोशन करण्यात येत आहे, त्यामुळे याबाबतीत जोपर्यंत निर्णय लागत नाही, तोपर्यंत आज या कर्मचाऱ्यांवर अशाप्रकारचा जो अन्याय होत आहे, त्याबाबतीत सरकार सहानुभूतीपूर्वक विचार करेल काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, एकंदरीतच घटनेप्रमाणे 50 टक्क्यांपर्यंत रिझर्व्हेशन असले पाहिजे, ही भूमिका स्वीकारली पाहिजे. आज व्हीजेएनटी आणि ओबीसीमध्ये अशा किती तरी जाती आहेत की, त्या ख-याअर्थाने मागासलेल्या आहेत. त्यांची स्वाभाविकपणे मागणी आहे की, आमच्या जातींचा समावेश एससी किंवा एसटीमध्ये करावा. कारण, व्हीजेएनटी आणि ओबीसीमध्ये त्यांना घटनात्मक संरक्षण मिळत नाही, त्याचदृष्टीने योग्य पध्दतीचा न्याय मिळत नाही. त्यातून आंदोलने होत आहेत. म्हणून ज्या जातींची अशी मागणी आहे आणि खऱ्याअर्थाने ज्या जाती मागासलेल्या आहेत, ज्यांना काही विशेष आणखी देण्याची आवश्यकता आहे, अशा जातींबाबत केंद्र सरकारने घटनेत बदल करुन तिसरे श्येडूल निर्माण करुन या उपेक्षित समाजाच्या लोकांना न्याय देण्याची मागणी केंद्र सरकारकडे करण्यात येईल. तसेच, नोकरीच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभाग याबाबतीतील न्यायालयीन निवाडे बघून निर्णय घेईल.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, त्या ठिकाणी मतदार यादी तयार झाली. त्यामध्ये एस.टी.आहेत असे समजून लोकांनी आपली नांवे नोंद केली. वॉर्डमध्ये संपूर्ण एस.टी.समाज म्हणजे हलबा समाजाचे लोक राहतात. दुस-या जातीचे एस.टी. त्या ठिकाणी उपलब्ध नाहीत. म्हणून या लोकांनी फॉर्म भरले व ते निवडून आले. कधी एस.टी.झाले म्हणून त्यांची सवलत काढून घेतली, कधी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आला, वगैरे सर्व बाबी यामध्ये आहेत. या सर्व बाबी लक्षात घेऊन जे नगरसेवक निवडून आले आहेत, मग ते कोणत्याही पक्षाचे असोत, जे निवडून आले त्यांच्यावर फौजदारी खटले दाखल करण्यात आलेले आहेत, हे खटले ताबडतोब काढून टाकावेत, अशी माझी विनंती आहे. अशी कार्यवाही शासन करणार काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर यापूर्वी दिलेले आहे.

श्री.सुरेशदादा देशमुख सभापती महोदय, कोष्टी समाजाचे लोक मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील काही भागात आहेत. या भागात कोष्टी समाजाचे प्रमाण फार मोठे आहे. आंदोलनासाठी आमच्या भागातील काही लोक नागपूर येथे गेले होते. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी म्हटल्याप्रमाणे तिसरे शेडयुल तयार करण्याबाबतची शिफारस केंद्र शासनाला करण्यात येणार आहे. या शेडयुलमध्ये महादेव कोळी समाजाचा समावेश करणार काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ज्या ज्या जाती मागासलेल्या आहेत, ज्यांच्यावर अन्याय होत आहे, असे वाटते, त्यांची वैधता विचारात घेऊन तिसरे शेडयुल तयार करण्याबाबतची आग्रही विनंती करणारी भूमिका राज्य शासनामार्फत घेतली जाईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या जातीचा समावेश निकषाप्रमाणे करता येतो का, तेही तपासले जाईल.

------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.**:नवी मुंबई येथील सायन्स ॲण्ड रिसर्च एज्युकेशनच्या महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांची करण्यात आलेली फसवणूक

**मु. शी.**:नवी मुंबई येथील सायन्स ॲण्ड रिसर्च एज्युकेशनच्या महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांची करण्यात आलेली फसवणूक यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बोरखार, ता.उरण, नवीमुंबई येथे मरीन विषयाचे शिक्षण देणाऱ्या सायन्स अँड रिसर्च एज्युकेशनच्या महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांची लाखो रुपयांची फसवणूक झाली असल्याची मार्च २००७ च्या शेवटच्या आठवडयात उघडकीस आलेली घटना, या संस्थेत मरीन इंजिनियरींगचे प्रशिक्षण देवून परदेशात नोकऱ्या मिळवून देण्याचे आमिष दाखवून संस्थेचे संचालक यांनी विद्यार्थ्याकडून फी पोटी करोडो रुपयांची माया गोळा करणे, या संस्थेस डायरेक्टर जनरल ऑफ शिपींग इंडिया यांची मान्यता नसल्याने तेथील विद्यार्थ्यांना त्यांच्या ट्रेडनुसार नोकऱ्या न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारीनुसार ही संस्था बोगस असल्याचे सिध्द होणे, विद्यार्थ्यांच्या तक्रारीनुसार त्यांच्यावर भांदवि कलम ४०६, ४१८, ४२०(३४) अन्वये गुन्हा दाखल होऊन त्यांना दिनांक ८ जानेवारी,२००७ रोजी अटक करण्यात येणे, या प्रकरणातील सह आरोपी यांचे अटक पूर्व जामीन उच्च न्यायालयाने फेटाळून एक महिना उलटूनही अद्यापपर्यंत त्यांना अटक न होणे, करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्या आरोपींना त्वरीत अटक करावी अशी मागणी उरण विकास मंचाने पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्याकडे करुनही त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..3...........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------------------

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : नवी मुंबई येथे मरीन इंजिनिअरिंगचे शिक्षण देणा-या सायन्स ॲण्ड रिसर्च एज्युकेशनच्या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना लाखो रुपयांचा चुना लावला आहे. प्रवेश देतांना परदेशात नोकरी देण्याचे अमिष दाखविले. डायरेक्टर जनरल ऑफ शिपींग इंडिया यांची मान्यता नसतांना देखील विद्यार्थ्यांना नोकरीची आश्वासने दिली. यासंदर्भात सरकारने कोणती कारवाई केली आहे, संबंधितांविरुध्द दाखल करण्यात आलेल्या गुन्हयाचे स्वरुप काय आहे, त्यांच्यावर खटला दाखल करण्यात आला का, फसवणुकीचे कलम लावण्यात आलेले आहे का ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, बॉम्बे सायन्स ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट यांच्या संचालकांनी डायरेक्टर जनरल ऑफ शिपींग इंडिया यांची परवानगी न घेता महाविद्यालय सुरु केले आहे. जवळ जवळ 381 व 190 विद्यार्थ्यांची फसवणूक करण्यात आलेली आहे व कोटयावधी रुपयांचा घोटाळा झाला आहे. संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम 406, 418, 420 व 34 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये दोन आरोपींना अटक केली असून बाकीच्या लोकांना अटक करावयाची आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या संस्थेचे संचालक, श्री.विकास चौरसिया यांनी पोलिसांना इन-कॅमेरा स्टेटमेंट दिले आहे. तेथील डी.सी.पी.,श्री.प्रवीण पवार व पोलीस निरिक्षक, श्री.वसंत पवार यांच्या उपस्थितीत हे स्टेटमेंट दिलेले आहे. हे स्टेटमेंट सभागृहासमोर ठेवणार काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : हे स्टेटमेंट आता उपलब्ध नाही, माहिती घेऊन सांगता येईल.

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, यामध्ये एका राजकीय पक्षाचा जनरल सेक्रेटरी गुंतलेला आहे. त्यांना पाच लाख रुपये दिले असे, संचालकाने सांगितले आहे. दुस-या एकाला वीस लाख रुपये दिल्याचेही सांगितले आहे. या पलिकडे काय घडले आहे ते मी येथे सांगू शकत नाही. पोलिसांनी जे शोधून काढले आहे ते मला येथे सांगता येत नाही, एवढे हे प्रकरण गंभीर आहे. पोलिसांनी इन-कॅमेरा स्टेटमेंट घेतले आहे ते नंतर सभागृहासमोर ठेवण्यात येईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, नियमाप्रमाणे हे स्टेटमेंट सभागृहासमोर ठेवता येईल किंवा नाही, ते तपासून बघता येईल. ठेवता येणे शक्य असेल तर निश्चित ठेवण्यात येईल.

..5......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..........

अनेक वेळा काही शैक्षणिक संस्था, केंद्रीय प्राधिकरणांची मान्यता, राज्य सरकारची मान्यता घेत नाहीत. माझ्या सूचनेप्रमाणे पोलीस या शैक्षणिक संस्थांवर बारकाईने लक्ष देत आहेत. काही मेडिकल कॉलेजेस केंद्र शासनाची, राज्य शासनाची मान्यता आहे, अशा जाहिराती देतात आणि कॉलेजेस सुरु केली जातात व विद्यार्थ्यांना लाखो रुपयांना फसविले जाते.

यानंतर श्री.बोरले........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील .........

या संस्थेमध्ये सुध्दा 9 कोटी रुपयांना विद्यार्थ्यांना फसविण्यात आले आहे. पोलिसांनी खूप खोलात जाऊन केंद्र शासनाची मान्यता नाही याचा शोध घेतला आणि संस्था चालकांना अटक करुन त्यांची मालमत्ता सुध्दा जप्त केली आहे. यामध्ये कोणत्या राजकीय पक्षाचा पदाधिकारी आहे, याचे मला आणि पोलिसांना काही घेणे-देणे नाही. जे फसवणूक करीत आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. मग तो पदाधिकारी कोणत्याही राजकीय पक्षाचा असला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल. इन कॅमेरा स्टेटमेंट देता येते काय ते सुध्दा बघितले जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, वर्तमानपत्रामध्ये इंजिनिअरींग कॉलेजच्या जाहिराती येतात हे माननीय मंत्री महोदयांनी कबूल केलेले आहे. राज्य शासन वर्तमानपत्रातील जाहिराती पाहून पालकांची दिशाभूल होऊ नये म्हणून सुमोटो कारवाई करणार काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, वर्तमानपत्रामध्ये ज्या जाहिराती येतात त्या ख-या आहेत की नाही, याची उच्च शिक्षण विभागामार्फत तपासणी करण्यात येईल आणि त्यावर पोलिसांमार्फत लक्ष ठेवण्यात येईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ही खूप लांब प्रोसिजर आहे. काही संस्था चालक बाकडी गोळा करुन पडक्या घरात शाळा सुरु करतात. ती शाळा अधिकृत आहे किंवा नाही हे कोणी बघत नाही. त्या शाळेमध्ये मुले प्रवेश घेतात. परंतु ती शाळा अधिकृत नसल्यामुळे शेवटी त्यांना एस.एस.सी. च्या परीक्षेला बसता येत नाही. परिणामी त्या मुलांना बाहेरुन परीक्षेला बसावे लागते. अशा अनधिकृत शाळा किंवा बांधकाम सुरु असलेल्या शाळांना केंद्र शासनाची, राज्य शासनाची परवानगी आहे किंवा नाही, इंजिनिअरिंग कॉलेज असेल तर त्याला ए.आय.सी.टी. ची परवानगी आहे किंवा नाही, याची माहिती घेऊन ती माहिती जनतेला दिली तर लोकांची फसवणूक होणार नाही. जाहिरात हा नंतरचा भाग आहे. तेव्हा आपण हे सर्व प्रकार थांबविण्यासाठी सुमोटो अशा प्रकारची कार्यवाही करणार काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, त्यामुळे पोलिसांचे आणखी एक काम वाढेल. चांगले काम करण्यासाठी जे संस्था चालक मान्यता घेऊन कॉलेज सुरु करावयास निघाले आहेत

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील .........

त्यांना पोलीस स्टेशनमध्ये पाठविले तर त्यांना त्रास होईल आणि हे पोलिसांना देखील त्रासदायक ठरु शकेल. अशा प्रकारचे कॉलेज काढण्याची कोणी हिम्मत करणार नाही यासाठी शिक्षण विभागामार्फत आणि गृह विभागामार्फत धोरण निश्चित केले जाईल. कोणत्या बाबीवर पोलिसांनी लक्ष ठेवले पाहिजे व कोणत्या बाबीवर उच्च शिक्षण विभागाने लक्ष ठेवले पाहिजे, याबाबत धोरण ठरविले जाईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा प्रकार गंभीर आहे. ज्यांना निकड आहे त्यांना ॲडमिशन मिळत नाही. अशा परिस्थितीत ज्यांना ॲडमिशन मिळत नाही ते बोगस जाहिरातीच्या पाठीमागे जाऊन त्या कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतात व नंतर यांची फसवणूक होते. म्हणून शासनाने जनतेच्या माहितीसाठी सर्व भाषांमध्ये परिपत्रक काढून जनतेमध्ये जागृती निर्माण करण्याची आवश्यकता आहे. वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिलेल्या इन्स्टीट्यूट अधिकृत आहेत किंवा नाहीत, मान्यता प्राप्त आहेत किंवा नाहीत याची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी शासन फतवा जाहीर करेल काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जी महागडी कॉलेजेस आहेत, ज्या कॉलेजमध्ये लाखो रुपये फी द्यावी लागते अशा कॉलेजमध्ये प्रवेश घेत असतांना पालकांनी सुध्दा खात्री करुन घ्यावी की ते कॉलेज अधिकृत आहे किंवा नाही. तसेच याबाबतचे परिपत्रक शासनामार्फत काढले जाईल. ही गोष्ट खरी आहे की, दरोडयांची चर्चा मोठया प्रमाणावर होते आणि ती झाली सुध्दा पाहिजे. अर्थात दरोडे पडणे चांगले आहे, असे कोणीही म्हणणार नाही.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ SBT/ MAP/ MAP/ पूर्वी श्री.बोरले 17:00

श्री.आर.आर.पाटील .....

सभापती महोदय, व्हॉईट कॉलर क्रिमिनल्सकडून घातलेले हे मोठे दरोडेच आहेत. लोकांची एकंदरीत जी वित्तहानी होत आहे त्यापैकी 95 टक्के लोकांची व पैशाची फसवणूक व्हॉईट कॉलर क्रिमिनल्सकडून होते. हे लोक समाजामध्ये, शासकीय कार्यालयात उघड माथ्याने व रुबाबात वापरतात आणि दरोडेखोरांपेक्षा भयानक काम हे करीत आहेत. आज आपल्याकडे सर्व प्रकारचे कायदे आहेत परंतु जितक्या गांभीर्याने व्हॉईट कॉलर क्रिमिनल्सवर कारवाई करायला पाहिजे तेव्हा हे कायदे अपुरे पडतात. याबाबत मी ठेवीदारांच्या कायद्याचे उदाहरण देऊ इच्छितो. कोटयावधी रुपयांच्या ठेवी जमा केलेल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये सर्वत्र पडलेल्या दरोडयामधील एकूण रक्कम दोन कोटीसुध्दा होणार नाही. परंतु व्हाईट कॉलर क्रिमिनल्सचा विचार केला तर ठेवीदारांच्या ठेवी बुडवून एक-एकाकडे 40-50 कोटी जमा झालेले आहे. व्हाईट कॉलर क्रिमिनल्सच्या बाबतीत निश्चितपणे काही उपाययोजना शासनाकडून केल्या जातील, असे मी आश्वासन देतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्र.29818 दिनांक 19.7.2007 रोजी सभागृहात उपस्थित झाला होता, त्यावेळी प्रश्नाच्या उत्तरात 2 कोटी 17 लाख 30 हजाराची मालमत्ता हस्तगत केल्याचे म्हटले आहे. परंतु आजच्या लक्षवेधीमध्ये हीच रक्कम 3 कोटी 6 लाख 9 हजार 400 इतकी दर्शविण्यात आलेली आहे. गृह खात्याने लक्षवेधी व तारांकित प्रश्नाच्या उत्तरात वेगवेगळी रक्कम दाखविली आहे. याबाबत मी प्रश्न विचारु इच्छितो की, खरी रक्कम कोणती आहे ? खरी मालमत्ता किती आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या शैक्षणिक संस्थेमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी विविध राज्यातील होते. त्यामुळे या प्रकरणाबाबत सर्वत्र चौकशी करुन जसजशा तक्रारी येतील त्याप्रमाणे कारवाई केली जात आहे. लोकांची किती फसवणूक झाली आहे त्यानुसार हे आकडे निश्चित केलेले आहेत. फसवणूक करणारांची मालमत्ता कोठे आहे हे शोधून जप्त करण्यात येत आहे. फसवणूक करणाऱ्यांनी बॅकेत ठेवलेले 1 कोटी 50 लाख 40 हजार 873 ही रक्कम व जंगम मालमत्ता 1 मोटार कार, 2 टँकर, 2 महिंद्रा, कंपनीची मोटार, जीप, ट्रॅक्टर, स्कार्पिओ गाडी, 2 लॅपटॉप अशा प्रकारे एकूण 4 कोटी 57 लाख 20 हजार 323 रुपयांचा माल जप्त करण्यात आलेला आहे.

-----

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) नियमावली 1981 मधील आरक्षणाच्या टक्केवारीत नियमानुसार करावयाचा बदल.

**मु.शी.** : खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) नियमावली 1981 मधील आरक्षणाच्या टक्केवारीत नियमानुसार करावयाच्या बदलासंबंधी सर्वश्री श्री.रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे, श्रीकांत जोशी वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) नियमावली १९८१ राज्यातील सर्व शाळांना दिनांक १५ जुलै,१९८१ पासून लागू होणे, सन १९८१ च्या नियमावलीतील तरतुदीनुसार सर्व शाळांना, शिक्षक व शिक्षकेतरांना, संस्थाचालकांना व शासनास बंधनकारक असणे, सन १९८१ च्या नियमावलीतील नियम ९ अन्वये सरळसेवा भरतीसाठी व पदोन्नतीसाठी आरक्षणाची तरतुद असणे, तत्कालीन शासन निर्णयानुसार सरळ सेवा भरतीसाठी ३४ टक्के व पदोन्नतीसाठी २४ टक्के आरक्षणाची तरतुद नियमावलीत असणे, गेल्या २६ वर्षात आरक्षणाच्या टक्केवारीत शासनाने बदल करणे, सध्या सरळसेवा भरतीसाठी ५२ टक्के व पदोन्नतीसाठी ३३ टक्के आरक्षण लागू असणे, मात्र शासनाने नियमावलीत दुरुस्ती न करणे, नियमावलीतील दुरुस्ती न केल्याने वाढीव आरक्षण न्यायालयाकडून अवैध ठरणे, शासनाकडे वारंवार निवेदने देऊनही १९८१ च्या नियमावलीत आरक्षणाच्या टक्केवारीत बदल न होणे, परिणामत: राज्यातील मागासवर्गीयांना सरळसेवा भरतीपासून व पदोन्नतीपासून वंचित ठेवणे, शासनाचे निर्णय व परिपत्रके न्यायालयाने अवैध ठरविणे, नियमावलीत बदल करणे आवश्यक असतांनाही बदल न करणे त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील मागसवर्गीय शिक्षक व शिक्षकेतरांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भूमिका व करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

.

.....3



PNG/ KGS/ SBT/ MAP/ MAP/

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....4

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियमावली 1981 मधील तरतूदीनुसार सरळ सेवा भरती व पदोन्नतीसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. याबाबतचा विषय लक्षवेधीच्या माध्यमातून सभागृहात मांडला आहे. 1981 सालापर्यंत माध्यमिक शाळा संहिता वापरात होती. या माध्यमिक शाळा संहितेऐवजी दिनांक 16 जुलै, 1981 पासून महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती 1981 ही नियमावली महाराष्ट्रामध्ये लागू झालेली आहे. या नियमावलीमधील नियम क्र.9 मध्ये आरक्षणाची टक्केवारी सरळ सेवा भरतीमध्ये 34 टक्के आहे आणि पदोन्नतीसाठी 24 टक्के आहे. आरक्षणाच्या टक्केवारीमध्ये यानंतरच्या 26 वर्षात अनेक बदल झालेले आहेत. सध्या सरळ सेवा भरतीच्या आरक्षणाची टक्केवारी 52 टक्के आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 17:05

श्री. मोते ...

आणि पदोन्नतीसाठी 33 टक्के आहे. त्यामुळे जोपर्यंत या नियमावलीमध्ये बदल होत नाही तोपर्यंत परिपत्रक किंवा जी.आर.च्या आधारे ही अमलबजावणी करता येत नाही. म्हणूनच अनेक प्रकरणे न्यायालयात गेलेली आहेत. न्यायालये देखील शासनाची परिपत्रके आणि जी.आर. मानायला तयार नाहीत. न्यायालयाचे देखील हेच म्हणणे आहे की, जोपर्यंत कायद्यात बदल होत नाही तोपर्यंत ही जी वाढीव आरक्षणाची तरतूद आहे ती मान्य होणार नाही. म्हणूनच माझी या लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, सरळ सेवा भरतीसाठी जे 34 टक्क्याचे आरक्षण आहे ते 52 टक्के करण्याच्या संदर्भात आपण तातडीने बदल करणार आहात का ? आणि माझा दुसरा मुद्दा असा आहे की, या ठिकाणी सभागृहाची दिशाभूल करणारे आणि चुकीचे उत्तर दिलेले आहे. या ठिकाणी आम्ही बढतीसाठी 52 टक्के आरक्षणाची मागणी केलेली नाही तर सरळसेवा भरतीसाठी 52 टक्के आरक्षणाची मागणी केलेली आहे आणि ती तरतूद आज या ठिकाणी आहे. केवळ त्याप्रमाणे कायद्यात बदल होण्याची आवश्यकता आहे. मात्र या ठिकाणी उत्तर असे दिले आहे की, 50 टक्क्यापेक्षा जास्त म्हणजे 52 टक्के आरक्षणाच्या संदर्भात जी अधिसूचना काढावयाची आहे त्या संदर्भात सुप्रीम कोर्टाचे जे निर्बंध आहेत त्यामुळे आम्हाला ती अधिसूचना काढता येत नाही. सभापती महोदय, आम्ही पदोन्नतीसाठी 52 टक्क्याचे आरक्षण मागितलेले नाही. त्यामुळे सुप्रीम कोर्टाचे हे बंधन लागू होणार नाही. तेव्हा आपण त्या पद्धतीने या दोन्ही तरतुदींमध्ये तातडीने बदल करणार आहात का ? आणि महाराष्ट्रातील मागासवर्गीय लोकांना न्याय देणार आहात का ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, अतिशय सुस्पष्ट आहे की, सरळसेवा भरतीसाठी 52 टक्के आणि पदोन्नतीसाठी 33 टक्के आरक्षण दिलेले आहे. पण यामध्ये खरा प्रश्न हा आहे की, या शासन निर्णयाला आव्हान देणारा हा भाग आहे. म्हणजेच विधीग्राह्यतेसंबंधातील हा प्रश्न आहे आणि नियमामध्ये बदल करणे तसेच रूल्स फ्रेम करणे यासाठी आवश्यक आहे आणि आम्ही ते एक महिन्यामध्ये करणार आहोत.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा जो 1977 चा कायदा आहे त्या प्रमाणे डेलिगेटेड लेजिस्लेशनच्या पॉवर्स घेऊन रूल्स फ्रेम केलेले आहेत. यामध्ये दोन गोष्टी होण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात शासनाने जे निर्णय घेतलेले आहेत त्या विषयी फार असे मतभेद आहेत असे नाही. पण शासन निर्णयांनी ते अमलात आणणे हे बेकायदा आहे असे निर्णय

....... 3झेड 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. देशमुख .....

हायकोर्टाने दिले आहेत. त्यामुळे ते रूल्समध्ये टाकले पाहिजे. ही एक गोष्ट आणि आपण विभागाला स्थायी आदेश द्या की, यानंतर कोणतीही गोष्ट रूल्समध्ये प्रिस्क्राईब करून नंतरच करा. तेव्हा यामध्ये दोन गोष्टी आहेत. त्यातील पहिली गोष्ट आपण किती दिवसात करणार आहात आणि दुसरी गोष्ट म्हणजे विभागाला स्थायी आदेश किती दिवसात देणार आहात ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, या दोन्ही अत्यंत महत्त्वाच्या बाबी आहेत आणि त्यासाठी निश्चितच एक महिन्याचा कालावधी लागेल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाचे वेळोवेळी आरक्षणाबाबत निकाल आलेले आहेत. ते निकाल आल्यानंतर त्या दृष्टीने दुरूस्ती करण्यासाठी अधिसूचना काढणे हे त्या त्यावेळी शक्य होते पण ते गेले गेले नाही, त्याची कारणे काय आहेत ? कारण बलदेव प्रकरणामध्ये जो निकाल झाला तो शासनाला माहिती आहे. त्या प्रकरणामध्ये हायकोर्टाने असे म्हटले की, नियमावलीमध्ये दुरूस्ती नसल्यामुळे सुप्रीम कोर्टाने निकाल दिला की, दोन जागा असतील तर एक जागा आरक्षित होते. हा सुप्रीम कोर्टाचा निकाल असताना देखील बलदेव प्रकरणात त्या तांत्रिक बाबीमुळे त्यांचे आरक्षण झाले. आता शासनाचे अधिकारी ते प्रकरण समोर ठेवून ज्यांना ज्यांना सुप्रीम कोर्टाने बढती दिली त्यांना रिवर्ट करण्याचे काम करायला लागले आहेत. ते तात्काळ थांबविणे आवश्यक आहे. आणि आरक्षणात बदल झालेले निर्णय दुरूस्त करणे हे नंबर एक आणि सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार दुरूस्त करणे हे नंबर दोन, आपण करणार का?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, मी हे मान्य केले आहे की, याच्या अमलबजावणीच्या वेळेसच या अडचणी निर्माण होतात आणि म्हणूनच एक महिन्याच्या आत आम्ही हे करणार आहोत.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी एक तांत्रिक प्रश्न विचारतो. या निवेदनामध्ये "सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे नोकरीतील बढतीचे प्रमाण 50 टक्क्यांच्या वर जाऊ नये असा निर्णय झाल्याचे समजल्यावरून.." म्हटले आहे. सुप्रीम कोर्टाचा कोणताही निर्णय होतो तो प्राप्त होतो. अशा प्रकारे समजण्याच्या आधारे सरकार चालणार असेल तर ती गंभीर बाब आहे. तेव्हा याबाबत सुप्रीम कोर्टाचा निर्णय निश्चितपणे झाला आहे काय? असेल तर तो शासनावर बंधनकारक आहे. निवेदनामध्ये असलेला 'समजल्यावरून...' हा शब्द आपण काढून टाकणार का ?

...... 3झेड 3 ...



KBS/ KGS/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 17:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाची अमलबजावणी करणे हे कायदेशीररित्या बंधनकारक आहे. या निर्णयाची अमलबजावणी करीत असताना त्यात अडचणी येतात, कॉम्प्लिकेशन्स निर्माण होतात, त्या दूर करण्यासाठी नोटिफिकेशन काढणे आवश्यक आहे. या ठिकाणी "...समजल्यावरून.." हा चुकीचा शब्द आला असेल तर तो दुरूस्त करण्यात येईल. सुप्रीम कोर्टाच्या त्या निर्णयाची छाननी करून एक महिन्याच्या आत त्याप्रमाणे अमलबजावणी करू.

***

( यानंतर श्री. सरफरे ....4ए 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, आता आपल्यापुढे क्रमांक चार वरील लक्षवेधी सूचना चर्चेसाठी आहे. आणि आता संध्याकाळचे पाच वाजून गेले आहेत. अजून तीन लक्षवेधी सूचनांवर चर्चा व्हावयाची आहे. याशिवाय तीन विधेयके चर्चेसाठी आहेत. आणि एक नियम 260 अन्वये प्रस्ताव तसेच दोन अर्धा तास चर्चा, इतके कामकाज आपल्याला करावयाचे आहे. तर हे सर्व कामकाज आज केव्हां पूर्ण होणार आहे? त्यासाठी किती वेळ लागणार आहे?

**उपसभापती** : हे सर्व कामकाज आज थोडे उशिरापर्यंत आणि उद्या सकाळी लवकर बसून करावयाचे म्हटले तर मला येथेच मुक्कामाला रहावे लागेल.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, तसे झाले तर रात्रीचे आपले सर्व कार्यक्रम डिस्टर्ब होतील...

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय उप मुख्यमंत्र्यांनी रात्रीचे आपले कार्यक्रम डिस्टर्ब होतील असे सुचविले. ही बाब त्यांना देखील त्रासदायक आहे.

**उपसभापती** : माननीय उप मुख्यमंत्री "आपले कार्यक्रम डिस्टर्ब होतील" असे म्हणाले. याचा अर्थ ते मलाच म्हणाले नाहीत. ते बहुवचनी बोलले आहेत. आपणा सर्वांना समोर ठेऊन बोलले आहेत. त्यामुळे आपणही त्यामध्ये आला आहात. उद्या सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजता भरणार असल्यामुळे सभागृहाची विशेष बैठक किती वाजता ठेवावयाची या संदर्भात मी माननीय सभापतींकडे पाच मिनिटामध्ये विचारणा करुन सांगतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

पृ.शी. : राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह,आश्रमशाळा व आंबेडकर भवन उभारण्याची अंमलबजावणी करणे

मु.शी. : राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह,आश्रमशाळा व आंबेडकर भवन उभारण्याची अंमलबजावणी करण्यासंबंधी सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, विक्रम काळे, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, सदाशिवराव पोळ, वसंतराव चव्हाण, जगन्नाथ शेवाळे, भास्कर जाधव, श्रीमती फौजिया खान यांनी दिलेली लक्षवेधी सूचना .

श्री. जितेंद्र आव्हाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

"राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, आश्रमशाळा आणि ३४ आंबेडकर भवने उभारण्यासाठी ५१९ कोटी रुपयांची तरतूद केलेली असताना या प्रकल्पांवर देखरेख व नियंत्रणासाठी स्वतंत्र सेल नसल्याने सदर प्रकरणी कार्यवाही करण्यास येत असलेले अपयश, सामाजिक न्याय विभागाने मागासवर्गीयांसाठी आखलेल्या योजनांची योग्य पध्दतीने अंमलबजावणी होत नसल्याने हजारो मागासवर्गीय या सुविधांपासून वंचित असणे, सदर प्रकरणी कार्यवाही करण्यास संबंधितांकडून होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील मागासवर्गीयांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, शासनाने जाहीर केलेल्या योजनांची अंमलबजावणी व्हावी यासाठी त्वरीत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. चंद्रकांत हंडोरे (सामाजिक न्यायमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, शासनाने अत्यंत उदात्त हेतूने गेल्या वर्षी मागासवर्गीयांकरिता आंबेडकर भवन व आश्रमशाळा उभारण्याची योजना जाहीर केली. परंतु त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यामध्ये दिरंगाई होत आहे असे दिसते. याबाबत मला असे विचारावयाचे आहे की, 430 जागांवर वसतिगृहे बांधण्याकरिता प्रस्ताव दिले होते त्यापैकी किती मंजूर झाले? 34 ठिकाणी आंबेडकर भवन उभारण्यासाठी प्रस्ताव दिले होते त्यापैकी किती ठिकाणी मंजूर झाले. तसेच, वसतिगृह व आंबेडकर भवनाच्या उभारणीसाठी किती निधी देण्यात आला? शासकीय वसतिगृहासाठी रु.19942.12 लाख, विभागीय वसतिगृहासाठी रु.2460.00 लाख, शासकीय निवासी शाळेसाठी रु.21221.76 लाख व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनासाठी रु. 7857.74 लाख इतकी रक्कम मंजूर करण्यात आली. यामध्ये केवळ 55 ठिकाणी शासकीय वसतिगृहांसाठी, 44 ठिकाणी शासकीय निवासी शाळांसाठी आणि 11 ठिकाणी आंबेडकर भवनाच्या बांधकामासाठी निविदा काढण्यात आल्या आहेत. ही बांधकामे करण्याकरिता शासनाला जागा मिळाली की नाही हे शासनाने स्पष्ट केले पाहिजे? मागासवर्गीय मुला-मुलींना न्याय देण्याकरिता पोटतिडिकीने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यामध्ये शासनाला कोणती अडचण येत आहे? या कामाकरिता महसूल विभागाने किती निधी दिला आहे? शासन हे काम करण्याच्या बाबतीत अजून मागे कां आहे?

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या संदर्भात सांगू इच्छितो की, 100 मुलांचे वसतिगृह बांधण्याचे निश्चित झाले आहे.

(यांनतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत हांडोरे (पुढे सुरू..

1 हजार विद्यार्थ्यांची क्षमता असलेली 7 वसतिगृहे बांधण्याचे निश्चित केलेले आहे. 353 तालुक्यांपैकी 100 ठिकाणी निवासी शाळा बांधण्याचे निश्चित केलेले आहे, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक सामाजिक न्याय भवन बांधण्याचे निश्चित केलेले आहे. यासाठी जवळजवळ 519 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. गेल्या दीड वर्षापासून सातत्याने ही सगळी कामे व्हावीत म्हणून मी स्वत: प्रयत्नशील आहे. या सगळ्या योजनांची माझ्याकडूनच सुरुवात झालेली आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : आपण सुरुवात केली, त्याबद्दल आपले कौतुक करतो, परंतु त्याची अंमलबजावणी झालेली आहे काय ?

श्री.चंद्रकांत हांडोरे : गेल्या दीड वर्षापासून सातत्याने मागासवर्गीय विद्यार्थांना रहाण्यासाठी तालुका स्तरावर वसतिगृहे झाली पाहिजेत, शाळा झाल्या पाहिजेत, यासाठी जीआर. काढून पैशाची तरतूद केलेली आहे. मी मंत्री असून देखील गाव पातळीर तलाठी, तहसिलदार, जिल्हा स्तरावरील जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त, माननीय महसूल मंत्री, माननीय मुख्यमंत्री यांच्याबरोबर जमीन मिळावी म्हणून बैठका घेतल्या, त्यांच्याशी दूरध्वनीवरून देखील चर्चा केली, त्यामुळे या कामांसाठी मोठ्याप्रमाणावर जमिनी उपलब्ध झालेल्या आहेत. काही जमिनी या कृषी खात्याच्या, दुग्ध विकास विभागाच्या, महसूल विभागाच्या आहेत. उपलब्ध झालेल्या जमिनींपैकी काही ठिकाणच्या जमिनीचे क्षेत्रफळ कमी असल्यामुळे सामाजिक न्याय भवनाला जागा कमी पडते. उदाहरण द्यायचे झ ाले तर ठाणे येथील कोपरी नाक्यावर 16 गुंठे जमीन उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे प्लॅनमध्ये बदल करून त्या ठिकाणी बांधकाम कसे करता येईल, हे पहाण्यासाठी काही कालावधी गेलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या कामांसाठी टेंडर बोलाविलेले आहे. त्यामुळे थोड्याच दिवसांमध्ये या सगळ्या कामांना सुरुवात होईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : आपण यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहात, परंतु त्यामध्ये आपल्याला किती यश आलेले आहे ? महसूल खात्याची, दुग्ध विकास विभागाची किंवा वन खात्याची जमीन मिळाली याच्याशी आम्हाला कर्तव्य नाही. दीड वर्षापासून आपण प्रयत्न करत अहात, त्या प्रयत्नाला किती यश आले ?

श्री.चंद्रकांत हांडोरे : वेगवेगळ्या स्तरावर प्रयत्न केले जात आहेत.याबाबत सर्व सन्माननीय

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.चंद्रकांत हांडोरे (पुढे सुरू....

सदस्यांनाही विनंती केलेली आहे की, आपण या कामामध्ये पुढाकार घ्यावा, जेणेकरून या कामाला सहकार्य मिळेल आणि ही कामे लवकरात लवकर करता येतील. 100 मुलांची क्षमता असलेली वसतिगृहे काढण्यासाठी 55 ठिकाणच्या जागांचा निविदा काढलेल्या आहेत. औरंगाबाद येथे 1 हजार विद्यार्थ्यांची क्षमता असलेल्या वसतिगृहासाठी एक टेंडर बोलाविलेले होते. त्या कार्यक्रमाला माननीय मुख्यमंत्री महोदय आणि उप मुख्यमंत्री महोदय आलेले होते.

श्री.जितेंद्र आव्हाड : माझा प्रश्न वेगळा आहे. आपल्याला यामध्ये किती यश आलेले आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड, यांना सांगावयाचे आहे की, दीड वर्षामध्ये या कामाचे मूल्यमापन करू नये. मंत्री महोदयांनी यासाठी सातत्याने प्रयत्न केलेले आहेत. थोड्याच कालावधीमये याबाबतचे अनुकूल परिणाम पहायला मिळणार आहेत.

श्री.जितेंद्र आव्हाड : यश किती आणि अपयश किती आलेले आहे? हे सभागृहाला कळले पाहिजे. 100 विद्यार्थ्यांची क्षमता असलेली वसतिगृहे बांधण्यासाठी 55 ठिकाणच्या निविदा आलेल्या आहेत म्हणजे 10 टक्के यश आलेले आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ....

दीड वर्षामध्ये 10 टक्के यश मिळणार असेल तर ते अपयश आहे. माननीय मंत्रिमहोदयांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना शासनाचा पाठिंबा नाही असे आम्ही समजावयाचे काय ? माननीय मंत्रिमहोदयानी सांगितले की, आम्ही फोनवरुन चर्चा करीत आहोत.

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदयांना मी सूचना करतो की, आपण सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांना बरोबर घ्यावे आणि पुढचे प्रयत्न करावेत म्हणजे हमखास यश मिळेल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी हे हसण्यावारी घेतले. त्यांनी उत्तर दिलेले नाही.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, जागेचा प्रश्न असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या मदतीपेक्षा आपली मदत उपयुक्त ठरेल.

**उपसभापती** : मी जर निर्देश दिले तर मतदान घ्यावे लागेल.

श्री. चंद्रकांत हंडारे : दोघांनी मिळून प्रयत्न केला तर आणखी लवकर काम होईल. सभापती महोदय, 1 हजार मुलांच्या वसतिगृहासाठी निविदा काढलेली आहे. 100 आश्रमशाळांच्या बाबतीत 100 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. 34 पैकी 17 ठिकाणी जागा मिळालेली आहे. 11 ठिकाणी निविदा काढण्यात आलेल्या आहेत. जमिनी मिळविण्यासाठी सातत्याने सामाजिक न्याय विभाग प्रयत्नशील आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : आपल्या सातत्याला शासनाचा सातत्याने पाठिंबा नाही.

श्री. चंद्रकांत हंडोरे : यामध्ये आपले सहकार्य अपेक्षित आहे असे मला वाटते.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाकडे प्रत्यक्षात असलेल्या होस्टेलच्या ठिकाणी अनेक जमिनी आहेत. त्या ठिकाणी मोठमोठ्या जमिनी आहेत. त्यांचा एफ.एस.आय. पूर्णपणे वापरला गेलेला नाही. अतिशय सडलेल्या अवस्थेमध्ये त्या इमारती आहेत. त्या जुन्या इमारती बदलून, त्या कन्व्हर्ट करुन सामाजिक न्याय भवन बांधू शकतो. आपण जमिनीच्या बाबतीत सातत्याने जे सांगत आहात त्या पध्दतीने काही होणार नाही. या प्रोसेसला किती दिवस लागणार आहेत ? आपल्याकडे काम करण्यासाठी सक्षम स्टाफ नाही. आपण स्वत: जाऊन सातबाराचे उतारे काढणार आहात काय ? आपले खाते काय करते ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती बरोबर आहे की, सामाजिक न्याय विभागाकडे होस्टेलसाठी ज्या जागा उपलब्ध आहेत त्यांचेही प्रपोजल तयार करीत आहोत. 54 ठिकाणी अतिरिक्त जमीन उपलब्ध आहे. आमच्या कडे तरतूद आहे. सन 2007-08 मध्ये तरतूद करीत आहोत. या सगळ्या जागा प्रोसेसमध्ये आहेत आणि त्या जागा मिळण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे हे काम लवकरात लवकर करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, हा अत्यंत चांगला आणि महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे. शिक्षण हे केवळ इमारतीवर आणि भवनावर अवलंबून नसते. आदिवासी विभागाने आदिवासी मुलांसाठी सैनिकी स्कूलला जोडण्याचा प्रस्ताव केला. जी शासकीय वसतिगृहे आहेत, ज्या निवासी शाळा आहेत तेथील सोयीसुविधा आणि शिक्षक यासाठी शासन नेमके काय करीत आहे ? आताची शासकीय वसतिगृहे पाहिली तर त्यांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. तशी वाईट परिस्थिती होऊ नये म्हणून शासन काय कार्यवाही करणार आहे ? यासाठी काय तरतूद केली आहे ?

श्री. चंदकांत हंडोरे : सभापती महोदय, यामध्ये प्राथमिक स्तरावर इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या शाळा आहेत. या शाळा सुरु व्हावयाच्या आहेत. एकदा शाळा सुरु झाल्यानंतर त्या ठिकाणी काय काय घ्यावयाचे ते ठरविता येईल. स्टाफ मंजूर झालेला आहे त्यामुळे तशी काही अडचण येणार नाही.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हा गंभीर प्रश्न आहे. नवबौध्दांचे तसेच अनुसूचित जमातीचे ड्रॉपआऊटचे जे प्रमाण आहे ते पाहता त्यांना सोयीसुविधा तातडीने उपलब्ध करुन देणे अत्यंत महत्वाचे आहे. अशा प्रकारे शिक्षणामध्ये या समाजाची जी अधोगती होत आहे ती पुरोगामी महाराष्ट्राच्या दृष्टीने फार चांगली नाही. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी होस्टेलची स्थिती सांगितली. वडाळा येथील होस्टेल पाडून नव्याने बांधण्याची गरज आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जितेंद्र आव्हाड...)

मागासवर्गीय माणसे तेथे जावू शकत नाहीत अशी हॉस्टेलची परिस्थिती आहे. सभागृहाचे नेते सभागृहामध्ये उपस्थित आहेत. माझी शासनाला विनंती आहे की, आपण जी पॉलिसी केली तिचे मागील दीड वर्षाच्या काळातील मूल्यमापन केले तर आपण अपयशाच्या वाटेवर आहोत असे दिसून येते. हे अपयश यशामध्ये कसे बदलता येईल यासाठी शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. शासनाला जमीन मिळण्यामध्ये अडचण नाही. औरंगाबाद, जालना, नाशिक या ठिकाणी तातडीने जमीन मिळू शकते. तेव्हा या जमिनी किती दिवसात मिळतील आणि ही संपूर्ण योजना किती दिवसात कार्यान्वित होईल ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून या शाळांची सोय केलेली आहे. पुढच्या महिनाभरामध्ये या सर्व कामांचा शुभारंभ केला जाईल.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: परभणी व राज्याच्या अन्य जिल्हयामध्ये रेशन यंत्रणेद्वारे निकृष्ट दर्जाचा गहू वितरण करणे

**मु.शी.**: परभणी व राज्याच्या अन्य जिल्हयामध्ये रेशन यंत्रणेद्वारे निकृष्ट दर्जाचा गहू वितरण करणे यासंबंधी सर्वश्री सुरेशदादा देशमुख, संजय दत्त, रमेश निकोसे, श्रीमती सुधा जोशी, सर्वश्री धनाजी साठे, गोविंदराव आदिक, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, पाशा पटेल, श्रीकांत जोशी, जगदीश गुप्ता, गुरुमुख जागवानी, डॉ. नीलम गो-हे सर्वश्री धोंडीराम राठोड, सागर मेघे, जयंत प्र. पाटील प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. सुरेशदादा देशमुख (परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"परभणी जिल्हयात तसेच राज्यात ठिकठिकाणी रेशन यंत्रणेवरुन वितरित करण्यात येणारा निकृष्ट दर्जाचा सडलेला गहू, या गव्हाचे वितरण रेशनद्वारे करण्यात आल्याने संतप्त झालेल्या महिलांनी सडलेल्या गव्हाच्या पोळया बनवून जिल्हाधिकारी परभणी यांच्या कार्यालयावर सदर गव्हाच्या पोळया घेऊन मोर्चा काढल्याची दिनांक 5 जुलै 2006 रोजी घडलेली घटना, अर्थसंकल्पीय अधिवेशनात बंदी केलेले लाल गव्हाचे नियतन पुन्हा राज्यात सर्वत्र होणे, परिणामी राज्यभर शासनाच्या गहू वितरणाच्या धोरणाबाबत जनमानसात नाराजीचे उमटलेले सूर, लाल गहू अतिशय निकृष्ट असल्याने व तो खाण्यास योग्य नसल्याने याबाबत गरीब जनतेत पसरलेली तीव्र संतापाची भवना, यावर शासनाने तातडीने करावयाची कारवाई आणि शासनाची प्रतिक्रिया."

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे (अन्न, नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथे सोबतचे यनिवेदन छापावे.)

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेशदादा देशमुख : परभणी आणि राज्यातील इतर जिल्हयातील शिधा वाटप केन्द्रातून निकृष्ट दर्जाचा गहू वितरीत करण्यात आलेला असताना देखील हा गहू खाण्यास योग्य असल्याचे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना आपल्या मार्फत विनंती करतो की, त्यांनी आमच्या परभणी जिल्हयामध्ये येऊन शिधा वाटप केन्द्रातील गव्हाचे निरीक्षण करावे. हा निकृष्ट गहू वितरीत करण्याच्याबाबतीत जबाबदार असणा-या अधिका-यांवर शासन तातडीने कारवाई करणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : माननीय सदस्यांचे निमंत्रण स्वीकारले जाईल. या संदर्भात, तो गहू मानवी खाण्यास योग्य आहे अशा प्रकारचे प्रमाणपत्र मिळालेले आहे. एव्हढेच नाही तर या बाबतीत जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्यावेळी शासनाने सर्व अधिका-यांना सक्त सूचना दिलेल्या आहेत. अशा प्रकारचा गहू उचल करण्यापूर्वी एफसीआय आणि आमच्या अधिका-यांनी संयुक्त तपासणी करावी आणि तो गहू खाण्यास योग्य आहे अशा प्रकारचे प्रमाणपत्र एफसीआयकडून घेऊन त्यानंतर त्या गव्हाचे वितरण करण्यात यावे अशा प्रकारच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

श्रीमती सुधा जोशी : निकृष्ट दर्जाचा, सडलेला गहू हा फक्त परभणी जिल्हयामध्येच नाही तर महाराष्ट्राच्या विविध जिल्हयामध्ये आणि मुंबई शहरामध्ये सुध्दा शिधा वाटप केन्द्रातून दिला जातो. या गव्हाच्या बाबतीत जनतेमध्ये तीव्र पडसाद उमटलेले आहेत. राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थे मार्फत निकृष्ट दर्जाच्या गव्हाचे वितरण होत नाही, तसेच मानवी खाण्यास योग्य अशा गव्हाचे वितरण करण्यात येत आहे, असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. हे उत्तर चुकीचे आहे. परभणी तसेच ठाणे जिल्ह्यातील वाडा तालुक्यामध्ये हा निकृष्ट दर्जाचा गहू दिलेला आहे. तेव्हा मानवी खाण्यास योग्य अशा प्रकारचे प्रमाणपत्र महामंडळाने कोणत्या आधारे दिले ? तो नमूना महामंडळाने कोठून आणला होता ?

श्री. सुनील तटकरे : हा गहू आपल्याला भारतीय अन्न महामंडळाकडून मिळत असतो. सन्माननीय सदस्य श्री. सुरेशदादा देशमुख यांनी जो प्रश्न विचारला ...

...नंतर कु.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे......

त्याच्या अनुषंगाने परभणी जिल्हयामध्ये फेब्रुवारीपासून ते जूनपर्यंत एकंदर शासनाने जो काही गहू उपलब्ध करुन दिला तो जवळपास 1,603 मॅट्रिक टन होता. जून महिन्यामध्ये 1,405 मेट्रिक टन उपलब्ध करुन दिलेला आहे. या गव्हाचे वाटप सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत झालेले आहे. या सहा महिन्यांमध्ये 1,069 मेट्रिक टन झालेले आहे. जेवढा गहू उपलब्ध करुन दिला त्याच्या 75 टक्के टन मे मध्ये 88 टक्के फेब्रुवारी एप्रिलला 105टक्के उचल झालेली आहे, अशा प्रकारे उचल सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत ग्राहकांनी केलेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यासंदर्भात बोलावयाचे झाले तर एखाद्या विशिष्ट दुकानांच्या बाबतीत जर तक्रार केली गेली तर त्या ठिकाणच्या गव्हाचे नमुने लॅबमध्ये तपासणीसाठी पाठवून तसेच, त्यासंदर्भातील सर्व प्रमाणपत्रांची चौकशी करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय,या गव्हाच्या बाबतीमध्ये माझा पॉईंटेड असा प्रश्न आहे की, हा खाण्यासाठी अयोग्य आहे असा अहवाल प्राप्त झाल्यावर सुध्दा त्याची जून महिन्यापर्यंत खुल्या बाजारामधील विक्री थांबविण्याचे आदेश दिले होते का ? आणि ते आदेश केव्हा व किती काळासाठी दिले होते ?

श्री.सुनील तटकरे : ज्यावेळेला अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये हा मुद्दा उपस्थित केला गेला होता त्यावेळी जो गहू होता तो वेगवेगळया ठिकाणाहून तपासणीसाठी पाठविला गेला होता आणि त्यातील काही गव्हाचे नमुने खाण्यासाठी योग्य नाही, असे आढळून आले होता म्हणून त्यावेळेला अशा प्रकारचे आदेश देण्यात आले होते.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ज्यावेळी लॅबमधून असा रिपोर्ट आला होता की, हा गहू खाण्यासाठी योग्य नाही त्यावेळी दिला गेला होता, परंतु त्यावेळी त्याची विक्री किती काळासाठी आणि कोणत्या भागामध्ये थांबविण्यात आली होती ? असा प्रश्न मी माननीय मंत्रिमहोदयांना विचारला होता.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, यासंबंधीची माहिती मी पटलावर ठेवीन.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय,हा अत्यंत गंभीर आणि संवेदनशील प्रश्न आहे. प्रत्येक कुटुंबातील माय - भगिनींशी संबंधित असलेला हा प्रश्न आहे. राज्यातील जनतेच्या आरोग्याशी निगडीत असा प्रश्न आहे. सभापती महोदय,मागच्या अधिवेशनामध्ये दिनांक 29 मार्च,2007 रोजी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त....

औचित्याच्या मुद्याद्वारे हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता, त्या आधारावर या सभागृहाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या होत्या आणि त्याच्यानंतर माननीय सभापतींनी आपल्या दालनात या संदर्भात बैठक बोलाविली होती. या बैठकीत माननीय मंत्री,माननीय सचिव आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते त्यांच्याकडून लॅबचा रिपोर्ट देऊन त्यांनी मान्य केले होते की, या गव्हाचे वितरण निकृष्ट दर्जाचे असल्याने बंद करण्यात येईल आणि त्याच्यानंतर सभागृहामध्ये यासंदर्भामध्ये हे स्टेटमेंट करण्यात आले होते. मला असे निदर्शनास आणावयाचे आहे की, एका बाजूला सभागृहामध्ये असे आश्वासन शासनातर्फे दिले जाते आणि दुस-या बाजूला या गव्हाचे वितरण सुरु आहे असे उत्तर या लक्षवेधीच्या निवेदनामध्ये दिले जाते. त्यामुळे येथे सभागृहाच्या अधिकाराचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, दिनांक 11 एप्रिल,2007 रोजी माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये निवेदन दिलेले होते, त्याची प्रत माझ्याकडे आणि माननीय मंत्रिमहोदयांकडेही आहे. या गव्हाचे वितरण बंद करण्यात येईल का ? व संबंधितांवर कारवाई करण्यात येईल का ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ते निवेदनही बरोबर आहे आणि हे निवेदनही बरोबर आहे कारण त्यावेळेला काही ठिकाणी तो गहू लॅबमध्ये तपासणीनंतर अप्रमाणित ठरला तो आपण बंद केला, परंतु आता अन्न महामंडळाकडून जो गहू आलेला आहे, तो प्रमाणित केलेला आहे आणि म्हणूनच त्या गव्हाचे वाटप होत आहे.

श्री.संजय दत्त : ठिकठिकाणी या विषयी आंदोलने होत आहेत. हे तुम्ही नाकारु शकता का ? मंत्रिमहोदय जो गहू गुराढोरांच्या खाण्याच्या लायकीचा नाही तो माणसांनी खावा अशी शासनाची अपेक्षा आहे का?

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी अशा प्रकारे हेत्वारोप करणे योग्य नाही. हा गहू माझ्या घरचा नाही. शासनाला जो गहू प्राप्त होतो तो भारतीय अन्न महामंडळाकडून होतो. ज्यावेळी या गव्हाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या त्यावेळी ठिकठिकाणी या गव्हाचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यानंतरच सर्वच ठिकाणी अशा सक्त सूचना दिलेल्या आहेत की गव्हाची उचल करताना भारतीय अन्न महामंडळ आणि खात्याचे अधिकारी यांनी या गव्हाची तपासणी करावी आणि खाण्यायोग्यतेचे प्रमाणपत्र एफसीआय कडून घेऊनच नंतर गव्हाची उचल करावी. त्यामुळे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच गव्हाची उचल करण्यात आलेली आहे आणि त्यानंतर त्याचे वितरण करण्यात आलेले आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, गोदामातील गव्हाची तपासणी करण्यात आली. गोदामामध्ये विविध प्रकारचे गहू ठेवलेले असतात. परंतु लोकांना जो गहू मिळत आहे तो निकृष्ट दर्जाचा आहे. त्यामुळे प्रत्यक्षात जो गहू वितरीत केला जातो त्याची तपासणी केलेली आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, जो गहू उचलला जातो तो वितरीत करण्यासाठी उचलला जातो. अन्न महामंडळाकडून मिळालेल्या गव्हाचा साठा गोदामात करण्यात येतो. त्यानंतर तो दुकानामध्ये पाठविला जातो आणि तोच गहू योग्य आहे. माननीय सदस्यांनी एखाद्या विशिष्ट दुकानाबाबत तक्रार असेल तर ती सांगावी त्या दुकानातील गव्हाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे पाठवू शकतो.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, आमच्याकडे खेडयात घरात चोरी होऊ नये म्हणून म्हटले जाते की, घराला जे न्हाणीघर असते त्याला बूच मारुन ठेवायचे आणि आणि घराचा दरवाजा उघडा ठेवायचा तशातला हा प्रकार आहे. गेल्यावर्षी 65 लाख टन गहू परदेशातून आयात केला आणि हा गहू जनतेला खायला दिला. जनतेच्या आरोग्याची अशा पध्दतीने हेळसांड होत असेल तर याबाबतीत मला शासनाला एक विनंती करावयाची आहे. गेल्या वर्षी आलेला गहू सोडा परंतु नवीन येणारा जो गहू आहे तो खरेदी करणारे जे एजंट आहेत ते भारतीय नाहीत ते परदेशी आहेत. म्हणून हा गहू खरेदी करण्यासाठी देशातील एजंट नेमा. प्रयोगशाळेत गहू तपासून घेण्यात आला असे सांगितले. परंतु सभापती महोदय, प्रयोगशाळेतील शेतीसाठी फवारणी औषधे तयार करणाऱ्या एका औषध कंपनीचा रिपोर्ट मी वाचला. त्यामध्ये त्यांनी सांगितले की यातील अर्धा लिटर औषध मी पिऊन दाखवितो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

सांगण्याचा हेतू हा की, शासन जे सांगेल त्याप्रमाणे प्रयोगशाळा रिपोर्ट देईल. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, पूर्ण राज्यामध्ये निकृष्ट गव्हाचे जे वितरण होत आहे ते तात्काळ बंद करा. आधीच राज्यात लोक कशाकशाने मरत आहेत त्यात या आणखी एका गोष्टीची भर कशाला? यावर्षी हा निकृष्ट दर्जाचा गहू लोकांना देऊ नका अशी मी शासनाला विनंती करतो. सभापती महोदय, आपण शासनाला निर्देश द्या.

**उपसभापती** : Speakar has no right to speak.

( **सभापतीस्थानी माननीय सभापती** )

नंतर श्री. भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.7..........

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, गव्हाची खरेदी हा राज्याच्या अखत्यारितील विषय नाही. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल सांगतात त्याप्रमाणे लॅबने अशा प्रकारचा निर्णय द्यावा, अशाप्रकारे प्रमाणित करावे असा दबाव येण्याचे कारण नाही. वेगवेगळया ठिकाणी लॅबमध्ये अशा प्रकारचा गहू पाठविला जातो. ज्या ठिकाणाहून प्रमाणित होऊन गहू आलेला आहे त्या ठिकाणीच आपण वितरित करीत आहोत.

श्री.गुरुमुख जगवानी : सभापति महोदय, मैं माननीय मंत्री महोदय से यह पूछना चाहता हूँ कि पूरे महाराष्ट्र से वाशी की लॅब में 258 सॅम्पल दिए थे, जिसमें से 222 सॅम्पल फेल हुए और 36 सॅम्पल पास हुए, क्या यह बात सच है ?

श्री.सुनील तटकरे : ज्यावेळी श्री.संजय दत्त यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी वाशी याठिकाणी जो गहू पाठविला होता तो मुंबई आणि ठाण्यातील रेशनवरचा गहू पाठविला होता. म्हणूनच त्यावेळी तो गहू वितरित करु नये असे आदेश दिलेले होते आणि त्या गव्हाचे वितरण आपण थांबविले होते.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : लाल गहू महाराष्ट्रातील लॅबने निकृष्ट दर्जाचा असल्याचे जाहीर केल्यानंतर किंवा तसे प्रमाणपत्र दिल्यानंतर एफसीआयच्या लॅबकडून प्रमाणित करुन घेण्याची वाट का पाहिली जाते? आमच्या पूर्वजांनी मिलो गहू खाल्ला म्हणून आम्ही देखील तो खावा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्रातील लॅबने निकृष्ट दर्जाचा असल्याचे जाहीर केल्यानंतर किंवा तसे प्रमाणपत्र दिल्यानंतर एफसीआयच्या लॅबकडून प्रमाणित करुन घेण्याची आवश्यकता आहे का? दोन लॅबमधील फरक आपण लक्षात घेणार आहात काय?

श्री.सुनील तटकरे : सन्माननीय सदस्य श्री.जगवानी यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो वाशी येथील लॅबचा होता. तेथील लॅबने अप्रमाणित गहू असल्याचा अहवाल दिल्यानंतर तो गहू वितरण करण्याचे थांबविले असून तो गहू पडून आहे. तो गहू वितरित केलेला नाही.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, हा गहू महाराष्ट्र शासनाने खरेदी केलेला नाही. महाराष्ट्र शासनाने खरेदी केलेला नसेल तर कोणी खरेदी केला?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.7..........

श्री.सुनील तटकरे : मी मघाशी प्रश्नाचे उत्तर देताना म्हटले की, असा गहू राज्य सरकार खरेदी करीत नाही. भारतीय अन्न महामंडळ गव्हाचा पुरवठा करीत असते.

श्री.पांडुरंग फुंडकर : हा परभणी जिल्हयाचा प्रश्न असला तरी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये लाल गव्हाचे वितरण झालेले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या गव्हाचे वितरण सुरु आहे. माझ्याकडे काही वृत्तपत्रातील कात्रणे उपलब्ध आहेत. ठाणे जिल्हयातील वाडा येथून माझ्याकडे एक निवेदन प्राप्त झाले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, चांगला तांदूळ हवा असेल तर निकृष्ट दर्जाचा गहू घ्या. विक्रमगड तालुक्यातील स्थलांतरित होणाऱ्या हजारो कुटुंबियांचे मागील 8 महिन्यांचे धान्य कुठे जाते याचा शोध लागेल काय? या गव्हाचे वितरण करण्याचा वरिष्ठांचा आदेश आहे. हा गहू घ्यावाच लागतो. काही लोक जनावरांना खाण्यासाठी गहू घेऊन जातात. खरेदी कोण करते, तुमच्याकडे कोण पाठवितो? मी संपूर्ण निवेदन वाचून दाखवित नाही. महिलांनी मोर्चा काढून बुरशी आलेल्या पोळया दाखविल्या होत्या. गेल्या 7-8 महिन्यापासून त्यांना असा गहू दिला जात आहे. पुरवठा अधिकारी काय करतात? जिल्हाधिकारी काय करतात? हा लाल गहू सर्वत्र वितरित केला जात आहे. मंत्रीमहोदयांनी लॅबचा दाखला दिला आहे. मागील अधिवेशनामध्ये उत्तर दिले होते की, तो गहू वाटप करण्याचे बंद केले आहे. वाटप करण्याचे थांबविण्यात आलेला गहू पुन्हा वाटप करण्याचे केव्हा सुरु केले?

श्री.सुनील तटकरे : वाटपासाठी जो गहू उपलब्ध होता तो गहू खाण्यासाठी निकृष्ट आहे असे प्रमाणपत्र आल्यानंतर तो गहू वितरित करण्याचे थांबविले होते.

श्री.पांडुरंग फुंडकर : खाण्यायोग्य नाही अशा गव्हाचे काय केले?

श्री.सुनील तटकरे : तो गहू पडून आहे. तो वितरित केलेला नाही. गहू हा भारतीय अन्न महामंडळाकडून उपलब्ध होत असतो.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे.....

सभापती महोदय, वेगवेगळया ठिकाणावरुन आलेल्या गव्हाची तपासणी आमच्या अधिका-यांनी तसेच एफसीआयच्या अधिका-यांनी करुन या गव्हाची उचल करण्यात आलेली आहे. हे मी सुरुवातीला सुध्दा सांगितलेले आहे. त्यामुळे गव्हाच्या संदर्भात सर्व प्रकारची तपासणी करुन, सर्व खात्री केल्याशिवाय गव्हाची उचल केली जात नाही एवढे मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो.

मेजर सुधीर सावंत : मघापासून माननीय मंत्रीमहोदय, भारतीय अन्न महामंडळाचा दाखला या ठिकाणी देत आहेत. याचा अर्थ भारतीय अन्न महामंडळ आपल्याला जो गहू पाठवेल तो आपण स्वीकारावयाचा का? रेशन दुकानामध्ये जो गहू देण्यात आलेला आहे तो निकृष्ट प्रतिचा आहे हे सर्वांना माहिती आहे त्यामुळे ही बाब आपण भारतीय अन्न महामंडळाच्या निदर्शनास आणून देणार आहात काय ? गहू निकृष्ट प्रतीचा आहे यासंदर्भात महाराष्ट्र सरकार चौकशी करु शकते त्यामुळे यासंदर्भात महाराष्ट्र सरकार गव्हाची चौकशी करणार आहे काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये सुध्दा अशाच प्रकारचा प्रश्न सभागृहात उपस्थित झाला होता त्यावेळेस एफसीआयच्या अधिका-यांना बोलावण्यात आले होते त्यावेळेस गव्हाची पूर्णपणे तपासणी करण्यात यावी अशा प्रकारचा निर्णय राज्यसरकारने घेतला होता. गव्हाची चौकशी करणे हा विषय महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, निकृष्ट प्रतीच्या गव्हाचे दळण गेल्या अधिवेशनापासून या सभागृहात सुरु आहे परंतु तरी सुध्दा यातून चांगल्या पोळया मात्र काही निकृष्ट नाहीत. या निकृष्ट गव्हाच्या संदर्भात बरीच आंदोलने झालेली असून जनमानसात त्याचे प्रतिबिंब उमटलेले आहे. आपण या खात्याचे मंत्री आहात म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी सुध्दा रेशन दुकानामध्ये जाऊन हा गहू पाहिलेला आहे. जनावरे सुध्दा खाणार नाही इतक्या निकृष्ठ प्रतीचा हा गहू आहे. इतक्या निकृष्ट प्रतीचा गहू भारतीय अन्न महामंडळाकडून कसा स्वीकारण्यात आला हे आमच्या पुढे कोडे आहे. आपण जो गहू स्वीकारलेला आहे तो माणूस काय परंतु जनावरे सुध्दा खाणार नाहीत अशी परिस्थिती आहे. जनसामान्यांचा विचार करुन आपल्याकडे आलेला निकृष्ट प्रतीचा गहू परत पाठविण्याची जबाबदारी सुध्दा आपल्या खात्याचीच असल्यामुळे हा गहू परत पाठविला जाणार आहे काय? तसेच चांगल्या प्रतीचा गहू महाराष्ट्र शासन जनतेला पुरविणार आहे काय? तसेच येणारा गहू चांगल्या प्रतीचा असेल याची दक्षता पुढील काळात घेतली जाणार आहे काय?

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मी मघाशीच उत्तर दिलेले आहे. गहू चांगल्या प्रकारचा असून तो खाण्यायोग्य आहे असे लॅबने प्रमाणपत्र दिल्याशिवाय आपण गव्हाची उचल करीत नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी अत्यंत पोटतिडकीने हा प्रश्न उपस्थित केलेला असून हा गहू अत्यंत निकृष्ट प्रतीचा आहे याची मी खात्री केलेली आहे. आपल्याला जर हे खरे वाटत नसेल तर आपण स्वत: आमच्या बरोबर हा गहू बघा. सन्माननीय सदस्य गव्हाच्या संदर्भात पोटतिडकीने प्रश्न मांडत असतांना आपल्याला त्याचे गांभीर्य नसेल तर आपण सन्माननीय सदस्यांच्या वक्तव्याला काही किमंत देणार आहात की नाहीत?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, वाडा, मोखाडा, विक्रमगड या ठिकाणच्या रेशन दुकानामध्ये जनतेला बळजबरीने निकृष्ट प्रतीचा गहू घ्यावा लागत आहे. जो गहू जनावरे खाऊ शकत नाहीत असा गहू सध्या गरीब जनतेला खावा लागत आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, रेशन दुकानामध्ये ज्या गव्हाचा पुरवठा करण्यात आलेला आहे तो अतिशय निकृष्ट प्रतीचा आहे. निकृष्ट गव्हाच्या संदर्भात मागील अधिवेशनात सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती व त्यावेळी शासनाने हा गहू विथड्रॉ सुध्दा केला होता. आता निकृष्ट प्रतीचा गहू महाराष्ट्रातील प्रत्येक रेशन दुकानावर विकला जात आहे. सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया यांनी या गव्हाच्या पोळया नागपूर अधिवेशनात आणून त्या वाटल्या जातील असे सांगितलेले आहे. केंद्रीय कृषी खात्याने भारतीय शेतक-याच्या गव्हाला जास्त भाव न देता ऑस्ट्रेलियातून निकृष्ट गव्हाची जादा किंमत देऊन गहू आयात केलेला आहे. ऑस्ट्रेलियामध्ये हा गहू जनावरे सुध्दा खात नाही अशा गव्हाचे वितरण सध्या महाराष्ट्रात होत आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, हा प्रश्न माझ्या अखत्यारितील नाही. तरी सुध्दा भारतातील गहू उत्पादक शेतकऱ्यांकडून किमान आधारभूत किंमतीवर खरेदी होत असते. या आधारावर देशातील गहू उत्पादक शेतकऱ्यांकडून खरेदी केल्यानंतरही देशाला गव्हाची गरज असल्यामुळे परराज्यातून गहू आयात करण्याचे धोरण केंद्र सरकारने स्वीकारलेले आहे. आयात केलेला गहू प्रमाणित करुन घेण्यात आलेला आहे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात. )

. श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत मंत्रिमहोदयांना विनंती आहे की.....

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

**सभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपापल्या जागेवर बसावे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

**सभापती** : लक्षवेधी सूचना संपलेली आहे.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.रविशेठ पाटील ( आदिवासी विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "देवरी येथील आधारभूत धान्य खरेदी योजनेंतर्गत झालेले नुकसान" या विषयासंबंधी सर्वश्री केशवराव मानकर व इतर वि.प.स. यांनी दिनांक 8 डिसेंबर 2006 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तरांच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवीत आहे.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यातील पेढी धरण या विषयावरील नियम 93 च्या सूचनेसंबंधी माननीय सभापतींचा निर्णय**

**सभापती** : काल,दिनांक 23 जुलै, 2007 रोजी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 93 अन्वये " अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यातील पेढी धरण प्रकल्पाचे कामामुळे तेथील शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी जाण्याने ते विस्थापित होणार असून प्रथम पुनर्वसन व मग धरण या शासनाच्या घोषणेनुसार पुनर्वसनाचा पत्ता नसल्याने तेथील महिलांनी सुरु केलेले आमरण उपोषण " या विषयावर सूचना दिली होती. त्या सूचनेच्या अनुषंगाने मी निर्णय देत आहे.

या विषयाच्या अनुषंगाने सोमवार, दिनांक 30 जुलै, 2007 रोजी माझ्या दालनात दुपारी 3.00 वाजता बैठक आयोजित केलेली आहे. या बैठकीस जलसंपदा मंत्री, राज्यमंत्री व या विभागाचे सचिव तसेच सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख व सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, वाल्मिचे तज्ज्ञ, जलसंपदा विभागाचे क्षेत्रीय अधिकारी, धरण विरोधी समितीचे दोन पदाधिकारी, लेंढी प्रकल्प संघर्ष समितीचे दोन पदाधिकारी आणि त्यांनी निवडलेले दोन तज्ज्ञ व अमरावतीचे जिल्हाधिकारी यांना बोलाविण्यात आलेले आहे. या धरणाच्या अनुषंगाने स्त्रियांनी उपोषण केलेले आहे,त्यांना चर्चा करावयाची असेल तर त्यांना माझे निमंत्रण आहे.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकदम घोषणा देत असतात. )

<u>**लक्षवेधी सूचना क्रमांक 7 बाबत.**</u>

**सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी निर्देश देणार आहे. याठिकाणी मी सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांना सांगेन की, सदनामध्ये यापूर्वीसुध्दा या प्रश्नाच्या अनुषंगाने गांभीर्याने चर्चा झाली होती, आपणही हा विषय गांभीर्याने घेतलेला आहे. याबाबतीत माझ्या दालनात जी चर्चा झाली, त्यामध्ये गव्हाचे काही नमुने आपण पाहिले व त्यामध्ये सदरचा गहू हा निकृष्ट दर्जाचा आहे, असे लक्षात आल्यानंतर त्याचे वाटप आपण थांबविले. याठिकाणी हा जरी परभणी जिल्हयाचा प्रश्न असला तरी राज्यातील अनेक ठिकाणी गव्हाच्या वाटपाबाबत नागरिकांच्या फार मोठया प्रमाणात गंभीर तक्रारी आहेत. मी असे म्हणेन की, या अनुषंगाने पुन्हा एकवेळ सगळया विभागाच्या अधिकाऱ्यांची गहू वाटपाच्या दृष्टीने किंवा गहू देण्याच्या दृष्टीने आपण तातडीने बैठक घ्यावी आणि तो गहू निकृष्ट दर्जाचा असेल तर कुठल्याही परिस्थितीत गरिबांच्या वाटपातून, रेशनिंगमधून तो गहू बाजूला होणे जरुरीचे आहे. याबाबतीत जरी शासनाचे काही प्रमाणात आर्थिक नुकसान झाले तरी गरिबांसाठी आपण ते सोसण्याची मानसिकता ठेवणे जरुरीचे आहे, त्यादृष्टीने आपण विचार करावा.

श्री.सुरेश देशमुख : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला न्याय दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

**सभापती** : याबाबतीत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना होत्या, त्या भावनांना मी माझ्यामार्फत न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे, एवढेच.

श्री.सुरेश देशमुख : सभापती महोदय, निकृष्ट दर्जाच्या गव्हाच्या पोळया मी सोमवारी सर्व सन्माननीय सदस्यांना खाण्यासाठी घेऊन येतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे, आता या विषयी आणखी चर्चा नको.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, यह प्रश्न पिछले अधिवेशन में सत्तारुढ़ पक्ष के माननीय सदस्यों ने उठाया था और उससे महाराष्ट्र की जनता को न्याय मिला था. अभी यहां पर इस प्रश्न के बारे में बाहर यह मॅसेज जाएगा कि माननीय विरोधी पक्ष के सदस्यों ने इस प्रश्न के बारे में न्याय मांगा और हम लोगों ने कुछ नहीं किया. मैं माननीय मंत्री महोदय को बताना चाहता हूँ कि लाल गेहूँ की समस्या पूरे महाराष्ट्र में है. मैं खुद 2 जगह पर दक्षता समिति का चेयरमेन हूँ. हमने इस बारे में डिस्ट्रिक फूड ऑफिसर से बात की तो यह बात सामने आई कि बाहर से जो गेहूँ आया है, वही दे रहे हैं. मेरा कहना है कि समय रहते हुए इस गेहूँ की सप्लाय को रोका जाए और इसके लिए माननीय सभापति महोदय ने मंत्री महोदय को निर्देश दिए हैं. महाराष्ट्र की जनता को अन्नपूर्णा योजना के तहत गेहूँ दिया जाता है, मेरी सरकार से मांग है कि उनको अच्छा गेहूँ मिलना चाहिए.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझे आपल्यामार्फत माननीय मंत्रिमहोदयांना एवढेच निवेदन आहे की, माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री हे राज्यातील आदरणीय नेते असून ते चळवळीतून आलेले आहेत. सर्वसामान्य नागरिकांच्या ज्या अडीअडचणी आहेत, त्याची त्यांना चांगली जाण आहे. त्यामुळे हा विषय त्यांनी प्रेस्टिजचा न करता, या विषयाकडे त्यांनी माणुसकीच्या दृष्टीने पहावे. या प्रश्नातील टेक्निकॉलिटी न बघता, जनतेच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घ्यावा, एवढीच माझी आपल्या माध्यमातून माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण निर्देश दिल्यानंतर माननीय मंत्रिमहोदय काहीच बोलले नाहीत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, हा विषय मघाशीच समाप्त झाला. माननीय सभापती महोदयांच्या निर्देशानुसार मी सर्व संबंधितांची बैठक बोलावणार आहे.

श्री.नितीन गडकरी : आपल्याला माननीय सभापतींनी कोणते निर्देश दिले, आपण नेमके काय करणार आहात ? याबाबत स्पष्ट खुलासा करावा.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे, अधिकाऱ्यांची बैठक बोलावून हा गहू मानवी खाण्यालायक आहे किंवा नाही यादृष्टीने खात्री करुन गहू वितरीत करण्यासंबंधी आपण सुचविल्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

**सभापती** : ठीक आहे. आता आपण विशेष उल्लेखाच्या सूचना घेऊ.

-------

(नंतर श्री.रोझेकर......

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी.** : पुणे बालकल्याण समितीच्या अध्यक्षांवर करण्यात आलेल्या लैंगिक शोषणाच्या तक्रारी

**मु. शी.** :पुणे बालकल्याण समितीच्या अध्यक्षांवर करण्यात आलेल्या लैंगिक शोषणाच्या तक्रारी याबाबत डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□य सदस्या डॉ.नीलम गो-हे यां□ एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिलेली आहे, त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गो-हे ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडते.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये मुलींच्या निवास संस्थामधील कारभारात अनेक ठिकाणी गैरव्यवहार होत असतात. या मुलींच्या हक्काबाबत काम करणा-या संस्था म्हणजे महाराष्ट्र क्वालिटी इन्स्टिटयूशनल केअर ॲण्ड अल्टरनेटीव्ह फॉर चिल्ड्रेन, क्यूआयसी ॲण्ड एसी एकत्र आल्यावर त्यांच्या असे निदर्शनास आले की, पुणे जिल्हयातील संपर्क ग्रामीण विद्यालय व बालग्राम, मु.भांबर्डे, ता.मुळशी, जि.ठाणे या संस्थेमध्ये छोटया बालकांवर अत्याचार होत होते, त्याबद्दल 7 डिसेंबर 2005 रोजी बालकांच्या शोषणाबाबत तक्रार नागपाडा पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली. या संस्थेचे संचालक, अमितकुमार बॅनर्जी यांच्या विरोधातच या केसमध्ये आरोपी म्हणून नोंद करण्यात आली होती. धक्कादायक बाब म्हणजे श्री.नकुल काटे, पश्चिम महाराष्ट्र समन्वयक यांनी या बाबीकडे लक्ष वेधले की, याच अमितकुमार बॅनर्जी यांना पुणे बालकल्याण समितीच्या अध्यक्षपदावर नियुक्त करण्यात आले आहे. गंभीर बाब म्हणजे ही घटना 7 डिसेंबर 2005 रोजी नोंदविल्यानंतर 9 डिसेंबर 2006 रोजी बालकल्याण समिती, पुणे यांना या समितीची पुनर्रचना करावी म्हणून निवेदन देण्यात आले. बालकल्याण विभागाने बैठक घेऊनही हीच व्यक्ती पुण्याच्या बालहक्क समितीवर अध्यक्ष आहे, ज्यांच्यासमोर लहान मुलांच्या केसेस चालतात त्या संस्थेच्या अध्यक्षावर बालकांच्या शोषणाच्या चार केसेस चालल्या आहेत. बालकांच्या निवासी संस्थात सुधारणा होण्यास क्वासी या संस्थेच्या (साथी, आग्रीपाडा म्युनिसिपल शाळा, पहिला माळा, ओमर फारुख पथ, मुंबई सेंट्रल, मुंबई) मागणीवर शासनाने अंमलबजावणी करावी, अशी या विशेष उल्लेखाव्दारे मी विनंती करते.

--------

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॉम्प्लेक्सला जमीन मिळण्याबाबत

**मु. शी.** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॉम्प्लेक्सला जमीन मिळण्याबाबत श्री.सय्यद जामा, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□य सदस्य श्री. सय्यद जामा यां□ एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. सय्यद जामा : (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापति महोदय, विशेष उल्लेख सूचना के माध्यम से मैं शासन का ध्यान आकर्षित करना चाहता हूँ कि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज के नाम से स्पोर्ट कॉम्पलेक्स बनाने के लिए 70 एकड़ जमीन महाराष्ट्र शासन ने 1992 में दी थी. बाद में यह स्पोर्ट कॉम्पलेक्स दूसरी जगह पर बन गया और यह 70 एकड़ जमीन महाराष्ट्र शासन के अधीन है. हमारे विदर्भ के सभी पक्षों के करीब 25 आमदारों और नागपुर यूनिवर्सिटी के उप कुलपति श्री पठान ने माननीय मुख्य मंत्री से अनुरोध किया था कि यह जमीन यूनिवर्सिटी को वापस देनी चाहिए, क्योंकि बहुत सारी विकास की योजनाएं नागपुर यूनिवर्सिटी में बाकी हैं और उसके लिए जमीन उपलब्ध नहीं है. अभी तक शासन ने यह जमीन नागपुर यूनिवर्सिटी को वापस करने का निर्णय नहीं लिया है. इसलिए मैं शासन से अनुरोध करना चाहता हूँ कि नागपुर यूनिवर्सिटी की 70 एकड़ जमीन जिसको सरकार इस्तेमाल नहीं कर रही है, वह यूनिवर्सिटी को वापस की जाए. यह मांग मैं इस विशेष उल्लेख के माध्यम से करना चाहता हूँ.

------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3............

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ. शी.** :घरफोडी, चोरी या खटल्यांमधील मुद्देमाल जतन करण्याची गंभीर समस्या निर्माण होणे

**मु. शी.** :घरफोडी, चोरी या खटल्यांमधील मुद्देमाल जतन करण्याची गंभीर समस्या निर्माण होणे याबाबत श्री.मध ुकर चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.मधुकर चव्हाण यां□ एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, एखाद्या घरात घरफोडी होते, हजारो लाखोंचे दागिने लुटले जातात, टोळी पकडली जाते, त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त केला जातो. आता आपलेही दागिने परत मिळतील, अशी आशा घरफोडी झालेल्या कुटुंबाला लागलेली असते. पण प्रत्यक्षात त्यांचे दागदागिने त्यांच्या पदरात पडेपर्यन्त बराच वेळ जातो आणि तो सर्व काळ हा लाखोंचा माल सुरक्षित सांभाळून ठेवण्याची जोखीम मात्र पोलिसांना उचलावी लागते. मुंबईच्या पोलीस स्टेशनमध्ये पोलीस कारवायांमध्ये हस्तगत करण्यात आलेला कोटयावधी रुपयांचा मुद्देमाल असा वर्षानुवर्षे पडून आहे. त्यातल्या शेकडो खटल्यांची सुनावणी सुरुच न झाल्याने ही जोखीम पोलिसांना आणखी किती काळ सांभाळावी लागेल ? आरोपींना अटक केल्यावर ऐवज जप्त करतांना रीतसर पंचनामा करुन सील केलेला मुद्देमाल पोलीस ठाण्यातील तिजोरीत ठेवला जातो. या गुन्हयांचे आरोपपत्र कोर्टात सादर होण्यास किमान तीन महिने जातात. खटला बोर्डावर येऊन त्याची सुनावणी होण्यास तर अनेक वर्षे जातात. खटला सुरु झाल्यानंतर सुनावणीत पुरावा म्हणून आरोपींकडून जप्त केलेला मुद्देमाल कोर्टापुढे सादर करावा लागतो. तोपर्यन्त हा मुद्देमाल पोलीस ठाण्यातच असतो. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये किमान आठ ते दहा लाख रुपयांची रोख रक्कम, दागिने असा ऐवज असतो. पोलीस ठाण्याच्या प्रशासन विभागाच्या अधिका-यांच्या ताब्यात हा मुद्देमाल असतो. या अधिका-याला डयुटीवरुन घरी परततांना तिजोरीवर आपल्या सहीचं सील

..4.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..........

करुन जावे लागते. दुस-या दिवशी डयुटीचा चार्ज घेताना सील व्यवस्थित आहे ना याची खात्री करावी लागते. अनेकदा तिजोरीची रुम, तिचे दरवाजे, खिडक्या, लॉक यांच्याकडेही बारकाईने नजर ठेवावी लागते. अनेक गुन्हयांमध्ये फिर्यादी चोरीस गेलेली रक्कम परत मिळावी, यासाठी म्हणजे रिटर्न ऑफ प्रॉपर्टीसाठी अर्ज करतात. सुमारे 20 ते 30 टक्के प्रकरणांत फिर्यादींना प्रॉपर्टी लवकर मिळते. मात्र आरोपींनी हरकत घेतल्यास कोर्टाची कारवाई लांबते, परिणामी पोलिसांनाच मुद्देमाल जतन करावा लागतो. जप्त केलेले दागिने कोणत्या प्रकारचे किती ग्रॅमचे आहे, तसेच नोटांचे नंबर हा सगळा तपशील नोंदवावा लागतो. अलिकडे अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे जप्त केलेल्या रोखीच्या नोटांचे डिजिटल कॅमे-याने फोटो काढून त्यांची चीप आणि सी.डी.बनवून मुद्देमालाचा पुरावा तयार करता येतो. हा पुरावा कोर्टाने ग्राहय धरावा यासाठी कायद्यात बदल होणं गरजेचे आहे. तसेच रोख रक्कम, दागिने बँकेत जमा केल्यास लाखो रुपयांचे व्याज मिळू शकते. या रकमेतून पोलिसांच्या विविध कल्याणकारी योजनांना आर्थिक बळ मिळू शकते. मुंबईच्या आर्थिक गुंन्हे अन्वेषण विभागाकडून अशा प्रकारे रक्कम बँकेत जमा केली जाते. अनेक गुन्हयांमध्ये आरोपी जामीन मिळाल्यानंतर फरार असतात. हे खटले प्रलंबित राहतात. वर्षानुवर्षे रखडत चाललेले खटले सुनावणीस आल्यानंतर बहुतेकदा मुद्देमाल न सापडण्याच्या घटनाही वाढत आहेत. त्यामुळे मुद्देमाल जतन करणं ही पोलिसांसमोर गंभीर समस्या बनत चालली आहे. सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करु इच्छितो.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (गृहमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी अतिशय योग्य सूचना केलेली आहे. त्यांच्या सूचनेची गांभीर्याने नोंद घेण्यात येईल. ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण विशेष उल्लेख वाचत होते त्यावेळी मला असे वाटले की, ही पोलिसाने मांडलेली व्यथा आहे. आज दागिने जपून ठेवणे हे कष्टाचे काम झालेले आहे. अनेक ठिकाणी असे झाले आहे की, पोलिसांनी जप्त केलेला माल पोलीस स्टेशनमधून चोरीला गेलेला आहे. ज्यांच्या दागिन्यांची चोरी होते, त्यांचा माल त्यांना लवकर मिळाला पाहिजे आणि तो त्यांचा हक्क आहे. निरपराध माणसांना त्याचा त्रास होता कामा नये. एव्हिडन्स ॲक्टमध्ये कसा बदल करता येईल, कोणत्या बाबतीत केंद्र शासनाची मान्यता घ्यावी लागेल, याबाबत माहिती घेतली जाईल आणि विशेष पावले उचलली जातील.

-------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कार्यक्रम पत्रिकेवरील म.वि.प.नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत.**

**उपसभापती** : आजच्या कार्यक्रम पत्रिकेतील अनुक्रमांक सातमध्ये दाखविण्यात आलेला म.वि.प. नियम 260 अन्वये "कायदा व सुव्यवस्थेवरील" प्रस्ताव उद्या बुधवार दिनांक 25 जुलै, 2007 रोजी सकाळी 10.00 ते 12.00 या वेळेत घेण्यात येईल आणि त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन्हा भरेल.

---------

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख व लक्षवेधी सूचनेसंबंधी</u>.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मी दिनांक 16 जुलै, 2007 रोजी विशेष उल्लेख दिला होता. परंतु तो विशेष उल्लेख मान्य झाला नाही. त्यानंतर मी काल दिनांक 23 जुलै, 2007 रोजी पुन्हा विशेष उल्लेख दिला. परंतु तो विशेष उल्लेख देखील मान्य झाला नाही. तसेच, मी ज्या लक्षवेधी सूचना दिल्या होत्या, त्या सुध्दा मान्य झालेल्या नाहीत. मी माननीय सभापतींना भेटून सांगितले की, मी दिलेला विशेष उल्लेख व लक्षवेधी सूचना मान्य झालेली नाही. आम्ही वेळो वेळी अधिका-यांना विचारणा करतो तेव्हा अधिकारी असे सांगतात की, आम्ही सभापतींना विचारुन आपली लक्षवेधी सूचना लावू. सभापती महोदय, असे असेल तर आम्हाला विचार करावा लागेल. मी काल दिलेला विशेष उल्लेख आजही मान्य झालेला नाही, हे चुकीचे आहे.

--------

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख.**

**पृ.शी.** : कणकवली तालुक्यातील गांगोवाडी येथे हॉटेल कोकण प्राईड या नावाने सुरु करण्यात आलेला अनधिकृत बिअरबार.

**मु.शी.** : कणकवली तालुक्यातील गांगोवाडी येथे हॉटेल कोकण प्राईड या नावाने सुरु करण्यात आलेला अनधिकृत बिअरबार याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री.परशुराम उपरकर यां□ एज विशेष उल्लेजाची सूच□ दिलेली आहे, त्यां□ ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेजाची सूच□ मांडतो.

" ज्याअर्थी, कणकवली (जि.सिधुदुर्ग) गांगोवाडी येथील (वार्ड क्र.3) नगरपंचायत हद्दीत सर्व्हे नं.207, हिस्सा नं.4 क वा मिळकतीमध्ये पत्राशेड नं.3/460 अ व 3/460 ब या मिळकतीमध्ये मालकाने "हॉटेल कोकण प्राईड" या नावाने एक हॉटेल व बिअरबार सुरु करणे, सदर हॉटेल हे मुंबई-गोवा हमरस्त्यापासून 22 मीटर अंतरावर असून सदर पत्राशेडमध्ये एक 50 फूट खोल व 10 फूट व्यासाची खोल विहीर असून त्यावर स्लॅब टाकून हा बिअरबार सुरु करणे, तसेच सदर बारपासून सुमारे 70 मीटर अंतरावर गांगोमंदिर व जवळच एस.एम.हायस्कूल ही शाळा सुध्दा असणे, आणि

ज्याअर्थी ही पत्राशेड 2002 मध्ये बांधण्यात आली असून त्याची आकारणी ही अटी व शर्तीवर करण्यात येणे, सन 1998 मध्ये कणकवली शहरासाठी शहर विकास आराखडा लागू झाल्याने कणकवली हद्दीतील कोणत्याही बांधकामाची बिनशेती परवानगी देण्यापूर्वी नियोजन प्राधिकरणाची परवानगी घेणे बंधनकारक असणे, असे असतांना प्रांत अधिकारी यांनी दिलेल्या आदेशामध्ये श्री.परुळेकर यांचा दिनांक 20.04.2006 रोजीचा अर्ज व माननीय तहसिलदार यांचा अहवाल यावर हा आदेश देण्यात येणे, यावरुन सदरहू परवानगी अर्थपूर्ण व्यवहार झाल्याचे स्पष्ट होणे, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता,

त्याअर्थी, या गंभीर विषयी हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करते."

----------

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयास इकॉलॉजीकली सेन्सिटीव्ह झोन जाहीर करणे.

**मु.शी.**: सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयास इकॉलॉजीकली सेन्सिटीव्ह झोन जाहीर करण्याबाबत कर्नल सुधीर सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी विशेष उल्लेखाची एक सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हे हे पर्यटन व फलोत्पादन जिल्हे असून असंख्य लोक मत्स्य उद्योगावर अवलंबून आहेत. फलोत्पादन क्षेत्रातून प्रत्यक्षत: दोन्ही जिल्हयात 1 लाखाहून अधिक लोकांना रोजगार उपलब्ध होतो. आंबा पिकाहून अधिक क्षेत्र काजूचे आहे व भविष्यात आंब्यापेक्षा अधिक लागवडी काजूच्या होणार आहेत. काजूवर प्रक्रिया करणारे गृहउद्योग व मध्यम उद्योग 300 च्या वर आज उभे राहिले आहेत. 25-30 वर्षात पयर्टन, मत्स्यव्यवसाय, फलोत्पादन यातून कोकणची अर्थव्यवस्था उभी केली आहे. अशा सर्व पार्श्वभूमीवर शासनाने कोकणामध्ये वीज प्रकल्प आणण्याचा निर्णय घेतला आहे. जयगड येथे जिंदाल कंपनीचा 1200 मेगावॅट क्षमतेचा औष्णिक वीज प्रकल्प कोळशावर आधारीत राहील. तर सिंधुदुर्ग जिल्हयातील गिर्ये-सौंदळ येथे 4000 मेगावॅट क्षमतेचा कोळशावर आधारित विद्युत प्रकल्प आणला जाणार आहे. या प्रकल्पांनी निर्माण होणारे विषारी वायू, राख, किरणोत्सर्ग, समुद्राचे घेतले जाणारे कोटयावधी लिटर्स पाणी व पुनश्च प्रक्रिया होऊन समुद्रात सोडले जाणारे प्रदुषीत पाणी, एकूणच कोकण किनारपट्टीचे वाढणारे तापमान या सर्वांचा एकत्रित परिणाम हा येथील पर्यावरणाच्या व स्थापित व्यवसायांच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे. ज्यामुळे येथील मत्स्यव्यवसाय, पर्यटन, फलोत्पादन हे व्यवसाय धोक्यात येणार आहे. हापूस आंबा हे आपले राष्ट्रीय फळ आहे, असे फळ इतरत्र कोठेच निर्माण होत नाही. तरी

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

मेजर सुधीर सावंत.....

हे फळ होणारा हा विशिष्ट प्रदेश जिओग्राफिकल इंडिकेशन कायद्यात रजिस्टर होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. डहाणू माथेरान याप्रमाणेच जैविक विविधता असलेला हा सर्व कोकणातील विभाग येतो. तरी या विभागाला इको फ्रजाईल झोन म्हणून मान्यता मिळविणे आवश्यक आहे, जेणे करुन प्रदुषणकारी प्रकल्प येथे येणारच नाही".

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

**पृ.शी.**: भिवंडी बायपास ते डोंबिवली शिळफाटा हया रस्त्याची
झालेली दुरावस्था.

**मु.शी.**: भिवंडी बायपास ते डोंबिवली शिळफाटा हया रस्त्याची
झालेली दुरावस्था याबाबत श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यापूर्वी मी दुसऱ्या एका बाबीवर बोलू इच्छितो की, काल सभागृहात मी सुप्रसिध्द कलावंतिनी श्रीमती प्रभाताई शिवनेकर यांच्याबाबत विशेष उल्लेख उपस्थित केला होता व त्यांना उदरनिर्वाह करण्यासाठी चॉकलेट-बिस्कीटे विकावी लागत आहेत, हे सभागृहाच्या निदर्शनास आणले होते. त्यावेळी माननीय उपसभापती महोदयांनी तत्परतेने त्यांना मदत जाहीर केली होती. आपल्याकडून प्रेरणा घेऊन आणि माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी केलेल्या आवाहनानुसार मी श्रीमती प्रभाताई शिवनेकर यांच्याकरिता आदरपूर्वक रु.5000 च्या मदतीचा धनादेश आपल्याकडे सादर करीत आहे.

आता मी आपल्या अनुमतीने विशेष उल्लेखाची पुढील सूचना मांडत आहे.

"ठाणे जिल्हयाच्या एका महत्वाच्या प्रश्नाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारित असलेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतून जाणारा भिवंडी बायपास ते डोंबिवली शिळफाटा हया रस्त्याची मोठया प्रमाणात दुरावस्था झालेली असून रुंदीकरणाचे व डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे यंदाच्या पावसाळयात या रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. या रस्त्यावर अपघाताच्या प्रमाणात वाढ होऊन नेहमीच जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याने वाहन चालक व प्रवाशांना प्रचंड मनस्ताप होत आहे. माहे एप्रिल 2007 दरम्यान सदर रस्त्याचे रुंदीकरण व नुतनीकरण झालेले असताना जून-जूलैमध्येच या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झालेली आहे. "रस्त्यात खड्डे आहे की, खड्डयात रस्ते आहेत" याची जनमाणसात चर्चा होत असून या बांधकामाच्या दर्जाबाबत संशयाचे

.....4



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.संजय दत्त .....

वातावरण निर्माण झालेले आहे. याबाबत सामाजिक संघटनांनीही सदर रस्त्यावरील खड्डयांमध्ये झाडे लावून संबंधित प्रशासनाच्या कारभाराचा निषेध केलेला आहे. सदरहू रस्त्याच्या कामाची उच्चस्तरीय चौकशी करुन सामान्यांच्या जीवनाशी खेळणाऱ्या भ्रष्टाचारी व गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कडक कारवाई करावी व सदर रस्ता प्रवाशांसाठी सुखकर व्हावा यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे, हा सार्वजनिकदृष्टया अत्यंत महत्वाचा विषय विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त ....

सभापती महोदय, मी या विशेष उल्लेखाद्वारा एका फार गंभीर प्रश्नाकडे आपले लक्ष वेधतो आहे आणि हे कोठे वाचून किंवा कोणाकडून ऐकून नाही तर रोज सकाळ-संध्याकाळी त्या रस्त्या वरून मी प्रवास करतो आणि माझ्याबरोबर त्या भागामध्ये राहणारे सन्माननीय सदस्य तसेच इतरही हजारो नागरिक प्रवास करीत असतात. या प्रश्नाला मार्गी लावण्यासाठी आपण या अगोदर पुढाकार घेतलेलाच आहे आणि निश्चितपणे मला येथे उल्लेख करावासा वाटतो की, या बाबतीत पाहणी करण्यासाठी संबंधित खात्याचे मंत्री महोदय दोन वेळा तेथे आले होते. त्यावेळी जनतेनेही त्यांचे स्वागत केले होते. परंतु असे असतानाही आज ही अवस्था आहे. मी त्या भागातील सर्व जनतेच्या वतीने आपल्याला नम्र विनंती करतो, सभापती महोदय, मी त्या भागातील या रस्त्याचे, त्यातील खड्ड्यांचे फोटो देखील येथे आपल्याला दाखविण्यासाठी आणलेले आहेत. ते मी आपल्याकडे सादर करतो आणि आपल्याला विनंती करतो की, आपण स्वत: तसेच संबंधित मंत्र्यांनी येऊन त्या रस्त्याची पाहणी करावी आणि जे कोणी अधिकारी या भ्रष्टाचारामध्ये गुंतलेले आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करण्याच्या संबंधितांना सूचना द्यावयात जेणे करून इतर भागामध्येही त्याचा मेसेज जाईल.

**उपसभापती** : कल्याण-शीळफाटा हा जो रस्ता आहे त्याबाबत यापूर्वी देखील वर्तमानपत्रातून बऱ्याच बातम्या आलेल्या आहेत आणि येत आहेत. हा जो प्रश्न आहे तो खरोखरी सार्वजनिक हिताचा आहे. गेले कित्येक दिवस या प्रश्नावर सातत्याने येथे विचार-विनिमय झाला आहे आणि मागील अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी देखील या प्रश्नाबाबत चर्चा उपस्थित केली होती. शेवटी काम कोण करते यापेक्षाही काम कसे झाले याला महत्त्व आहे. या रस्त्याच्या कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे याबद्दल शंकाच नाही आणि ही गोष्ट यापूर्वीही वृत्तपत्रांतून पत्रकारांनी देखील निदर्शनास आणलेली आहे. या रस्त्याचे काम काळ्या यादीमध्ये टाकलेल्या कंत्राटदाराला दिले आहे यापेक्षा वेगळे आणि अधिक काही सांगितले पाहिजे असे नाही. यातील काही गोष्टी मंत्र्यांन निदर्शनास आणून दिल्या नंतरही एका विशिष्ट कंत्राटदारालाच काम देण्याचा दुराग्रह प्रशासनाकडून झाला आणि त्याचा परिणाम म्हणून कित्येक कोटी रूपये अक्षरश: खड्ड्यामध्ये गेलेले आहेत. त्यामुळे मी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त, श्री.मोते यांना जनहिताच्या दृष्टीने एकच सांगू इच्छितो की, या ठिकाणी या खात्याचे राज्यमंत्री श्री. रविशेठ पाटील हे उपस्थित आहेत. ... ...... 4एन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या रस्त्याच्या कामामध्ये आणि या एकूण प्रश्नामध्ये आपली सगळ्यांचीच फसवणूक झालेली आहे. ..

**उपसभापती** : मी येथे उपस्थित असलेल्या राज्यमंत्री श्री.रविशेठ पाटील यांना सांगू इच्छितो की, ही गोष्ट तितकीच सत्य आहे, जी गोष्ट सन्माननीय सदस्यांनी येथे सांगितली आहे. त्या रस्त्याची आज देखील इतकी वाईट अवस्था आहे की, मी त्या रस्त्याने जाणेदेखील सोडून दिले आहे. एकदा, दोनदा, तीनदा सभागृहामध्ये तेथील सगळयाच सन्माननीय सदस्यांनी या रस्त्याबद्दल सांगितल्यानंतर त्यांच्या भावना लक्षात न घेता जनतेशी प्रतारणा करणे बरोबर नाही. तेव्हा आजही पुन्हा नीट विचार करावा. या रस्त्याला यापूर्वी नामदार मंत्र्यांनी, श्री.अनिल देशमुख यांनी दोन वेळा भेट दिलेली आहे. पण माननीय राज्यमंत्री श्री.रविशेठ पाटील, आपण या भागाशी निगडित आहात त्यामुळे आपल्याला त्या भागातील जनतेच्या भावनांची चांगली जाण असल्याने आपण हा प्रश्न अधिक चांगल्या प्रकारे सोडवू शकाल याची मला खात्री आहे. म्हणूनच मी आपल्याला सांगू इच्छितो की, हे अधिवेशन संपल्यानंतर आपण स्वत: या रस्त्याच्या कामाला भेट द्यावी. ... अर्थात आज येथे विशेष उल्लेखाद्वारा हा विषय उपस्थित झाल्यामुळे आपण तेथे भेट देण्यापूर्वीच त्या सगळ्या रस्त्यावरील खड्डे बुजवून त्याची रंगरंगोटी करून दुरूस्ती केली जाईल याचीही मला खात्री आहे. म्हणूनच या वेळेस अशा प्रकारे काम करण्यास संबंधितांना वेळ न देता आपण तेथे भेट देऊन पाहणी करावी आणि तेथील कंत्राटदारावर असे निकृष्ट काम केल्याबद्दल कारवाई करावी. आणि ती कारवाई आपण काय करणार आहात हेही येथे आता आपण सांगितल्यास बरे होईल. मी या बाबत आता कोणतेही निदेश देत नाही. मात्र यापुढे अशा प्रश्नांबाबत सभागृहामध्ये मतदान घेण्याचा माझा विचार आहे हेही मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

( यानंतर श्री. सरफरे ..... 4ओ 1 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, आपण सर्व जण एकत्रितपणे त्या रस्त्याची पहाणी करु. आणि त्यानंतर आपली व लोकप्रतिनिधींची एक संयुक्त बैठक घेऊन या प्रश्नामधून मार्ग शोधून काढू.

**उपसभापती** : या रस्त्याचे काम निकृष्ट झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. त्या बाबत आपण कोणती कारवाई करणार आहात?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, त्या रस्त्यावरील सर्व खड्डे ताबडतोब बुजवले जातील.

श्री. मधुकर चव्हाण : ज्यांनी त्या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम केले आहे त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात?

**उपसभापती** : मंत्रिमहोदय, मी अत्यंत जबाबदारीने आणि आत्मियतेने आपणापुढे हा प्रश्न मांडला असल्यामुळे आपण तो हसण्यावारी घेऊ नका. त्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यास आपण आणि मी जाणार नाही. परंतु चांगल्या प्रकारचा रस्ता बांधण्याऐवजी अशाप्रकारचा वाईट रस्ता बांधून त्यावर कित्येक कोटी रुपये खर्च करण्यात आले. ज्याला काळया यादीमध्ये टाकण्यात आले आहे अशा कंत्राटदाराला या रस्त्याचे काम दिल्यानंतर तो निकृष्ट काम करणार. तेव्हा त्याने केलेल्या या कामाबाबत आपण त्याच्यावर काय कारवाई करणार आहात?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, यासंबंधी मुख्य अभियंत्यांना ताबडतोब त्याठिकाणी पाठवून या प्रकरणी चौकशी करण्यात येईल. आणि त्या कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचे काम केले असेल तर त्याच्यावर ताबडतोब कारवाई केली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व
पंचायत समिती (सुधारणा) विधेयक

**L.A. BILL NO.XXXVI OF 2007.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958 AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.)**

श्री. रणजित कांबळे (ग्राम विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधा□सभे□ संमत जे ल्याप्रमाजे,मी आपल्या अ□मती□सन 2007 .चे वि.स.वि. ज्रमांज 36 मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयज मांडज्यात आले आहे.

श्री. रणजित कांबळे : महोदय,मी आपल्या अ□मती□स□ 2007 चे वि.स.वि. ज्रमांज 36 मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेज्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, विधेयकाच्या उद्देश व कारणांमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे मी त्याची पुनरुक्ती न करता माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत व या विधेयकाबाबत माझे म्हणणे माझ्या उत्तराच्या भाषणामध्ये अधिक स्पष्टपणे मांडीन.

प्रश□प्रस्तुत झाला.

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सन 1958 च्या ग्रामपंचायत अधिनियमामध्ये सुधारणा करण्याकरिता मंत्रिमहोदयांनी या सभागृहामध्ये हे विधेयक मांडले आहे. जात पडताळणीचा कालावधी शासनाने एक महिन्यांनी वाढविला आहे. खरे म्हणजे शासनाने अध्यादेश काढून हा कालावधी वाढविला होता त्याची मुदत संपून गेली आहे. महाराष्ट्रामधून जात पडताळणीच्या कार्यालयामध्ये जवळपास दीड लाख अर्ज पडून आहेत. त्यामध्ये काही निवडणुकांशी संबंधित तर काही विद्यार्थ्यांचे आहेत. अशाप्रकारे वेगवेगळया स्तरावरील अर्ज प्रलंबित आहेत. या प्रलंबित असलेल्या अर्जांवर महिनोगणती शासनाकडून निर्णय होत नाही. आज कॉलेजमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोव्हिजनल प्रवेश घ्यावा लागत आहे. जात पडताळणी कार्यालयाकडे अर्ज केला तर त्यांच्याकडून आमचे प्रमाणपत्र घेऊन जा असे सांगण्यात येते. अशाप्रकारे जर जात पडताळणीचे अर्ज प्रलंबित राहिले तर विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाच्या दृष्टीने ते अडचणीचे व त्रासदायक होणार आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु.....

कारण त्या कार्यालयामध्ये कर्मचारी वर्ग अपुरा आहे, त्यामुळे निर्णय होत नाहीत. लोक कार्यालयामध्ये चकरा मारतात, त्यांच्याशी कर्मचारी बोलत नाहीत, रिस्पॉन्स देत नाहीत. त्यांना सांगितले जाते की, कागदपत्रे येथे ठेवून द्या. त्यानंतर त्याबाबत महिनोनमहिने निर्णय होत नाही. ठाणे परिसरामध्ये जातपडताळणी करून दाखले दिले, त्यामध्ये लाखो रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे. खरे म्हणजे मुदत ही अपुरी आहे. ती मुदत सहा महिन्याची केली असती तर आणखी लोकांना न्याय मिळाला असता, एवढेच या विधेयकाच्या बाबतीत सांगावयाचे आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जी सूचना मांडली त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. जातपडताळणी हे एक भ्रष्टाचाराचे वेगळे कुरण बनलेले आहे. निवडणुकीच्या निमित्ताने कोकण भवन येथे मला जाण्याचा योग आलेला होता. माझ्याबरोबरचे जे कार्यकर्ते होते, त्यांच्याकडून पाच-पाच हजार रुपये, दहा-दहा हजार रुपये देऊन प्रमाणपत्रे घेतलेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. आज ग्रामपंचायतीच्या, जिल्हापरिषदेच्या निवडणुकीला उभे राहिल्यानंतर जातपडताळणी प्रमाणपत्र घेण्याकरिता कोकणभवन येथे जावे लागते. सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी मांडल्याप्रमाणे एक महिन्याची मुदत वाढ मागितलेली आहे ती सहा महिन्याची करावी. जेणेकरून निवडणुकीमध्ये पैशाचा आणि सरकारी यंत्रणेचा अपव्यय होणार नाही, या दृष्टीकोनातून ही दुरुस्ती करावी. जेणेकरून जातपडताळणीच्या संबंधात सुधारणा झाली पाहिजे. आज जवळजवळ जातपडताळणीच्या 10 हजार फाईल्स प्रलंबित आहेत. लिफ्टमध्येच एका शिपायांने तुमची फाईल काढून देतो म्हणून माझ्याकडे पैसे मागितले. मी आमदार आहे, असे त्याला सांगितले तरी त्याचे त्याला काही वाटले नाही. हे कोठेतरी थांबले पाहिजे. अनेकवेळा सभागृहामध्ये जातपडताळणीच्या विषयावर चर्चा केलेली आहे. आपल्याला पहायचे असेल तर माझ्या मोबाईलवर रेकॉर्डींग केलेले आहे, त्यावरून आपल्याला काय चालते ते कळेल. नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये मी आणि खालच्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.देवेंद्र साटम आम्ही कोकण भवनला गेलो होतो, त्या ठिकाणी आम्ही आरडाओरडा केला म्हणून त्यांनी 10 वाजेपर्यन्त कार्यकर्त्यांची जातपडताळणी सर्टिफिकेटस् दिलेली आहेत. आता आपण एक महिन्याची मुदतवाढ मागितलेली आहे, ती सहा महिन्याची केली तर त्याचा उपयोग होईल. सन्माननीय मंत्री महोदयांना मी विनंती आहे की, पुढील आठवड्यापर्यन्त अधिवेशन आहे तोर्पन्त यामध्ये सुधारणा करावी.

----

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 आणि महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी हे विधेयक क्रमांक 36 आणलेले आहे.

सभापती महोदय, या देशामध्ये मंडल आयोगाचे हे उपकार आहेत. मंडल आयोग आणून भ्रष्टाचाराची एक व्यवस्था देशामध्ये केलेली आहे. यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार आणि जातीजातीमध्ये भिंती घालण्याचे काम झालेले आहे. आमच्या पक्षाने मंडल आयोगाला विरोध केलेला होता. माननीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी जातीजातीमध्ये अशाप्रकारच्या भिंती उभ्या करू नयेत, त्याचे दूरगामी परिणाम या देशाला भोगावे लागतील, असे सांगितले होते. त्याचे प्रात्यक्षिक आपल्याला पहायला मिळत आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये नगरसेवक पदासाठी उभ्या राहिलेल्या उमेदवारांना कोकणभवन येथे जावे लागते.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

रायगड जिल्ह्यातील लोकांना किंवा अन्य ठिकाणच्या लोकांना त्यांच्या भागात जावे लागते किंवा कोकण भवनला यावे लागते. त्या ठिकाणी जो भ्रष्टाचार चाललेला आहे त्याबद्दलचे वर्णन सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी आपल्यासमोर केलेलेच आहे. आपण ही मुदत वाढवित असताना एक महिन्यासाठी अध्यादेश काढला. तीन महिन्यांऐवजी चार महिन्यांची मुदत करावी असे यामध्ये सांगितले आहे. म्हणजे त्या लोकांचे आणखी उखळ पांढरे झाले. खरे म्हणजे ही मुदत त्याचवेळी सहा महिन्यांची केली असती तर भ्रष्टाचाराला आळा बसला असता. अर्जेन्सी आली की, भ्रष्टाचार वाढतो असे याचे तत्व आहे. या तत्वाचा शासन विचार करीत नाही. आपल्या खात्यातील लोक कमवत आहेत तर कमवू द्या या भावनेतून अशी व्यवस्था होते. त्याबद्दल दु:ख होते, वेदना होतात. लोकशाहीमध्ये निवडणूक लढवावयाची असेल तर आधी त्या लोकांच्या तोंडात पैसे कोंबून त्यांची तोंडे बंद करावी लागतात. त्यानंतरच जातीचे सर्टिफिकेट मिळू शकते. जात पडताळणी यंत्रणा ही अत्यंत अकार्यक्षम आहे. त्या यंत्रणेकडून ज्या गतीने काम व्हावयास पाहिजे तसे होत नाही. त्याबाबतीत कोणत्याही प्रकारचे डायरेक्टीव्हज शासनाने दिलेले नाहीत. शासनाने चार महिन्यांची मुदत दिली होती. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका जाहीर झाल्या की, त्या लोकांना अक्षरश: चांगले दिवस येतात. ते लोक दिवाळी साजरी करतात. मला असे सुचवावयाचे आहे की, आपण हे विधेयक मागे घ्यावे. आम्ही या बिलाला सुधारणा दिलेली नाही परंतु आम्ही याबाबत सूचना करीत आहोत. शासनाने एक महिन्याचा अध्यादेश काढलेला आहे. ती मुदत वाढवून सहा महिने करावी. वाटल्यास त्यासाठी पुढच्या आठवड्यात विधेयक आणावे. आणखी एक अध्यादेश काढावा. माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत की, फार कमी लोक राहिलेले आहेत. परंतु अनेक लोकांची प्रकरणे प्रलंबित आहेत. जात पडताळणी सर्टिफिकेटच्या संदर्भात काही लोकांना कोर्टामध्ये जावे लागते. काही लोकांचे जात प्रमाणपत्र व्हॅलिड झाले तर काही लोकांचे इनव्हॅलिड झाले. त्या ठिकाणी अनेक प्रकारचे गोंधळाचे वातावरण आहे. ज्या अनेक लोकांना आरक्षित जागेवर निवडणूक लढवावयाची असेल अनेक लोकांसमोर प्रश्नचिन्ह उभे आहे. मी निवडणूक लढविल्यानंतर माझे जातीचे प्रमाणपत्र व्हॅलिड आहे की, इनव्हॅलिड आहे हे त्यांना समजण्यास

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .......

मार्ग नाही. जात पडताळणी समितीने सर्टिफिकेट दिले की, आपण सुटलो असे नाही. ते प्रमाणपत्र निवडणूक आयोगाने स्वीकारावयाचे असते. आपल्या काँग्रेस पक्षाबद्दल बोलावयाचे तर मुंबई शहरामध्ये ज्या ज्या ठिकाणी काँग्रेसचे उमेदवार पडले त्या त्या ठिकाणी काँग्रेस पक्षाने तेथील निवडीला आव्हान दिले आहे. त्यामुळे त्या लोकांना कोर्टात जावे लागले आहे. निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात लढविली पाहिजे. हरलो तर हरलो आणि जिंकलो तर जिंकलो. आम्ही याचा अनुभव घेतलेला आहे. आम्ही हे धंदे करीत नाही. आम्हाला हायकोर्टमध्ये जाऊन जिंकावे लागले. काँग्रेस पक्ष हा आपल्या लोकशाहीतील सगळ्यात जुना पक्ष आहे. आपण मनाचा मोठेपणा दाखववायास पाहिजे. नवीन लोक, नवीन तरुण या प्रोसेसमध्ये येत आहेत. या तरुणांना सामावून घेण्याची क्षमता काँग्रेस पक्षामध्ये आहे. परंतु करायचे काय ? जी इच्छाशक्ती असावयास पाहिजे ती नाही. सौ. प्रतिभाताई पाटील राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी उभ्या राहिल्या. त्या महाराष्ट्र कन्या आहेत त्यामुळे आम्ही त्यांना पाठिंबा दिला. त्यासाठी आम्ही आपली परवानगी विचारत बसलो नाही. आमची ही भूमिका आहे. अशा पध्दतीची व्यापक भूमिका प्रत्येक पक्षाने स्वीकारली तर कोर्टाचे खटले अर्ध्यापेक्षाही कमी होतील. परंतु तसे घडत नाही. त्यामुळे आपण जे विधेयक आणले आहे त्याबाबत विचार करावा. चार महिन्यांची जी मुदत आहे ती कमीतकमी सहा महिने करावी. त्यामुळे त्या ठिकाणी पैशाचा जो भ्रष्टाचार चाललेला आहे तो थांबेल आणि योग्य वेळेमध्ये लोकांना जात पडताळणी सर्टिफिकेट मिळू शकेल. कोणत्याही कोर्टामध्ये गेले तरी ते सर्टिफिकेट इनव्हॅलिड ठरणार नाही अशा पध्दतीचे सर्टिफिकेट देण्याची व्यवस्था होण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 18:35

(श्री. मधुकर सरपोतदार....)

तेथे सुध्दा भ्रष्टाचार चाललेला आहे त्यामुळे हे सर्व प्रकार चालले आहेत. व्हॅलिडेटिंग सर्टिफिकेट हे जरी अंतिम असले तरी कोर्टामध्ये ते परत व्हेरिफिकेशनसाठी येते. हा मी आमचा अनुभव आपणास सांगत आहे. म्हणून या सर्व प्रश्नांकडे माननीय मंत्री महोदयांनी आत्मियतेने पहावे. जे कायदे कराल ते लोकांना सहाय्य करणारे असावेत, ते लोकांचे जीवन उद्ध्वस्त करणारे तसेच निवडणुकांच्या प्रक्रियेमध्ये अडथळा आणणारे नसावेत. श्रीमंताना जसा निवडणुका लढविण्याचा अधिकार आहे तसा गरीब माणसांना देखील निवडणुका लढवून जिंकून येण्याचा अधिकार आहे. सर्व समाजाचे प्रतिनिधी या ठिकाणी यावेत या दृष्टीने कायदे व्हावेत. या बाबतीत शासनाने अध्यादेश काढलेला आहे. विधेयकाच्या खंड 4 मध्ये असे म्हटलेले आहे की, " मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, 2007 हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. अध्यादेश काढल्या शिवाय हे राज्य चालूच शकत नाही अशी परिस्थिती आहे. कोणतीही गोष्ट म्हटली की, माननीय राज्यपालांचा उपयोग करुन अध्यादेश काढला जातो आणि तो निरसित करण्यासाठी विधेयक आणले जाते. आमच्या समोर आणलेले हे विधेयक अध्यादेशाच्या संदर्भातून आलेले आहे त्यामुळे ते स्वीकारलेच पाहिजे. उद्देश व कारणे यामध्ये असे म्हटलेले आहे की, अशी परिस्थिती निर्माण झाली आणि त्याबाबत माननीय राज्यपालांना खात्री पटली म्हणून त्यांनी अध्यादेशाला मंजुरी दिली. एवढे मोठे संकट पडले होते म्हणून त्यांनी अध्यादेशाला मंजुरी दिली. माझे एवढेच सांगणे आहे की, भविष्य काळात तरी या प्रश्नाकडे गांभीर्याने पहा आणि जो अध्यादेश काढला तो लोकांना उपयोगी पडेल, त्याचा त्यांना फायदा होईल, लोकांचे कष्ट वाचतील, वेळेचा अपव्यय होणार नाही या गोष्टी विचारात घेऊन विधेयक आणा. आपण जे काम करता त्याचे भ्रष्टाचारी लोक कौतुक करतात, सर्वसाधारण नागरिक कौतुक करीत नाहीत याची नोंद घेऊन आपण काम करा एवढीच माझी आपणास विनंती आहे. धन्यवाद.

---

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मेजर सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदय, मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकावर बोलताना सन्माननीय सदस्यांनी अनेक गंभीर विषय उपस्थित केले. जात पडताळणी समितीच्या भ्रष्टाचाराबाबत या ठिकाणी वक्तव्य करण्यात आले. याबाबतीत मी आणखी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देत आहे की, या जात पडताळणी सर्टिफिकेटमुळे असंख्य लोकांचे जीवन उद्ध्वस्त झालेले आहे. माझ्या माहिती प्रमाणे सेंट्रल बँक आणि बँक ऑफ इंडिया या बँकामध्ये 25 वर्षापासून नोकरी करणा-या 69 कर्मचा-यांना काढून टाकण्यात आलेले आहे. सभापती महोदय, सुरुवातीला 25 वर्षापूर्वी त्यांना जातीच्या आधारावर नोक-या मिळाल्या. आता त्यांनी कोणाचे समाधान केले नाही म्हणून, त्यांना जात पडताळणी सर्टिफिकेट मिळाले नाही म्हणून, त्यांना नोकरीतून काढून टाकण्यात आलेले आहे. जात पडताळणी सर्टिफिकेट मिळत नसल्यामुळे केवळ महाराष्ट्रातीलच सेंट्रल बँक आणि बँक ऑफ इंडिया या बँकेतील 69 कर्मचा-यांनाय काढून टाकण्यात आले. अशा प्रकारे भारतील अन्य कोणत्याही राज्यामध्ये या बँकातील कर्मचा-यांना काढून टाकलेले नाही. फक्त महाराष्ट्र राज्यामध्ये बँक ऑफ इंडिया, पोस्ट, रेल्वे यामधील अनेक कर्मचा-यांवर या जात पडताळणी सर्टिफिकेटमुळे संकट आलेले आहे. या कर्मचा-यांना वाचविणे आवश्यक आहे. जात पडताळणी सर्टिफिकेट समितीच्या भ्रष्टाचाराबाबत अनेक सन्माननीय सदस्याने वक्तव्य केलेले आहे. जात पडताळणी समितीकडून योग्य प्रकारे सर्टिफिकेट दिले जाते की नाही हे पाहिले पाहिजे. सेंट्रल बँक, बँक ऑफ इंडिया, रेल्वे, पोस्ट यामध्ये काम करणारे कर्मचारी हे महाराष्ट्रातीलच आहेत आणि त्या कर्मचा-यांना संरक्षण देण्याची जबाबदारी ही महाराष्ट्र शासनाची आहे. तेव्हा त्या दृष्टीकोनातूनही सर्टिफिकेट देण्याच्या बाबतीत जाणीवपूर्वक लक्ष घालून कारवाई केली पाहिजे.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MAP/ SBT/ प्रथम श्री.शिगम एम. ...... 18:40

मेजर सुधीर सावंत.......

सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सुचविल्यानुसार ही मुदत फक्त एक महिना वाढविण्यात काय अर्थ आहे ? कारण फक्त एकच महिन्याची मुदत वाढविली आणि काही सर्टिफिकेट्स तात्काळ मिळवावयाची असतील तर भ्रष्टाचाराची ही प्रक्रिया आणखी वेगाने वाढते म्हणून जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्याची मुदत सहा महिने पर्यंत वाढवून द्यावी, अशी मी विनंती करतो, आणि या विधेयकाचे समर्थन करतो.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4S - 2

ॲड.अनिल परब ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा ) : जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात आली होती. तीन महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर संबंधित उमेदवाराची निवड रद्द केली जाईल, असे सुरुवातीला सांगितले होते. मागच्या अधिवेशनामध्ये यासंदर्भातील मुदत वाढविण्यात आली होती. आता या विधेयकाद्वारे ही तीन महिन्यांची मुदत आणखी एक महिन्याने वाढविण्यात येत आहे. एकंदर मुंबई महानगरपालिका,नगरपालिका,जिल्हापरिषद अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या संदर्भात प्रचंड मोठया प्रमाणात जो भ्रष्टाचार झाला, त्याबाबत येथे वारंवार उल्लेख केला गेला परंतु याचे मूळ कारण जर आपण शोधले तर त्यामध्ये सुरुवातीला जात पडताळणी समितीच्या काही अधिका-यांनी असा समज पसरविला की, जर तीन महिन्याच्या आत हे वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही, तर जो कँडिडेट दोन नंबरला आहे त्याला आम्ही एक नंबर देऊ मग तो ताबडतोब एक नंबरला येईल. असा एक समज जाणीवपूर्वक पसरविला गेला होता जो सभासद एक नंबरला असतो, त्याला वैधता प्रमाणपत्राच्या बाबतीमध्ये व्हिजिलन्स ऑफिसर असतो तो त्या प्रथम क्रमांकाच्या उमेदवाराला फोन करतो व सुरुवातीलाच दम देऊन सांगतो की, या ठिकाणी तुम्ही अमुक वेळेला उपस्थित राहा, मला तुमची सर्व प्रमाणपत्रे प्रत्यक्ष शाळेत जाऊन तपासावयाची आहेत, तसेच तुम्ही जी कागदपत्रे सादर केलेली आहेत, ती देखील मला तपासावयाची आहेत. अशा प्रकारे जो निवडून आलेला उमेदवार आहे त्या उमेदवारावर दबाव टाकला जातो आणि त्याच वेळेला जो दोन नंबरचा उमेदवार असतो त्याच्याकडे देखील अशा प्रकारची बातमी पसरविली जाते की, या प्रथम क्रमांकाच्या उमेद्वाराचे सर्व प्रमाणपत्र जर इनव्हॅलिड सिध्द झाले तर तुला आपोआपच एक नंबर मिळेल. मागच्या वेळी जेव्हा या संदर्भात चर्चा झाली होती, त्यावेळी माननीय मंत्री श्री. राजेश टोपे हे सभागृहात हजर होते त्यांनी आपल्या उत्तरात सांगितले होते की, कोणत्याही परिस्थितीत असे होणार नाही, निवडणूकच घेतली जाईल. ही बातमी पेपरमध्ये आल्यानंतर जातीचे वैधता प्रमाणपत्र देण्याच्या संदर्भात पैसे घेण्याचे प्रमाण हळूहळू कमी झाले, असे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सुध्दा सांगितले. सभापती महोदय, यासंदर्भात त्या कार्यालयाच्या लिफ्टमध्ये देखील पैसे मागितले जात होते. जात पडताळणी समितीच्या कार्यालयाच्या बाहेर असणारे शिपाई, वकील जे असतात ते सुध्दा असे सांगतात की, अमुक अमुक वकिलांकडे जा आणि त्यांना पैसे द्या तुमचे काम होईल.

ॲड.अनिल परब.......

ते तुम्हाला डायरेक्ट जातीचे वैधता प्रमाणपत्र देतील, जातीचे वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी आजकाल तीन-चार लाख रुपये प्रत्येक निवडून आलेल्या व्यक्तीकडे मागितले जात आहे. जो उमेद्वार हरला त्याच्याकडेही पैसे मागितले जातात आणि शेवटी त्या अधिका-यांना जे करावयाचे असते तेच करीत आहेत. दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, जात पडताळणीचा सक्षम अधिकारी हा ॲडिशनल कलेक्टर लेव्हलचा असावा लागतो, परंतु तो डेप्युटी कलेक्टरच्या लेव्हलचा आहे याबाबतही हाय कोर्टामध्ये अनेक याचिका प्रलंबित आहेत कारण हायकोर्टामध्ये देखील यासंदर्भातील केसेसना चॅलेंज केले गेलेले आहे. यासंदर्भामध्ये आज सकाळी ठाणे कोर्टामध्ये दोन निकाल लागलेले आहेत आणि यानंतर मुंबई कोर्टामध्येही चार-पाच निकाल लागणे अपेक्षित आहेत. जात पडताळणी समितीच्या अधिका-यांचे काम हे आहे की, यासंदर्भातील उमेद्वारांने जी कागदपत्रे सादर केलेली आहेत, ती खरी आहेत की नाहीत, त्या कागदपत्रांची तपासणी करुन सक्षम अधिका-यांसमोर यासंबंधीचा अहवाल ठेवावयाचा असतो त्यानंतर तो सक्षम अधिकारी जातीचे प्रमाणपत्र वैध आहे की, अवैध आहे ते ठरवित असतो. ब-याचशा रिपोर्टमध्ये हे लिहिले गेलेले आहे की, व्हेरिफिकेशन अंती अमुक अमुक प्रमाणपत्रे इनव्हॅलिड आहेत. हा अधिकार प्राथमिक तपासणी करणारा जो अधिकारी असतो, त्याला दिला ? त्या अधिका-याच्या वरचा जो सक्षम अधिकारी आहे, ज्याच्याकडे संबंधित उमेदवारांच्या प्रमाणपत्रांच्या प्राथमिक तपासणीचे अहवाल सुपूर्द केले जातात, जो सुनावणी करतो व जो तुमचे म्हणणे ऐकून घेऊन मग निर्णय देतो, तो सक्षम अधिकारी आहे. तो सक्षम अधिकारी ठरवित असतो की, जातीचे प्रमाणपत्र अवैध आहे की वैध आहे. ब-याचशा केसेसमध्ये जिंकलेल्या उमेदवाराला बोलाविले जाते.....

यानंतर श्री.कानडे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ SBT/ 18:45

ॲड. अनिल परब....

या पध्दतीने तुम्ही सही केलेली आहे. उद्या तुम्ही सही करणार आहात त्याच्या अगोदर सांगा याबाबतीत काय करावयाचे ? अशा पध्दतीने सरळसरळ पैसे काढले जातात. पैसे मागून रिपोर्ट लिहिला जातो. याबाबतीत अतिशय सखोल चौकशी होण्याची आवश्यकता आहे. याविषयाच्या बाबतीत मी 2/3 उदाहरणे देणार आहे. मुलाला व्हॅलिडीटी दिली. त्याआधारावर मुलाने इंजिनिअरींग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि शिक्षण पूर्ण केले. त्याचे वडील निवडणुकीला उभे राहिले. तेच कागदपत्र सादर केले. त्याच्या वडिलांना प्रमाणपत्र मिळाले होते. त्यांनी सांगितले माझ्या वडिलांना प्रमाणपत्र मिळाले,मुलाला मिळाले आता मला मिळण्यास काय हरकत आहे ? परंतु त्याची प्रमाणपत्राची वैधता रद्द केली. आता हायकोर्टामध्ये समितीवर ताशेरे ओढले जातील, संबंधित खात्यावर ओढले जातील. अधिकारी बरोबर काम करतात किंवा नाहीत हे पाहणे आवश्यक आहे. अतिशय बारकाईने तपासणी करणे आवश्यक आहे. वैश्यवाणी ही जात आहे. ज्यावेळी ही जात ओबीसी प्रवर्गात घेतली गेली. कोर्टाने सांगितले त्यावेळचे कागदपत्रे सादर करा. हे कागदपत्र कोणाकडेच नाहीत. सगळेच अधांतरी आहे. जातीचे प्रमाणपत्र माझ्या भावाला मिळाले आणि माझ्या काकाला मिळाले. निवडणुकीत दोघे उभे राहिले एक पडला आणि एक निवडून आला. एकाला व्हॅलिडीटी मिळाली एकाला मिळाली नाही. सभापती महोदय, दैवज्ञब्राम्हण म्हणजे सोनार. वडिलोपार्जित धंदा आहे. जातपडताळणीसंबंधी सिध्द झालेला आहे. पूर्ण चौकशीमध्ये हे सोनार आहेत. गॅझेटमध्ये दैवज्ञब्राम्हण असल्यामुळे वैधता मिळाली नाही. खात्याने अशा केसेस अतिशय गंभीरपणाने बघितल्या पाहिजेत. जातीचा असूनही ती जात मान्य करणार नसाल तर हे अन्याय करण्यासारखे आहे. सभापती महोदय, कुरीयन शेट्टी अशी एक जात आहे. कुरीयन नंतर स्वल्पविराम आणि शेट्टी. महिला उमेदवाराची जात कुरीयन शेट्टी आहे. तिने केस दाखल केली. शासनाने उत्तर दिले. सांगितले की कुरीयनशेट्टी हे एकच. स्वल्पविराम चुकीचा आहे. चूक स्वल्पविरामाची झाली आहे. समाजकल्याण खात्याने तसे पत्र दिले.प्रिटींग मिस्टेक असू शकेल. परंतु शासनाने चूक केली असता त्या उमेदवाराचे काय चुकले ? त्यानंतर पुन्हा पोलिसांनी नोटीस काढली की चुकीचे प्रमाणपत्र सादर केले म्हणून तुमच्यावर गुन्हा दाखल करु. म्हणजे शासनाच्या चुकीचे परिणाम उमेदवारांना मात्र वेगवेगळया पध्दतीने भोगावे लागतात. लिटीगेशन झालेल्या आहेत. ज्या केसेस समितीकडे दिलेल्या आहेत त्यांची वैधता तपासणे हे समितीचे काम आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ SBT/ 18:45

ॲड. अनिल परब ...

एकाच गावातील दोन वैश्यवाणी निवडणुकीला वेगवेगळया पक्षातून उभे राहिले. एक निवडून आला एक पडला. एकाचे प्रमाणपत्र वैध ठरविले आणि दुसऱ्याचे जातप्रमाणपत्र अवैध ठरविले. ही सगळी शासनाच्या अधिकाऱ्यांची चूक आहे. या शासनावर उद्या कोर्टात ताशेरे ओढले जाण्याची शक्यता आहे आणि कोर्टात शासनाला भोगावे लागणार आहे. ज्या सक्षम अधिकाऱ्यांनी जातप्रमाणपत्र दिलेले आहे ते सक्षम आहेत किंवा नाहीत हे अधिकार तपासण्याचे अधिकार शासनाचे आहेत. सध्याचा 3 महिन्यांचा कालावधी 4 महिने केला जाणार आहे. परंतु तो 6 महिने करावा अशी माझी विनंती आहे. कारण बऱ्याच केसेस रेफरबॅक होणार आहेत.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब........

कारण त्यामध्ये मूळ मुद्दा हा आला की, ज्या अधिकाऱ्याला अधिकार नाहीत, जो ॲडिशनल कलेक्टर असला पाहिजे त्याऐवजी डेप्युटी कलेक्टर असलेल्या अधिकाऱ्याने अहवाल दिला आहे. त्यामुळे बऱ्याच केसेस रेफर बॅक होणार आहेत. एका महिन्याच्या वाढीव कालावधीमध्ये हे काम पूर्णत्वास जाणार नाही आणि याचे पातक शासनाच्या डोक्यावर येणार आहे. दुरुस्ती करण्यासाठी ज्या केसेस येतील त्यासाठी शासनाचा प्रतिनिधी नियुक्त करुन बारकाईने प्रत्येक प्रकरणाचा अभ्यास करुन निर्णय घेण्यात आला पाहिजे. सभापती महोदय, हे अधिकारी इतके हुशार आहेत की, ते स्वत: पैसे घेत नाहीत. वेगवेगळी माणसे त्यांनी नेमली आहेत. कोणीही स्वत: अडकणार नाही याची काळजी घेतली आहे. प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचाराचे कुरण जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या माध्यमातून शासनाने खुले केले आहे. या कुरणाला टाळे लावावे. यामध्ये ज्यांना न्याय अपेक्षित आहे त्यांना योग्य तो न्याय मिळेल यादृष्टीने दक्षता घ्यावी आणि 4 महिन्याऐवजी 6 महिन्यांचा कालावधी करावा अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक-36 मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा8 विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी आणि या विधेयकावर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंगजी फुंडकर यांनी जो मुद्दा मांडला त्या मुद्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ग्रामपंचायत अधिनियम, 1958 प्रमाणे गोंदिया व भंडारा जिल्हे आता विभक्त झालेले आहेत. येत्या दोन महिन्यानंतर ग्रामपंचायतीच्या निवडणुका होणार आहेत. जात प्रमाणपत्राअभावी साधारण गरीब माणूस निवडणूक लढवू शकणार नाही हे निर्विवाद सत्य आहे. कारण बॅकलॉगमुळे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये अशा पात्र माणसाला उभे करावे लागते, जो अनुसूचित जाती-जमातीचा किंवा ओबीसी प्रवर्गातील असतो. तो निवडणुकीसाठी अनामत रक्कम भरु शकत नाही. वॉर्डमधील लोक निधी गोळा करुन अशा उमेदवाराची अनामत रक्कम भरतात आणि त्याला निवडून आणण्याचे काम करतात. अशी व्यक्ती जात प्रमाणपत्र कुठून आणणार हा मोठा प्रश्न आहे. जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तहसीलदाराकडे खेटे घालावे लागतात. अर्ज भरुन ए टू झेड जोडपत्रे जोडून तो अर्ज तहसीलदाराकडे दिल्यानंतर एसडीओ प्रमाणपत्र देत असतो. त्यासाठी किती परिश्रम करावे लागतात, किती आर्थिक खर्च येतो याची सभागृहाला कल्पना असली पाहिजे. खेड्यापाड्यातील माणसाला त्यासाठी शहरात यावे लागते. तालुक्याच्या ठिकाणी येण्याजाण्याचा खर्च करावा लागतो. निवडणूक लढविण्यासाठी जात प्रमाणपत्र तातडीने हवे असते. त्यामुळे चार-आठ दिवसात ते मिळविणे आवश्यक ठरते. माझी शासनाला विनंती आहे की, तालुक्याच्या ठिकाणी तहसीलदार आणि एसडीओ यांच्यामार्फत जात प्रमाणपत्र दिले जात असल्यामुळे ग्रामपंचायतीची निवडणूक असेल तर तालुक्याच्या ठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांनी कॅम्प घेतला पाहिजे. सन्माननीय शिक्षण मंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. शिक्षणाधिका-यांना मंजुरी द्यावयाची असेल तर ते कॅम्प घेतात. ज्या त्रुटी असतील त्या जागच्या जागी नजरेस आणून दिल्या जातात आणि त्याची पूर्तता केल्यानंतर ताबडतोब मंजुरी दिली जाते. त्याप्रमाणेच जात प्रमाणपत्र देण्याबाबत व्यवस्था झाली पाहिजे. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी जात प्रमाणपत्र द्यावयाचे असेल तर तालुक्याच्या ठिकाणी कॅम्प घेतला पाहिजे. जिल्हा परिषदेची निवडणूक असेल तर जात प्रमाणपत्र देण्यासाठी जिल्हयाच्या ठिकाणी कॅम्प घेतला पाहिजे. नगरपरिषद किंवा नगरपालिकेची निवडणूक असेल तर त्या ठिकाणी कॅम्प घेतला पाहिजे. एका जिल्हयामध्ये साधारणपणे 8 ते 9

..3..

श्री.केशवराव मानकर.........

तालुके असतात. एक-एक दिवस प्रत्येक तालुक्यामध्ये कॅम्प घेतला तर साधारणपणे 9 दिवस लागतील. 15 दिवसाची मुदत दिली तर संबंधित व्यक्ती कागदपत्रे आणून सादर करु शकते. गरीब माणसाला अशा व्यवहाराचे ज्ञान नसते. यासाठी जन्माचा दाखला पाहिजे, आजोबांचा व वडिलांचा जातीचा दाखला तसेच त्याचा स्वत:चा जातीचा दाखला आवश्यक असतो. पोलीस पाटलाचा दाखला पाहिजे, ग्रामपंचायतीचा दाखला पाहिजे, तलाठ्याचा दाखला पाहिजे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ MAP/ SBT/ प्रथम श्री. भोगले... 18:55

श्री. केशवराव मानकर....

हे सर्व दाखले त्याला जमा करावे लागतात. सर्व दाखले जमा करणे हे काही सोपे काम नाही. सर्व जुने रेकॉर्ड शोधणे हे काम सोपे नाही. जन्म दाखल्यासाठी मग शाळेतील मुख्याध्यापकाकडे जावे लागते परंतु मुख्याध्यापक सांगतात तुम्ही 15 दिवसांनी या. त्यामुळे यासंदर्भात आपण 3-4 महिन्यांची जी मुदत दिलेली आहे ती कमी पडते, त्यामुळे ही मुदत सहा महिने केली पाहिजे. यासंदर्भात कोणकोणते अर्ज लागतात, काय काय माहिती जोडावी लागणार आहेत, या साठी सहा महिन्याची मुदत देणे आवश्यक आहे. यासंदर्भात कॅम्प घ्यावे. कॅम्प केले तरच जात पडताळणी प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळू शकेल. लोकशाहीमध्ये आज या जात पडताळणीय संदर्भात एक क्रुर थट्टा चालू आहे. निवडणूकीमध्ये निवडणूक लढण्यासाठी उभी असणारी व्यक्ती बरेच पैसे खर्च करीत असते. निवडून आल्यानंतर 3 महिन्यात जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करु शकले नाही तर ती व्यक्ती अपात्र ठरते. सभापती महोदय, बरेच पैसे खर्च करुन, मेहनत करुन निवडणूका जिंकल्या नंतर जर जातपडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्याचे पद जाणार असेल तर ते चांगले नाही. जातप्रमाण पत्र व जातपडताळणी प्रमाणपत्र मिळविण्यामध्ये जो भ्रष्टाचार सुरु आहे तो थांबवायचा असेल तर यासंदर्भात एका सक्षम अधिका-याची नियुक्ती करणे आवश्यक आहे. यासंदर्भात माझी सूचना आहे की, एका सरकारी निवृत्त न्यायाधिशाकडे यासंदर्भात काम द्यावे व त्यांनी कॅम्प घेऊन जात पडताळणीचे काम तेथे पूर्ण करावे.अशा प्रकारची व्यवस्था केली तर यामध्ये असलेला भ्रष्टाचार संपून जाईल व उमेदवारांना जातप्रमाणपत्र व जात पडताळणीप्रमाणपत्र वेळेमध्ये मिळेल. सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी वैधता जातप्रमाणपत्र व जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत सहा महिन्यापर्यंत वाढविण्यात यावी, अशी मागणी केलेली आहे ती योग्य असून सुस्पष्ट आहे.मुदत वाढवून दिल्यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, एनटीच्या गरीब समाजाला न्याय मिळू शकेल. त्यामुळे यासंदर्भात 6 महिन्याची मुदत वाढवून द्यावी तसेच जातप्रमाण पत्र जात वैधता प्रमाणपत्र देण्याच्या संदर्भात निवृत्त न्यायाधिशामार्फत कॅम्प घेण्यात यावे व सामान्य जनतेला न्याय मिळवून द्यावा. अशी व्यवस्था करण्यात आल्यानंतर सामान्य जनतेचा वेळ आणि पैशाचे अपव्यय होणार नाही.एवढी मागणी करुन आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.................. 

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या बिलाच्या चर्चेच्या दरम्यान काही महत्वाचे मुद्दे उपस्थित झालेले आहेत. राखीव जागेवर निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तीस नामनिर्देशनपत्र भरताना सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतु एकाद्या व्यक्तिने जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज करुनही नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकास, त्या व्यक्तिला जात पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल तर त्या व्यक्तीस ती निवडून आल्याच्या दिनांकापासून 3 महिन्याच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करता येत होते परंतु आता त्याची मुदत 4 महिने करण्यात आलेली आहे परंतु ही मुदत कमी असल्यामुळे ही मुदत सहा महिन्यांची करावी अशी आमची मागणी आहे. यासंदर्भात सहा महिन्याची मुदत वाढवून देण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाला सुधारणा मांडली असती तर बरे झाले असते, असे आता आम्हाला वाटू लागले आहे. मागच्या अधिवेशनात नगरपालिकेचे विधेयक मांडले होते, त्यावेळी येथे सांगण्यात आले होते की, एका सक्षम अधिका-याची नेमणूक करण्यात आलेली आहे. माझी अशी सूचना आहे की, आपण जो सक्षम अधिकारी नेमणार आहात, त्या अधिका-याने नियुक्ती नंतर प्रथम आपली प्रापर्टी जाहीर केली पाहिजे. राष्ट्रपती, खासदार, आमदारांना सुध्दा निवडणूकीच्या वेळी त्यांची प्रॉपर्टी जाहीर करावी लागते. ग्रामपंचायती निवडणूकीपासून सर्व निवडणूकीमध्ये उमेदवाराला त्याची प्रॉपर्टी जाहीर करावी लागते. त्यामुळे जातपडताळणीचे वैधता प्रमाणपत्र देणा-या अधिका-यांनी सुध्दा आपली प्रॉपटी प्रथम जाहीर करावी. यासंदर्भात आपण काय निर्णय घेणार आहात, याची माहिती मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी, अशी विनंती आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.दिवाकर रावते............

प्रचंड पैसा घेतला जातो हे सर्वांना माहीत आहे. आज ग्रामपंचायत, जिल्हापरिषदेच्या निवडणुकीत 20-25 लाख रुपये खर्च केले जातात. नगरपालिकेच्या निवडणुकीत एकेका मतासाठी पाच हजार-दहा हजार रुपये घेतले जातात. परभणी जिल्ह्यातील पूर्णा येथे एकेका मतासाठी 15 हजार रुपये देण्यात आल होते. वकील आणि डॉक्टर्ससुध्दा फॅमिलीसहीत पैसे घेऊन मतदानासाठी रांगेत उभे राहतात हे पाहून अतिशय वाईट वाटते. लोकशाहीची ही चेष्टा आहे. आपला जातीचा दाखला रद्द होईल अशी भीती उमेदवारास घातल्यास त्यासाठी तो पैसे मोजणारच. तेव्हा जात पडताळणी करण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांची नेमणूक केली पाहिजे. त्याठिकाणी ॲडीशनल कलेक्टर दर्जाचा अधिकारी नेमला पाहिजे. त्याची कामावर निष्ठा असली पाहिजे.

सभापती महोदय, एस.टी.एस.सी.,ओ.बी.सी. या समाजाला प्रतिनिधीत्व मिळण्यासाठी आरक्षण केलेले आहे. महिलांनासुध्दा प्रतिनिधीत्व मिळत नव्हते म्हणून महिलांसाठी सुध्दा आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. आरक्षण ठेवण्यामागील हा उद्देश आहे. काहीजण अवैध मार्गाने दाखला मिळवितात. जर दाखला अवैध झाला तर असा दाखला देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे. जातीचा दाखला देण्यासाठी जी नियमावली तयार करण्यात आलेली आहे त्यामध्ये अमूक अमूक कागदपत्रे पाहिजेत याची लिस्ट दिली पाहिजे. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी भाषण करताना एक उदाहरण सांगितले की, मुलाला, काकाला जातीचा दाखला मिळतो, परंतु मुलाच्या वडिलांना जातीचा दाखला मिळत नाही. वडील दुसऱ्या जातीचे असू शकतात काय ? जातीच्या दाखल्याच्या कारणास्तव पोटनिवडणूक झाली तर तो होणारा खर्च आपण कोणाकडून वसूल करणार आहात याबाबत विधेयकात कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. आपणास लोकशाही खऱ्या अर्थाने राबवावयाची असेल, महात्मा जोतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व शाहू महाराज यांच्या राज्यामध्ये पददलितांना न्याय मिळवून द्यावयाचा असेल तर आपणास विशेष

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.............

काळजी घ्यावी लागेल. ॲट्रॉसिटी कायद्यामध्ये जर एखाद्याने जातीवाचक शिवी दिली आणि ती सिध्द केली तर शिक्षा होते. हा विषय वेगळा आहे.

सभापती महोदय, सर्वसामान्यांना न्याय मिळण्यापासून वंचित ठेवणाऱ्यांना कडक शिक्षा झाली पाहिजे. पैसे देऊन दाखला मिळवून निवडणूक लढविण्याची कोणाचीही हिम्मत होणार नाही. अशी जरब निर्माण केली पाहिजे. आपल्यावर घरदार विकण्याची पाळी येईल अशी जरब बसली पाहिजे.

सभापती महोदय, मी आपणास सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एक घटना सांगतो. दैनिक "सामना" मधील "सच्चाई" सदरात ही बातमी आली होती. त्या महिलेचे नाव मला आठवत नाही. त्या महिलेने नसलेल्या महिलेच्या नावावर खाडाखोड करुन बोगस सर्टीफिकेट मिळविले आणि ते मान्य करायला लावले. तेव्हा अशा प्रकाराबाबत शासन कोणती भूमिका घेणार आहे ?

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

त्यासंदर्भात आपण कोणती कारवाई केली ? हे सर्व घडत आहे. सत्तेच्या बळाचा वापर करुन अशाप्रकारची किमया घडत आहे, त्यावर आपण निर्बंध घालणार की नाही ? यामध्ये जे दोषी आहेत, त्यांची चौकशी होणार की नाही ? केवळ याठिकाणी केले-केले, झाले-झाले, आम्ही हे वाढवून दिले आणि कायदा केला, असे चालणार नाही. याबाबतीत ठोस निर्णय होणे आवश्यक आहे. आम्ही सुधारणा दिली नसल्यामुळे, याचा कालावधी 6 महिने होणार नाही व तो आपण करणारही नाही. परंतु याठिकाणी दोन्ही खात्याच्या माध्यमातून नियंत्रण राहणे आवश्यक आहे. याठिकाणी आपल्याला खऱ्याअर्थाने लाभ द्यावयाचा असेल तर ठोस अशाप्रकारचे निर्णय घेतले पाहिजेत, अशी माझी इच्छा आहे. याठिकाणी मी जे मुद्दे मांडले त्याचा माननीय मंत्रिमहोदयांनी जरुर विचार करावा. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र !

-----

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, या विधेयकावर बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी आपले विचार मांडले. याठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांची एवढीच मागणी आहे की, या विधेयकाच्या माध्यमातून आपण एक महिन्याची जी मुदत आहे, ती आपण 6 महिन्यांची करावी. परंतु याबाबतीत मागची पार्श्वभूमीही लक्षात घेणे गरजेचे आहे. हे विधेयक जेव्हा आले, तेव्हा मुंबई हायकोर्टाने आणि इलेक्शन कमिशनने काही मार्गदर्शन सूचना दिल्या होत्या. मुंबई हायकोर्टमध्ये सन 2002 मध्ये अशाप्रकारच्या दोन केसेस दाखल झाल्या होत्या. ते लक्षात ठेऊन आाणि शासनाचा पैसा खर्ची पडतो, वेळ जातो म्हणून त्यामध्ये तसेच इतर सन्माननीय सदस्य निवडून आले असतील, अशा अनेक गोष्टी लक्षात ठेऊन तसेच माननीय उच्च न्यायालयाने जे आदेश काढले, त्यावेळी स्टेट इलेक्शनने ज्या सूचना केल्या त्या सर्व बाबी लघात घेऊन जात पडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध होण्याबाबतचा अध्यादेश काढण्यात आला. महानगरपालिकांच्या 125 सदस्यांचे, नगरपरिषदेच्या 15 अध्यक्षांचे आणि 54 सदस्यांचे सदस्यत्व जातींचे दाखले न दाखवल्यामुळे रद्द होण्याचा प्रसंग आला होता. जात पडताळणीसाठी मुदत मिळावी यासाठी शासनाने मागच्या डिसेंबर महिन्यात याबाबतीत ॲक्टमध्ये सुधारणा केली. सेक्शन 10 आणि 12 मध्ये ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यासंबंधी दिनांक 21.12.2006 मध्ये सुधारणा केल्या. 10 फेब्रुवारीला जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांचे नोटीफिकेशन आले होते. 23 फेब्रुवारीला नॉमिनेशन होते आणि निवडणुका मार्च महिन्यात झाल्या होत्या. सदरचा वेळ कमी होता म्हणून आम्ही तीन महिन्यांच्या आतमध्ये सदस्यांनी जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर आपले सदस्यत्व रद्द होणार आहे, असे केले होते. हे झाल्यानंतर शेवटची तारीख दिनांक 12 जून,2006 रोजीपर्यंतची होती. यासंदर्भात दिनांक 6 जून,2006 रोजी जेव्हा माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी आढावा बैठक घेतली, तेव्हा आमच्या निदर्शनास आले की, जवळपास 188 असे सदस्य होते की, ज्यांची आत्तापर्यंत कास्ट व्हेरिफाय झालेली नव्हती.

नंतर श्री.रोझेकर......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे........

त्यामुळे एक महिन्याची मुदतवाढ घेणे आवश्यक आहे, असे वाटले. जवळ जवळ 188 सदस्यांचे सदस्यत्व रद्द होणे योग्य होणार नाही म्हणून एक महिन्याची मुदतवाढ देण्यासाठी अध्यादेश काढण्यात आला. मी आपल्याला माहिती देऊ इच्छितो की, ज्यावेळी अध्यादेश लॅप्स झाला होता त्यावेळी जिल्हा परिषदेच्या 171 एस.सी.,एस.टी. च्या व 443 ओ.बी.सी.च्या केसेस पेंडिंग होत्या. पंचायत समिती स्तरावर 358 आणि 850 ओ.बी.सी.च्या केसेस पेंडिंग होत्या. आजच्या घडीला जिल्हा परिषदेची एस.सी.,एस.टी.ची एक केस सबज्युडिशिअल असल्यामुळे पेंडिंग आहे. पंचायत समिती स्तरावर एस.सी.,एस.टी.च्या 8 केसेस पेंडिंग आहेत, त्यापैकी तीन नागपूर व पाच अमरावती येथील आहेत. बाकी सर्व फॉर्म्समधील जात पडताळणी दाखला प्राप्त झाला असून त्याबाबत निर्णय झाला आहे. जात पडताळणी समितीकडे जातीचा दाखला गेल्यानंतर एकतर तो स्वीकृत होतो किंवा नाकारला जातो. हे अधिकार त्या कमिशनचे आहेत. ग्राम विकास विभागाचा केवळ इलेक्शनशी संबंध आहे, जे निवडून आले आहेत त्यांनी जात पडताळणी दाखला मिळविण्याबाबत कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक होते. त्यावेळी जो काही निर्णय घ्यावयाचा होता त्यासाठी नागपूरच्या अधिवेशनामध्ये विधेयक आणण्यात आले होते. त्यावेळी जात पडताळणी दाखला मिळविण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी पुरेल किंवा नाही, अशी विचारणा झाली होती. परंतु, वस्तुस्थिती अशी आहे की, जिल्हा परिषदेचे एस.सी.एस.टी.चे केवळ एक प्रकरण शिल्लक आहे व ते सबज्युडिशिअल असल्यामुळे पेंडिंग आहे. पंचायत समितीमधील एस.सी.,एस.टी.च्या 8 केसेस पेंडिंग आहेत. यापुढे कोणतीही निवडणुक असो, महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्राम पंचायत, पंचायत समित्या, त्यासाठी कोणत्याही उमेदवाराला उभे रहावयाचे असेल तर नॉमिनेशन भरतांनाच त्यांना जात पडताळणी दाखला जोडावा लागणार आहे. सन्माननीय सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, निवडून आल्यानंतर जात पडताळणी दाखला मिळवावा लागतो व त्यामध्ये त्यांना त्रास होतो. त्यासाठी नॉमिनेशन भरतांनाच जात पडताळणी दाखला जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी अशी मागणी केली की, ही मुदत सहा महिन्यांची करण्यात यावी. त्यासाठी मी हे निदर्शनास आणतो की, आता केवळ सहा फॉर्म्स शिल्लक आहेत. आज त्यांना आपण मुदतवाढ देऊ शकत नाही, कारण अध्यादेशामध्ये एक

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे..........

महिन्याचा काळ होता व तो आता संपला आहे. अध्यादेश लॅप्स होण्यापूर्वी हे झाले असते तर आपण त्यांना मुदतवाढ देऊ शकलो असतो. यापुढे ज्यांना निवडणुकीसाठी उभे रहावयाचे आहे त्यांना जात पडताळणी दाखला देणे बंधनकारक केले आहे. सन्माननीय सदस्यांनी कमिशनच्या कामाच्या व्यापाबाबत मुद्दा उपस्थित केला. अगोदर एस.सी.,एस.टी.साठी प्रत्येक विभागामध्ये एक याप्रमाणे विभागीय स्तरावर सहा कार्यालये होती. शासनाने नंतर बारा कार्यालये सुरु केली व आता पंधरा कार्यालये कार्यरत आहेत. त्या ठिकाणी कर्मचारीवर्ग कमी होता, त्यासाठी पदांची निर्मिती करणे आवश्यक होते, शासनाने 140 पदे निर्माण केली आहेत, भरतीची प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे जात पडताळणीची प्रक्रिया यापुढे जलद गतीने होईल. सन्माननीय सदस्यांनी अशी शंका व्यक्त केली की, जात पडताळणी करतांना भ्रष्टाचार होतो, त्यांच्यावर नियंत्रण असण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात विधानसभेत देखील चर्चा झाली आहे. आमच्या विभागाचे मंत्री, इतर सर्व संबंधित विभागाचे मंत्री यासंबंधी गांभीर्याने चर्चा करणार आहोत. योग्य मार्ग निश्चितपणे निघणार आहे. माझी आपल्या माध्यमातून सर्व सभागृहाला विनंती आहे की, हे विधेयक सभागृहाने मंजूर करावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, जर एस.सी., एस.टी. किंवा ओ.बी.सी. प्रवर्गाच्या कुटुंबातील एका व्यक्तीला जात पडताळणी प्रमाणपत्र मिळाले असेल तर त्या कुटुंबातील इतर सदस्यांना पुन्हा जात पडताळणी करण्याची आवश्यकता असू नये, असे वाटते. याबाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा केला तर बरे होईल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, पूर्वी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी होता. ही मुदत आता एक महिन्यांनी वाढविण्यात आली आहे. जोपर्यंत जात पडताळणीची कार्यवाही पूर्ण होत नाही तोपर्यंत विभागाने निवडणुक आयोगाला व्हॅकन्सी झ ााल्याचे कळवावयास नको. कारण आता तसे झालेले आहे. महानगरपालिकेने किंवा तत्सम स्वायत्त संस्थांनी व्हॅकन्सी क्रिएट करुन ठेवलेल्या आहेत. जोपर्यंत कालावधी पूर्ण होत नाही तोपर्यंत व्हॅकन्सी क्रिएट करु नये.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, दिनांक 12 जुलै पर्यंत आम्ही निवडणुक आयोगाला नोटिफिकेशन दिलेले नाही. जिल्हापरिषदा किंवा पंचायत समित्यांनी असे आदेश काढलेले नाहीत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना एकच प्रश्न विचारावयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे एखाद्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले तर ज्या प्राधिका-याने जात प्रमाणपत्र दिले असेल त्या प्राधिका-यांवर कोणती कारवाई करणार आहात ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, सन्माननीय सदस्यांनी मांडलेले मुद्दे अत्यंत महत्वाचे आहेत. यासंदर्भात आपल्याला काही तरी ठरवावे लागेल. हा प्रश्न फक्त निवडणुकीपुरता मर्यादित नाही. मुलांच्या शिक्षणापासून ते निवडणुकीपर्यंत जात प्रमाणपत्रांचा प्रश्न निर्माण होतो. सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांनी सांगितल्याप्रमाणे कुटुंबातील एका व्यक्तीकडे जात प्रमाणपत्र असेल तर त्या व्यक्तिच्या मुलांना किंवा मुलींना पुन्हा प्रमाणपत्र घेण्याची गरज पडणार नाही हे शासनाच्या विचाराधीन आहे यासंदर्भात शासन लवकरात लवकर कार्यवाही करेल.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते खंड 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 36 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 36 संमत झाले आहे.

--------

..3...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी.**

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रम पत्रिकेतील सन 2007 चे वि.प.वि. क्रमांक 3-महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (सुधारणा) विधेयक आज मंजूर करावे आणि सन 2007 चे वि.प.वि.क्र.5-मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक उद्या चर्चेला घ्यावे. कारण या विधेयकावर आम्हाला चर्चा करावयाची आहे. या विधेयकाला आम्ही सुधारणा दिलेली आहे. ते विधेयक आज चर्चेला घेऊ नये, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (सुधारणा) विधेयक.

**L. C. BILL NO.III OF 2007.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' PENSION ACT, 1976.)**

श्री.राजेश टोपे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक 3 -महाराष्ट्र विधान मंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, 1976 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 वि.प.वि.क्रमांक 3 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2007 चे वि.प.वि.क्र.3 संमत झाले आहे.

सभागृहापुढील कामकाज संपले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार दिनांक 25.7.2007 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.00 ते 12.00 वाजेपर्यत विशेष बैठक होईल. दुपारी 12.15 वाजता पुन्हा सभागृहाचे नियमित कामकाज सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7.23 मिनिटांनी बुधवार दिनांक 25.07.2007 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यत स्थगित झाली)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही